नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका


मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

अनुक्रमणिका



अनुक्रमणिका



विदर्भ साहित्य संघातर्फे आयोजित पहिल्याच दलित साहित्य संमेलनाचे उद्‌घाटन करतांना न्या. चंद्रशेखर धर्माधिकारी



विदर्भ साहित्य संघाच्या दलित साहित्य संमेलनास आशीर्वाद देत मार्गदर्शन करतांना डॉ. गंगाधर पानतावणे

(सविस्तर वृत्तांत पुढील अंकात)

युगवाणी

॥ विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र ॥

संपादक : श्रीपाद भालचंद्र जोशी
प्रबंध संपादक : केशव जोशी

॥ भाषा, साहित्य, संस्कृती, संवाद व कलाविषयक अभिरुचीचे जोपासन–संवर्धन–संशोधन ॥

वर्ष सत्तेचाळीसावे/अंक ४७-९ ते ४७-११ स-ऑ-नो.–१९९१
मूल्य–१० रु./वार्षिक वर्गणी : ५० रु.
त्रैवार्षिक वर्गणी १२५ रु.

अनुक्रम ■ ■ ■

[महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाकडून अंशतः अनुदान प्राप्त]

आवरण पृष्ठ / संजय धोतरकर

रेखाचित्रे : संदीप राशिनकर

मुद्रित शोधन / संकलन / प्रतिलिपी इ. सहकार्य : सौ. शोभा उबगडे /श्यामकांत कुळकर्णी / विलास देशपांडे

जाहिरात विभाग : प्रवीण बर्दापूरकर, आमंत्रक, प्रकल्प विभाग, वि. सा. संघ, नागपूर.

संपादकीय पत्रव्यवहार : संपादक / युगवाणी, विदर्भ साहित्य संघ,/ झाशी राणी चौक /नागपूर – १२

वर्गणी व वितरण विषयक पत्रव्यवहार : सरचिटणीस / विदर्भ साहित्य संघ, नागपूर



अनुक्रमणिका

संपादकीय

मानवी संस्कृतीच्या एका अद्भुत, अनोख्या अशा कालखंडातून आपण चाललो आहोत. एकाच वेळी 'प्रिमिटिव्ह आर्ट' पासून तो 'हाय-टेक आर्ट' पर्यंत सान्याच गोष्टी आपल्या अवतीभवती फेर घरून आहेत. संवादाच्या साधनांमधल्या अभूतपूर्व क्रांतीमुळे आज सतत चोवीस तास आपण संगीत, खेळ, करमणूक, राजकारण, वृत्त आणि माहिती व कलेच्या कितीतरी आकार-प्रकारांच्या सान्निध्यात आलो आहोत. केवळ एक-एक बटन दाबताच त्या त्या वातावरणात पोहोचू शकतो आहोत. अर्थात ही उपलब्धता प्रत्येकालाच आहे असे नव्हे. त्यातही अगदी टोकाचेच वातावरण निर्माण झालेले आहे. परंतु ज्याला ही उपलब्धता आहे त्याच्यापासून तो ज्याला ती नाही त्याच्यापर्यंत मधले सारे अंतर या वातावरणाच्या प्रभावाने व्यापले जाते आहे.

एकीकडे विभिन्न संस्कृतीतील भिन्न भिन्न बाबींच्या आदान-प्रदानातून एकमेकांत भिनत चाललेली एक आगळी वेगळी विश्वसंस्कृती वेगाने पसरत चालल्याचे आपण अनुभवतो आहोत तर दुसरीकडे (व कदाचित त्याचमुळे) आपआपल्या आद्य संस्कृतींबद्दलचा अभिनिवेश व त्या त्या संस्कृती, भाषा, वंश, प्रदेश, भूभाग इ. बद्दलचे आपले स्वामित्व, प्राचीनत्व, आद्यत्व व त्यावर आधारित आपली सांस्कृतिक विलगता टिकवण्याची धडपड करण्याची सामूहिक वृत्ती वाढीस लागली आहे.

एका नव्या, सांस्कृतिक राष्ट्रवादाची बीजे धारण करणाऱ्या, अशा गर्भार कालखंडाचे आपण साक्षीदार होत आहोत. आज एकाच वेळी एकीकडे राज्यसंस्थाच नामशेष होऊन विलय पावेल व मानवी शोषणाच्या साऱ्याच व्यवस्था संपुष्टात येतील असे आदर्शवादी स्वप्न रंगवणाऱ्या तत्त्वज्ञानावर आधारलेल्या आंतरराष्ट्रीयवादी राज्यसत्ता, यंत्रणा, महासत्ता आता छोटया छोटया राष्ट्रवादी सत्तेत रूपांतरित होत आहेत. तर दुसरीकडे त्याच्याच शेजारी त्याचवेळी छोटया राष्ट्रवादी सत्ता आपले एकच चलन, एक बाजारपेठ व एकच संसद यांचे स्वप्न साकार करून जणू (Continental) खंडीय शासनसत्तेच्या निर्मितीकडे वाटचाल करू लागल्या आहेत. या पद्धतीने एकीकडे समग्र विश्वात एक व्यवस्था, विश्वसरकारचे स्वप्न, विश्वनागरिकत्वाची चाहूल तर दुसरीकडे दुबळी केंद्रसत्ता, जुन्या अस्मितावाद्यांच्या व नवअस्मितावाद्यांच्या राष्ट्रवादी प्रेरणांमधून राष्ट्रांच्या व बदलणाऱ्या आणि हालणाऱ्या भौगोलिक सीमा अशा दुहेरी, दोन टोकाच्या मानसिक–सांस्कृतिक संघर्षात हे विश्व कधी नव्हे अशा प्रकारे सापडलेले आहे.

आधुनिक मानवी संस्कृती ज्यांच्या पायावर (व डोक्यावर) उभी आहे अशा साऱ्या मूलभूत क्रांत्या, त्यांचे क्रांतिकारकत्व, त्याचे प्रयोजन आणि मूल्ये यांची तपासणी–फेरतपासणी, त्यातील फोलपणा आणि श्रेष्ठत्व या दोहोसकट आज परीक्षणनलिकेत घातल्या जाते आहे.

'मास' किंवा 'समूह' भावनेची जागा व्यक्ती आणि 'व्यक्तिवाद' घेत असून हे दशक व्यक्तिवादाची तुतारी वाजवीत आलेले व त्याचेच ढोल बडवीत राहणारे दशक असल्याचे सांगितले जात आहे.

एकूणच सारे कसे या विश्वाच्या विशाल 'मेल्टिंग पॉट' मध्ये वितळून–मिसळून जात असताना आप–आपल्या सांस्कृतिक अस्तित्वाचा विलय होण्याच्या शक्यतेने ग्रासले गेले आहे. या वैश्विक स्वरूपाच्या ग्रहणकालातून चाललेल्या या प्रवासात म्हणूनच कोणत्याच एखाद्या वाद (ईझम) प्रवाद किंवा प्रतिवादात जीवनाला मूल्यव्यवस्था प्रदान करण्याचे त्राणच उरलेले नाही. जे जे साहित्य, कला त्यांच्या मूल्यव्यवस्थेच्या प्रेरणा वाद (ईझम)–प्रतिवादातून घेऊ पाहात होत्या त्यांची अवस्था अधिकाधिक केविलवाणी होत जाणार असल्याचे भयही त्यांना ग्रासून आहे.

मानवी मुक्तीच्या, स्वातंत्र्याच्या, व्याख्याच आता पुन: बदलू घातल्या आहेत. सर्वाधिक वादग्रस्त ठरविण्यात आलेला, येत्या शतकाचा तत्त्ववेत्ता ठरू पाहणाऱ्या रजनीशांनी आधुनिक माणसाच्या आत सतत वास करून असलेल्या 'डिसहार्मनी' कडे आपले फार सूक्ष्मपणे लक्ष वेधले आहे. माणूस फक्त जीवनाच्या निम्नस्तराबरच 'संघटित' राहू शकतो. जीवनात उच्च आणि उच्चतम असे काही (स्तर) अनुभवायचे झाल्यास ते 'व्यक्तिगत' पातळीवरच व 'एकाकी' राहू शकण्याची क्षमता असणाऱ्या माणसापुरतेच शक्य आहे. समूहाचा तेथे संबंध सुटतो. मग समूहातील त्या त्या व्यक्तीची जात, वर्ग, धर्म, पक्ष, पंथ कोणताही असो. अधिकाधिक लोक तेव्हाच सोबत असू शकतात किंवा असतात जेव्हा अधिकाधिक निम्नस्तरावरील जीवनाच्या आपण सान्निध्यात असू. आणि कलेचा वाङमयाचा हेतू, प्रयोजन तर सर्वत्रच जीवनाला उच्चतम अशा स्तरांकडे नेण्याचे आहे. हे व्हायचे कसे ? जीवनाच्या समूहानुभवीकरणामुळे खुद्द कलावंतच अशा जीवनस्तरांपासून वंचित असेल तर त्याच्या कलेत त्या स्तरांची अनुभूती शोधण्याचे प्रयोजनच काय ?

थोडक्यात, समकालीन विश्वातील घडामोडींचे प्रतिबिंब म्हणून वाङमय-कला प्रांतात देखील टोकाच्या अशा काही परिस्थितीचा आपण अनुभव घेत आहोत. प्रयोजनशून्य अशा कोत्या, खुज्या, पसरट व अनेकदा म्हणूनच केवळ 'व्यापक' आणि 'विस्तृत' जाणवणाऱ्या वाङमयकलेचाच तेवढा पसारा मांडला गेला असतांनाच वाङमयकलेचे सार्वत्रिक प्रयोजन मात्र जीवनाच्या उच्चतम स्तरांकडे जाण्याचेच कायम आहे.

कोणताही 'ईझम', (वाद धर्म, संस्कृती, विचार) याकरिता तोकडा, तुटपुंजा व अवास्तव असल्याचा अनुभव देणारे हे दशक म्हणूनच पुन्हा एकदा नववाङमयीन प्रवृत्ती व प्रमेयांचे बीज धारण केलेले गर्भार दशक ठरते आहे. संख्यात्मकतेपेक्षा (पुन:नव्याने महत्त्व प्राप्त होत चाललेल्या) वैयक्तिकतेतच हे प्रयोजन कायम राखण्याचे व त्याचे दिग्दर्शन करण्याचे सामर्थ्य अधिक असल्याचा विश्वास निर्माण करणाऱ्या नव्या युगाच्या पायरीवर नकळत येऊन आपण उभे केलो गेलो आहोत.

साहित्य संमेलनांसारख्या संस्थात्मक स्वरूपाच्या व्यासपीठांकडून असल्या अपेक्षांची पूर्ती होणे त्यामुळेच कसे अशक्य आहे हे आपल्याला जाणवू शकेल. असल्या प्रश्नांची गांभीर्याने चर्चा देखील साहित्य संमेलनांमधून आयोजित होत नाही, होऊ शकत नाही. कारण ही संमेलने वर म्हटल्याप्रमाणे विविध अस्मितावाद्यांची बेटेच तेवढी झालेली आहेत आणि तसे होणे हेच त्यांचे प्राक्तन होते व ते झालेले आहे. जे झाले आहे तीच त्यांची समकालीन समाजातील भूमिका असल्याने जे झाले आहे ते गैर आहे असे समजण्याचे कारण नाही. साहित्य संमेलनांचे प्रयोजनच मुळी साहित्यशास्त्रीय असण्यापेक्षा समाजशास्त्रीय असते. त्याच अंगाने त्याकडे बघणे इष्ट.

नव्या युगाच्या या पायरीवर आता कोणताही 'ईझम' (वाद–प्रतिवाद–धर्म-संस्कृती–अस्मिता–विचार) त्यामुळे तोकडा, तुटपुंजा व अवास्तव असल्याचा जो सार्वत्रिक अनुभव आपण घेतो आहोत तो व्यक्तीची गमावलेली औचित्यविहीनता व्यक्तीला पुन्हा प्राप्त करवून देण्याकरिता पोषक द्रव्य म्हणून कामी येत आहे. हे दशक म्हणूनच पुन्हा एकदा नववाङमयीन प्रवृत्ती व प्रमेयांचे बीज धारण केलेले गर्भार दशक ठरते आहे. नव्या–जुन्या साऱ्याच लेखक–कलावंतांना हे गर्भारपण पेलण्याचे सामर्थ्य अंगी आणावेच लागेल.

श्रीपाद भालचंद्र जोशी

आंधळयांनी सूर्य ताब्यात घेतला
आणि ते उन्मतपणे नाचू लागलेत
गाऊ लागलेत.
जमावांसमोर कंठशोष करू लागलेत
रक्ताच्या, कोळशाच्या भाषेत
संस्कृतीची, भाषेची मुळे कापून टाका
म्हणालेत
" सूर्य आता आमचा आहे
फक्त आमचा आहे."

सूर्य आपल्या अनंत किरणानी हंसला
मानवाच्या लहान अर्भकाच्या ओठांत
आणि फुलांशी उभ्या असलेल्या
किशोरींच्या सोनेरी केसांत
आणि त्याने सर्वांच्याच पीडित अंत:करणांत
आपली ऊब ओतली,
त्यांच्या डोळयांत आपले तेज भरले
दलदलीत रुतलेल्या आंधळयांना मात्र
हे कांहीच दिसले नाही.

हे सूर्या,
त्यांचा अंधार दूर कर
त्यांच्या अंत:करणांत प्रकाश ओत
त्यांना प्रेमाची ब्रेल शिकव
म्हणजे त्यांना तुझे जग दिसू शकेल
कळू शकेल.

बिश्वास कानडे

अनुक्रमणिका

गीता साने : चिंतनशील, व्रतस्थ, बंडखोर 'यती'

तारा धर्माधिकारी

भारतीय स्त्रियांमध्ये सहसा दुर्मिळ असणारी बुद्धिमत्ता व चिंतनशीलता, व्यासंग व संशोधन याची जोड लाभलेल्या या प्रतिभाशाली स्त्रीच्या साहित्याची व्यापकता भारतीय स्त्रीजीवनाच्या सर्व थरांना स्पर्शून गेली आहे ..... पन्नास वर्षापूर्वी सर्व स्त्री समस्यांची अशी परखडपणे उकल करणारे साहित्य मराठी भाषेत कुणी लिहिल्याचे आढळत नाही.

त्यांच्या नायिका आधुनिक शिक्षणाने सुसज्ज असल्या तरी पाश्चात्य जीवनाचा आधार घेणाऱ्या तकलादू स्त्रिया नव्हत्या......

भारतीय मातीत पाय रोवलेल्या भारतीय स्त्रियाच होत्या......

निम्म्या संख्येने असलेल्या स्त्रियांचा विकास झाला नाही तर लोकशाही दुबळी राहील. स्त्रीला, तिच्या तरल बुद्धीला उमलण्याची संधी देणे ही आजच्या विज्ञानयुगाची गरज आहे आणि त्यासाठी समाजाच्या स्त्रीविषयक दृष्टिकोनात बदल होणे अत्यावश्यक आहे. अशी तर्कसंगत समाजशास्त्रीय दूरदृष्टी हाच त्यांचा मूलमंत्र होता.

गीताताईंच्या जीवनातील आशावाद, उत्साह व भविष्याला कवेत घेण्याचे साहस त्यांच्या वृद्धापकाळातही टिकून होते.

गीता साने यांचे १२ सप्टेंबर १९९१ रोजी धनवाद (बिहार) येथे वृद्धापकाळामुळे वयाच्या ८४ व्या वर्षी निधन झाले. मन अत्यंत विषण्ण झाले. समजू लागल्यापासून या नावाच्या मागे भारतीय आदर्श स्त्रीचे एक वलय असल्याचे माझ्या मनात ठसू लागले होते. पाणीदार डोळे, चेहऱ्यावर बुद्धिमत्तेची झळाळी, लहानसर बांधा पण सहज छाप पाडणारे असाधारण व्यक्तिमत्त्व! १९३२ साली स्वातंत्र्याच्या चळवळीच्या काळात दीडरुपया खर्चून कै. नरसिंग धगमवार यांच्याशी (प्रेम) विवाह व तोही नोंदणी पद्धतीने केलेला. देशभक्ताची मुले म्हणून देशभक्तीचे बाळकडू मिळाल्याने ध्येय, त्याग व त्याबरोबरच कर्तव्याचे भान ठेवून कौटुंबिक जीवनासाठी त्यांनी संघर्ष केला पण त्याच बरोबर विदर्भासारख्या मागास भागात राहूनही स्त्रीस्वातंत्र्याचा पुरस्कार केला. लग्नानंतर त्यांनी आपले नाव बदलले नाही, मंगळसूत्रासारख्या रूढ चिन्हांचा आयुष्यात कधीच उपयोग केला नाही. किंबहुना कधीही दागिनेच वापरले नाहीत, कपड्यांचा सोस बाळगला नाही. निर्भयता व स्वयंनिर्णयाची जबरदस्त ताकद हा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा गाभा होता. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारतीय लोकशाही सुदृढ कशी होईल याचाच त्यांना सतत ध्यास लागलेला असे. देशाच्या अर्ध्या लोकसंख्येने असलेल्या भारतीय स्त्रिया या लोकशाहीच्या सुजाण नागरिक कधी बनतील, कशा घडविता येतील यासाठी त्यांचे क्रियाशील व्यक्तिमत्त्व खर्ची पडले. कामगार स्त्रिया, आदिवासी स्त्रिया, विशेषत: खाणीत काम करणाऱ्या स्त्रियांच्या हितासाठी त्या सदैव धडपड करीत राहिल्या. त्याचबरोबर स्वत:चे 'घरकुल' प्रेमाने, आनंदाने फुलवित राहिल्या. दोन कन्यका व पती यांच्यासोबत वैवाहिक जीवनाची वाटचाल अत्यंत यशस्वीरित्या त्यांनी केली. पतीच्या

मृत्युनंतर त्या खचल्या नाहीत. आपले आयुष्य आपल्या कामाला वाहून घेणाऱ्या आदर्श देश-सेवकाची त्या जणू मूर्ती होत्या. त्यांचे व्यक्तिमत्त्व जीवननिष्ठा व समाजनिष्ठेने समृद्ध असून ते चिंतन-शील पण व्रतस्थ होते. अन्यायाविरुद्ध बंड करून उठणे हा त्यांचा सहज स्वभाव होता, मग तो कुठल्याही व्यक्तीवर असो ! समाजावर असो वा देशावर असो ! त्यांचे वाचन चौफेर होते, पिंड लेखकाचा होता पण हृदय कवीचे होते.

मात्र तितक्याच त्या प्रसिद्धीपराङ्मुखही होत्या ! सतत साठ वर्षे असे आदर्श जीवन जगणाऱ्या; भारतीय स्त्रियांमध्ये सहसा अत्यंत दुर्मिळ असणारी बुद्धिमत्ता व चिंतनशीलता, व्यासंग व संशोधन याची जोड लाभलेल्या या विदुषीला तिचे यथायोग्य स्थान लाभले नाही, याची खंत माझ्यासारख्या एखाद्या आप्तस्वकीयाला वाटली, तर त्यात नवल कोणते ? दूरदर्शन आकाशवाणी, स्त्रीमुक्तीच्या कार्यकर्त्या स्त्रिया यांना त्यांचा सहवास लाभावा, कला, विद्वत्ता व कलेचे माहेरघर असणाऱ्या मुंबईकरांना अशा व्यक्तिमत्त्वाचा परिचय व्हावा, असे सारखे वाटत असे. कारण कै. दादा धर्माधिकारी यांनी म्हटल्याप्रमाणे 'भारतीय स्त्रीच्या क्रांतिकारकतेचा इतिहास लिहिताना गीता साने, अंबिका बेहेरे या स्त्रियांची नावे लिहिल्याशिवाय पुढे जाताच येणार नाही. इतके त्यांचे व्यक्तिमत्त्व महत्त्वाचे होते. त्यातही मला एवढे समाधान आहे की विदर्भ साहित्य संघाने त्यांना अहेरी या आदिवासी क्षेत्रात भरलेल्या विदर्भ साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाचा मान दिला व स्वतःची प्रतिष्ठा राखली.

स्त्री मुक्ती, पुरुष द्वेष नव्हे !

त्यांच्या मृत्युने एक चिंतनशील व समृद्ध व्यक्तिमत्त्व हरपले याची जाणीव फारच थोड्या लोकांना आहे. विदर्भासारख्या अविकसित भागात राहून तारुण्याच्या काळात त्यांनी स्त्री-स्वातंत्र्याचा पुरस्कार केला. बंडखोर विचार प्रकट करून कुटुंबसंस्था, विवाह संस्था, विवाहपद्धती रूढी, चालीरीती यावर कठोर प्रहार करणाऱ्या नायिकांचे कथा-कादंबऱ्यातून प्रकटीकरण केले. मात्र त्यावेळेस देखील त्यांची स्त्रीस्वातंत्र्याची चळवळ 'पुरुष द्वेष्टी' नव्हती. स्त्री जीवनाची संकुचितता त्याच्या व्यक्तिमत्त्वाला कधीच स्पर्शून गेली नाही. कारण त्यांच्या जीवनाचा एकूण आधारच मानवीय मूल्यांची प्रतिष्ठापना करणारा होता. पुरुषांवर परखडपणे टीका त्यांनी केली. परंतु स्त्री–पुरुष सहजीवनाचा मार्ग चोखाळण्यात त्या सदैव अग्रेसर व प्रयत्नशील राहिल्या. स्त्री–मुक्ती ही पुरुषांच्याही मुक्तीसाठी, नव्हे तर संपूर्ण मानवजातीसाठी आवश्यक आहे असे त्या मानीत होत्या. तारुण्यात उद्भवलेल्या स्त्री समस्या निरीक्षणशक्तीने चित्रित केल्या परंतु त्यांचा पिंड क्रियाशील प्रवृत्तीच्या समाज सेवकाचा असल्याने, त्या समस्यांचे निराकरण करण्यासाठीच त्या झटत राहिल्या आणि व्यासंग, बुद्धिमत्ता व संशोधन यांच्या सहाय्याने, समाज-शास्त्रज्ञाच्या दृष्टिकोनातून स्त्रियांवर होणाऱ्या सर्वांगीण अन्यायाचे त्या विश्लेषण करू शकल्या. त्यांच्या उतारवयात प्रसिद्ध झालेले 'भारतीय स्त्रीजीवन' हे पुस्तक त्यांच्या समाजशास्त्रज्ञाच्या व संशोधकाच्या बुद्धिमत्तेचा पुरावा आहे. या पुस्तकाची त्यांची मूळप्रत सुमारे साडेसहाशे पानाची होती. परंतु छपाईच्या सोयीसाठी त्यांना ती संक्षिप्त करावी लागली. पण त्यासाठी देखील त्यांनी महिनाभर फार परिश्रम घेतले. स्त्रीविषयक प्रश्नांचा अभ्यास त्यांनी प्रत्येक पैलूतून केलेला आहे व समस्यांचे निराकरण करणाऱ्या कायद्यांची पुरेपूर छाननी करून घेतली आहे. हा प्रचंड अभ्यास त्यांनी जीवनाच्या व्यापक भूमिकेतून अचाट निरीक्षणशक्ती व प्रतिभेची विलक्षण झेप याच्या बळावरच केला होता. त्या विज्ञानाच्या विदर्भातील पहिल्या स्नातक होत्या. "विज्ञान प्रत्येक गोष्टीबद्दल प्रमाण मागते. ग्रंथाने वा गुरूने निर्वाळा दिला तरी तो बिनचूक असल्याचा पडताळा प्रत्यक्ष प्रयोगाने घ्यावा लागतो, असा विज्ञानाचा दंडक आहे, हे पथ्य न पाळतात विज्ञानाचा अभ्यास करून केवळ गुण मिळविले, चांगली नोकरी मिळविली, तरी विज्ञान हे जीवनाची शैली किंवा जीवनाचे

तत्त्वज्ञान होत नाही. ती केवळ जीवनावरची पातळ साय मात्र असते. म्हणूनच निकाल चांगला लागला किंवा चांगली नोकरी मिळाली म्हणजे सत्यनारायणाच्या पूजा केल्या जातात. विज्ञानात प्रावीण्य मिळविणाऱ्यांच्या मनोवृत्तीही जुन्याच चाकोरीत फसलेल्या असतात, असे त्या म्हणत.

आद्यनिष्ठा जीवनावर !

पन्नास साठ वर्षांपूर्वीच कुटुंबसंस्था, विवाह-संस्था, प्रजनन इ. सामाजिक प्रश्नांबाबत उद्भवणाऱ्या समस्या त्यांनी समाजासमोर मांडण्याचे धैर्य औचित्य व दूरदृष्टी दाखविली. आपल्या कादंबरीच्या नायिका 'उंबरठा' ओलांडणाऱ्या दाखविताना त्यांनी पाश्चात्य संस्कृतीचा आधार घेतला नाही. समान अधिकार मागणाऱ्या, सामाजिक कोंडवाड्यात कुंचबणा सोसणाऱ्या त्यांच्या नायिका आधुनिक शिक्षणाने सुसज्ज असल्या तरी पाश्चात्य जीवनाचा आधार घेणाऱ्या तकलादू स्त्रिया नव्हत्या. प्रत्यक्ष वैयक्तिक व सामाजिक संघर्षांना तोंड देणाऱ्या, धैर्याने जगणाऱ्या, भारतीय मातीत पाय रोवलेल्या, भारतीय स्त्रियाच होत्या. स्त्रीवर अन्याय करणारे सामाजिक कायदे, त्यांना बंधनात ठेवणारी पुरुषी, वर्चस्व राखण्याची प्रवृत्ती, औद्योगिकरणामुळे होणारे सामाजिक परिवर्तन व त्याचे परिणाम या साऱ्यांची चाहूल त्यांना अर्धशतकापूर्वीच लागली होती व त्याबाबतचे धोक्याचे इशारे देऊन त्यानी समाजाला धक्के देण्याचे जे प्रयत्न केले ते निःसंशय असाधारण तर होतेच, पण एका सामान्य मध्यमवर्गीय कुटुंबात जन्मलेल्या स्त्रीकडून अपेक्षितही नव्हते. त्यांचा जन्म एका मध्यम, अल्प उत्पन्नाच्या ब्राह्मण कुटुंबात झाला होता, शिक्षण घेतांना त्याकाळी उद्भवणाऱ्या सर्व समस्यांना सामोरे जावे लागत होते. जीवन-संघर्षाला तोंड देण्याची तयारी करावीच लागत होती. तरी त्यांनी आपल्या असामान्य बुद्धिमत्तेच्या जोरावर चिकाटी व जिद्द यांच्या सहाय्याने आपल्या आई-वडिलांना बहिण-भावंडांना पोसण्याचे सामर्थ्य दाखविले. एवढे असूनही 'पुरुष-द्वेषा'ची संकुचित भावना त्यांच्या मनात कधीही घर करुन बसली नाही. कारण स्वातंत्र्याच्या चळवळीत भाग घेणाऱ्या देशभक्त पुरुष मंडळींनी, त्यात त्यांचे आप्त-स्वकीय व आजूबाजूच्या परिवारांतील असंख्य लोकांनी देशासाठी केलेला त्याग, निःस्पृहतेने झेललेले दुःख, विरह यातना त्यांनी जवळून पाहिल्या होत्या. या उदात्त भावनेने जगणाऱ्या परिवारांच्या सहवासाने त्यांच्या मनाचा तोल कधीही ढळला नाही व त्यांच्या जीवनाला व्यापक परिमाण लाभले. त्यांच्या साहित्याचा काळ १९३६ ते १९४७ असा होता. त्यात दहाच्या वर कादंबऱ्या होत्या. याशिवाय त्यांनी १९३५ ते ६० दरम्यान विविध मराठी नियतकालिकातून अनेक लघुकथा व लघुनिबंध लिहिले आहेत. पण आपल्या साहित्याचा प्रसार होतो आहे किंवा नाही, त्याला प्रसिद्धीचे वलय लाभते आहे किंवा नाही, अशा गोष्टींचा विचार करण्याची त्यांची वृत्तीच नव्हती. त्याबाबतीत त्या नेहमीच म्हणत, "मला वाचकांचा म्हणण्यासारखा प्रतिसाद मिळालाच नाही. लोकमत काय आहे हे मला कळतच नाही आणि माझ्याकडूनही प्रतिसाद समजवून घेण्याचे प्रयत्न कधी झालेच नाहीत. कारण मी महाराष्ट्रापासून दूर अशा उत्तर प्रदेशात व बिहारमध्येच राहिले. कोणाचे पत्र आले की लिहून पाठवा, तरच लिहायचे, नाहीतर नाही लिहायचे, असेच चालत असे." परंतु काही इतर भाषिक लोकांनी त्यांच्या साहित्यात मुद्दाम रस घेतला कळत नव्हते म्हणून इंग्रजी भाषांतर करवून वाचले. स्त्रीसमस्याप्रधान कादंबऱ्या लिहून, स्त्रीमुक्तीच्या वाटा चोखाळणाऱ्या, अन्यायाविरुद्ध संघर्ष करणाऱ्या बंडखोर नायिका चित्रित करून स्त्रीहृदयामधील स्वातंत्र्याच्या उर्मींची जाणीव समाजात प्रकट केल्याबद्दल श्रीमती कमला चट्टोपाध्याय यांनी देखील समीक्षा लिहून या बंडखोर भूमिकेबद्दल गीताताईंची प्रशंसा केली होती. याचे मूळ कारण हेच होते की गीताताईंची आद्यनिष्ठा जीवनावर होती. जीवननिष्ठा व समाजनिष्ठा असल्याशिवाय साहित्याचा जन्म संभवतच नाही. माणसाला माणूस म्हणून प्रतिष्ठेने जगता आले पाहिजे ही जाणीव उराशी बाळगूनच त्यांनी साहित्याच्या प्रांगणात पदार्पण केले. साहित्य व संस्कृतीचे

मूल्य सर्व प्रकारचे स्वातंत्र्य आणि मानवाची प्रतिष्ठा हेच असते आणि या जाणीवेतून लेखन करणाऱ्या साहित्यिकाच्या लेखणीतून त्याचे मन व हृदयच द्रवरूप होऊन कागदावर उतरत असते. गीताताईंच्या संपूर्ण जीवनाला कर्तव्याची, त्यागाची, झालर होती. स्त्रीसुलभ नटणे, मुरडणे त्यांना कधीच आवडले नाही. प्रतिभासंपन्न व्यक्तिमत्त्व हाच त्यांचा अलंकार होता. आधुनिक लेखिकांच्या विचारसरणीनुसार पुरुष कलावंत, लेखक, चित्रकार इ. प्रमाणे 'व्यसनांची' फॅशन त्यांना कधीच रुचली नाही. उपभोग व सुखलोलुपता यापासून त्या नेहमीच दूर राहिल्या.

कार्यात बुडूनही संसारही सुखाचा

गीता साने यांचा जन्म ३ सप्टेंबर १९०७ साली वऱ्हाडातील वाशिम तालुक्यातला. वडिलांचे नाव श्री. जनार्दन उर्फ भाऊसाहेब साने. ते वकीली करीत. गीता, सीता, शांता, लता व तारा अशा पाच बहिणी व एक भाऊ-कै. लखू साने हे मध्यप्रदेशात व नंतर महाराष्ट्रात इलेक्ट्रिसिटी बोर्डाचे चीफ इंजिनियर होते. सर्वच भावंडे बुद्धिमान होती. गीताताईंनी पंधराव्या वर्षी अमरावतीच्या सरकारी मुलींच्या शाळेतून मॅट्रिकची परिक्षा प्रथम श्रेणीत उत्तीर्ण केली. शिष्यवृत्ती मिळविली व नागपूरच्या विज्ञान महाविद्यालयातून बी. एस्सी. पदवी, नंतर एम. एस्सी. पास झाल्या. वडील व सोबत आईदेखील असहकार आंदोलनात उतरल्यामुळे गीताताईंना कुटुंबाची जबाबदारी उचलावी लागली. एखादी तरुण स्त्री त्या काळातही कुटुंबाची जबाबदारी स्वीकारण्याची हिंमत बाळगू शकते. हे त्यांनी समर्थपणे दाखवून दिले. उत्तर प्रदेशातील परप्रांतात जाऊन तेथे त्यांनी १९३१ पासून जवळपास दहा वर्षे शाळेत शिक्षिकेची नोकरी पत्करली. भावंडांच्या शिक्षणाची व्यवस्था केली त्यांच्या आजूबाजूला बरीचशी साम्यवादी विचाराची मंडळी वावरत त्यामुळे त्यांच्यावर कम्युनिस्ट असल्याचा छाप बसत असे पण तशा त्या कोणत्याही राजकीय पक्षाच्या सभासद नव्हत्या.

१९३२ साली त्यांनी नागपूरचेच श्री. नरसिंग धगमवार यांच्याशी प्रेमविवाह केला. तोही नोंदणी विवाह व फक्त दीड रुपये खर्च करून असे त्या सांगत ! लग्नानंतर त्यांनी आपले नाव बदलले नाही किंवा मंगळसूत्रासारख्या रूढ सौभाग्यलंकाराचा वापरही केला नाही. स्त्रीचे स्वतंत्र व्यक्तिमत्त्व जोपासण्याचा त्यांचा बाणा हेच त्यांचे जीवनवैशिष्ट्य होते. लग्नानंतर त्या मीरतहून घनवादला आल्या व तेथे राहिल्या. तेथे पुन्हा १९५६ ते १९६१ याकाळात शिक्षिकेची नोकरी केली पण १९६१ मध्ये 'चंबळची दस्युभूमि' हे पुस्तक लिहिण्यासाठी मागितलेली रजा न दिल्यामुळे नोकरी सोडली. घनवादला असताना खाणकामगार, स्त्रिया, आदिवासी स्त्रिया, कष्टकरी स्त्रियांच्या प्रश्नांशी समरस होऊन त्यांनी समाजकार्य केले. त्यामुळे कोल माईन्स वेल्फेअर कमिटी व लेबर को-ऑपरेटिव्ह सोसायटीवर त्यांनी अनेक वर्षे काम केले. स्त्रियांना स्वच्छता, साक्षरता व संततिनियमनाचे धडे देण्यासाठी त्या सदैव कष्ट करीत. वयापरत्वे कामाला मर्यादा पडतात परंतु गीताताई तरुण व नव्या कार्यकर्त्यांना सदैव उत्तेजन देत. त्यांच्या पाठीवर शाबासकी देऊन अधिक उत्तेजन देत. पुढे त्यांचे पती श्री. नरसिंग धगमवार यांनी खाणमालकाशी झालेल्या मतभेदावरून नोकरी सोडली व वकिली व्यवसाय सुरू केला. गीताताईंचा संसार अत्यंत सुखी व समाधानी होता. त्यांना दोन मुली आहेत. एक 'मार्ग' संस्थेची संचालक प्रसिद्ध कार्यकर्ती व बुद्धिमान कायदेतज्ञ डॉ. वसुधा धगमवार व दुसरी डॉ. वीना पद्मनाभन्. त्यांचे वैवाहिक जीवन ४०-४२ वर्षे टिकले याचे श्रेय कै. श्री. नरसिंग यांच्यासारख्या मुक्त जीवनदृष्टीच्या सहचराला आहे असे त्यांना वाटे.

विलक्षण बुद्धिमत्तेची स्त्री

साहित्याचा उगम सांस्कृतिक असतो आणि अस्तित्वही सांस्कृतिक पातळीवर असते या भूमिकेतून विचार केला तर गीताताईंचे साहित्य आपल्या प्राचीन संस्कृतीत असणारी कुटुंबसंस्था, विवाहसंस्था, विवाहपद्धती, पतीपत्नी नाते, नैतिक मूल्ये इत्यादीतील स्त्रीविषयक जाणीवांच्या समृद्धीवरच आधारलेले दिसते. या सर्व कांदबऱ्यान्यातून त्यांनी ज्या स्त्री जीवनाच्या विविध

समस्यांचा उहापोह केला आहे, त्या खरोखरीच मौलिक स्वरुपाच्या आहेत व त्याचे उत्तर आजही सापडलेले नाही.

त्यांच्या पहिल्या कादंबरीतून (वठलेला वृक्ष) कुटुंबसंस्था ही स्त्रीच्या गुलामगिरीवर आधारलेली आहे म्हणून ही इमारत ढासळल्याखेरीज राहणार नाही, हा इशारा पन्नास साठ वर्षापूर्वीच देऊन ठेवला आहे. कुटुंबसंस्थेचा बळी असलेली नायिका म्हणते, " स्वतंत्र स्त्री आपल्या हक्काची मागणी करते. औदार्याने तिचे समाधान होत नाही. पुरुषाच्या कार्यक्षेत्रात पदार्पण केल्यावरोबर मी पुरुषाचे हक्क मागत होते. पण मनाचा मोठेपणा पुरुषांजवळ नाही. दयेची भिक्षा म्हणून चतकोर भाकरी आमच्या पदरी घालायला ते आनंदाने तयार आहेत. या भिक्षेवर आमची आई संतुष्ट होती. बाबा तिला आदराने वागवीत. पण मी पुढच्या पिढीची होते. मानाचे चांदीचे ताट मला नको होते. त्या ताटाची योग्य ती व्यवस्था करण्याचा हक्क मी हिसकावून घेण्याचा प्रयत्न करीत होते. हाच खरा लढा होता !"

स्त्री जीवनाची संकुचित दृष्टी त्यांच्या जीवनाला कधीच स्पर्शून गेली नाही. त्यांच्या जीवनाला समाजनिष्ठेचा व्यापक आशय लाभल्यामुळे त्यांनी पुरस्कारिलेली स्त्री स्वातंत्र्याची चळवळ एकांगी नव्हती, केवळ स्त्री स्वातंत्र्याच्या नकली कल्पनेने भारावलेली नव्हती, मातापित्यानी घालून दिलेले आदर्श देशभक्तीचे धडे अंगी बाणल्यामुळे जीवनात निःस्पृहता, निरपेक्षता सहजतेने साधता आली. ही त्यांच्या जीवनाला लाभलेली उदात्त दृष्टि व माणूसपण जपण्याची तीव्र जाणीव त्यांच्या जीवनाला एक व्यापक परिमाण देऊन गेलेली दिसते. अशा बुद्धिमत्तेची स्त्री अखिल भारतीय पातळीवरही दुर्मिळ दिसते. एरवी स्त्रियांची वृत्ती पुरुषी स्वातंत्र्याची नक्कल करण्याकडे अथवा पाश्चात्य राहणीच्या सुखलोलुप जीवनात स्त्रीस्वातंत्र्याच्या वल्गना करण्याकडेच वळलेली असते, असे आपल्याला आढळून येते.

भारतीय स्त्रीच्या प्रश्नांची पार्श्वभूमी मुळातच पश्चिमेपेक्षा भिन्न होती. शिवाय पाश्चात्य स्त्रीप्रमाणे आपल्या स्थितीबद्दलचे प्रश्न भारतीय स्त्रियानी स्वतः उभे केले नाहीत, तर स्त्रियांची अवनत अवस्था पाहून कळवळलेल्या वरिष्ठ जातीच्या उदारमतवादी तरुणांच्या हातात स्त्रियांच्या प्रश्नाची सूत्रे होती. त्या उदारमतवादी सुधारक वैचारिक चळवळीने स्त्रीविषयक जुनी विचारसरणी व वहिवाट याविरुद्ध हत्यार उगारले. सती, नवजात कन्येची हत्या, विधवा-विवाह बंदी, केशवपन, स्त्री शिक्षणाची जाणवलेली गरज इ. विविध प्रश्नांवर ही चळवळ आधारलेली होती. आता गेल्या दीड शतकात कुटुंबाचे चित्रही सतत बदलत जात आहे. ते आता पूर्वीसारखे कर्त्या पुरुषावर अवलंबून व विसंबून राहिलेले नाही.

बहुसंख्य कुटुंबांमध्ये मुलांना पुरेसा आहार नाही, सुरक्षित निवारा नाही व औषधपाण्याची सोय नाही. काही उच्च मध्यमवर्गीय अजूनही कुटुंबसंस्थेला सांभाळण्याचा प्रयत्न करीत आहेत पण त्यांची संख्या फार मोठी नाही. मुले शिक्षणासाठी बाहेर पडली आहेत, त्यांच्या महत्त्वकांक्षेला नवे पंख फुटतात. एकूण एकत्र कुटुंब मोडकळीला आले आहे व विभक्त कुटुंबही हळहळू खिळखिळे होत आहे. कुटुंबातील स्त्रीचे स्थानही आता बदलत आहे, अर्थार्जन करण्यासाठी बाहेर पडल्यामुळे तिचे समाजात संबंध प्रस्थापित झाले आहेत. कुटुंबसंस्था अनेक अंगानी तुटत असली तरी ही वस्तुस्थिती समाज मान्य करीपर्यंत कुटुंबसंस्थेत परिवर्तन करता येत नाही, असे गीताताईंना वाटते.

बंडखोर प्रतिभेची झेप

त्यांची स्त्रीमुक्तीचा सर्वांगाने विचार करणारी 'हिरवळीखाली' ही कादंबरी वैचारिक प्रतिभेची झेप दाखविणारी प्रभावी कादंबरी ठरली होती. नायिका वनिता-निसर्गभक्त, गांधी-उपासक, रूसो, थोरो, टॉलस्टाय आवडीने वाचणारी त्यांनी दाखविली. ती मातृत्वाच्या आनंदासाठी समाजाचे सारे रूढ संकेत तोडून टाकणारी व वैचारिक पातळीवरून जगणारी स्वतंत्र स्त्री दाखविली. वनितेच्या पात्रातून त्यांनी सामाजिक अनिष्ट चालीरीतीवर कडक प्रहार करण्याची एकही

संधी सोडलेली नाही. "कुठेही स्त्री दिसली की समाजाचा प्रत्येक घटक पहिला प्रश्न हाच करतो पतिता की पतिव्रता ? कुलीन की कुलटा ? या एकाच प्रश्नावर स्त्रीचे भवितव्य अवलंबून असते ! आम्ही स्त्रिया सर्व प्रकारच्या त्यागाला तयार असतो पण आमचे पावित्र्य अबाधित राहिले पाहिजे आणि पावित्र्य म्हणजे काय तर आमच्या शरीर भोगाचा हक्क एका व्यक्तीसाठी राखून ठेवणे. हे पावित्र्य राखणे हेच आमचे जीवनसार !

अशाप्रकारे स्त्रीपात्रांच्या मुखातून बंडखोर विचार त्यांनी साहित्याद्वारे प्रकट केले. तरी त्यावेळच्या सामाजिक परिस्थितीनुसार त्यांचे स्वागत तर झालेच नाही उलट या बंडखोर विचारांना प्रसिद्धी मिळू नये असाच प्रयत्न झाला असण्याचा संभव आहे. कारण हे बंडखोर विचार प्रस्थापितांना परवडण्यासारखे नव्हते. मुलींचे शिक्षण; त्यांची लग्नाची वये, बालविवाह व विधवांच्या जीवनात उद्‌भवणाऱ्या समस्यांचा विचार करण्यास देखील कुणी तयार होत नसे, त्या काळात गीताताईंनी बंडखोर विचार आचरणात आणून दाखविले. पण त्याचे स्तोम माजविले नाही वा प्रसिद्धी केली नाही.

प्राचीन काळापासून मनुस्मृतीने स्त्रीचे दास्य स्पष्टपणे मांडून तिचे माणूसकीचे अधिकार काढून घेतले. भारतात परंपरा व न्यायव्यवस्था हा धर्मशास्त्राचा भाग असल्याने स्मृतीच्या आज्ञांचे पालन कठोरपणे करण्यात येते. विश्वाच्या प्रारंभीच मनूने स्त्रीला ओढाळ, नाठाळ मादी मानून झोप, रिकामपणा, दागिन्यांचे वेड, काम, क्रोध, वक्रता, द्रोह, दुराचार इ. गुण तिच्यावर लादले आहेत म्हणून आजच्या सुशिक्षित स्त्रीला देखील केवळ धन, प्रतिष्ठा व शिक्षण यांच्या जोरावर परवशतेचे पाश तोडणे कठीण जात आहे, असे स्पष्ट विवेचन आपल्या 'भारतीय स्त्रीजीवन' पुस्तकात गीताताईंनी केलेले आहे.

स्त्री माणूस आहे, तिच्या ठायी बुद्धी, सारासार विचार भावना, धैर्य, करुणा, स्नेह इ. मानवी गुण आहेत. याचा समाजाला विसर पडल्यामुळे स्त्रीचे व्यक्तिमत्व नष्ट झाले. स्त्रीजीवनातील हा अंधार शतकानुशतके लोटली तरी संपला नाही, ही खत त्यांनी आपल्या लेखनात नमूद करून ठेवली आहे. स्त्री ही आंधळी, मुकी व बहिरीच राहिली. तिचे अंतर्याम आपल्याला क्वचितच दिसते. जीवनातील विटंबनेला विटलेली सीता, नालायक नवऱ्यांपुढे हतबल झालेली द्रौपदी, वंचतेने संतापलेली शकुंतला इ. अपवादस्वरूप स्त्रियांचे सूर कानावर पडतात एवढेच ! पण त्याही अन्यायाचा प्रतिकार करण्यास असमर्थच ठरल्या !

त्यांच्या सततच्या चिंतनातून व संशोधनातून त्यांनी हे पूर्णत: हेरले होते की स्त्रीविषयक प्रश्नांचा विचार सर्वांगीण स्वरूपाचा करावा लागेल. कारण समाजजीवनाच्या सर्व क्षेत्रात स्त्री पुरुषापेक्षा कमी दर्जाची मानली जाते मग ते क्षेत्र अर्थव्यवस्थेचे असो, कायदा असो, न्याय असो, आरोग्य असो वा शिक्षण ! स्त्रीमध्ये कुठलेही वैगुण्य नसताना ती परतंत्र का ? या मूलभूत प्रश्नाने त्यांना सदैव चिंतन करायला लावले. त्यांची डोळस निरीक्षण शक्ती प्रत्येक क्षेत्रातील स्त्रीचे स्थान, व तिला येणारे अनुभव याचा मागोवा घेत राहिली. आणि त्यामुळेच त्यांच्याहातून विस्तृत लेखन घडले. आजच्या लोकशाहीत निम्म्यासंख्येने असलेल्या स्त्रियांचा विकास झाला नाही, तर लोकशाही दुबळी राहील, इतक्या मोठ्या संख्येने असणाऱ्या समाजातील स्त्रियांना विकासाची संधी न मिळाली तर समाजकल्याणाच्या दृष्टीने ती फार मोठी हानी संभवते म्हणून स्त्रीला, तिच्या तरल बुद्धीला उमलण्याची संधी देणे, ही आजच्या विज्ञानयुगाची गरज आहे, आणि त्यासाठी समाजाच्या स्त्रीविषयक दृष्टिकोणात बदल होणे अत्यावश्यक आहे अशी तर्कसंगत, समाजशास्त्रीय दूरदृष्टी हाच त्यांचा मूल मंत्र होता आणि तो समाजासमोर परखडपणे मांडण्याचा प्रयत्न त्यांनी सतत चालविला होता. १९३१ ते १९९१ या साठ वर्षात त्यांनी समाजपरिवर्तनाचा लढा अविरत चालविला. त्यांनी आपल्या संशोधनातून व लिखाणातून स्त्रियांच्यावर विविध क्षेत्रात होणाऱ्या अन्यायाचे विवरण मांडण्याचा प्रयत्न केला व त्यावरील उपायांची चिकित्सक पद्धतीने मीमांसा केली आहे.

परखड उकल, निर्भय प्रवास

त्यांच्या मते औद्योगिकरणामुळे समाजाच्या लैंगिक नीतीनियमांचा संकेतही लंगडा पडला आहे. विविध व्रतांच्या योगाने स्त्रीच्या मनावर एकनिष्ठतेचा संस्कार दृढ केला जात असे पण आजच्या बदलत्या सामाजिक परिस्थितीत व आर्थिक संदर्भात पुरुषाचेच काय पण स्त्रीवरचेही अंकुश बोथट होत चालले आहेत. मोठ्या शहरातून अनामिकतेचे संरक्षणही प्रत्येक व्यक्तीला मिळतच असते. काही विशेष परिस्थितीत गर्भपात सुलभ व कायदेशीर करण्यात आला आहे. याप्रमाणे स्वतःच्या नीतिनियमांचे काटेकोर प्रतिपालन करवून घेण्यात समाज असमर्थ होत आहे. जुने नियम अव्यवहार्य ठरल्यामुळे नवे नीतिनियम रूढ होणे दूरच राहो, पण सुचविलेही जाऊ शकत नाहीत त्यामुळे नैतिक व अनैतिक यांच्यामधील सीमारेषा पुसट होऊन तेथे अराजक उत्पन्न होण्याचा संभव आहे.

पन्नास वर्षापूर्वी सर्व स्त्रीसमस्यांची अशी परखडपणे उकल करणारे साहित्य मराठी भाषेत कुणी लिहिल्याचे आढळत नाही. त्यामुळे त्यांच्या निर्भयतेचे कौतुक केल्यावाचून राहवत नाही. समाजात राहून समाजाच्या प्रवाहाविरुद्ध पोहोण्याची घडाडी त्यांनी त्यावेळी दाखविली. देशाकरिता स्वार्थत्याग करून सुखाची होळी करणाऱ्या आदर्श स्वातंत्र्य सैनिकाच्या पिढीच्या त्या प्रतिनिधी आहेत. पक्षबंधनात न अडकता मनन, चिंतन आणि प्रत्यक्ष कृतीद्वारे समाजसेवा करणाऱ्या त्या 'यती' होत्या. ध्येयवादाच्या व त्यागाच्या मुशीतूनच त्यांचे व्यक्तिमत्त्व साकारले आहे.

स्त्रीप्रबोधनाव्यतिरिक्त त्यांनी लिहिलेले 'चंबळची दस्युभूमी' हे १९६५ साली प्रकाशित झालेले पुस्तक लेखिकेच्या चिंतनशील मनाचा, गाढ अध्ययनशीलतेचा आणि चिकाटीने एखाद्या प्रश्नाचा उलगडा होईपर्यंत पाठपुरावा करणाऱ्या वृत्तीचा उत्कृष्ट नमुना आहे. सतत दोन वर्षे शोध घेऊन इतिहासाचा, विज्ञानाचा व वस्तुस्थितीचा मागोवा घेत केलेला हा प्रवास आहे. दस्युभूमीच्या ऐतिहासिक, आर्थिक, सामाजिक व भौगोलिक संदर्भात दस्यूंचे रंग त्यांनी अत्यंत समर्पक शब्दात पण अगदी यथार्थतेने रंगविले आहेत.

दस्युभूमीच्या समस्यांचे आव्हान आपल्या मूलभूत श्रद्धांना आहे. लोकशाहीने जनतेला संरक्षणाची हमी दिली आहे. 'मुलूखगिरी' हा क्षत्रियांना धर्माने व परंपरेने दिलेला अधिकार आहे, तो घटनेने का काढून घ्यावा ही डाकूंची समस्या आहे. सामाजिक अभ्यास, चिंतन आणि ती मांडण्याची तर्कशुद्ध हातोटी यामुळे समाजशास्त्राच्या कुठल्याही अभ्यासकाला या साहित्याबद्दल आदर वाटल्याखेरीज राहत नाही. मराठीतील समस्याप्रधान तरीही सामान्य वाचकांना आकर्षून घेणारे हे पुस्तक फार मोलाचे ठरले आहे. गीताताईच्या जीवनातील आशावाद, उत्साह व भविष्याला कवेत घेण्याचे साहस त्यांच्या वृद्धापकालातही टिकून होते.

अशा या प्रतिभाशाली स्त्रीच्या साहित्याची व्यापकता भारतीय स्त्रीजीवनाच्या सर्व थरांना स्पर्शून गेली आहे. वेश्यासमस्येविषयी विस्तृत विवेचन करताना त्या सांगतात, नवऱ्याचा जाच, मायेच्या माणसांचा अभाव, बेकायदेशीर लैंगिक संबंध, दारिद्र्य, चैनीची आवड, नवऱ्याचा बाहेरख्यालीपणा, कौटुंबिक कटकटी व गरीबी यातून वेश्याव्यवसायास प्रारंभ होतो. हा देहविक्रय केवळ गिऱ्हाईक-विक्रेता व्यवहार नसतो, त्यात दलाल प्रमुख असून तो दोहोंना लुबाडून तुंबडी भरतो. माल मिळविणे, मागणी असेल तेथे पाठविणे त्याची जाहिरात, विक्री, मागणी वाढवून बाजार गरम करणे इ. सर्व तऱ्हा विक्रेय स्त्रीच्या बाबतीत वापरल्या जातात. अशा 'पण्य' स्त्रियांचे माणूस हे नाते शिल्लक उरतच नाही. त्यांना जगण्याचेच काय पण मरण्याचेही अधिकार नसतात. विज्ञानयुगामुळे स्त्रियांची बुद्धी, गुण व त्यांचे माणूस हे नाते महत्त्वाचे झाले आहे. त्याच विज्ञान युगाच्या परिणामी झालेल्या औद्योगिक परिवर्तनामुळे वेश्यांसाठी मागणी वाढत आहे. विज्ञानाने देऊ केलेले औद्योगिक समृद्धीचे अमृत घेताना त्याने उत्पन्न केलेले हे विष देखील पचवावे लागत आहे असे त्यांनी परखडपणे नमूद केले आहे.

समाजाच्या संकेतांनी स्त्रियांना विवाह आवश्यक

केला आणि याच संकेतांनी विवाहबाह्य गर्भधारणे-साठी त्यांचा अतोनात छळही केला. पातिव्रत्य हा सामाजिक संकेत आहे, निसर्गाचा नियम नाही. पतीशिवाय इतरांच्या संभोगाने वा बलात्काराने स्त्रिया विटाळतात की त्या समाजाच्या नियमामुळे? स्त्रियांवर प्रतिबंध समाजाचा आहे. समाजाने चाकोरी सोडल्याबद्दल स्त्रियांचा वेळोवेळी पाण-उतारा केला व स्वातंत्र्य मागणाऱ्या स्त्रियांचा आजही उपहास चालूच आहे.

भरपूर चैतन्य

पण परिवर्तन हा समाजाला लागलेला रोग नसून ते नव्या समाजरचनेचे डोहाळे आहेत. या नव-रचनेच्या स्वागताची तयारी सामान्य माणसांना, स्त्रियांना, धैर्याने व चिकाटीने सामान्य चाकोरी सोडून करावयाची आहे. यंत्रशक्ती माणसालाच काबूत ठेवता येणार आहे. विज्ञान विकासाची आधुनिक कथा ही भस्मासुराची ठरणार की दिव्याच्या राक्षसाची, हे नैतिक मूल्यांची जोपासना करणाऱ्या सामान्य स्त्रीपुरुषानांच ठरवावे लागणार आहे.

वयाच्या पंचाहत्तराव्या वर्षीदेखील मोटार बाहेर काढून पतीला स्टेशनवरून घरी आणण्या-साठी उत्साहाने निघणाऱ्या गीताताईमध्ये एवढे तरुण मन, उत्साह, चैतन्य कसे असा अचंबा करणाऱ्यांना हे माहित नव्हते की गीता साने यांनी आपल्या तरुणपणी कविता केल्या होत्या. त्यांचे कवीहृदय देशभक्ती, समाजपरिवर्तन, जीवनसंघर्ष या भावनांनी जसे ओतप्रोत भरले होते, तसे तारुण्याच्या चैतन्याने, जीवनाच्या प्रेममय मधुर संगिताने, मातृत्वाच्या नैसर्गिक प्रेमाने ओथंबलेले होते. त्यांची हस्तलिखिताची, कवितांची वही वाचताना, मला यांचे वारंवार प्रत्यंतर येत होते. म्हणून त्यांच्याच शब्दात त्यांना श्रद्धांजली अर्पू या!

"फुलुनी, फुलुनी-फळुनी, फळुनी सार्थ करू जीवित
गाऊ ये संगीत, मधुर मधु गाऊ ये संगीत ।।
एकेक स्वर येई जाई, जनन मरण उमजे न कुणाही
जीवित झाले विफल तयांचे ? नाही, नाही
मधुर गान जे सृजन पावले, तीच तयांची जीत ।।"

त्यांचा वारसा जपणारी त्यांची कन्या, डॉ. वसुधा धगमवार एक प्रतिभावंत कायदेपंडित आहे, समाजाला 'मार्ग' दाखविणाऱ्या संस्थेच्या संचालिका आहेत, पत्रकार-लेखिका आहे. गीताताईंचा वारसा त्या पुढे चालविणार आहेत. नव्या मनूचा नवा शिपाई! त्यांच्या तुतारीची वाट पाहू या! ■

विदर्भ साहित्य संमेलनाच्या भूतपूर्व अध्यक्ष, थोर लेखिका, समाजसेविका, चिंतक व प्रागतिक स्त्री जीवनाचा आदर्श ठरलेल्या गीता साने यांना युगवाणीची विनम्र श्रद्धांजली!

वाचकांनो,

युगवाणीचा अंक वाचल्यानंतर त्यातल्या आपणास बऱ्या–वाईट वाटलेल्या बाबींवर निःसंकोचपणे आपल्या प्रतिक्रिया संपादकास कळवा. संपादकास आपल्या प्रतिक्रिया तोंडी कळविण्याकरिता कृपया राखून ठेवू नका. त्या मुक्तपणे इतरांकरताही वाटून द्या. युगवाणीस कळवा.

त्या प्रकाशित करणे युगवाणीस आवडेल. लक्षात घ्या की आपल्या या प्रतिक्रिया वर्तमान वाङ्मयीन संस्कृतीचे स्पंदन आहेत.

अनुक्रमणिका

टिपण

मनमोहनांची कविता : स्वकालीन काव्याविषयीचे खदखदणारे असमाधान

डॉ. अक्षयकुमार काळे

प्रचंड काव्यलेखन व ते प्रसिद्ध करण्याचा अदम्य उत्साह मनमोहनांजवळ होता. प्रारंभीच्या काळात अनुकरणाचे प्राबल्य त्यांच्यावर अधिक होते. माधव ज्यूलियनांच्या 'विरहतरंगा'च्या धर्तीवर 'कॉलेजिअन' नावाचे अनुकरणशील काव्य त्यांनी लिहिले. हे सुनीतबद्ध खंडकाव्य असून त्यात ३६ सुनीते पंधरा प्रकरणात विभागली आहेत. ही सुनीते शेक्स्पिरिअन पद्धतीची आहेत. झेंडूच्या फुलांच्या अनुकरणाने 'अफूच्या गोळ्या', 'दर्यातील खसखस', 'शंखध्वनी अथवा बोंबाबोंब' इत्यादी काव्यसंग्रहांची निर्मिती त्यांनी केली. या विनोदनिर्मितीच्या संदर्भात प्रा. रा. श्री. जोग[1] म्हणतात, "अत्रे यांनी निर्माण केलेले हत्यार भलत्याच्या हाती पडल्याने किती अनर्थ होणे शक्य आहे याचा प्रत्यय येण्याला फार काळ जावा लागला नाही. विडंबनकाव्यास कवीस स्वतःचे भांडवल फारसे लागत नाहीच. लागलेच तर सद्भिरुचीचेच लागते. ते नसल्यास हा काव्यव्यापार स्वतः कवीस नसला तरी इतरांना किती तापदायक होत असेल याची कल्पना उपरिनिर्दिष्ट संग्रहावरून चांगलीच येते." 'उद्धार' हे त्यांचे स्पृश्यास्पृश्य विवाहावरचे काव्य होय. त्यात तात्त्विक विचारापेक्षा नायक-नायिकेची आळीपाळीने झालेली शीलभ्रष्टता मनमोहनांनी अधिक विस्ताराने रंगविलेली आहे 'बॉम्ब' या काव्याची निर्मिती महात्मा गांधींच्या चरित्र व कार्याच्या रेखाटनाकरिता त्यांनी केली. टेनिसनच्या 'इनक् आर्डन'च्या आधारे 'जीवनाधार' हे काव्य त्यांनी रचले तर 'युगायुगाचे सहप्रवासी' या काव्यात हिंदुमुसलमान ऐक्याचा प्रश्न त्यांनी चर्चेला घेतला. हिंदुमुसलमान हे हाडवैरी नसून युगायुगांचे सहप्रवासी आहेत असा गांधीवादी विचार या काव्यात संज्ञाप्रवाह पद्धतीचा उपयोग करून त्यांनी मांडला आहे. याशिवाय कितीतरी स्फुट कवितांची निर्मिती त्यांनी केली.

सतत आणि विपुल लेखन करूनही कायमची उपेक्षा मनमोहनांच्या पदरी पडलेली स्पष्ट दिसते. मनमोहनांची झालेली उपेक्षा त्यांच्या कितीतरी स्फुट कवितेचे आशयद्रव्य झालेली आहे. एकीकडून फुलत राहणे व दुसरीकडून जळत राहण्याच्या त्यांच्या वृत्तीमुळेच,

> 'शव हे कविचे जाळु नकाहो जन्मभरी तो जळतच होता
> फुलेही त्यावरि उधळु नका हो, जन्मभरी तो फुलतच होता.'

अशी अपेक्षा त्यांच्या काव्यात व्यक्त झालेली आहे, काव्यात्म बंडखोरी हा मनमोहनांचा स्वभाव असला तरी बंडखोरीची परंपरा बनविण्याचे आणि आपल्या विचारांचे व्यासपीठ निर्माण

१. प्रा. रा. श्री. जोग. अर्वाचीन मराठी काव्य, पृ. २३९

करण्याचे सामर्थ्य मनमोहनांमध्ये नसल्याने त्यांची बंडखोरी विक्षिप्त वेडगळ उद्‌गारांमध्ये परावर्तित झाली. विच्यातील आशय महत्त्वाचा नाही असे नाही, परंतु या उद्दाम आशयाला आवश्यक असणारा कलात्मक संयम व सदभिरुचीसंपन्नता मात्र मनमोहनांजवळ नव्हती.

स्वकालीन काव्यविषयीच्या खदखदणाऱ्या असमाधानातून मनमोहनांची विवक्षित काव्यदृष्टी साकार झाली आहे. रविकिरणमंडळाच्या काव्याविरुद्ध 'झेंडूच्या फुला'त जशी प्रतिक्रिया व्यक्त झाली तशीच मनमोहनांनीदेखील रविकिरणमंडळाच्या स्वप्नरंजनात्मक संकेतनिबद्ध काव्याविरुद्ध आपली आघाडी उभारली. 'राजकवी'ना थोबाडाया, 'लोककवी' मी पहिला झालो', अशी आपली उद्दाम भूमिकाही त्यांनी स्पष्ट केली.

काव्यदेवतेबद्दलची अपार भक्ती त्यांच्या अंतःकरणात आहे. हिचे चरण चुंबिताना क्षुद्रता संपून सार्थकाची हळद अंगी लागते अशी त्यांची श्रद्धा आहे. उद्दाम आत्मविश्वास त्यांच्या ठायी असला तरी 'रसिका ! ही ' कविता म्हणजे । खुद्द कविलाच एक कोडे असते चांगले कागद, चांगली शाई । चांगला विषय अशा तयारीनं ती पुष्कळ वेळा आपले प्रेतच नटवून आणते, अशी प्रांजळ कबुली त्यांनी दिली आहे. आपण तप्त टाळू तेलाने भरणारे, व ती भरत नाही म्हणून वणवणणारे अश्वत्थामे असून आपल्या चिरसौख्याची व चिरदुःखाची शाश्वततेची व अशाश्वताची गुरुकिल्ली प्रतिभेच्या आधीन आहे असे मनमोहन म्हणतात. आपण प्रतिभेचे पाईक असून आपल्याला कवितांचा गर्व नाही. आपली 'प्रतिभासंपन्न' कविता सत्कवीसाठी असल्यामुळे 'टीकाकारांच्या जव्ह्याशी नाही सोयरे आणि सुतकही । तोंडे फोडाया शतकाचो । सरकावली मी वरती वाही' असे ठणकावून ते बजावतात. नाटकातल्या राजांसाठी शंभरपानी काव्ये रचणारे राजकवी वागीश्वरांची विटंबना करणारे आहेत. अशांना वठणीवर आणण्यासाठी मी आधीचा नम्र असणारा उद्धट झालो, अशा प्रकारचे विचार मनमोहनांनी आपल्या काव्यात मांडले आहेत. एकूण त्यांच्या काव्यदृष्टीचा प्रकाश-झोत कवितामूल्य, कवितेचे महात्म्य, कवितांची निर्मितीप्रक्रिया, अनुभूतीचे महत्त्व, समकालीन कवितेच्या मर्यादा, अनुभूतीशून्य कवी, अभिरुची नसलेले आंधळे रसिक, आणि मिंधे टीकाकार या सर्वांवरून फिरलेला आहे. साकल्याने पाहता या संदर्भात मनमोहनांची दृष्टी निराशाजनक आहे. 'श्रेष्ठ कवी जन्माला याया । मराठीचे गर्भाशय कोते', असा निष्कर्ष त्यातून निघाला आहे. 'हे अंगा भिडलेले वारे' या कवितेतून त्यांची संपूर्ण काव्यदृष्टी प्रभावीपणे व्यक्त झाली आहे. मराठी काव्यप्रांतात कल्पकतेचे कणे मोडणारे गवतावरले सरडे आहेत, क्रांतिकवी नाहीत. समकालीन जीवनाचा स्पर्श असणारे कुणी नाही, ही त्यांची व्यथा असल्यामुळे अगदी जाणिवेने वर्तमानाशी समरस होण्याचा 'प्रयत्न' मनमोहनांनी आपल्या कवितेतून केला. या प्रयत्नातून मनमोहनांची सामाजिक-राष्ट्रीय कविता आकारास आली. शिवाजी, सावरकर, सुभाषचंद्र आणि गांधीजी या राष्ट्रीय महापुरुषांची मोहिनी सतत त्यांच्या मनावर राहिलेली आहे.

शिवाजी, संभाजी व त्र्यंबकजी डेंगळ यांच्यावर त्यांनी स्वतंत्र दीर्घकथाकाव्ये रचली आहेत. सुभाषचंद्र आणि त्यांची आझाद हिंद सेना त्यांच्या कायम आदराचा विषय असल्याने 'फील्ड मार्शलची सलामी' या दीर्घ काव्यात त्यांनी त्यांचेही गुणगान केले. अस्पृश्योद्धार, जातीय विषमता इत्यादी विषयही त्यांच्या खंडकाव्यांत येतात. 'युगायुगांचे सहप्रवासी' या काव्यात हिंदुमुसलमान प्रश्नावर त्यांनी बरीच चर्चा केली आहे, अशा काव्याविष्करणामध्ये कवीचे बहिर्मुख व्यक्तिमत्व प्रकाशमान झाले आहे. ते सामान्यतः संघर्षशील आहे, इथे यांच्या मनाच्या वृत्ती पेटलेल्या आहेत. मनात कुठेतरी पडलेल्या पिळामुळे क्षणाचीही स्वस्थता त्यांना लाभलेली दिसत नाही. या अस्वस्थतेचा प्रतिकूल परिणाम त्यांच्या काव्याविष्करणावर फारच मोठ्या प्रमाणात झाला आहे.

त्यामानाने भावकवितेला जवळ असणारी त्यांची शृंगारकविता बरीच आटोपसर आहे. मनाच्या प्रक्षुब्ध वृत्ती इथे काहीशा निमालेल्या दिसतात. या कवितेत संभोगशृंगाराला जास्त वाव आहे. ' नंतर ' ' पाळण्या ', ' दूर किनारा ' ' ×××× ', मोहाच्या मध्यरात्री ', इत्यादी सुंदर शृंगारकविता मनमोहनांनी रचल्या आहेत.

' मोहाच्या मध्यरात्री । मदिरेहून मादक तू । रजनीच्या कटिवरली
चंद्राची कळशी फुटे । जास्वंदी जाळीतुनी फण काढुनि नाग उठे ।
पृथ्वी वजा करुनीही तीन हात शिल्लक तू '

किंवा चंदनाचे झाड मी अन् नागिणीने वेढले
तू दिशांना स्पर्शिणारी पाऊले उंचावली
श्वास होते दोन आणि एक होते मीलन
चार ओठांतून स्वप्ने रंगली फेसाळली

किंवा ' प्राजक्तापरी ठुसका बांधा । अंबाडा मानेवर लटके ।
त्यावर वेणी जाई जुईची । ती गंधाचे देई चटके ।
घट्ट कंचुकी गलोल झाले । उरोज उन्नत त्यावर बसले ।
अंगांगातून या भरलेल्या । पिवळे चाफे फुलू लागले ।

असे रतिभावनेचे सुरम्य चित्रण ते करतात. त्यांच्या बहुसंख्य प्रेमकवितांतून संयमित आणि आकर्षक रीतीने शृंगाराचा आविष्कार झालेला असला तरी ' ×××× ' या कवितेत वैचित्र्य-निर्मितीकरिता शृंगाराच्या पहिल्या क्षणातील प्रेयसीचे रोमांचयुक्त सळसळणे चित्रित करताना 'प्रथमत: विरोधासाठी हर हर महादेव करीत धावले । सोळा वर्षांच्या कौमार्याच्या सिंहासनापासले रोमांचाचे सैन्य ' अशी विक्षिप्त प्रतिमा मनमोहन उपयोजितात. जी रसिकांच्या आस्वादप्रक्रियेशी संपूर्ण विरोधी अशी असते. आणि फुलणारी सगळीच कविता आकस्मिकपणे परतंत्र होऊन कवीच्या विक्षिप्त व्यक्तिमत्वाशी जखडली जाते.

मनमोहनांची शैली संपूर्णपणे स्वतंत्र आहे. प्रस्थापित कलानियमांच्या वृद्धयाच केलेल्या गळचेपीत तिला वेगळाच आकार प्राप्त झाला. शैली घडविणे, एकेका शब्दासाठी अडणे, त्या शब्दाच्या औचित्याचा विचार करणे त्यांच्या प्रतिमेला अमान्य आहे. त्यामुळे ही शैली प्रवाही आहे. परंतु सौंदर्याचा तिच्यात अभाव आहे. मनातील उद्दाम स्त्रोत पेलून धरण्यासाठी आवश्यक असणारे विशाल प्रतिभापात्र त्यांच्याजवळ नसल्याने तो स्त्रोत पुष्कळच ठिकाणी वाकडातिकडा भरकटला आहे. नाही तरी लालित्ययुक्त भावमधुर शब्दांची ऐशीतैशी करणे आणि ' दादोबांच्या पाठीवर लाथ ठेवण्याची ' भाषा बोलणे हा त्यांचा जन्मसिद्ध स्वभाव आहे. विनोद आणि गांभीर्य यांचे तारतम्य नसल्यामुळे शैलीतील एकसंधपणा पार लयास जाऊन तिला खडबडीत स्वरूप आले. एखादा गंभीर विचार मांडल्याबरोबर त्यांना शाब्दिक कोटी करण्याची वा विक्षिप्त प्रतिमान वापरण्याची लहर येते आणि त्यात कवितेचा सच्चा सूर पार हरवून जातो. मनमोहनांच्या दीर्घकाव्यापेक्षा त्यांची स्फुट कविता जास्त आकर्षक आहे. तिच्यातील भावविवशता अनुभवांना अधिक समृद्ध करते. शब्दाचे काठिण्य आणि विक्षिप्त शब्दयोजना अशा कवितांत पुष्कळच कमी झाली आहे. रचनाही आटोपसर व बांधेसूद झालेली आहे. त्यामानाने त्यांच्या दीर्घरचना भाव-विवशतेने आणि अनावश्यक पाल्हाळाने बरबटल्या आहेत. पाल्हाळाला थोडा देखील आवर घालण्याचा विवेक त्यांच्या ठिकाणी नाही. त्यामुळे कवितेचा घाट पूर्णपणे विस्कळित झाला आहे. मात्र त्र्यंबकजी डेंगळ्यांवरचे कथाकाव्य पुष्कळच नेटके उतरले आहे. कही काथाकाव्यातील मधूनच केलेली शब्दचित्रणे वेधक आहेत. परंतु काव्याच्या विस्कळित आविष्करणामुळे ती वाचकांवर फारसा

प्रभाव टाकू शकत नाहीत. एकूण त्यांच्या काव्य रचनेचा प्रवास दीर्घ काव्याकडून स्फुटकाव्याकडे झालेला आहे.

मनमोहनांची प्रतिमासृष्टी विविध प्रकारची असून तिच्यात जीवनातील नानाविध गोष्टींचा समावेश होतो. स्पर्श, रंग, श्रुती इत्यादी संवेदनांचा वेगळेपणा त्यांच्या काव्यात आहे. या संवेदना वा प्रतिमांमध्ये अंतर्गत सुसंवाद नाही. त्या विक्षिप्त, तऱ्हेवाईक आणि असंबद्ध असतात. समकालीन जीवनापासून पौराणिक कथातील अनेक घटना त्यांच्या प्रतिमेचा विषय होतात. संज्ञाप्रवाहाच्या नादात ते कधी अतिरेक करतात, कधी चमत्कृती साधतात, तर कधी स्वैर कल्पनेच्या पंखावर आरूढ होऊन स्वतःला आणि वाचकाला फसविण्याचा प्रयत्न करतात.

एवढी प्रचंड निर्मिती करूनही शेवटी मात्र मनमोहनांच्या वाट्याला घोर उपेक्षाच आली व

'सदुसष्ट जन्माचे पाप माझे फेडले मी ' कवी ' इथे होऊन
ना मान । ना धन । ना लौकिक । मुलांनो कवी नका होऊ '

असे उद्गार त्यांना काढावे लागले. त्यांच्या या अपयशाचे कारण, त्यांच्या बंडखोरीला, प्रयोग-शीलतेला, उपहासप्रियतेला व काव्यदृष्टीला कधीही न साधता आलेला सुवर्णमध्य हे आहे हेही इथे लक्षात घेतले पाहिजे. ■

जयश्री थत्ते भट :
कथेतील एक आंतरराष्ट्रीय प्रवाह

सुलभा हेर्लेकर

'मावळतीची झाडे' हा एकच कथासंग्रह लिहून साहित्यक्षेत्रात लक्ष वेधून घेणारी जयश्री थत्ते भट ही मूळची भारतातली. पण आता पूर्ण परदेशीय झालेली. परदेशात राहून भारतीय संस्कृतीचे वरपांगी पोवाडे गाणारे लोक तसे खूप आढळतात. पण आपल्या भारतीय संगीतातून, भारतीय कुटुंबव्यवस्थेच्या, एकत्रीकरणाच्या, एकात्मतेच्या सांस्कृतिक कल्पना शब्दातून मांडून एक अनोखे विश्व वाचकांना देणारी ही लेखिका वैशिष्ट्यपूर्णच ठरावी. पाश्चात्य आणि भारतीय संस्कृतीला जवळ आणणारी, त्यांचे आदान प्रदान करणारी व भारताच्या जमिनीवरील दारिद्र्याशिवाय सत्वशील गोष्टींचे दर्शन करून देणारे भावविश्व लेखिकेने 'मावळतीची झाडे' यात चित्रित केले आहे. भारतातील परदेशीय लेखक बरेच. माझी एक मैत्रीण अजिता काळे गेक्सरुवर्गला राहून मराठी साहित्याची निर्मिती करते. पण अजिताच्या, व जयश्रीच्या लिखाणात सूक्ष्मतःच एक फरक आहे. अजिता जिथे काम करते त्या टीनएजेस्च्या घडलेल्या कथांचे ती दर्शन घडवते. एकप्रकारे पाश्चात्य संस्कृतीचेच ते एक दर्शन असते, हे अनोखे दर्शन तिच्या कथांतून वाचताना भारतीय माणूस भांबावून जातो. तर जयश्री भारतीय संस्कृतीच्या काही मुळयाच तिथे पेरायला घेते. भारतीय संगीताच्या संस्था निर्माण करते. मग या सुरांच्या माध्यमातून मानवी मनाचे पैलू शोधते, आधी मनातून शब्दांची जुळवाजुळव होते ती इंग्लिश माध्यमातून. मग ते मराठीत येतात. म्हणूनच जयश्रीच्या कथांचा घाट हा भारतीय कथेच्या घाटापेक्षा निराळा भासतो. पु. शि. रेगेही आधी काही कविता इंग्लिशमधून करीत आणि मग त्या मराठीत येत. त्यांचेही निराळेपण मराठी कविता जाणते. पण नुसता घाट निराळा आहे म्हणून जयश्रीची कथा वैशिष्ट्य धारण करते असे नव्हे. तर त्यातला

आशय-त्याचे वळण भारतीय आहे. जमीन सारी एक आहे. एका तुकड्याला भारत नाव आहे तर दुसऱ्याला कॅनडा. पण हे सारं कथेतून, शब्दातून व्यक्त होताना खुरटून जात नाही.

प्रत्यक्ष अनुभवावर आणि स्वतःच्या निरीक्षणशक्तीवर विश्वास ठेवूनच लेखिकेचे कथाविश्व आकारले आहे. भारतात गेलेलं बालपण आणि कॅनडात घडलेली mental framework यातून social comparision करण्याची एक ताकद लेखिकेला मिळाली. त्यातूनच मग अनुभवाकडे डोळसपणे बघण्याची एक सवय जडली. That is her main resource ! 'मावळतीची झाडे' याला एक सुरांची लय आहे. संगीतातील सरगमप्रमाणेच, त्यातली गायकी जशी फुलते, विस्तारते... तसेच कथेतही प्रतिभेचे क्षितिज विस्तारत जाते.

मराठी कथेची वळणे बदलत आता ज्या वळणाशी कथा आली आहे....उदा. आशा बगे, ह. मो. मराठे, भारत सासणे, गौरी देशपांडे, सानिया इत्यादी, यांच्या कथांतील मानवी मनोव्यापारांचे दर्शन जुनेच पण आव्हान देणारे विषय आणि समर्थ भाषाशैली, आंतरराष्ट्रीय जाण इत्यादी अनेक समर्थ अंगातून अलीकडची कथा आकारली आहे. एकाच वेळेस जुन्या संस्कारातून नव्या वाटा शोधणारी, संस्कृतीला कुशीत बाळगत पुढे जाणारी तरीही थोडी बंडखोरी करुन जुन्याला धक्के देणारी आशा बगे यांची कथा वाचक ज्या तऱ्हेने स्वीकारतो, तेच वाचक दुसऱ्या टोकावरील गौरी देशपांडे यांची, बेधडक शारीरिक पातळीवरील मैत्रीला, तिच्यातल्या फुलत्या वासनेला, तिच्या बंडखोर शैलीला, तिच्या पाश्चात्यीकरणाला अनुसरणारी कथाही आवडीने वाचतो, याचा अर्थच असा की एकाच वेळेस वाचकाला कथा ही कलाकृती म्हणून संस्कारित व पुरोगामी अशी दुहेरी हवी असते. 'मावळतीची झाडे' प्रसिद्ध झाले आणि त्याच वेळेस मराठी कथाप्रवाहात एक 'आंतरराष्ट्रीय प्रवाह' हळूच येऊन मिसळला. 'स्त्रीपुरुष' संबंधातले दोन्ही जमिनीवरचे भावविश्व चितारताना नीतिमत्तेपेक्षाही मानसिकतेवर अधिक भर देणारी त्यांची 'सहचर' ही कथा त्यादृष्टीने वैशिष्ट्यपूर्ण आहे.

'सहचर' या कथेत निशी आणि वसू दोघेही भारतीयच. निशी कॅनडात राहणारा, फक्त लग्नासाठी भारतातून वसूला घेऊन जाणारा इथपर्यंत कथा आपल्या ओळखीचीच असते. जी आपल्या समाजांत घडतच असते. पण निशी कॅनडात राहूनही मनानी पूर्ण सनातनी विचारांचा. खूप वैभव आहे, उंची फर्निचर आहे, अशा बंगल्यात बायकोनी दिवस घालवावे या वृत्तीचा, त्याचं स्वतःचंही रूटीन स्वतःपुरतंच आखलेलं. नोकरी, पैसा, वैभव, संगीत, कला, खेळ, वाचन अशा कुठल्याही छंदाशी त्याचा स्पर्श नाही. अगदी स्वयंकेंद्रित असा. तर वसू ही भारतातल्या जमिनीवरची पण महत्त्वाकांक्षी ! भारतीय स्त्रीला बंधनामुळे स्वतंत्रपणे काही करता येत नाही पण शाळा, कॉलेजमधे चमकलेल्या वसूला कॅनडात खूप शिकायचंय्. मोठं व्हायचंय, स्वतःची स्वतंत्र अस्मिता मिरवायचीच, जपायचीय, पण हे सारे अशक्य दिसले तेव्हा एकटीने बाहेरच्या जगात पाऊल ठेवले. खेळ, अभ्यास यात प्रगती करून स्वतःच्या मताशी पटणाऱ्या कॅनेडियन टॉमबरोबर लग्न न करताच राहाण्याची घोषणा केली आणि निशीच्या भारतीय मनाला धक्का बसला. स्वाभाविकच एक भारतीय मुलगी एवढे धाडस करेल हे त्याच्या बुरसट मनात येणेही अशक्यच. पण वसूला तिचा जोडीदार मिळाला होता, तिच्या मनाला, तिच्यातल्या स्त्रीत्वाला सांभाळणारा, तिच्या महत्त्वाकांक्षेला वाव देणारा. पूर्णपणे कॅनडाच्या भूमीवर-विचारांवर जोपासलेला ! एक भारतीय बीज कॅनडाच्या बीजाशी जुळू शकते, पण भारतीयाशी नाही. कारण वृत्तीतला हा संकुचितपणा भूमीवर अवलंबून नसून परिस्थितीवर व मनातल्या संस्कारित वृत्तीवर अवलंबून असतो. हे अतिशय सूचकतेने लेखिकेने या कथेत मांडले आहे. स्त्रीच्या नैतिकतेबरोबर तिला व्यक्ती म्हणून एक स्थान मिळवून देण्याचे कार्य ही कथा करते.

जयश्री थत्ते भट या काही वेळला 'यक्ष' सारखी कथाही लिहून जातात. चमत्कृती निर्माण करणारी ही कथा जेव्हा दूरदर्शनवर चित्रीत होते तेव्हा वाचनापेक्षाही या दृष्यतेमुळे तिचा प्रभाव मोठा वाटतो.

स्त्रीच्या, स्त्रीस्वातंत्र्याच्या या काळात नेमकेपणानी तिची दिशा दाखवणारी पात्रे काही कथेत अधूनमधून भेटतात. 'सौदा तडजोडीचा' या कथेत एक गंमत आहे. दोघांनाही आधार हवा आहे. एकाला पैशाचा. तर दुसऱ्याला शरीराचा. जोन ही २५ वर्षाची तरुणी एका ६५ वर्षाच्या वृद्धाशी स्वखुशीने लग्न करते. स्वतःच्या महत्त्वाकांक्षेमाठी ! पण त्याच वेळेस हेही पटवून देते की एका प्रौढाला एक तरुणी मिळवताना जो स्वतःच्या पुरुषत्वाचा आनंद मिळतो तो मी याला देतेय. केवळ त्याच्या संपत्तीसाठी नव्हे. स्त्रीच्या स्वभावाचे अनेकपदरी, अनेक स्तरीय दर्शन लेखिका देत राहते. तिची निरीक्षणशक्ती किती खोल आहे ते अशा कथांतून कळत जाते.

"कॅनेडियन समाजापेक्षा भारतीय समाज जास्त भावनाप्रधान आहे. व्यक्तीव्यक्तींमधील प्रेमही इथल्यापेक्षा अधिक जाणवतं. जगात कुठल्याही व्यक्तीला पैशाचं प्रेम वाटणं स्वाभाविक आहे पण इथल्यासारखी डॉलरच्या भोवती स्वतःला सदैव गुंडाळून ठेवणारी वृत्ती भारतीयात कमीच असल्याचं दिसतं." या शेरूला दिलेल्या तिच्या मैत्रीणीचे उत्तर (भांगेतली तुळस यात) म्हणजेच लेखिकेची भारतीय संस्कृतीबद्दलची समज आहे. तर शेरूकडून – 'लोक पायातले जोडेही एवढ्या झटपट बदलत नसतील तितक्या झटपट माझ्या आईने नवरे बदलले' या उत्तरात पाश्चात्य संस्कृती स्पष्ट होते. शेरूची व्यथा ही एका पाश्चात्य तरुणीची व्यथा आहे.

लेखिकेला संगीताबद्दल आकर्षण आहे. वैज्ञानिक व संगीत अशी जोड असणारी ही वाङमयीन कथाकार आहे. 'नियतीचे सूर' या कथेत स्वतःचा नवरा कॅनडात गेल्यावर आंधळ्या आईला तो डोळे देतो आणि नंतर मैफिलीत ते डोळे बघताना त्या डोळ्यांनी भोगलेल्या साऱ्या व्यथा "सगळ्या रागांची बंदिशी कशी विस्कटून भैरवीतच बुडते !" या वाक्याशी जुळून जातात. आत्यंतिक आर्त चित्रण या कथेत करतानाही तत्वचिंतकाची कुठलीही कठोर भाषा येत नाही. तर मानवी मनाच्या भावनिकतेला स्पर्श करून अनोख्या विश्वात घेऊन जाते. मानवी मनाचा शोध सनातन आहे. आणि वाङमयात, व्यवहारात, विचारात त्याचे प्रतिबिंबही अपरिहार्य आहे.

जयश्री थत्ते भट यांनी ज्या कथा चितारल्या आहेत. त्यातले प्रश्न, समस्या चिरंतन आहेत. मानवी मनाशी निगडीत अशा ज्या भावभावना आहेत त्याच त्याही रंगवतात. पण जी बीजं चिरंतन, मानवी मनाच्या तळातून आलेली असतात. अशा बीजांनी निर्माण केलेले प्रश्न, त्याचा शोध घेणे हे त्यांच्या पहिल्याच कथासंग्रहाचे वैशिष्ट्य आहे. स्वतः अनुभवलेले अनुभव, व्यक्ती यावर आधारित कथा असल्याने सर्जनशीलतेचे माप त्यांच्या पदरात पडते.

शैलीला पैलू न पाडताच आलेली, थोडीशी अनोखी वळणाची पण वेगळेपणा दाखवणारी म्हणून ही कथा स्वीकारार्ह वाटते. कथेच्या कुठल्याच प्रवाहात न बसणाऱ्या पण कथाच असणाऱ्या या कथा वाचकांना खिळवून ठेवतात. दोन्ही संस्कृतींचा विचारही करायला लावतात. म्हणूनच कथेचा हा वेगळा प्रवाह... मराठी कथेला एक सुवत्ता देऊन जातो. ■

ट्रॅक

: पद्माकर पाटील

: १ :

कचाकचा ब्रेक लावत तीनचार कारा स्टेशनाच्या आवारात लगबगीनं येऊन थडकल्या. एका कारच्या टपावर दोनतीन हार फेकल्या-सारखे ठेवून होते. इतर कारांच्या टपावर कुठेकुठे काही वेगा आडव्यातिडव्या पडून होत्या.

क्षणात पटापटा कारची दारं उघडल्या गेली नि आतली माणसं चटाचटा बाहेर पडली.

कारमधली ती आठदहाजणं कपडे सावरीत घाईगर्दीनं स्टेशनमास्तरच्या केबिनच्या दिशेने निघाली नि सरळ केबिनमधे घुसली.

आत स्टेशनमास्तर गायतोंडे आपल्या तुटक्या लाकडी केनिंगच्या खुर्चीत मुकाट बसून होता. नुकतीच अंजली सुपरफास्ट स्टेशनातनं पास होण्याच्या बेतात होती.

'मास्तर ! हे मंत्री हैत-कॅबिनेट मंत्री ! ह्येनला अर्जंट जाचं है...' दुसरा मध्येच बोलला, 'येणारी सुपरफास्ट थांबवा !'

'हो, सुपरफास्ट थांबवा ! आम्हांला अर्जंट जायचं आहे ! ' तिघाचौघांनी गलका केला.

गायतोंडे चमकलाच ! गोंधळला. नि मंत्री महोदयच आपल्याकडे आलेत म्हणून लगेच उठून अदबीनं उभा राहिला.

'बोला साहेब'

'कसलं बोला, अहो-सुपरफास्ट थांबवा ! 'मंत्रीमहोदय उभेउभेच जरा रागानेच बोलले. त्यांना घाई होती.

'साहेब–पण. सुपरफास्ट येथे थांबत नाही. हा तिचा स्टॉप नाही. मी–मी कसा काय गाडी थांबविणार साहेब ?' गायतोंडेने थोडं थांबत आपली अगतिकता दाखविली.

'च्यामायला, मंत्र्यांसाठी गाडी थांबवत नाही मजी काय ?' एक कार्यकर्ता गायतोंडेवर खेकसला.

'अहो मी कॅबिनेट मंत्री सांगतोय तुम्हांला–गाडी थांबवा !' गायतोंडेच्या बोलण्यानं बाळासाहेबांचं डोकं स्टोव्ह भडकावा तसं भडकलंच !

गायतोंडेच्या नकारात्मक वर्तनानं मंडळी खवळली होती.

एव्हाना त्यांनी त्या भोवती कोंडाळं करून गोंधळ घालायला सुरवात केली.

'मास्तर, डोकं ताळ्यावर आहे कां ? कुणाशी बोलताय तुम्ही ?'

'सुपरफास्ट थांबव ! नंतर परिणाम ठीक व्हनार नै मास्तर ! आयला, एडपटच दिसतय !'

'भडव्या रेल्वेखात्यात नोकरी करतो. नि मंत्र्यांशी हुज्जत !'

'अहो, मी नोकर माणूस साहेब. येथे सुपर-फास्ट थांबविता येणार नाही मला. माझी नोकरी जाईल साहेब' गायतोंडे काकुळतीला येऊन सांगू लागला. मधेच दोघातिघांनी त्यांचेशी धक्का बुक्कीही करायला कमी केलं नाही.

'अहो अर्ध्यातासानं पुन्हा गाडी आहे. तिच्यानं जाता येईल तुम्हाला.'

'तिच्यामारी, आम्ही कोनत्या गाडीनं जाचं ह्ये तू कोन रं आम्हास्नी सांगनारा श्याना ?'

'मायला मास्तर तुमची पार तिकडं डोंगरात–जंगलात बदली करून टाकू ! मग बसाला बोंबलत !'

'आयला, आम्ही मंत्री, आमदार मंडळी–अन् ह्ये आमची इज्जत ?'

'पंप मारता मारता स्टोव्ह भडकावा तसं बाळासाहेबाचं माथं पुन: भडकलं !' तिच्यामारी मी मंत्री है मास्तर. मी ऑर्डर देतोय तुम्हाला–थांबव गाडी ! नाहीतर –' बाळासाहेब गायतोंडेवर ओरडले तसा गायतोंडे थोडा नरमला. त्याला काय करावं कळेना. सुपरफास्ट थांबविली तर पुढील कार्यालयीन परिणामांची भीती त्याला भासू लागली. तो घाबराघुबरा झाला. त्यात बदली

इकडेतिकडे केली गेली की पंचाईत व्हायची. इकडे आड तिकडे विहिर.

तरी कसाबसा धीर एकवटून त्याने महादेवला आवाज दिला. नि मग, संबंधितांना सूचना आदेश देऊन गाडी थांबविण्याची व्यवस्था केली. बराच-वेळ गायतोंडे थरथरत राहिला.

पंधराएक मिनिटातच सुपरफास्ट दूरवरनं येतांना दिसू लागली.

पडलेला सिग्नल पहाताच सुपरफास्टचा वेग हळुहळु कमी झाला नि ती फलाटावर येऊन थांबली. मंत्री, आमदार, कार्यकर्तेमंडळी लगबगीनं आत चढली. बॅगा चढविल्या गेल्या. न येणारे सोबत फलाटावरच थांबलेत.

'क्योंवे, क्या हुवा ?' ड्रायव्हरनं खिडकीतनं मान बाहेर काढून मागेपुढे पहात फलाटावर उभ्या महादेवला त्रासिकपणे विचारलं आधीच गाडी लेट धावत होती.

'कुछ नै साब. मंत्रीजी चढे. उनके लिए रुकवाया. अर्जंट पहूचना है बोले.'

'उनकोभी साला यही गाडी में बैठना था क्या ?' ड्रायव्हर स्वतःशीच चडफडला. त्याने मान आत घेतली. नि सिग्नल वर व्हायची वाट पाहू लागला.

नको त्या स्टेशनावर गाडी थांबली म्हणून शेकडो माना त्रासिकपणे खिडकीतन बाहेर पुढे-मागे डोकावल्या होत्या.

गार्डशी गायतोंडेचं फलाटावर बोलणं झालं नि लाईन क्लीअर होताच गाडी स्टेशनातून हलली.

डब्यात गर्दी होती. बसायला एकही बाक रिकामा नव्हता.

बाळासाहेबांसोबतची पांच सहाजणं 'लेडीज केबिन'कडे वळली. कारण ह्या गाडीस फर्स्ट-क्लास, एअर कंडीशन वगैरे प्रकार नव्हताच. त्यामुळे डब्यात 'लेडीज केबिन'मध्येच व्यवस्था लावावी असं मंडळीनं ठरविलं.

आडदांडपणे ते गर्दीत धक्के देत 'लेडीज केबिन'शी आलेत नि दरडावून आतल्या मंडळीस ऑर्डर दिली, 'चलो-निकलो बाहर! मंत्री सावके लिए केबिन खाली करो!'

'चलो जल्दी! उठाव अपना अपना सामान!'

केबिनमधील स्त्री-पुरुष मंडळी ह्या अनपेक्षित प्रसंगानं भांबावून गेलीत.

'अरे भाई- हमारा रिझर्व्हेशन है. पहिलेसेही है!'

'तो क्या हुआ ? निकलो बाहर! बाहर बैठो! मंत्रीजी, व्हीआयपी लोग आये है!' नि मग दोघांतिघांनी बळजबरीनेच दोघा पुरुषांना हात धरून केबिनबाहेर काढलं. त्यांचं सामान फेकल्यासारखंच केबिनबाहेर काढलं. स्त्रिया तर गोंधळून, हादरून गेल्या होत्या त्या निमूट-पणे केबिनबाहेर पडल्या. बाहेर बडबडत राहिल्या.

ह्या प्रकारानं डब्यात थोडा गोंधळ उडाला. पण मंत्री महोदयांसाठी केबिन खाली करण्यात आल्याचे पाहून बरेच जण गपगप् झाले. काही झाल्या प्रकारावर चिडले, नि आपसात तावा-तावात चर्चा करीत आपला संताप मनात जिरवित राहिले. काहींना मंत्री आपल्या सोबत प्रवास करताहेत याचं कौतुकही वाटून गेलं.

केबिन खाली होतानाचा गोंधळ पहात विजयी मुद्रेने बाळासाहेब मग आपल्या सहकार्यांसमवेत आत शिरले. धोतर, टोपी सावरीत आतल्या मोकळ्या बाकावर ऐसपैस बसले. हास्यविनोद सुरू झाले. केबिनचं दार ओढून घेण्यात आलं.

दोघांना आत जागा जमली नाही त्यांनी केबिनबाहेरच्या दोन सीटा बळजबरीनं बळ-कावल्या. तेथे बसलेल्यांना हुसकावून लावलं.

सीटग्रस्त मंडळी याला त्याला शिव्याशाप देत बडबडत इतरत्र बसलीत. काही उभी उभीच गर्दीत तापल्या डोक्यानं संताप व्यक्त करीत राहिली.

बंद केबिन बोलकी झाली-

'आयला, गणपतरावानी ऐनवेळीच पोराच्या लग्नाचं काढलं! काही आधी चार एक दिवस सांगायचं की नाही ?'

'बरं लग्नही अशा गावी की, तिथं विमानभी उतरत नाही. तालुक्याचं गाव.'

'बरं झालं बाळासाहेब, सुपरफास्ट थांबविली ते, नंतर लग्न लागल्यावर आपण पोहोचतु.'

'बाकी पेपरातनं ह्या लग्नाबद्दल काय काय

लहून येतया त्ये वाचलेत ? अवो हिरीत बर्फाच्या लाद्या टाकल्यात काय म्हनत्यात ! राजेशाही सजावट चाल्लीत म्हनत्यात काय ! मायला, ह्येचं काय जातं-कळत नाय. नुस्तंच आपलं इनाकारन बोंबलत्यात !'

'थोरात अप्पा, अहो लोकशाही ही ! कुनी काहीही करा नि कुनी काहीही लिहा ! व्यक्ती स्वातंत्र्य की काय म्हनत्यात ते हेच !'

'अवो-पन मी म्हंतो, आपल्याले जन्तेत वावरावं लागतं. इलक्शनमधी आडवं केलं म्हंजी ?'

'नानाभाऊ, तुम्ही आपले उगाच पब्लीकला भिता. अहो पब्लीक आपलीच अस्ते. तिला कशयाला भ्याचं ?'

'बाळासाहेब, तुम्ही मंत्री आहातच सत्ताभी आपन उपभोगतोय- आपत्याला पाहिजे तशी कुनाचं भ्या है.'

'नानाभाऊ, सुपरफास्ट थांबविलीच की नाही आपन ? अं ?'

मग, बाळासाहेबांसहित सारेच खळखळून हसले.

सुपरफास्ट खडखडाट करीत धावत होती. आत केबिनमध्ये गप्पा, हास्यविनोद, चावट चर्चा रंगत होत्या. विडी, सिग्रेटीचे धूर सोडले जात होते. केबिनच्या बाहेर सीटांवर बसलेले जाधव, दळवी आतल्या मंडळीस काय हवं नको ते अधून मधून पहात होते.

मध्यंतरात गाडी कुठल्याशा स्टेशनावर थांवली तेव्हा पाच सहा कार्यकर्ते मंडळी फलाटावर उतरली. नाश्त्यासाठी फेरीवाल्याकडून भरपूर फळे, खाद्यपदार्थ त्यांनी घेतली नि कां कुणास ठाऊक पैसे न देता फेरीवाल्यांशी हुज्जती घातल्या. दमदाटी केली. धक्काबुक्कीपर्यंत प्रकरणे गेलीत. नि क्षणभरानं फलाटावरील आरडाओरडी, शिव्या यांच्या गोंधळात गाडी सुटली. मंडळी गरम डोक्यानं आपापल्या स्थानावर स्थानापन्न झाली.

'आपली लोकं साली सुधरायची नाहीत ! आम्ही यांची सेवा करायची ! यांचे प्रश्न सोडवायचे ! जन्तेकरिता अहोरात्र झिजायचं ! अन् ह्या जन्तेचा हा एक अल्पसा घटक-फेरीवाले यांनी काय आमची प्रवासात साधी नाश्त्याचीही सोय करायची नै ? चक्क पैसे मागायचे ?' जीभाऊ केळीची सालटं काढीत तावातावानं आपल्या जागेवर बसत ओरडला

'नाहीतर काय ? साले लोकं बदललेत आजकाल.' बटाटा वड्याचा घास तोडत नानाजीपंत उत्तरलेत.

'म्हनून म्हंतो-आमदारकीत आता राम राहीला नाय. खुर्सी हाय तवर सत्ता उपभोगून घ्या.' थोरात अप्पानं विडीचा झुरका घेतला नि वाफेच्या इंजिनागत भकाभका तोंडातनं धूर सोडला.

बाळासाहेबांनी मग एक एक द्राक्ष तोंडात टाकीत, चव चघळीत सर्वांना आपल्यापरीनं शांत केल. काहींची गरम झालेली डोकी निवळली...

'बाळासाहेब, इचका झाला वघा कार्यक्रमाचा !'

'मग ?'

'मायला, लग्नाला चालतूत नि कोरडं कोरडं ?- आरं पार्टी हू द्या झक्कास !'

'तात्या, ही सुपरफास्ट व्हय. नि आग गाडी ! इथं कुटलं बिअर नि व्हिस्की ?'

'सोवत बाळासाहेब हूंत कशापायी ? आरं गाडी थांबवू की ! काय बाळासाहेब ?'

'तुमची इच्छाच आहे तर होऊन जाऊ द्या !' बाळासाहेबांनी सहर्ष संमती दर्शविली, तशी सर्वांनीच परस्परांशी टाळ्या घेत जल्लोश केला.

केबिनचं दार बंद होतं तरी आतल्या गोंधळाचा बाहेरच्या प्रवाशांना त्रास होतच होता. परस्परांशी कुजबुजत त्रासिकपणे नाराजी व्यक्त करीत होते. दुसरं करणार काय ?

पुढचं स्टेशन साधारणतः तास दीडतासानं येणारं होतं. नि त्या स्टेशनवर, स्टेशनाच्या बाहेर वाईनशॉप असल्याची माहिती जाधव, दळवीनं दिली, त्यामुळे आता पत्त्यांचा डाव मांडीत गप्पा छाटण्याशिवाय मंडळीस दुसरा ईलाज नव्हता.

थोरात अप्पा नि नानाभाऊ आपापला धोतर, पायजमा सावरीत वर आडव्यातिडव्या उभ्या टांगा टाकीत बर्थवर चढलेत नि काहीवेळ डोळे मिटतो म्हणून आडवे झालेत. थोरांत अप्पांना लोळतांना धोतराची अडचण होऊ लागली म्हणून

त्यांनी पडल्यापडल्या ढुंगण तिरपंतारपं उत्रकावित अंडरपँटवरच धोतर सोडलं नि पाय लांब ताणून मोकळं धोतर अंगभर पांघरून घेतलं.

खालच्या बाकावर इतर मंडळींचा पत्त्यांचा डाव रंगला.

मध्यंतरात दळवी, जाधवचं सांगणं न जुमानता टीसी नं केबिनचं दार उघडवून मंडळीकडे तिकीटांची मागणी केली नि बाळासाहेबांना पहाताच टीसीनं ते मंत्री असल्याचं ओळखलं नि तो काहीच न बोलता दिलगिरी व्यक्त करीत पुढे वळला. वळतांना त्याने स्वतःहून केबिनचं दार ओढून बंद करून घ्यायची दक्षताही घेतली.

स्टेशन आलं तशी गाडी हळूहळू फलाटावर येऊन थांबली. लोक गोंधळ करीत चढू उतरू लागले. फेरीवाले ओरडू लागले.

दळवी, जाधवनं ठरल्याप्रमाणे रिकामी थैली घेतली नि ते लगत्रगीनं गाडीतनं उतरून स्टेशनाबाहेर पडले. वाईनशॉपच्या मार्गाला लागले.

स्टेशनात गाडी सुटण्याची वेळ झाली तरी दळवी, जाधवचा परतण्याचा पत्ता नव्हता. इतर मंडळी दारात, फलाटावर येऊन त्यांना इकडे तिकडे माना वळवीत शोधू लागली.

एव्हाना थोरात अप्पा, नानाभाऊ यांची डुलकी घेऊन झाली होती नि तेही फलाटावर येऊन जांभया देत उभे होते.

'गार्डसाब, अंदर मंत्रीजी बैठे हैं. व्हीआयपी लोक भी हैं, काही माणसं ह्या स्टेशनावर त्यांना भेटणार आहेत. ते आले नाहीत अजून. थांबवा थोडा वेळ गाडी.'

झालं ! गाडी थांबली.

स्टेशनभर सर्वत्र गोंधळ. त्रासिकपणा. चिडचिडपणा, आधीच गाडी तीनतास उशीरा धावतेय. त्यात पुन्हा उशीर !

एव्हाना साऱ्या गाडीभर माहित झालं होतं कीं, ह्या गाडीतनं कुणी मंत्री कार्यकर्ते मंडळी प्रवास करीत आहेत.

बराच वेळ झाल्यामुळे लोक संबधितांकडे तक्रारी करू लागले. कुणाला वेळेवर पोचायचं होतं. कुणाला पेशंटला ॲडमीट करायचं होतं. शेकडो प्रश्न !

'अरे भै, गाडी स्टार्ट किया तो चेन खेचेंगे ! उसमे व्हीआपी लोग हैं, मैं क्या करू ?' सर्वत्र हतबलता दिसून आली. काहींनी आरडाओरडा करून पाहिला. पण काहीच फरक पडला नाही.

एकदाचे दळवी, जाधव लगबगीने थैल्यांसह फलाटावर आले नि फलाटावरनं धावतपळत डब्यात चढले. केबिनमधे आलेत नि मग, जीभाऊनं गार्डला इशारा दिल्यावर एकदाची गाड हलली.

'भडव्यांनो ! इतकावेळ कुठे होता ?' बाळासाबेब दोघांवर ओरडलेत–'साल्यांनो ! लोकांनी खवळून काही कमीजास्त केलं अस्तं तर ?'

'साहेब बाटल्याच नव्हत्या. दुकानदाराला अडचण सांगितली तवा त्यानं त्या दुसरीकडून आणून व्यवस्था करून दिली. म्हणून जरा वेळ झाला साहेब.' बाटल्या–चिवडयाची थैली जीभाऊंच्या ताब्यात देत दळवी, जाधव दबक्या आवाजात उत्तरले नि केबिनबाहेर आले. त्यांनी दार ओढून घेतलं. कुणासही इकडे फिरकू न देण्याची सक्त सूचना नानाभाऊनं त्यांना देऊन ठेवली.

केबिनमधे पार्टी ऐन रंगात आली. साऱ्यांच्या अंगाचा नि डोक्याचा बिअर–व्हिस्कीनं पूर्ण तावा घेतला. सारेच हवं तसं बसल्याजागी झिंगत बोलत होते. जिभा अडखळत होत्या.

'बाळासाहेब, ह्या खेपेस आपल्याला तिकीट मिळालं पायजेलऽऽ. आयला, हा गणप्या दुसऱ्यांदा आमदारकी भोगून राहिलाऽऽ हाऽऽ'

'तात्या–ओता की तुम्हीबी लाखो रुपये, नि घ्या तिकीट ! तुम्हांला कोण नाय म्हणतं ?'

'बाळासाहेब, हा कसला निवडून येतो ? डुबायचा उलट लाखोंनी !'

'तात्या, तुम्ही त्या अजाबराव सारखं करा ! म्हंजी निवडणूक न लढविता आमदार मंत्री बी व्हता येतं. काय ?'

तात्याजीपंतांनी जीभाऊच्या हातावर टाळी देत खीखी हास्य पसरविलं नि तात्याकडे 'समजलं काय ?' ह्या अर्थानं रोखून पहिलं.

'पुढल्या हप्त्यात मिटींग है तिकीटवाटपासाठी. बाळासाहेब, तुमी वजन खर्ची घाला नि जमवा आमचं बी.' मंडळीतले दोघंतिघं बोलले.

अनुक्रमणिका

'खिसे गरम ठेवा म्हंजी झालं ! काय ?'

पेले पुन्हापुन्हा भरले जात होते. रिते होत होते. चिवडा, बिड्या, सिग्रेटींचा फडशा पाडला जात होता. मधेच एकदा जाधव दळवी आत येऊन दोनचार पेग मारून गेले होते नि पुन्हा बाहेर आपल्या जागेवर येऊन बसले होते.

सुपरफास्ट खडखडाट करीत धावत होती. मंडळीचं उतरण्याचं ठिकाण अजून दीडदोन तासानं येणारं होतं.

मग, काही वेळानं हळूहळू आपोआप केबिन शांत होऊ लागली. सारे बसल्याजागी हवेतसे आडवेतिडवे लवंडले. केबिन मुकी झाली.

बाहेर बसलेला—डोळे मिटून खिडकीशी डोके रेललेला जाधव एकाएकी दचकला नि त्यानं मनगटावरचं घड्याळ पाहिलं. खिडकीतनं बाहेर इकडे तिकडे पाहिलं नि जाधवला उठवलं नि मग, केबिनचं दार ओढून आत जाऊन साऱ्या मंडळीला जागं केलं. अर्ध्यातासात सीतापूर येतयं नि आपल्याला उतरायचंय याची वर्दी दिली.

मंडळी लगबगीनं उठली. सर्वांनी स्वतःला ठीकठाक केलं. जाधवनं आतला पसारा आवरला. हातंतोंड धुऊन ज्यानं त्यानं स्वतःला टवटवीत करून घेतल.

'बाळासाहेब, सीतापूर येऊन राहिलं. गाडी तिथं थांबत नं. खिचू चैन ?'

'एडपटागट काय विचारतो, खेच !'

आपापल्या बॅगा सामानासहित सारेजणं केबिनबाहेर आले नि दारात थांबले. फलाटावर गाडी थांबेल असा अंदाज बांधीत जाधवनं चैन खेचली तशी गाडी हळूहळू थांबत नेमकी फलाटावरच थांबली.

पटापटा सारी मंडळी खाली उतरली. सामान उतरवलं गेलं.

नेहमीसारखी शेकडो डोकी खिडकीतनं, दारातनं मागेपुढे त्रासिकपणे डोकाऊ लागली. काय झालं ? काय झालं ? याला त्याला विचारू लागली. बडबडू लागली. आधीच गाडी जवळ-जवळ पाच तास लेट झाली होती.

'आयला, ही सुपरफास्ट आहे की, बैलगाडी ? आपली कुठंही, केव्हाही थांबत चाललीय ?'

'गाडीत मंत्री, आमदार, पुढारी मंडळी आहे म्हणतात. मग, गाडी तर वेळेवर धावायला हवी. नियमानुसार स्टॉपवरच थांबायला हवी. पण, आजकाल ना कुणाला मंत्र्याची भिती वाटते ना आमदाराची ! सगळीकडे मनमानी !'

'हा साला विस्कळीतपणा कुठंतरी थांबायला पाहिजे.'

गाडीभर डब्याडब्यात गोंधळ. चिडचिड. नाराजी. संताप. काहीजण निव्वळ मठ्ठ ! मठ्ठ ! दोनएक मिन्टात हॉर्न देत गाडी हलली.

साऱ्यांनी पुन्हा एकदा सुटकेचा श्वास टाकला. लोकं आपापल्या जागी टेकली.

'मंत्री उतरलेत हिथं !' शब्द माणसामाणसा-वरनं उडत गाडीच्या दोन्ही टोकास त्वरित पोहोचले नि गाडीनं खडखडाट करीत पुन्हा-वेग घेतला....

: २ :

कचाकचा ब्रेक लावत तीनचार कारा स्टेश-नाच्या आवारात लगबगीनं येऊन थडकल्या. काही कारांच्या टपावर कुठेकुठे काही बॅगा आडव्यातिडव्या पडून होत्या.

क्षणात पटापटा कारची दारं उघडल्या गेलीत नि आतली माणसं चटाचटा बाहेर पडली.

कारमधली ती आठदहाजणं कपडे सावरीत घाईगर्दीनं स्टेशनमास्तरच्या केबिनच्या दिशेने निघाली नि बंद कांचेरी केबिनच्या दाराशी येऊन थांबली. लगबगीनं एकादोघांनी कांचेरी दारावर टकटक केलं

आत स्टेशनमास्तर साकाहितो आपल्या खुर्चीत मुकाट बसून होता. नुकतीच नागासाकी सुपरफास्ट स्टेशनातनं पास होण्याच्या बेतात होती.

टकटक आवाज व बाहेर दाराशी गोंधळलेली माणसं त्याला पारदर्शक कांचेरी दारातून दिसलीत तसा तो लगबगीनं सावरून बसला. त्याने खुणेनेच त्यांना आत येण्याची परवानगी दिली.

तसे सारेजण क्षणात कांचेरी दार ढकलून आत आलेत नि उभं राहून दोन्ही हात पुढ्यात बांधून कमरेत वाकत त्यांनी अदबीनं साकाहितोला

नमस्कार केला. खुर्चीतनं बाजूस उठून साकाहितोनेही त्यांना नमस्कार केला.

'सर, नुकताच मला संदेश मिळाला. माझी आई गावी अत्यंत सिरियस आहे. मला तेथे पोहचणं अत्यंत आवश्यक आहे. ती नव्वद वर्षाची असून मी तिचा एकुलता एक मुलगा आहे–'

बोलणाऱ्या एकानं एका दमात लगबगीनं सांगायला सुरवात केली.

'बरं मग–मी काय करावं अशी आपली इच्छा आहे ?" साकाहितो काहीसा गोंधळून बोलला.

'सर, गावी पोचायला काहीच साधन आता नाहीए. आता नुकतीच येथून पास होणारी नागासाकी सुपरफास्ट तुम्ही थांबवाल तर ?–

'व्हॉट ? तुम्ही म्हणताय काय ? अहो, नागासाकी सुपरफास्ट आहे. सर, हा तिचा स्टॉप नाही. ती थांबणार कशी ? नि मी तिला थांबविणार कसा ?'

'सर, प्लीज– हेल्प मी सर. आय वॉंट टू मीट माय मदर, परहॅप्स्–शी विईल बी ऑन द वे ऑफ डेथ. मी तिचा एकुलताएक मुलगा आहे, मला तेथे पोहचणं अत्यावश्यक आहे.' त्याच्या स्वरात दुःख, चिंता दाटून आली होती.

उरलेल्या तिघाचौघांनीही साकाहितोला परोपरीनं विनविलं.

'सर, हे कॅबिनेट मंत्री आहेत. ताऊचानी सुडीमारो.'

मंत्र्याचे नाव ऐकताच नि त्यांना पुढ्यातच पहात साकाहितो चमकला ! तसा त्याने लगेच पुन्हा सुडीमारोंना अदबीनं नमस्कार केला. सुडीमारोंनीही त्यांना अभिवादन केलं.

'सर, अर्ध्या तासानं पुन्हा दुसरी गाडी आहे. तिच्यानं जाता येईल तुम्हाला.'

'पण सर, ती सुपरफास्ट नसेल ना ? नि आम्हाला तर क्वीक्, मोस्ट अर्जंट पोहोचायचं.'

'प्लीज सर'–

साकाहितो गोंधळला. त्याला काय बोलावं, कळेना. मंत्र्याच्या विनंतीनुसार सुपरफास्ट थांबविली तर पुढील कार्यालयीन परिणामांची भीती त्याला ग्रासू लागली. तो घावराघुवरा झाला. त्याची ती दोलायमान अवस्था सुडीमारोंनी जाणली तसे ते तडक म्हणाले, 'सर, डोन्ट वरी. नागासाकी सुपरफास्ट येथे थांबविल्याची पूर्ण जबाबदारी मी घेतो. तुम्हाला वाटल्यास लेखी देतो.'

'नो नो सर'–साकाहितोला ओशाळल्यागत झालं. त्यानं थोडावेळ विचार केला नि लगेच तो कांचेरी दार लोटून फलाटावर लगबगीनं आला त्याचे पाठोपाठ सारी मंडळीही फलाटावर आली.

साकाहितोनं शिमाच्याला आवाज दिला नि मग, संबंधितांना सूचना–आदेश देऊन गाडी थांबविण्याची व्यवस्था केली.

पांचएक मिनटातच सुपरफास्ट दूरवरनं येताना दिसू लागली.

पडलेला सिग्नल पहाताच सुपरफास्टचा वेग हळूहळू कमी झाला नि ती फलाटावर येऊन थांबली.

क्षणात डब्यांची दारं उघडली. सुडीमारो नि त्यांचे सहकारी लगबगीने समोरच्या डब्यात चढले. बॅगा चढविल्या गेल्या. न येणारे फलाटावर थांबले.

'शिमाच्या, व्हॉट हॅपन्ड ?' ड्रायव्हरनं मान बाहेर काढून मागेपुढे पहात फलाटावर उभ्या शिमाच्याला त्रासिकपणे विचारल. कारण हा सुपरफास्टचा स्टॉप नव्हता.

'काही नाही. मंत्री सुडीमारो चढलेत. त्यांच्याकरिता थांबविली गाडी. अर्जंट जायचं आहे म्हणे.'

ड्रायव्हर अचंबला, नि गाडी लेट होईल म्हणून चिंतेतही पडला. त्याने मान आत घेतली नि सिग्नल वर व्हायची वाट पाहू लागला.

नको त्या स्टेशनावर गाडी थांबली म्हणून शेकडो माना त्रासिकपणे खिडकी–दारातनं पुढेमागे डोकाविल्या होत्या.

गार्डशी साकाहितोचं फलाटावर बोलणं झालं नि लाईन क्लीअर होताच गाडी स्टेशनातनं हलली.

डब्यात गर्दी होती. बसायला एकही बाक रिकामा नव्हता. वा कुठे जागा दिसत नव्हती.

मंत्री सुडीमारो नि त्यांच्या आमदार सहकाऱ्यांना दरवाजा व शेजारील पॅसेजमध्ये उभं राहून प्रवास करण्याशिवाय गत्यंतर नव्हतं.

ते तसेच पॅसेजमध्ये उभे राहिले. सामानाच्या बॅगा तेथेच बाजूस लावल्या.

सुडीमारो बरेच चिंतेत दिसत होते. वृद्धापकाळामुळे आईची तब्बेत वरचेवर बिघडत होती. आता तर सिरियस झाल्याची बातमी होती. शिवाय तिला आवश्यक असणारं औषधही शहरात मिळू शकलं नव्हतं. ती औषधं–टॅबलेटस् आठवणीनं आणण्याविषयीचा डॉक्टरांचा आदेश होता. पण–ते हतबल झाले होते. आजूबाजूच्या शहरी माणसं त्वरेने धाडूनही टॅबलेटस् मिळाल्या नव्हत्या. तरी ते आपल्या आईला आपल्याजवळ शहरी राहण्याविषयी नेहमी आग्रह धरीत पण ती टाळी वडीलोपार्जित घरातच जीव सोडीन असा तिचा हट्ट असे. त्या खेड्यातल्या घराशी तिचं भावनिक नातं ते तोडू शकले नाहीत.

'सर, बरेच चिंतीत दिसता.' नाकासोने बोलायचं म्हणून बोलला.

'हो. हो–' सुडिमारो भानावर आले.

'नाकासोने, टॅबलेटस् मिळाल्या असत्या तर बरं झालं असतं. आता केवळ परमेश्वरावरचं भरवसा ठेवायचा.'

'गॉड इज ग्रेट सर. चिंता करू नका. तात्याना ठीक असेल.'

मग काही वेळ कुणीच काही बोललं नाही.

'नाकासोने, आपण सुपर फास्ट थांबविली. आता चढून प्रवास करतोय. बरं वाटत नाही मनाला अपराधीसारखं वाटतंय. हो ना ?'

'सर, आपल्याला इलाजच नव्हता : विमानानं टिकीला जाऊन तेथून कार–टॅक्सीनं पियातोला पोचता आलं असतं. पण ऐनवेळी फ्लाईट रद्द झाली. अनिश्चित वेळेकरिता. करणार काय ?'

'कंडक्टर आला की दंडासहित तिकीटं काढून घेऊ सर. डोन्ट वरी.'

समोरच्या बाकावरचे दोघ तिघं मघापासून त्यांचेकडे मुकाट पहात होते. शेवटी न राहून त्यातले दोघं उठून त्यांचे जवळ आलेत नि त्यांनी त्यांची चौकशी करून अदबीनं त्यांचे सोबत बाकावर दसगेविषयी विनंती केली.

मग, सारेजण हो नाही करीत समोरा समोरच्या दोन बाकांवर मागे पुढे ढुंगणं टेकीत सामावून घेतली गेली.

सामानाच्या बॅगाही बाकाखाली, बर्थंव ठेवण्यात आल्या.

सर्वांचा गप्पा गोष्टीत प्रवास सुरू झाला.

सुपर फास्टनं वेग घेतला होता.

कोपऱ्यात खिडकीशी बसलेल्या एका स्त्रीला बाकावरच्या गर्दीमुळे सारखं अवघडल्यासारखं होत होतं. ही गोष्ट टिकासोच्या लक्षात आली. ते उठलेत नि त्यांनी बाकाखालील एक मोठी बॅग खरकन् बाहेर ओढून काढली नि बॅगेला उभी करून त्यावर ढुंगण टेकून मधल्या बाजूत बाजूला बसले. बॅगेवरची त्यांची बैठक व्यवस्थित जमली, तसे त्या बाकावरचे जरा मोकळे मोकळे बसले. एक जण बाकावरचा कमी झाल्यामुळे खिडकीजवळच्या त्या स्त्रीलाही मोकळे बसता आले.

गप्पांच्या ओघात मधेच कंडक्टर आला, त्यास नाकासोनेनी सारी परिस्थिती कथन केली, नि क्षमा मागून सुपर फास्ट सुटणाऱ्या स्टेशनापासून लागणाऱ्या तिकिटाच्या चौपट दंड भरून तिकीटा काढून घेतल्या.

मंत्री, आमदारांनीही विदाऊट तिकीट प्रवास करावा यावद्दची नाराजी कंडक्टरच्या चेहऱ्यावर स्पष्टपणे दिसत होती. त्याच्या त्या नाराजीनं साऱ्यांनाच अपराधीसारखं वाटत होतं. पण, मंडळींचा नाईलाज झाला होता.

कंडक्टर पुढे गेल्यानंतर काहीवेळ गप्पात खंड पडला. कुणी काही बोललं नाही थोडावेळ. मग, पुन्हा हास्य विनोदात गप्पा सुरू झाल्यात.

सामाजिक, आर्थिक, राजकीय बाबींवरून चर्चा करीत मंडळी वैयक्तिक चौकश्यांवर केव्हा येऊन पोहोचली कुणास कळलेही नाही.

'अहो, टॅबलेटस् शोधूनही कुठे मिळाल्या नाहीत. औषधाचा तुटवडा जाणावा ही अत्यंत गंभीर बाब.'

'डॉक्टरांनीही त्या टॅबलेटस्ला पर्याय नाहीच सांगितलं–कळविलं. करणार काय ? आता तर देवावरच भरोसा ठेवणं हाती आहे.'

सुडीमारो नि त्यांचे सहकारी पुन्हा काळजीत गेले.

'ह्या टॅबनी कदाचित तात्यानांना आरामही मिळाला असता. पण–'

'कुठल्या टॅब म्हणालात ? डिसॉन्टीन्स ?' वाकावरचा एक जण काहीसं आठवत बोलला.

'हो. डिसॉन्टीन्स–'

'अहो, फिजीला एका केमिस्टकडे मिळतात की ! महिना भरापूर्वी आम्ही फुजीत सारेजण गेलो होतो, तेव्हां डॉक्टरांनी वडिलांना ह्या टॅब सांगितल्या होत्या. तातडीनं त्या फुजीत मिळाल्यात. अगदी रेल्वे स्टेशनला लागून औषधाचं दुकान आहे ते– ह्या टॅबमुळे वडिलांना दोन मिन्टातच आराम मिळाला होता–'

'असं म्हणता ?' साऱ्यांना थोडा हुरूप आला. आशा पल्लवीत झाल्या.

'बरे झाले-पुढचं स्टेशन फुजीच आहे.'

'कुणी तरी एकानं स्टेशनाबाहेर तातडीन् जाऊन–घेऊन या. गाडी थोडावेळच थांबते तिथे.'

मग मंडळीनं आपसात काही ठरविलं नि ते फुजीला गाडी थांबण्याची वाट पाहू लागले.

काही वेळानं 'फुजी' आलं. गाडी हळू हळू फलाटावर येऊन थांबली. क्षणात दारं उघडलीत. लोकं चढू–उतरू लागलेत.

दारं उघडताच नाकासोने नि टिकासोनी भराभर फलाटावर उड्या घेतल्या नि ते स्टेशनाच्या बाहेर धावत निघाले.

गाडी सुटण्याची वेळ झाली तरी नाकासोने, टिकासोचा परतण्याचा पत्ता नव्हता. इतर मंडळी दारात, फलाटावर येऊन त्यांना इकडेतिकडे माना वळवीत शोधू लागली.

शेवटी त्वरेने मंत्री सुडीमारो गार्डजवळ पोहोचलेत नि त्यांनी त्यांना अडचण सांगितली.

'सर, ही सुपरफास्ट आहे. लेट झाली तर मला पुढे स्पष्टीकरण द्यावं लागेल."

'जस्ट फाईव्ह मिनिटस् सर. जीवनमरणाचा प्रश्न आहे–ते येतच असतील.' दोघातिघांनी गार्डला विनविलं. मंडळी नाकासोने, टिकासोची वाट पहात फलाटावर थांबलीत.

एव्हाना, बराच वेळ झाला तरी गाडी स्टार्ट होत नाही म्हणून सर्वत्र गोंधळ पसरला. नाराजी–त्रासिकपणा–चिडचिड... नि साऱ्या गाडीभर मग माहित झालं की, ह्या गाडीतनं मंत्री ताऊत्रानी सुडीमारो प्रवास करताहेत. त्यांचेसोबत त्यांचे काही आमदार सहकारीही आहेत. नि त्यांच्यामुळेच गाडी थांबून आहे. लेट होत आहे

बराच वेळ झाल्यामुळे लोकं तक्रारी करू लागलीत. कुणाला वेळेवर पोचायचं होतं. कुणाला पेशंटला ॲडमीट करायचं होतं, शेकडो प्रश्न !

एकदाचे नाकासोने, टिकासो लगबगीने फलाटावर धावत धावत आलेत नि क्षणात ते डब्यात चढलेत. सुडीमारोनी गार्डला इशारा देताच हॉर्न देत गाडी हलली.

नाकासोने, टिकासो धावल्यामुळे हपापत होते. त्यांना बोलणंही जमेना.

'इतका वेळ कुठे होता ?' सुडीमारो दोघांवर जवळजवळ संतापाने ओरडलेच. दम घेत क्षणभरानं टिकासो बोलला; 'सर दुकानात टॅब नव्हत्या. संपल्यात म्हणे. शेवटी दुकानदाराला अडचण सांगितली तेव्हा त्यानं त्या टॅबलेटस् दुसऱ्या केमिस्टकडून आणून दिल्या. त्यामुळे थांबावं लागलं सर–'

टिकासोनेनी कोटाच्या खिशात हात घालून टॅबलेटस् पाकिट काढलं नि ते सुडीमारोंच्या ताब्यात दिलं. दम लागल्यामुळे त्याचा ऊर अजूनही धपापत होतं.

सुडीमारो पुढे काहीच बोलले नाही. शेवटी पुन्हा मंडळी दारातनं आपापल्या जागी आली. बडबडीत टेकली.

आपल्यामुळे संपूर्ण गाडीतल्या लोकांना त्रास झाल्याचा सुडीमारोसहित साऱ्यांनाच खेद होऊ लागला.

काही वेळ मंडळी अपराध्यासारखी पुन: मुकीमुकी बसून राहिली.

शेवटी बाकावरल्या मघाच्या माणसानंच बोलणं काढलं, 'बरं झालं सर,–टॅबलेटस् मिळाल्या.'

'होनं–आता तशी जास्त काळजी नाही म्हणायची. तात्यानाला त्वरीत टॅबस् देता आली पाहिजेत आता.'

मग मंडळी पुन्हा गप्पात रंगली. येणाऱ्या नव्या निवडणुका हा प्रामुख्याने गप्पांचा विषय होता. सुपरफास्ट धावत होती.

बराच वेळ गेला. आईला केव्हा भेटतो असं सुडीमारोंना झालं होतं.

'सर, एक सांगू–' नाकासोनेनं हिम्मत करून विचारायचं ठरविलं. मग तोच पुढे बोलला.

'सुपरफास्ट पियातोला थांबत नाही. सरळ झिङ्यांगला थांबेल. तेथे उतरून नंतर आपण कारटॅक्सीनं परत मागे दीडदोनशे किलोमीटर येणं–म्हणजे पुन्हा दीडदोनतास घालविणं होईल.'

'मग–'

'सुपरफास्ट पियातोवरूनच पास होते. मग पियातोलाच कां गाडी थांबवू नये ?'

'नाकासोने, तुम्हाला वेड लागलंय की काय?'

'आधीच लोकं आपल्या नावानं नाराज झाले आहेत गाडीतले !'

'सर, आपल्याजवळ आता औषध–टॅबलेटस् आहेत–तात्यानासाठी. त्या त्यांना त्वरेने पोचविता आल्या तरच त्याचा उपयोग उगाच–तीन तास आपण पुन्हा उशीरा पोहचू–मधल्या काळात काहीही कमीजास्त होऊ शकतं. नाही का ?''

'हो सर, नाकासोने ठीक बोलताय. तेवढाच तात्यानांना लवकर आराम मिळेल.''

दोघातिघांनी नाकासोनेचं म्हणणं उचलून धरलं. मग सर्वांनाच पियातोला गाडी थांबवून उतरणं योग्य वाटू लागलं

सुडीमारो काहीसे गोंधळले. त्यांना काय करावं कळेना. आई तात्यानाचा वृद्धमलूल चेहरा त्यांच्या डोळ्यापुढे आला. ते त्यांचं दैवत होतं. अत्यंत हालअपेष्टात आईनं त्यांना शिकवून आज ह्या पदापर्यंत पोहोचविलं होतं. आज, तीच आई मृत्यूच्या दारात उभी होती. तिला आपल्याशिवाय आहे तरी कोण ?

आईसोबतचा सारा भूतकाळ, वर्तमानकाळ तुकड्यातुकड्यानी त्यांच्या डोळ्यापुढे चमकून गेला...सुडीमारो भानावर आलेत नि त्यांनी पियातोला गाडी थांबवायच्या निर्णयाला संमती दिली.

पियातो दहापंधरा मिनिटात येईल अशा अंदाजानं बाकावरनं मंडळी उठली. सर्वांनी स्वतःला ठीकठाक केलं. बॅगा दारात नेऊन ठेवल्या नि बाकावरच्या इतर मंडळींचा निरोप घेऊन दारात येऊन थांबलीत.

'पियातो' येताच नाकासोनेने दारावरली साखळी खाली खेचली तसा गाडीचा वेग मंदमंद होत गेला नि फलाटावर थांबली

क्षणांत दारं उघडली. सुडीमारो नि त्यांच्या सहकाऱ्यांनी पटापटा खाली उड्या मारल्या. सामान उतरविलं.

नको त्या स्टेशनवर गाडी थांबली म्हणून नेहमीसारखी पुनः शेकडो डोकी खिडकीतनं, दारातनं मागेपुढे त्रासिकपणे डोकावू लागली. आधीच गाडी अर्धातास उशीरा धावत होती. गाडीभर डब्याडब्यात गोंधळ. चिडचिड–नाराजी–संताप-काहीजण निव्वळ मठ्ठ, मठ्ठ !

एकदोन मिनिटात हॉर्न देत गाडी हलली.

गाडी त्वरीत धकली म्हणून सर्वांनी सुटकेचा श्वास टाकला.

'मंत्री उतरलेत इथे !' शब्द माणसामाणसावरनं उडत गाडीच्या दोन्ही टोकास त्वरीत पोहोचले. गाडीनं पुन्हा वेग घेतला ..

* *

उपरोक्त दोन्ही घटनांचा त्या त्या देशात प्रसिद्धी माध्यमातनं गदारोळ उठला, आणि घटना अशा घडल्या :

१. श्रीयुत बाळासाहेब व त्यांच्या प्रवासातील सहकारी मंडळींना नव्या निवडणुकीसाठी पक्षाचे पुन्हा तिकिट मिळाले ! जल्लोश झाला.

२. श्रीयुत ताऊचानी सुडीमारो यांना तडकाफडकी मंत्रीपदावरून बडतर्फ करून नव्या निवडणुकीसाठी पक्षाने तिकीट तर नाकारलेच परंतु त्यांच्या प्रवासातील सहकारी मंडळींसह त्यांची सहावर्षांसाठी पक्षातून हकालपट्टीही केली !

ट्रॅकच्या मधोमध आपण उभे राहून सरळ दूरवर ट्रॅकच्या दोन्ही बाजूस आलटून पालटून पाहिले की, आपणास दोन्ही बाजूंना रूळ एकमेकास मिळालेले दिसतात. पण असे प्रत्यक्षात असते कां ?

नाही. हा केवळ आपला भास असतो. दृष्टीदोष असतो.

तात्पर्य, ट्रॅकचे रूळ समांतरच जात असतात हेच खरे. ■

टपाल पेटी क्र. ९५, ठाणे

गगनगूढ

डोहाहुन संथ किती
शब्दांचा अर्थ खोल;
काठावर आतुर मी
सावरून फक्त तोल.

नकळत निसटून जाय
पाऱ्यासम बिंब पूर्ण;
तळ चुंबुन क्षण उठली
अस्फुटशी चंद्रधून.

अधिकच गहिरे आत
गगनगूढ रत्नमोल;
काठावर स्तब्ध तरी
डोहाहुन मी सखोल...

□

तो

त्याचे उभे आयुष्य
महासमुद्रातल्या एखाद्या
लहानग्या बेटासारखे अलिप्त, एकाकी
बेताल वादळवाऱ्याला अचानक
सामोरे जाणारे...
तरीपण
अपशकुनी आवेगाचे
घनघोर घाव
त्याने प्रत्येक वेळी झेललेत
निमूटपणे.

आता
आपल्या समुद्री डोळ्यातली तुफानी गाज
आतल्या आत सतत फोफावू देत
तो उभा आहे
एकटक वाट पहात
एक अटळ
अनावर वादळमिठीची
आयुष्याच्या अखेरच्या उंबरठ्यावर

□

साक्षात्कार

कॅटरेक्टच्या काळोखात डोळे
सराईट वाटा हळुवार चोखाळताना
कधी कधी
खोल अभावित उमलणारा
नवजात कवितेचा निखळ नागवा प्रकाश
निखळतो माझ्या अंगांगातून अविराम.
–हा प्रकाश
माझ्या सर्वस्वाचा
क्षणैक अज्ञेयाचा ओझरता स्पर्श आलिंगून
कॅटरेक्टच्या अंधारातून आरपार
जात घडवणारा आपसूक
पुन्हा एक वेगळा
पहाटेपूर्वीचा सुनीळ साक्षातकार
विराटातून निथळत
केवळ माझ्या रंध्रारंध्रात अनाहूत
पालवणारा...

शंकर रामाणी

दोन प्रतिमा

माघाच्या रणरणत्या दुपारी
बाभळीच्या नक्षीदार छायेत
साळुंक्यांनी आपल्या बैठकीत
कोणता ठराव पास केला ?

आणि शरदाच्या टिपूर चांदण्यात
कडुलिंबाच्या नक्षीदार छायेत
विसावलेल्या माणसांच्या सावल्यांनी
कोणत्या ठरावाला मूक संमती दिली ?

सूर्य–चंद्राला विचारले
तर आकाश फक्कन् हसले !

□

ओळी

मी म्हणालो, आपण बागेत बसू
आणि तू आलीस
पण त्यावेळी तू मनात का हसलीस ?
मी म्हणालो, ही बाग आपली आहे
आणि तू मान हलविलीस

तेव्हापासून आपण येथे बसलो आहोत
पण ही बाग काही फुलली नाही
जी काही चार दोन फुलं आलीत
ती देखील पटकन् कोमेजलीत
इथली सारी झाडं वाळत चालली आहेत.
इथे कधी वसंतात कोकीळ आला नाही
की कधी वाऱ्याला क्षणाचा मोह झाला नाही
इथली जमीन तापली आणि परत तापली
आणि थंडीतही कधी हिने देवाची शाल
पांघरली नाही
वर जेव्हा ढग आलेत
आणि वाऱ्याने थोडा धिंगाणा केला
तेव्हा पाऊस बाजूने निघून गेला
आणि जमीन न्हाऊन चिंब झालीच नाही
नुसती तापली आणि पुन: तापली
तू मात्र बसून राहिलीस
माझा हात हातात घेऊन
थोडी वाळू, काही दगड आणि
गवताच्या काड्यांशी खेळत
सकाळ, दुपार, संध्याकाळ !

ही संध्याकाळ मात्र वेगळी वाटतेय्
तुलाही—
कारण, तुझ्या पांढऱ्या भिवयांखाली जरी
गडद काळी वर्तुळं असली तरी
तुझ्या डोळ्यांतून परतणारी सोनेरी तिरीप
माझ्या कपाळावर, छातीवर,
हातांच्या बोटांवर
जेव्हा स्थिरावते,
तेव्हा पावसाने भिजलेल्या मातीचा गंध
हलवून टाकतो माझ्या शरीराचा रंध्र रंध्र
आणि माझ्या पायांच्या भेगा गेलेल्या
तळव्यांना
ऐकू येऊ लागतो जमिनीखालच्या
खोल झऱ्याचा मर्मर स्वर

बागेला लागूनच क्षितिज आहे
हे आजवर लक्षातच आले नाही
लागलीच पलीकडे आहेत
आपले सनातन सोयरे, सखे
हेही लक्षात आले नाही
पहाटे आपण त्यांना भेटूच
तो पर्यंत हात असाच हातात राहू दे
ही रात्र सरेपर्यंत
ह्या बागेत, सखे !

□

तीन मुक्तके

१.

सर्वांत फसवा उजेड
जो अंधाराची संवय म्हणून येतो;
तो आंत नसतो
बाहेरही नसतो
तो सर्वत्र
नसतोच नसतो.

२.

माझ्या कुडाच्या घराला
माझ्या पणतीचा उजेड
नाहीतरी सारे सूर्य
माझ्या हाताच्या पल्याड.

३.

शब्दांच्या ओंजळीत
न ठरे सत्याचे पाणी
ओले–कोरडे शब्द असे
गाती मृगजळाची गाणी.

विश्वास कानडे

तसा तू मला अनेकदा भेटतो

तसा तू मला अनेकदा भेटलास,
पिंजऱ्यातल्या वाघाच्या डोळ्यात
ब्रेक नसलेल्या ड्रायव्हरच्या मेंदूत
छातीपर्यंत चढलेल्या पाण्यात
'ती'च्या निकराच्या निरोपात
बुढीआईच्या संरमंर स्पर्शात
अन् आता हृदयाच्या कृष्णविवरात

काल मात्र तू बंद डोळ्यांच्या
पापण्यांशी भिडलास
मी मान वळवतो तो मानगूटीवर बसलेला.

तू खुशाल ठाणं मांड तिथे,
माझे काही म्हणणे नाही.
माझ्या रोपांची झाडे झाल्याशिवाय,
मी खचितच येणार नाही.

एक मात्र अगदी खरे,
अनेकांना तुझ्या पावलांची चाहूलही नाही
माझ्या बाबतीत मात्र अगदी खुले सर्व काही

उगाच भांडण्याविडण्यापेक्षा
आपण एक करार करू:
'रोपांची झाडे झाल्याशिवाय तुझे
पाऊलही दिसणार नाही'
'ती झाडे झाल्यावर मी
क्षणभरही रेंगाळणार नाही'
"तुझे 'टारगेट' ओलांडण्यासाठी मी हवे तर,
नंतर आणखी एकीला घेऊन येईन"
'तोपर्यंत मात्र तू तिलाही शिवणार नाही'

अगदीच जमणार नसेल तर
साराच चौकोन पुसून टाक !
एवढे जरी जमले तरी मग
कसला आवाज अन् कसली हाक !

हाकेच्या अंतरावर आपण सगळेच असतो
तसाच तू मला अनेकदा दिसतो

■

नरेश

तू आहेस उन्मळलेला वृक्ष
आकाशात झेपावणाऱ्या तुझ्या शाखा
आणि मातीतून चैतन्य फुलविणारी तुझी मुळं
दोन्ही या भयाण काळोखात जळून गेलीत
नाही, असे तुझे झाले नाही.

जमिनीतून विलगताना आतून तुटल्याचा
हुंदका ऐकला होतास तू
हुंदक्यांचा पाऊस तू डोळ्याने पिऊन टाकलास
तुझे डोळे : एक जख्ख झालेली विकल रात्र
झडणारे स्पर्शगीत प्राणपणाने जपून ठेवणारी
तुझी त्वचा.... थरथरणारी बोटे
बोटांमधले विराट आरसे
त्यात प्रतिबिंबाची संभाव्यता; तेही हरवले
तुझी सृष्टी : माणसांच्या मुखड्याआडून
ओघळलेले मानव्यविकार
त्यांची अलंकरणे... त्यात दडलेल्या स्त्रिया
वासनेचे अमोघ अस्त्र; शोधाचे अन् सृजनाचे

खळकन फुटावे झुंबर तसे तुझे झाले
झुंबराच्या अवशेषांवर पडणारा प्रकाश
परावर्तित करण्याचे तुझे केविलवाणे प्रयत्न

एवढाच प्रकाश तुझ्या आयुष्यात
तो घेऊन तू गुहेकडे निघतोस
प्रवेशाच्या क्षणी तुला दिसली
जमिनीत ओढली जाणारी माणसं
आत कोसळण्यापूर्वी सर्वाधिक प्राणवायू
शरीरात भरून घेण्याची त्यांची धडपड
आणि एकमेकांसाठी आक्रंदणारे विशुद्ध मन
'अस्तित्वाचा शब्द' विरून जावा,
ही अंतीम इच्छा म्हणतोस
पण, हेही खरे नाही.

स्वतःच्या प्रतिकृतीसाठी
आसुसलेल्या पराभूताचा
अपरिहार्य पवित्रा आहे हा फक्त
चिरंतन वाहणाऱ्या वेदनेवर उमललेले
फूल तुला बघायचे आहे
अन् त्याला बिलगलेली फुलपाखरं....

□

उत्खनन

झाडांची पाने हलकेच थोपटायची
पक्षांच्या पंखांवर स्वप्न हिंडून यायचे
शब्दांच्या मेण्यात माणसं जन्मायची
चित्रांच्या रंगांचे डोळे असायचे
आरशात प्रतिबिंब रंगीत व्हायचे
तेव्हा–
कवितेची लेणी भुईतून उमलायची
□ □ □
एक दिवस आकाशातून सूया कोसळू लागल्या
नंतर सुरे–बंदुकीच्या गोळ्या–
तोफांचे अग्निगोल
पान–पक्षी–शब्द-माणसं–चित्र
यांचे नखशिखांत प्रेत झाले
आकाश लोळागोळा होऊन समुद्राखालच्या
विवरात शिरले
उधाणल्या पाण्याची क्षणात
पाषाणभूमी झाली....
□ □ □
'मी आहे मानवाच्या मस्तकात शिरून
पोलाद झालेल्या हाताचा घण
पाषाणभूमी जागवतील घणांचे घाव
मेंदूकडे जाणाऱ्या शिरीतून
ओघळते आहे रक्त
रक्ताची लकाकती शुभचिन्हे
चिन्हांच्या कुपीत राजहंसाचे पीस
या पिसाने करेन मी आता
कवितेचे उत्खनन'

संजय आर्वीकर

टिपण

प्रभा गणोरकर यांची कविता

रवीन्द्र ठाकूर

" जमिनीत मुळं रुतवून असलेली स्थावर जंगम माणसं
ज्यांना धास्ती असते सतत झंझावाताची
आणि जी दचकून शिशिराला उमलतात भीतीनं
ती तुला समजून घेऊ शकत नाहीत " –व्यतीत

एखादी कविता अशी असते की जिचा मनावर ठसा उमटतो परंतु तिच्याविषयी काही बोलावं म्हटल तर ते शक्य होत नाही. आपल्या शब्दात त्या कवितेचं तरल रूप सापडत नाही. मग गोळा होतात ते कवितेचे तुकडे. कविता हरवूनच जाते. म्हणून वाटायला लागतं की तो खटाटोपच नको. त्या कवितेनं मनावर उमटविलेलं ते प्रतिबिंब तसंच राहू द्यावं. त्याला शब्दांचा स्पर्श होऊ देऊ नये. प्रभा गणोरकर यांच्या कवितेबाबत मला हाच अनुभव येतो. अनेकदा ही कविता वाचली. वाचावीशी वाटली. परंतु तिच्याविषयी काही लिहावं म्हटलं की काय लिहावं हा प्रश्न पडतो.

पहिल्यांदा हे जाणवलं की, अनेक वाङमयीन चळवळींच्या आजच्या काळात स्वतःचा वेगळा आवाज या कवयित्रीने जपला आहे. खरं तर हे फार अवघड असतं. परंतु हे या कवयित्रीला साधलं आहे. परंतु असं म्हणणं योग्य ठरणार नाही. कारण आपल्या या वेगळेपणाची जाणीव या कवितेत हेतुतः कुठेही व्यक्त झालेली नाही. हे या कवितेचं खरोखरच फार मोठं सामर्थ्य आहे असं म्हणावं लागेल.

त्यांचा पहिला कवितासंग्रह ' व्यतीत ' १९७४ मध्ये प्रसिद्ध झाला. यात १९६३ ते १९७३ या कालखंडातल्या कविता संग्रहित झालेल्या होत्या, त्यांचा दुसरा कवितासंग्रह ' विवर्त ' १९८५ मध्ये प्रसिद्ध झाला. यात अर्थातच १९७३ नंतरच्या कविता समाविष्ट झाल्या आहेत. या दोन्ही कवितासंग्रहांकडे पाहिले असता त्यांतून कवयित्रीने आपला भावमिक सूर (Emotional tone) स्वाभाविकपणे जपलेला आहे असे दिसते. या दृष्टीने या कवितासंग्रहाच्या अर्पणपत्रिकाही बोलक्या आहेत.

गणोरकरांच्या कवितेने कुठले वळण घेतले नाही की कुठले नवे प्रयोग केले नाहीत. ती एक विशुद्ध भावकविता आहे. दोन्ही कवितासंग्रहात तिचे हे स्वरूप अबाधित राहिले आहे. म्हणूनच ' विवर्त 'चा विचार करताना ' व्यतीत 'चा संदर्भ घ्यावा लागतो. आणि तो ' व्यतीत 'चा संदर्भ आवश्यकही ठरतो.

अनुभवाकडे–अनुभवातील वास्तवाकडे-कठोर निर्ममपणे पहाण्याचं वळ या कवयित्रीच्या ठायी आहे. अनुभवाचं वास्तव शोधताना त्यात आपला स्वतःचा जो ' रोल ' आहे. त्याकडे कवयित्री डोळेझाक करीत नाही. त्यामुळे ही कविता आत्मशोधाच्या पातळीवर जाते.

ही कविता म्हणजे अनाकलनीय अशा जीवन प्रवासाचा शोध आहे. त्यास काही मर्यादा असतील परंतु जे जाणवलं आणि जे व्यक्त झालं त्यात सच्चेपणा आहे. जीवनमार्गावरची अपरिहार्य फरफट सुचविणारे प्रवास हे प्रतीक ' व्यतीत 'मधील पहिल्याच कवितेत येते.

" नकळत मैलांचे दगड मागे पडत असतात
स्वत:ला काळोखाच्या ओंजळीत लपवून
कुठून थाले असते मी
कुठे जाणार असते
मध्यरात्री उभी राहते गाडी,
तेव्हा एक अनोळखी गाव तेवढे दिसते ". —व्यतीत पृ. २

' ऋणानुबंध ', ' कळत नाही ' या कवितांतूनही हे प्रतीक येते.

भोवतालच्या विश्वाच्या संदर्भात कवयित्री आपल्या अस्तित्वाला अर्थ देऊ पाहते परंतु असे घडत नाही. उलट एकप्रकारची विसंगती प्रत्ययास येते. आपण ज्याला प्रेम म्हणतो, नातेसंबंध म्हणतो, ऋणानुबंध म्हणतो ते सारे खोटे आहेत असे जाणवू लागते. उदाहरणार्थ ' हात ' या कवितेत आधार शोधणारी ' ती ' त्याच्या हातावरच्या घनदाट अरण्याच्या रेषांतून आयुष्याची एखादी सरळ पाऊल-वाट शोधण्याचा प्रयत्न करते. त्या प्रयत्नात त्याच्या हातावरच्या रेषा भाग्यवंत होऊन जातात. परंतु या रेषा अज्ञात भवितव्याच्या पायरवाने थरथरणाऱ्या रेषा आहेत. एकमेकांना आधार ठरू पहाणारं हे नातं टिकेलच याची शाश्वती नाही. कारण ' फसगत ' या कवितेत कवयित्री म्हणते,

" आपणच आपली फसगत केली आजवर
त्वचेखाली वाढणाऱ्या दुर्धर रोगमुळांप्रमाणे
आपल्या मनांमध्ये दबा धरून आहेत
अपरिचयाचे सूक्ष्म दु:खकण " —व्यतीत पृ. २९

अस्तित्वाचा शोध घेताना येणारे स्पर्शानुभवही शरीर स्पर्शातीत व्हावे असे वाटायला लावणारे घृणास्पद असतात, त्यातील निर्घृणता पाहून ' महारोग्यासारखे गळून पडावे अवयव हे ' असे वाटू लागते. मग स्वत:लाच स्वत:च्या कोशात गुरफटून घ्यावे लागते. आपली सुखदु:खे ही आपलीच असतात. कोणीही त्यांचे व्यर्थ ओझे करून घेणार नाही हे कळू लागलेले असते. भोवतालचं जगच काय कधी कधी आपण स्वत:ही स्वत:ला पारखे होत चाललो आहोत अशी जाणीव होऊ लागते. एक प्रकारची दिशाहीनता वाटयाला येते. आपल्या हातात काही राहत नाही अशा अवस्थेत परिस्थितीपुढे शरण जाणं नव्हे ' बळी ' जाणं एवढंच उरते.

अनुभवातून शिकणं, शहाणं होत जाणं ही जगण्याचीच गरज आहे. म्हणूनच ' मोजदाद ' (व्यतीत, पृ. ४०) या कवितेत एरवी आभाळाच्या उदारपणाने अपात्री दान केल्याची खंत विसरून नियमाचा एखादा अपवाद करण्याची तयारी दिसते. काळ्या मातीचे ओसाड शेत तुडवीत जाताना बाजूच्या स्मशानातला आतापर्यंत लक्षात न आलेला पळस आज आपल्या हिरव्या मखमली देठांवर लाल ज्योती पेटवून नृत्यमुद्रेत सामोरा आलेला पाहून मनाला उभारी येते. परंतु हे सर्व दु:खजाणीव विसरण्यासाठी केलेले प्रयत्न ठरतात. कारण अटळ दु:खाची जाणीव मनाला कायम व्यापून राहिलेली असते. सततच्या दु:खजाणिवेमुळे दु:खाशीच एक अतूट नातं जडतं. अनेक अनुभवांचे पेले नव्या दमाने भरले गेले आणि पचविले गेले, परंतु दु:खाचा शेवटचा पेला रिता करवत नाही. 'नातेच जुळले या भरलेपणाशी आणि संपवायला मन घेत नाही ?' असा स्वत:लाच प्रश्न पडतो.

' विवर्त ' हा या जाणिवांचा पुढील प्रवास आहे. नसांतून जडलेला जीव उपटून घ्यायला हवा मुळांपासून । दुखावलेल्या रोपट्यासारखा जळून जाईल हा देह मूकपणे...। उठायचेच नाही मातीतून तर सारखेच या धारांचे असणे आणि नसणे असं म्हणणारी कवयित्री झाडांनीच मला जगणे शिकविले, जमीनदोस्त केले तरी उभे होणे शिकविले असे म्हणताना दिसते. झाडं ज्या जीवन-प्रेरणेने चिवटपणे जगतात ती जीवनप्रेरणा मानवातही आहेच. तथापि झाडं ज्या बिनतक्रार सहजतेनं जगतात ती सहजता आपल्याला साधत नाही ही खंत येथे व्यक्त होताना दिसते. इथून उपटून तिथं लावलं, कोवळी पालवी ढोरांनी कुरतडून टाकली किंवा अळ्यांनी धमन्यांच्या आत शिरून पोखरलं तरी झाड जगतं, अशावेळी आपण आत्महत्या केली असती परंतु झाडावर मात्र दरवेळी सारे बळ पणाला लावून लाल थेंबाएवढे पान फुटते असा अनुभव येतो. खुरटे आयुष्य नशिबी आले तरी केविलवाणी का होईना देठावर कळी येते. आपल्याला तसं फुलता येत नाही. मुळं रोवता येत नाहीत आणि भोवतालच्या वास्तवाच्या संदर्भात आपल्या अस्तित्वाला अर्थ देता येत नाही ही खंत सतत व्यक्त होत राहते. ' एखादे जुने दुःख ' या कवितेत कवयित्री म्हणते,

" जागेपणी एखादे दुःस्वप्न आठवत रहावे तसे
मी जगत असते भोवतालचे वास्तव
एखादे मतिक लांववीत जावे तसे
मी पुढे ढकलीत जाते
हा आज स्वीकारणे." —विवर्त पृ. ६३

परंतु हा आज पुढे ढकलल्याने टळत नाही. याच कवितेत पुढील ओळी आहेत.

" मी श्रमिष्ट विचलित
उदास अनवाणी पावलांनी
चालत राहते कोलाहलातून
पाय मोडलेल्या गायीने हिंडावे तशी "

पुरासारखे
एक जुने अनोळखीपण मला
वेढून घेत आहे. —विवर्त पृ. ६४

अटळ परात्मतेचा हा स्वीकार विवर्तमध्ये गडदपणे व्यक्त होताना दिसतो, अंतर्मनातील हाकांशी पूर्ण विसंवादी असं जगणं मूकपणे स्वीकारावं लागतं उदाहरणार्थ, माती पांघरून जमिनीच्या आत एखाद्या कंदाप्रमाणे निजून राहावे, सारखं दार ठोठावणाऱ्या पावसाने रागावू नये म्हणून केसुरत्यांचा डोंब उसळल्यासारखे लाल फूल होऊन बाहेर यावे आणि कुतूहलाने बघणाऱ्या एखाद्या लहान मुलीसाठी एक एक पराग जमिनीवर ठेवून पुन्हा आत निवून जावे अशी इच्छा असताना दिवसभर सरडे अंगावर घेत नुसत्याच शोभिवंत पानांचे झाड होऊन सरड्यांना भिणाऱ्या त्या मुलीचे ओरडणे ऐकत उभे राहणे नशिबी आले आहे.

उन्मत्त पावसाचे दिवस संपत आलेले असतात, आकाश भकास कोरडे झालेले असते, झाडे करपून शुष्क झालेली असतात. अशी विराट होरपळ डोळ्यांना दिसत असताना शरीरातल्या हाकांना उत्तरं द्यावीशी वाटत नाहीत. ज्या पावसात डोळे भिजवून घ्यायचे असतात तो सुरू होण्याच्या आत अचानक संपून गेलेला असतो. ज्या झाडांना कुरवाळलं, पाणी घातलं, वाढवलं, जगवलं ते आपल्या दुःखावर फुंकर घालू शकत नाहीत. माणसाचं माणूसपण आटलेलं समजू शकतं पण घरानेच

चालविलेला हा तटस्थ असहकार स्वीकारता येत नाही. 'घर' या कवितेत ही जाणीव व्यक्त होताना दिसते.

माणसांशी संवाद साधण्याचा प्रयत्न करावा तर तेथेही मध्ये एक जाडजूड साऊंडप्रूफ काच असल्यासारखे वाटते. कारण तेथील संवादात शब्द आपले मूळ अर्थ हरवून हिडीस अर्थांनी सामोरे येतात. आईचा पाठीवरून फिरणारा मायेचा हात, वडिलांची शाबासकीची थाप अशी हळूवार स्पर्शाची भाषा लोप पावल्याचे दिसून येते. डोळ्यांची भाषा वापरली गेलीच तर ती केवळ बीभत्स शब्दांऐवजी वापरली जाताना दिसते. अशावेळी भाषेला काळी अक्षरे एवढाच अर्थ उरतो. संवादासाठी आवश्यक असा भाषा हा संदर्भच आयुष्याला राहात नाही. मग एखाद्या शिलालेखात अज्ञात लिपीत मजकूर लिहिलेला असतो त्याप्रमाणे आपला आवाज हरवलेल्या या कोलाहलात आपलीही एक वेगळी लिपी शोधावी लागणार असे वाटू लागते (लिपी). जे काही सांगायचे आहे ते जड शब्दांनी सांगता येत नाही (म्हणणे). शब्द भुतांच्या अस्पष्ट आकारांसारखे भोवती हलत राहातात. दरक्षणी वाढत जाणारी स्तब्धतेची ओसाडी पार करता येत नाही. म्हणायचं असतं ते असं विरून गेल्यानंतर म्हणण्यासारखं काहीच उरत नाही. ही भाषाहीन बधीरता असह्य होते. म्हणून पानांची थरथर, वाऱ्यांची सळसळ, अष्टदली लिलीच्या उमलण्याचा आवाज, भेगा पडलेल्या जमिनीत पावसाचा आवेग शिरतांना होणारा सीत्कार अशी भाषा स्वतःपुरती समजावून घ्यावी लागते.

भोवताली सतत पहारा करणाऱ्या असुरक्षिततेच्या चक्रात वावरतांना सुटकेचा एकच मार्ग दिसतो. तो म्हणजे मृत्यू. केवळ जीवनाचा अंत म्हणजे मृत्यू एवढीच जाणीव त्यामागे नाही. भोवतालच्या असुरक्षिततेपासून स्वतःला वाचवायचं असेल तर तोच अधिक सुरक्षित वाटू लागतो. (पर्सिक्युशन) रक्ताच्या प्रत्येक थेंबाचं ओझं असह्य झालेलं असताना आणि आतल्या सूक्ष्म रेषेच्या बळावर हा प्रवाह अधिक काळ खेळविण्याची शक्यता सपत आलेली असताना एखादे धारदार पाते जवळ करावेसे वाटते. असुरक्षिततेत वावरताना कुठल्या क्षणी ती वाटचाल सुरू होईल याची शाश्वती उरत नाही. आत्मरक्षणाच्या प्रेरणेतून भीती उमलून येते आणि खोल कुठे तरी पाहिलं तर दिसू लागतात त्याचे सतत डोळ्यापुढे येणारे डोळे (तुझे डोळे).

खंडित अस्तित्वात जगत असताना प्रेमाचा आधार शोधणं, त्याद्वारे जीवनाला अर्थ देऊ पाहणं येथेही दिसतं. परंतु या प्रीतीतही परस्परविश्वासाचा भंग झालेला आहे. तो कधी झाला हे दोघांच्याही लक्षात आलेलं नाही. अशावेळी आधार शोधण्याला आणि असण्याला अर्थ उरत नाही. अंधारात एकमेकांचे विरत चाललेले चेहरे रिक्त हातांना शोधण्यासारखा तो एक अर्थहीन प्रयत्न ठरतो :(अविश्वास). प्रेमानुभवातलं मौन अर्थपूर्ण वगैरे नसतं. त्या पोकळीत एक फसवी शांती असते. मग एकाएकी जाणवतं,

"कसे आपण काळोखाच्या भीषण बोगद्यात शिरलो
एकाएकी
हिरव्या शेतमळ्याचा गारवा
अंजनासारखा डोळ्यात रेखून एकत्र
वाटचालीला सुरुवात केली असताना
कसे आपण अपरिचयाच्या क्रूर काटेरानाकडे वळलो."

एकाएकी ? -विवर्त पृ. ८

एकेकाळी असलेला आपलेपणाचा भाव (आपण असणे) आज उरलेला नाही. आणि हे आपण नसणं हे स्वीकारणं शक्य होत नाही. कारण परिचित रस्त्यांवरून एकमेकांची आठवण येऊ न देता चालणं शक्य आहे ? परंतु त्याचीही सवय करून घेणं आवश्यक ठरतं (सवय ६०). 'जे नाही ते आहे असे

नुसते वाटून घेण्यापेक्षा ज्याने जे असायचे आहे ते त्याने नुसते असले म्हणजे झाले (दृष्टी).एवढीही अपेक्षा पूर्ण होत नाही. कुठेच काही संगती सापडत नाही अशावेळी–

" एखाद्या किडयाला रात्रीच्या अंधारात
इतस्ततः फिरत जावे लागावे
तसे अनोळखी, आंधळे भटकणे उरते
आपल्यासाठी."–विवर्त पृ. २३

असा प्रत्यय येतो.

गणोरकरांची कविता 'व्यतीत' पेक्षा 'विवर्त'मध्ये अधिक भावतरल होत गेली आहे. ही कविता नव्या प्रतिमा हुडकून काढून त्या जंजाळात स्वतःला अडकवून घेत नाही. येथे प्रसंगच प्रतिमारूप होतात. त्याद्वारे होणारी थेट अभिव्यक्ती हे या कवितेचे वैशिष्टय आहे. अनेकदा एखादी अनुभूती उद्रेकाप्रमाणे सरळ शब्दरूप घेते.

या लेखातील सर्व लेखन आस्वादक समीक्षेच्या स्वरूपाचे झाले आहे. खरं तर या कवितेवर लिहिणं बरंच अवघड होतं. मध्येच हा प्रयत्न सोडून द्यावा असंही वाटून गेलं. परंतु तरीही ही मोट बांधली आहे. ती या कवितेला कितपत न्याय देणारी ठरू शकेल हे सांगता येणार नाही. शस्त्रक्रियेच्या टेबलावर फुलपाखराचे विच्छेदन कसे करता येईल ? असा प्रश्न सुरेश दलाल यांनी विचारला आहे ते योग्यच आहे. त्यांनीच 'टीकाकाराचे कार्य' (आलोचना, फेब्रुवारी १९८८) या लेखात म्हटल्याप्रमाणे " अंशतः नव्हे तर समग्रतेने कलाकृतीचे आकलन करणे आणि तिचे अर्थ–बोधन करून ते दुसऱ्या कोणापर्यंत पोचविणे हे सर्वच समीक्षकांना आव्हान असते. पुष्कळदा असे होते की, मूल्यमापन करताना समीक्षक शब्दातून जे काही व्यक्त करण्याचा प्रयत्न करतो, त्यात त्याने अनुभवलेली उत्कटताच हरवलेली असते. मग ते केवळ आनंदाचे वर्णन होते, तो प्रत्यक्ष आनंद नसतो. पाण्यात पोहणाऱ्या माशाच्या सौंदर्याने व लावण्याने तुम्ही मोहून जाता. पण ते दाखविण्यासाठी तुम्ही मासा बाहेर काढता तेव्हा ती मूळ मोहकता व लावण्य पुन्हा कधीही पकडता येत नाही." ■

यशवंतराव चव्हाण कॉलेज, कोल्हापूर

॥ शोध ॥

अर्वाचीन मराठी बीजकवी

डॉ. सुरेश भृगुवार

'प्रत्येकाचा 'मूड' स्वतंत्र असतो. प्रत्येक प्रतिभासंपन्न कवी आपल्या 'मूड' नुसार लेखन करीत असतो. त्यामुळे अन्य कवींच्या कवितेचे बीज केशवसुतांच्या कवितेत शोधण्याचा प्रयत्न फारच आग्रही स्वरुपाचा वाटतो व हे अन्य कवींवर अन्याय केल्यासारखे वाटते.'

यामुळे 'अर्वाचीन मराठी बीजकवी = केशवसुत' असे समीकरण धोपटमार्गाने मांडले की पुरेसे खतपाणी न लाभल्यामुळे पूर्ण वाढ न झालेल्या किंवा पशुने ओरबाडून खाऊन टाकलेल्या रोपट्यांना जन्म देणाऱ्या बीजांसारखे काही कवींना वगळून टाकण्याची चूक घडते. असे प्रस्तुत लेखकाला वाटते आहे. अर्वाचीन मराठी कवितेतील 'बीजकवी'बद्दलच्या आपल्या समजुती तपासून बघण्याचा हा एक प्रयत्न.

बीजकवी म्हणजे मूळकवी, जनक, प्रवर्तक, प्रणेता हा अर्थ सामान्यपणे लक्षात घेतला जाऊन, अर्वाचीन मराठी बीजकवी म्हणजे केशवसुत, अशी प्रथमत:च कल्पना केली जाते; त्यानंतर रूढ पद्धतीने केशवसुतांनी मराठी कवितेत केलेले आंतरिक व बाह्य बदल सांगून त्यांच्याविषयी माहिती दिली जाते. यापूर्वी रा. श्री. जोग प्रभृती समीक्षकांनी सिद्ध केलेले त्यांचे जनकत्व पुन्हा एकदा सिद्ध केले, की प्रस्तुत विषयाला न्याय दिला, असे वाटू लागते. म्हणूनच 'बीजकवी'बद्दलच्या आपल्या समजुती तपासून बघायला हव्यात, असे प्रस्तुत लेखकाला नम्रपणे सुचवावेसे वाटते.

पुढे विकसित होऊन फुलण्याचे व फळण्याचे सामर्थ्य सूक्ष्मरूपाने बीजात असते. ह्या बीजाला जमिनीत रोवले आणि आवश्यक खतपाणी दिले की त्या बीजाला अंकुर फुटतात, पालवी फुटते आणि प्रथम रोपटे व पुढे वृक्ष असा विकास होऊ लागतो. (वृक्षात परिणती होणे, हे ते बीज कशाचे आहे, यावर अवलंबून आहे.) सर्वच बीजांना अंकुर फुटणार नाहीतही; जी बीजे मूळ धरतात, अशाच बीजांना महत्त्व आहे. अशा 'सात्त्विक' (सत्त्व असलेल्या) बीजांनाच भवितव्य असते, आपल्यामागे आपली परंपरा निर्माण करण्याचे सामर्थ्य असते. अशी बीजे एकच नव्हे, तर एकाहून अधिक असू शकतात.

हे मान्य झाले, तर प्रस्तुत विषयाच्या संदर्भात बीजकवी सुद्धा फक्त एकच मानण्याचे कारण उरत नाही. बीज → अंकुर → मूळ → रोपटे → वृक्ष या क्रमाने वृक्षाची उंची व शक्ती लाभलेल्या बीजालाच महत्त्व द्यायचे, की अंकुरित होऊन पुढे रोपटे झाले व नंतरची वाढ बाधित झाली (Inhibited), अशा बीजांचेही प्रजननसामर्थ्य (जरी पुढील विकसित रूपाला फारसे आयुष्य लाभले नाही तरी) लक्षात घेऊन त्यांचीही नोंद करायची, हे निश्चित ठरवायला हवे, अन्यथा, 'अर्वाचीन मराठी बीजकवी केशवसुत' असे समीकरण धोपटमार्गाने मांडले, की पुरेसे खतपाणी न लाभल्यामुळे पूर्ण वाढ न झालेल्या किंवा पशूने ओरबाडून, खाऊन टाकलेल्या रोपट्यांना जन्म देणाऱ्या बीजांसारखे काही कवींना वगळून टाकण्याची चूक घडते.

मराठी वाङमयेतिहासात पंचकांना फार महत्त्व दिले जाते. 'पाच संतकवी', 'आधुनिक कवि पंचक', 'दासपंचायतन', 'पाच कवी', 'पाच कथाकार' इत्यादी. हे पंचपरमेश्वर व त्यांतील एक प्रमुख (सरपंच) ठरविला की झाले! ह्यापाचांनंतर सहाव्याचा विचार होत नाही. प्रमुखाच्या नावाने त्यांचा संप्रदाय ठरतो, व एक गुरू व बाकी चेले मानण्याची प्रवृत्ती कायम होते. एकदा ही धारणा बाळगली गेली, की प्रमुखाची वैशिष्टये अन्य चौघांत कशी दिसून येतात, हे दाखविले जाते. मग अन्यांची स्वतंत्र वैशिष्टये असू शकतात, वा एखाद्याचे स्वतःचा 'सवता सुभा' निर्माण करण्याचे सामर्थ्य असू शकते, हेही विसरले जाते. समीक्षक वा अभ्यासक हे विसरतो, असे नव्हे; तर स्वतः शिष्यदेखील गुरुकृपाछत्राखाली राहण्यात धन्यता मानू लागतो. नाटकांच्या संदर्भात, कोल्हटकर व खाडिलकर यांना मागे टाकण्याची भाषा बोलणारे गडकरी कवितेच्या बाबतीत स्वतःच्या स्वयंसिद्ध, प्रज्ञावंत अस्मितेकडे डोळेझाक करून, स्वतःला केशवसुतांचा 'सच्चा चेला' म्हणवून घेण्यात धन्यता मानू लागले.

विनायक, गोविंदाग्रज, रेंदाळकर, बालकवी इत्यादी 'केशवसुत-संप्रदाया'त मोडले जाणारे कवी स्वतः आपले आगळेपण दाखवू शकले असते. परंतु यांनीच नव्हे, तर रे. टिळक आणि बी यांनीही 'तुतारी-लाटे'त स्वतःला झोकून दिले. सामाजिक मंथनाची व उद्बोधनाची जेव्हा गरज भासू लागली, तेव्हा आपला मनःपिंड असो वा नसो, 'तुतारी'पद्धतीची कविता आपणही लिहायला हवी, असे प्रत्येकाला वाटू लागले, आणि मग गोविंदाग्रजांनी 'दसरा', बालकवींनी 'धर्मवीर' किंबहुना बी कवींनी देखील 'डंका' इत्यादी कविता लिहिल्या.

द. भि. कुळकर्णी लिहितात, "केशवसुतांच्या 'तुतारी' या कवितेचे खूपच अनुकरण झाले– रणशिंग, शिंग, दसरा, धर्मवीर, डंका, स्वेदगंगा इत्यादी कवितांवर 'तुतारी'चा परिणाम स्पष्ट आहे. वास्तविक रे. टिळक, रेंदाळकर, गोविंदाग्रज, बालकवी, बी, करंदीकर हे अर्वाचीन काळातील मान्यवर कवी होत. त्यांनी अनेक प्रभावी व मौलिक कविता लिहिल्या आहेत."[१] भ. श्री. पंडित, लिहितात, "केशवसुतांनी स्वतःचा असा संप्रदाय स्थापन केला नव्हता."[१] गोविंदाग्रजांनी स्वतःहून आपणास केशवसुतांचे शिष्य म्हणवून घेतले. ते लिहितात.

"शिवरायाच्या मागें आम्ही लालमहालीं फिरणें।
तसेंच तुमच्या मागें आम्ही नवीन कविता
करणें ॥" (– वाग्वैजयंती)

भ. श्री. पंडित पुढे लिहितात, "...तसे पाहिले तर केशवसुतांच्या आणि त्यांच्या कवितेत साम्यापेक्षा वैषम्यच अधिक आहे. गोविंदाग्रजांनी केशवसुतांच्या या संप्रदायाला 'तुतारी मंडळ' हे नाव दिले..... गोविंदाग्रजांच्या या केशवसुत–संप्रदायाशी व तुतारी मंडळाशी केशवसुतांचे समवयस्क व समकालीन कवी रे. टिळक व विनायक यांचा अर्थाअर्थी काही संबंध नव्हता. परंतु १९१९ साली 'आधुनिक कविपंचक' प्रसिद्ध झाले, त्यात तो संबंध जोडण्यात आला.....यापुढे आधुनिक मराठी कवितेच्या समीक्षेत 'केशवसुत संप्रदाय' ही कल्पना अकारण रूढ होऊन बसली."[१]

संतकवींनी (अपवाद रामदास व एकनाथ) स्पष्टतः समकालीन संदर्भ न देता कविता लिहिली, व आपले प्रामाणिक आध्यात्मिक अनुभव मांडले. अर्वाचीन कवितेच्या नवेपणाच्या अनेक पैलूंपैकी समकालीन सामाजिक संदर्भ कवितेत आणणे, हाही एक पैलू होता. केशवसुतांनी ते केले. स्त्री–दास्यविमोचन, विधवा–विवाह अस्पृश्यता, सामाजिक (व आर्थिक) विषमता इत्यादी सामाजिक प्रश्न यांची बीजे आगरकरांच्या सुधारणावादी विचारात सापडतात.[४]) प्रथमतः केशवसुत यांच्या व त्यानंतर अन्य कवींच्या कवितेत मांडले गेलेत. या प्रश्नांना कवितेत स्थान दिले नाही तर आपण प्रतिगामी ठरू म्हणून मनाची बैठक तशी नसूनही गोविंदाग्रज, बालकवी यांसारखे शुद्ध कलावादी व सौंदर्यवादी कवीदेखील केशवसुतांच्या छत्राखाली समाधानी राहिले. (रे. टिळक, बी या कवींचा संबंध तर केशवसुतांशी दूरान्वयाने देखील लावता येणार नाही.) अर्थात, केशवसुतांच्या प्रभावामुळे

अन्यांचे डोळे दिपले, व पुढील मार्ग नीट दिसू नये, असे झाले.

केशवसुतांचे मोठेपण मी नाकारीत नाही ! किंबहुना, अनेकांनी त्यांना बहाल केलेले जनकत्वही त्यांच्याकडेच असो ! मी यापूर्वी म्हटले, त्याप्रमाणे केशवसुतांची मानाची खुर्ची यथास्थित ठेवली आहेच; परंतु त्यांच्यासोबत, त्यांच्या बरोबरीने बसण्याचा अन्यांचा अधिकार तर अबाधित आहेच ना ? रा. श्री. जोग लिहितात, केशवसुतांनी मराठीत सुनीतरचना प्रथम केली. आधुनिक मराठी कवितेत अजाणता का होईना गूढगुंजनाचा प्रवाह आणून सोडला, नवीन कवितेमध्ये प्रेमाचे पहिले शाहीर त्यांना म्हणावयास हवे. सृष्टीविषयक नवीन दृष्टी केशवसुतांच्या कवितेत दिसते. मराठी कवितेत सामाजिक सुधारणाविषयक प्रश्नांना प्रथम स्थान केशवसुतांनीच मिळवून दिले. रचनाविषयक अनेक प्रयोग नव्याने केशवसुतांनी केले ...यामध्ये अगदी स्वतःचे असे केशवसुतांनी काही आणले नाही, परकीयांकडून सारे उसने घेतले व परकीयांच्या अंमलाखाली आणि संसर्गाने ते केव्हा ना केव्हातरी यावयाचेच होते या गोष्टी मान्य केल्या, तरी या साऱ्या कोणातरी एक वा अधिक व्यक्तींच्या हाताने व्हाव्या लागतात.'[५] द. भि. कुळकर्णी लिहितात, "उत्तरकाळात मराठीत जी मधुर प्रेमगीते, अलवार निसर्गगीते आणि बंडखोर समाजगीते लिहिली गेली त्याचा बीजमंत्र केशवसुती कवितेने प्रथम जपला आहे,"[६] (मला वाटते, या 'बीजमंत्र' शब्दातूनच सूचना घेऊन 'बीजकवी'ची कल्पना मांडली गेली असावी.)

केशवसुतांना पुढे लाभलेली प्रतिष्ठा व सन्मान त्यांच्या हयातीत लाभला नव्हता. त्यांच्या हयातीत त्यांना टिळकांइतकी प्रसिद्धी नव्हती. भ. श्री. पंडित लिहितात, " मे १८९८ व जाने. १८९९ च्या 'सुविचारसमागमा'त कै. मोती वुलासा यांनी 'मराठी भाषेची सद्यःस्थिती' या निबंधात त्यावेळपर्यंतच्या मराठी वाङ्मयाचा आढावा घेतला होता. त्यात आधुनिक कवी म्हणून टिळकांचा नामनिर्देश आहे. परंतु केशवसुतांचा उल्लेख नाही."[७]

केशवसुतांनी कवितेत बाह्य व आंतरिक बदल केलेत, हे सांगताना अक्षरगणवृत्तांकडून मात्रावृत्तांकडे कविता वळविली, हे सांगितले जाते. परंतु हे सुद्धा सर्वांशाने खरे नाही. त्यांची सुनीतरचना शार्दूलविक्रीडित वृत्तात आहे. (अर्थात, सुनीतासाठी हेच वृत्त योग्य, हे मलाही मान्य आहे. गंभीर विषय, तत्त्वप्रतिपादन, उपदेश, शौर्याबद्दलची स्तुती यांचे वर्णन शार्दूलविक्रीडित वृत्तात असावे. क्षेमेन्द्राने आपल्या 'सुवृत्ततिलक' या ग्रंथात कोणत्या रचनांसाठी कोणते वृत्त उचित ठरेल, याची चर्चा केली आहे.)[८] याशिवाय त्यांच्या अन्य कितीतरी कविता अक्षरगणवृत्तांत आहे. केशवसुतांच्या एकूण १३२ (+ १ अप्रकाशित) कवितांपैकी ७२ (+१) कविता अक्षरगणवृत्तात व त्यांतील ४५ (+१) शार्दूलविक्रीडित वृत्तात आहेत. केशवसुतांनी व गोविंदाग्रजांनी नवा विचार शार्दूलविक्रीडित वृत्तात मांडून त्या वृत्ताचे सामर्थ्य व औचित्य स्पष्ट केले आहे.

भ. श्री. पंडित लिहितात, "केशवसुतांची बहुतेक कविता त्रुटित, स्फुटित व सुटसुटीत आहे. याला कारण त्यांच्यासमोर इंग्रजी कवितेचा आदर्श आहे.....केशवसुतांची फार थोडी रचना गेय आहे. त्यांचा सारा भर जुन्या अक्षरगणवृत्तांवर व मात्रावृत्तांवर आहे."[९]

केशवसुतांचे अग्रेसरत्व कशात आहे, त्यांच्या काव्याची वैशिष्ट्ये कोणती, त्यांनी अर्वाचीन मराठी कवितेत रचनादृष्ट्या व आशयदृष्ट्या कोणते बदल केले, यासंबंधी चर्चा करण्याचे कारण नाही. प्रबुद्ध वाचकांना ते सारे माहित आहेच. त्यामुळे आता अन्य कवींच्या वैशिष्ट्यांची चर्चा प्रस्तुत विषयाच्या अनुरोधाने करू.

केशवसुतांच्या कविता "विशिष्ट अशा विषयावर नसून त्या त्या कवितेत त्या त्या वेळचे त्यांच्या मनोवृत्तीचे (mood) लेखन आहे."[१०] असे भ. श्री. पंडित लिहितात. मनोवृत्ती ही व्यक्तिगत personal बाब आहे. त्यामुळे त्यांचा हा (मूड) इतर कवींनी घेतला असे म्हणता येणार नाही. प्रत्येकाचा 'मूड' स्वतंत्र असतो. प्रत्येक प्रतिभासंपन्न कवी आपल्या 'मूड'-नुसार लेखन करील. त्यामुळे अन्य कवींच्या

कवितेचे बीज केशवसुतांच्या कवितेत शोधण्याचा प्रयत्न फारच आग्रही स्वरूपाचा वाटतो. व हे अन्य कवींवर अन्याय केल्यासारखे वाटते.

आता क्रमशः अन्य कवींच्या मनोवृत्तीचा शोध घेऊ.

रे. टिळक

रे. टिळकांना केशवसुत–संप्रदायात गोवण्याचा कसा प्रयत्न झाला, हे वर आलेच आहे. केशवसुतांनाच मुळी टिळकांपासून स्फूर्ती मिळाली होती" (–'काव्यरत्नावली', १९०५–मोरोपंत दामले यांची टिपणे), हे लक्षात घेतले तर बीज-कवित्व केवळ केशवसुतांनाच कां द्यावे असा प्रश्न पडतो. भ. श्री. पंडित लिहितात, "टिळक माणुसकीचे कवी होते. मानवी प्रेमावर आधार-लेली दया, क्षमा आणि शांती यांचा पुरस्कार करणारी 'संहिता' (Bible) त्यांना पूज्य होती."[११] टिळकांची मनोवृत्तीच केशवसुतांच्या मनोवृत्तीहून वेगळी होती. त्यामुळे केशवसुतां-मधील उद्दाम आवेश व त्यातून येणाऱ्या कल्पनांचे उत्तुंग उड्डाण टिळकांकडून अपेक्षिणे अयोग्य आहे. टिळकांच्या व्यक्तित्वातील प्रेमळपणा आणि साधुत्व हे भारतीय परंपरेशी नाते राखणारे आहे. म्हणून ह्या परंपरेतील आध्यात्मिक अस्मि-तेची बीजे प्रस्फुरित करण्याचे सामर्थ्य त्यांच्या कवितेत आहे, यात शंका नाही. टिळकांनी आपल्या ख्रिस्तभक्तीला देशभक्तीची आणि मराठी भाषाभिमानाची जोड दिली. ख्रिस्ती लोकांच्या मराठी भाषेत सुधारणा घडवून आणली.

रा. श्री. जोग लिहितात, "कवी आणि संत या दोनही भूमिका एकत्र असण्याची महाराष्ट्रात जुनी परंपरा होती. त्या परंपरेचे नवीन युगातील शेवटचे प्रतिनिधी टिळक होते." क्रांतिपूर्वकाला-तील अभिजात परंपरेशी त्यांनी नाते कायम ठेवले, त्याबरोबर अर्वाचीन कवितेच्या स्वच्छंदवादी प्रवृत्तीही जोपासल्या. जीवनाविषयीची प्रामाणिक आस्था, अनुभवातील निखळ सच्चेपण, आध्यात्मिक चिंतनातून बळावणारा दृढ आशावाद, सुबोध व आत्मीय प्रकटीकरण इत्यादी वैशिष्ट्यांनी युक्त अशी वास्तववादाला जवळ जाणारी टिळकांची कविता आहे, केशवसुतांची उड्डाणे सर्वसामान्यांना सहजशक्य वाटत नाही. आकाशाची उंची गाठू पाहणारी त्यांची कविता आहे. टिळकांची कविता लहानग्या बाळाचे बोट धरून त्याच्या पावलांनी पाऊल टाकणाऱ्या वत्सल बापाची आहे. असे हे स्नेहमाधुर्य भारतीय मनाला आपले वाटते, आत्मीय वाटते. त्यांची कविता निर्मळ वाटते, तिचे लावण्य आकर्षक, पण उद्दाम नाही, प्रसन्न आहे. धर्मांतर केलेल्या या कवीने रचलेली कविता अस्सल भारतीय आहे, हे लक्षणीय आहे.

'बी'

बींची कविता भारतीय तत्त्वज्ञानाशी नाते जोडणारी आहे. "पूर्णापासुनि ढळलेले जग जातें पूर्णाकडे" असे ते लिहितात तेव्हा 'ईशावास्योप-निषदा'तील 'ॐ पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवाव-शिष्यते'चा अनुकार आहे, हे लक्षात येते. बी कवींच्या मनोवृत्तीची बीजे भारतीय आध्यात्मिक-तेत सापडतात. बी आपल्या 'पूर्वदिव्यां'शी नाते ठेवून आहेत. केशवसुत संप्रदायापासून बी वेगळे राहिलेत, याचे कारण त्यांचे स्वतःचे वेगळेपण! म्हणून बींनाही बीजकवी मानायला हवे. (आपल्यामागे आपली परंपरा कुणाला निर्माण करता आली नाही, म्हणून त्याचे 'बीजकवित्व' नाकारण्याचे कारण नाही, हे वर आले आहेच!)

बींच्या काव्यदृष्टीत त्यांचे केशवसुतांशी समान-धर्मित्व शोधण्याचा प्रयत्न अक्षयकुमार काळे यांनी केला आहे.[१२] बींची मनोवृत्ती संस्कृत साहित्यशास्त्रीय संकल्पनांना अधिक जवळची आहे. त्यामुळे पाश्चात्यांपासून प्रेरणा घेऊन परिपुष्ट झालेली केशवसुतांची काव्यदृष्टी व भारतीय आध्यात्मिक बैठकीवर दृढमूल झालेली बींची काव्यदृष्टी यात वरवर समानधर्मित्व जाण-वले, तरी दोघांचीही जातकुळी भिन्न आहे. बींची काव्यदृष्टी त्यांच्या आध्यात्मिक उंचीची जाणीव करून देणारी आहे. ती त्यांना संतांच्याजवळ नेणारी आहे. "त्यांच्या कविता वाचीत असताना आपण एका चिंतनशील आणि प्रगतिशील अशा रसज्ञ तत्त्वज्ञानाच्या सान्निध्यात आहोत", असे अ. ना. देशपांडयांना वाटते.[१३]

काव्य नव्हे शब्दांचा सुंदर नादमधुर मेळ
अर्थचमत्कृतिचाही नोहे डोंबारी खेळ
निसर्गदृष्टीची सादृश्ये नीतिपाठ भव्य
थाटदार घाटाची रचना केवळ नच काव्य !

असे लिहून, ऐश्वर्यात्मक निर्माणक्षमता, अंतरंग ओथंबून वाहणारी सुंदरता, स्वानंदाचे जिव्हार असणारी सौंदर्याची दिव्य प्रस्कुरणे, नव्हे मूर्तिमंत सौंदर्य म्हणजे काव्य अशी बी कवींनी काव्याची व्याख्या केली आहे. ही त्यांची निर्मळ कलानिष्ठ काव्यदृष्टी त्यांच्या दृढ मनाच्या आध्यात्मिक बैठकीवर खंबीरपणे उभी आहे.

बी कवींचा प्रबळ आशावाद हा त्यांच्या मनाच्या या आध्यात्मिक बैठकीतून परिपुष्ट झालेला आहे. "पूर्णापासुनि ढळलेले जग जातें पूर्णाकडे । लांबण मोठी, वाट बिकट ती; उतार चढ वाकडे" ह्या त्यांच्या दृढ श्रद्धेत त्यांच्या प्रबळ आशावादी भव्य, दिव्य आणि वैश्विक जाणीवेचे दर्शन होते. येथे संतत्वाला स्पर्श करणारे त्यांचे मन प्रकट होते, आणि म्हणूनच फार वेगळ्या पातळीवर आपण बींना बघतो.

बींच्या संस्कृतप्रचुर भाषेमुळे व प्रासादिक गुणांच्या अभावामुळे मात्र पुढीलांनी त्यांचे अनुकरण केले नाही. बी आपल्यामागे आपली शिष्य-परंपरा उभी करू शकले नाही.

पाश्चात्य सामाजिक विचारांचा प्रभाव सर्वच क्षेत्रात पडू लागला. साहित्याची पाळेमुळे पाश्चात्य विचारदर्शनात शोधायची; व मार्क्सवाद, समाजवाद, साम्यवाद इत्यादी वादांचा प्रभाव साहित्यावर पडल्याचे दाखवायचे ! यामुळे, व राजकीय नेत्यांच्या वैचारिक मतांचा जनमानसावरील एकूण प्रभाव यामुळे भारतीय तत्त्वज्ञान व हिंदु सांस्कृतिक परंपरेशी असलेले नाते झुगारून दिल्यानेच आपण पुरोगामी व 'सेक्युलर' ठरू, अशी कल्पना अकारण रूढ झाली. 'पूर्व दिव्य ज्यांचे त्यांना रम्य भाविकाळ' ह्या कल्पना वुरसटलेल्या व टाकाऊ वाटू लागल्या...इतिहास हेतुपुरस्सर विसरला जाऊ लागला. नव्याने, प्रतिकूल सत्य टाळून, अनुकूल घटनांचा इतिहास लिहिण्याची भाषा बोलली जाऊ लागली. त्यामुळेच की काय, परंपरेची नाळ कापणाऱ्यांची व पाश्चात्यांच्या उच्छिष्टांवर परिपुष्ट होणाऱ्यांची काव्यदृष्टी अधिक पुरोगामी, अद्भुत व नवनिर्माणक्षम भासू लागली. (केशवसुतांचा अपवाद वगळता, १९४० नंतरचे साहित्य खरे मराठी साहित्य होय, अशी भाषा आज बोलली जात आहे.) या कालमहिमेत विदर्भातील बी कवी उपेक्षित राहिले, याच आश्चर्य ते काय ?

बालकवी

गोविंदाग्रजांनी बालकवींना 'नवकवितेच्या जरिपटक्याचा अधिकार' दिला आहे. आपल्या बालसुलभ मनोवृत्तीत रमणाऱ्या तरीही आशयसंपृक्त व रचनेच्या कौशल्याने नटलेली बालकवींची कविता अन्य समकालीन कवींपेक्षा वेगळी व वैशिष्ट्यपूर्ण आहे. त्यांच्या कवितेतील शब्द हे शैलीय सौंदर्याने नटलेले आहेत. समर्पक क्रियाविशेषणांची व गतिमान छंदांची योजना यामुळे बालकवींची कविता शैलीच्या अभ्यासकांना एक आव्हान आहे. बालकवींनी कवितेतील शब्दांचे अमित सामर्थ्य ओळखले. अभ्यस्त शब्दांची बालकवींनी केलेली योजना व त्यांचे एकूण शब्दौचित्य त्यांच्या कवितेला सुंदरतेच्या कलात्मक पातळीवर घेऊन जातात. "सुंदरतेच्या सुमनावरचें दंव चुंबुनि घ्यावे" इतकी हळुवार, कुसुमकोमल आस्वाददृष्टी असलेल्या कवीची मनोवृत्ती त्यांची स्वतःची बालसुलभ मनोवृत्ती आहे.

बालकवी लौकिक अर्थाने बालवृत्तीचे नव्हते, हे दाखवून द. भि. कुळकर्णी लिहितात, "पण त्यांच्यातील कलावंत मात्र बालवृत्तीचा होता; म्हणजे कुठल्याही अनुभवाची कलात्मक संगती लावताना तो अनुभव आपोआप बालवृत्तीतून वुचकळून निघत असे."[१८] या शब्दांतून द. भि. नी बालकवींच्या कवितेच्या यशाचे नेमके मर्म सांगितले आहे. बालकवींची कविता समजून घेताना, प्रथम हे मर्म नीट समजून घ्यावे व मग कवितेला जवळ घ्यावे.

खरे तर, 'बालकवी' या टोपण नावामुळेच समीक्षकांच्या दृष्टीची झेप सीमित झाली. त्यांच्या कवितेकडे कौतुकाने पाहिले गेले. प्रथमदर्शनी आकर्षित करणाऱ्या मोहक शब्दजालात रसिक

रमले, टीकाकार फसले. या शब्द-योजनेतील कवींचे कलात्मक सामर्थ्य त्यांच्या दृष्टीत सामावले नाही. "प्रौढत्वीं निज शैशवास जपणें बाणा कवीचा असे" या केशवसुतांच्या उद्गारांचे आपण कौतुक केले; पण असा बाणा जपणाऱ्या बालकवींच्या कवितेतील चिरंजीवी शैशव-सौंदर्य मात्र आपण शोधले नाही.

बालकवींच्या कवितेकडे पाहण्याची नवी विशुद्ध कलात्म दृष्टी आपल्याला मर्ढेकरांनी दिली आहे. मर्ढेकर, बेडेकर, गाडगीळ... "या टीकाकारांनीच प्रथम बालकवींच्या निर्मितिप्रक्रियेचा सच्चेपणा, त्यांची निरूपम संवेदनशीलता त्यांचे नवे आशयबंध गुंफण्याचे वळ या साऱ्यांची व आपली ओळख करून दिली.", असे द. भि. कुळकर्णी म्हणतात,[१८] ते पटण्यासारखे आहे.

बालकवींना निसर्गकवी म्हणून मान्यता मिळालेली आहे. बालकवींच्या कवितेतील निसर्ग चैतन्यशील व खेळकर वाटतो. बालकवी निसर्गाला आपला सखा मानतात. त्यामुळे बालकवी व त्यांचा निसर्ग समपातळीवर असतात. दोघेही परस्परांशी एकरूप होतात. हा निसर्ग त्यांच्याशी हसतो, रूसतो; खेळतो, भांडतो; अबोला धरतो, पुन्हा दोघे एक होतात. बालकवींचे निसर्गाशी हे नाते मराठी कवितेत अभूतपूर्व आहे. त्यांची निसर्गप्रीती अस्सल आहे. अपूर्व आहे; ती उपरी नाही, परकी नाही. संतांशी ईश्वर जसा बोलतो, संतांना जसा ईश्वराचा साक्षात्कार होतो, तसाच बालकवींशी त्यांचा निसर्ग बोलतो, त्याचा त्यांना साक्षात्कार होतो. त्यांची भेट 'जिवा-शिवां'ची नसते, 'जिवा-जिवा'ची असते. बालकवी निसर्गाला स्वतःहून वेगळे मानीतच नाहीत. ही तन्मय-तद्रूपता सामान्य पातळीवर समजून घेणे केवळ अशक्य आहे. द. भि. लिहितात, "...बालकवी निसर्गाला जेव्हा लघुरूप देतात व त्यावर पौगंडावस्थेतील मनोवस्थेची फुंकर घालतात तेव्हाच त्यांचे मौलिक काव्य जन्माला येते."[१९]

प्रतिभावान कवींच्या कवितेतील शब्द अपरिहार्य, अपरिवर्तनीय असतात. शैलीशास्त्रज्ञांच्या मते, कोणत्याही शब्दाला समानार्थक (Synonyms) शब्द नसतात.[१०] बालकवींच्या कवितेतील क्रियाविशेषणे व अभ्यस्त शब्द यांची योजना अर्थपूर्ण व सौंदर्यपूर्ण झाली आहे. "या अभ्यस्त शब्दांमुळे कवितेला एकदम एक बालसुलभ छटा आली आहे." असे द. भि. नी दाखवून दिले आहे.[१८] 'लाजलाजली', 'डोलडोलवी', 'नाचनाचतो', इत्यादी अभ्यस्त शब्द त्यांच्या कवितेतून शोधून, विशिष्ट संदर्भात त्यांचे शैलीय सौंदर्य उलगडून दाखविता येईल.

"बालकवींची तरल कल्पनाशक्ती पंचेन्द्रियांपैकी फक्त नेत्रेंद्रिय आणि श्रवणेंद्रिय या दोन इंद्रियांशीच संबद्ध असलेल्या संवेदनांचे ग्रहण करण्यापुरती कार्यक्षम ठरलेली आहे.[१९] हे मत तपासून बघायला हवे. बालकवींनी शोधलेला निसर्ग हा केवळ नेत्रेंद्रिय व श्रवणेंद्रियांनीच आस्वाद घेण्याचा विषय नाही. ती दृष्टी व ती अनुभूतीच अतींद्रिय आहे. अनुभवाच्या ज्या कलात्मक पातळीवर बालकवी पोहचले होते, त्या पातळीवरून त्यांच्या कवितेचा आस्वाद घेता आला, तरच त्यांच्या कवितेचे यथायोग्य आकलन व मूल्यांकन होऊ शकेल.

प्रा. ठकार म्हणतात, "'धर्मवीर'सारख्या सामाजिक जाणीवेच्या न 'वनमाला'सारख्या गूढगुंजनात्मक अनुकरणपर व फसलेल्या कवितांवरून बालकवींची केशवसुत-परंपरा सिद्ध केली पाहिजे, असे नाही...केशवसुत ओजस्वी तर बालकवी सुकुमार. केशवसुतांची रचना ओबडधोबड तर बालकवींची नादमधुर. केशवसुत प्रगल्भ तर बालकवी निरागस. दोघांच्या व्यक्तिमत्वातील फरक हा मं. वि. राजाध्यक्ष यांनी म्हटल्याप्रमाणे कविप्रतिभेतील दोन वृत्तींमधील निसर्गभेद होय."[२०]

तात्पर्य, बालकवींचे व्यक्तित्व स्वयंभू, आत्मसिद्ध, आत्मतुष्ट, स्वयंपूर्ण व पृथगात्म आहे. ह्या व्यक्तित्वातून निर्माण झालेली त्यांची कविताही 'आत्मक्रीड: आत्मरति:' अशी आहे. ती स्वयंस्फूर्त आहे, आनंदमय आहे आणि मंगल आहे. (बालकवी आगगाडीखाली येऊन मृत्युमुखी पडावे, हा केवढा दैवदुर्विलास होय ! त्यांना अधिक आयुष्य

लाभते तर त्यांच्या प्रतिभेचा परिपूर्ण विकास बघायला मिळाला असता. परंतु समीक्षेच्या क्षेत्रात ‘जर–तर’च्या भाषेत मूल्यमापन शक्य नसते!)

गोविंदाग्रज

गडकऱ्यांनी नाटक, कविता आणि विनोदी साहित्य या तीनही वाङमयप्रकारात लेखन करून कीर्ती मिळविली असली, तरीही गडकऱ्यांची मूल-प्रकृती कवीची आहे. काव्य हेच त्यांच्या व्यक्तिमत्वाचे मूळ अधिष्ठान आहे. त्यांच्या नाटकांतूनही त्यांची कविताच बोलते आहे, असे दिसेल.

आत्यंतिक भावनोत्कटता हा त्यांच्या मनोवृत्तीचा स्थायीभाव आहे. अलौकिक प्रतिभा, असाधारण कल्पकता आणि अंतःकरणातील उत्कट भावना यातून निर्माण झालेली त्यांची कविता रसिकांना एका बाजूने कल्पकतेच्या उत्तुंग पातळीवर घेऊन जाते व दुसऱ्या बाजूने ती भावव्याकुळ होते. तिला करुणेचा स्पर्श झालेला जाणवतो.

विपुल शब्दवैभव, अभूतपूर्व भाषाविभ्रम, उत्तुंग कल्पनाविलास आणि संतकवितेने घडविलेले त्यांचे श्रद्धाळू मन यांतून त्यांच्या दिव्य प्रतिभेला लाभलेला भावस्पर्श यामुळे त्यांच्या कवितेने रसिकांना आकृष्ट केले. त्यांचे संवेदनशील मन त्यांच्या कवितेतून – विशेषतः प्रेमकवितांतून – प्रांजळ भावोत्कटतेने व्यक्त होते.

प्रेम, उत्कट प्रेम हा गोविंदाग्रजांच्या कवितेचा मुख्य विषय आहे. प्रेमाच्या सफलतेचे व विफलतेचे विविधरंगी पदर त्यांच्या कवितेतून दिसून येतात. त्यांना ‘प्रेमाचा शाहीर’ म्हणून गौरविले जाते, ते उगीच नव्हे ! विफल प्रेमाचे, प्रेमनैराश्याचे विविध रंग त्यांच्या कवितेतून भावोत्कटतेने उतरतात.

आपल्यावर कुणीही प्रेम करीत नाही, ही प्रखर जाणीव अंतःकरणाला पीळ पाडणारी असते. अवतीभवती कुठेतरी दाहक वाळवंटात प्रेमाचा झरा सापडावा, यासाठी गोविंदाग्रजांची तडफड आहे. म्हणून ते भावव्याकुळ होऊन लिहितात :–

ओठांशीं भिडतें रहस्य मनिचें–
सांगूं कुणाला परी ?
अश्रु हे नयनींहि–माळ करूनी
घालूं कुणाच्या गळां ?
आलें हें भरुनी रितें हृदयही–
देऊं कुणाच्या करीं ?
आला दाटुनि कंठ–हाय !
रडुनी कोठें करूं मोकळा ?–(ती कोण ?)

या ओळींतून व्यक्त होणारी भावना अस्सल नाही, असे कोण म्हणेल ? प्रेमाच्या तीव्र निराशेने त्यांच्या मनाला तडा जातो व भावावेगाने ते पुढील ओळी लिहून जातात–

होतें नव्हतें त्याची केली तुझ्या ठिकाणीं पोंच ॥
जीवांच्या जाळचांत झेलला शब्द
न पडला तोंच ॥
× ×
केल्या ज्याच्या पायघड्या मीं
तुझ्या पावलांसाठी ॥
त्या हृदयाला तुडवुनि गेलिस
नटव्या थाटापाठीं ?
× ×
जगावांचुनि लाभतीस तरि
जग मी केलें असतें ॥
तुझ्यावांचुनि जग हे आतां
असून झाले नसतें ॥–(निर्दय बालेस)

ही दाहक प्रेमनिराशा कुणाही सहृदय रसिकाला हेलावून टाकील. प्रीतीचा कुसुमकोमल स्पर्श झाला की अंगप्रत्यंग फुलून येते, आणि त्या प्रीतिगंधित क्षणाने मृत्यूला सामोरे जाण्याचे मनोबल लाभते.

क्षण एक पुरे प्रेमाचा । वर्षाव पडो मरणांचा ॥

गोविंदाग्रजांची प्रेमकविता म्हणजे प्रेम या विषयावर भाष्यच होय. ते प्रेमस्तोत्र आहे, प्रेमगीता आहे. प्रेमाच्या विविध रूपांचा इतका सहजसुंदर, नितांतरमणीय, उत्कट व प्रांजळ आविष्कार मराठी कवितेला दुर्लभ होता. रा. शं. वाळिंब्यांनी म्हटलेच आहे, “गडकऱ्यांनी विफल प्रेमाची किंवा प्रणयभंगाची जी गीते लिहिली आहेत, त्यांच्यामधील भावोत्कटतेला मराठी भाषेत तरी तोड सापडणे फार कठीण आहे.”[११] त्यांच्या कवितेतून व्यक्त होणारी प्रामाणिक वेदना ही केवळ अपूर्व आहे. त्र्यं. वि.

सरदेशमुख लिहितात, "गोविंदाग्रजांच्या प्रेम गीतांतील आत्मपरता (...) इतकी प्रांजळ, चोख, प्रसादपूर्ण व करुणमधुर आहे की तिला शिफारशीचा वाराही खपू नये."[२२]

गोविंदाग्रजांच्या कवितेने पुढे अनेकांना प्रेरणा दिली. जीवनाच्या मूलभूत व्यथांची जाणीव व सृजनशील कल्पकता यातून पुढे मनमोहन, भारती प्रभु यांची मुक्त प्रेमगीते फुलली आहेत. त्यांच्या भाषेच्या सौंदर्याची नवनवी रूपे पु. शि. रेग्यांनी दाखविली. (त्यांच्या विनोदी कवितांतून प्रेरणा घेऊन, पुढे 'झेंडूची फुले' बहरास आली असण्याची शक्यता नाकारता येणार नाही.)

गोविंदाग्रजांच्या कवितेची भाषा ही खास त्यांची आहे. मराठी भाषेने आपले संपूर्ण वैभव या कवीसाठी दोन्ही हातांनी भरभरून उधळले आहे. मराठी भाषेचा यथोचित शब्दगौरव, पदलालित्य, अर्थसौंदर्य, काव्यविभ्रम सारे यांच्या कवितेत बघता येतात. "माझा मऱ्हाटा चि बोलु कवतिकें । परि अमृतातें हीं पैजेंसी जींके । ऐसीं अक्षरें चि रसिकें ।। मेळवीन ।।" ही मराठीच्या अभिमानाची भाषा बोलण्याचा अधिकार जसा ज्ञानेश्वरांचा होता, तसाच गोविंदाग्रजांचा आहे. या कविद्वयांनी जसे मराठी भाषेवर प्रेम केले, तसेच मराठी भाषेनेही यांच्यावर आत्यंतिक प्रेम केले. मराठी भाषा किती वैभवसंपन्न आहे, किती तेजोमय आहे, किती अर्थगर्भ आहे हे अर्वाचीन मराठी कवितेत गोविंदाग्रजांनी दाखवून दिले. ही भाषा पेलण्याचे ज्यांच्यात बळ नव्हते, त्यांनी या भाषेला दूषणे दिलीत. तिच्यावर कृत्रिमतेचा; बेगडीपणाचा शिक्का मारला. परंतु आजही त्यांची कविता (व नाटकेसुद्धा) वाचताना, त्यांच्या भाषेचा चिरंजीवी चिद्विलास प्रतीत होतो.

गोविंदाग्रजांच्या काव्यभाषेबाबत बोलताना माधव मनोहर म्हणतात, "शैलीच्या अभिधानविशेषाला संपूर्ण पात्र ठरणारी कोणाची भाषा असेल तर ती आधुनिकात तरी निदान केवळ गडकऱ्यांचीच होय."[२३] (प्रस्तुत लेखकाने गोविंदाग्रजांच्या कवितेचा आधुनिक शैलीवैज्ञानिक दृष्टिकोणातून अभ्यास करून, पीएच्. डी. पदवीसाठी प्रबंध सादर केला होता.)

असो. येथवर केशवसुतांवरोबर रे. टिळक बी, बालकवी व गोविंदाग्रज यांची मनोवृत्ती व काव्यवैशिष्टये यांचा धावता परिचय करून घेतला. यांच्या कवितांचे विश्लेषण करून, त्यांची समाजदृष्टी, त्यांच्या कवितेतील विविध विषय इत्यादींचा मागोवा घेणे, प्रस्तुत लेखाचा उद्देश नव्हे ! जे माहिती आहे, अनेकांनी लिहून ठेवले आहे, त्याचेच येथे पुनर्लेखन करण्यात स्वारस्य नाही.

प्रस्तुत लेखाचे 'बीजकवी' हे विचारसूत्र घेऊन, व 'बीजकवी' कुणाला म्हणता येईल, याबाबत माझी धारणा प्रथम स्पष्ट करून, त्या विचारसूत्राच्या आधाराने वरील कवींच्या बीजा कवित्वाचा शोध घेतला. (यात आणखी कवींचा विचार करता आला असता, परंतु १९२० पर्यंतच्या प्रमुख कवींचा विचार करण्याचे ठरवून विषयाला थोडी मर्यादा घालावी लागली.)

वरील चर्चित सर्व कवींमध्ये आपल्या नंतरच्या कवींना प्रेरणा देण्याची योग्यता होती. प्रत्येकात स्वतःचा एक संप्रदाय (School) स्थापन करण्याचे सामर्थ्य होते. पुढीलांनी त्यांच्या कवितेने भारावून जाऊन त्यांच्या मागे जावे, त्यांचे अनुकरण करावे, एवढे बळ त्यांच्या कवितेत होते. त्यांच्या कवितेतील अशी बलस्थानेच त्यांना 'बीजकवी' ही सन्मान्य उपाधी प्रदान करण्यास सार्थ व सक्षम ठरतात.

म. श्री. पंडित लिहितात, "वास्तविक विचार केला तर या सर्व कवींचा पिंड आपआपल्या परी स्वतंत्र होता. आणि यापैकी प्रत्येकाने आधुनिक कवितेला कांहींना कांही विशेष प्रदान केलें आहे."[२४]

कांहीचे अनुकरण कां होऊ शकले नाही, त्यांनी परंपरा कां निर्माण केली नाही, याची कारणे शोधणे हा वेगळा, स्वतंत्र लेखाचा विषय होईल. गवयाचा पोरगा गवई झाला नाही, यात काय दोष केवळ बापाचा मानायचा ? पोरगा बापाजवळ निष्ठेने, एकाग्रतेने बसला तर बाप आपल्या अनुभवाचे चार सूर त्याच्या गळयात नक्कीच बांधील ! असे झाले नाही, म्हणून बापाच्या योग्यतेबद्दल शंका घेण्याचे काही कारण नाही.

तात्पर्य; बीजकवी म्हणून घेण्याचा अधिकार वरील सार्‍याच कवींचा आहे, हे आता मान्य व्हायला हरकत नसावी. ■

संदर्भ टीपा

१. कुळकर्णी, द. भि. 'पहिली परंपरा' (पप) नागपूर, अमेय प्र., पहिली, १९७६, पृ. १०
२. पंडित, म. श्री. 'समग्र केशवसुत' (सके), पुणे, व्हीनस, पुनर्मुद्रण १९७८, पृ. ११३
३. तत्रैव, पृ. ११३
४. तत्रैव, पृ. ११२
५. देशपांडे, अ. ना. 'आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास, भाग पहिला, (आमवा) पुणे, व्हीनस, पुनर्मुद्रण; मार्च १९७४, पृ. ३११
६. पूर्वोक्त–पप, पृ. ६
७. पूर्वोक्त–सके, पृ. ३६
८. पहा–क्षेमेन्द्रकृत 'कविकण्ठाभरण' (सं.– वा. के. लेले), वाराणसी, मोतीलाल बनारसीदास, प्रथम संस्करण. १९६७, पृ. २१–२२.
९. पूर्वोक्त, सके, पृ. ७०
१०. तत्रैव, पृ. ७१
११. पंडित, म. श्री. 'आधुनिक मराठी कविता (आमक), नागपूर, सुविचार प्र. मं. द्वितीय, १९६८, पृ. १५५
१२. काळे, अक्षयकुमार 'सूक्तसंदर्भ'; नागपूर अमेय, पहिली १९८५, पृ. १३
१३. पूर्वोक्त, आमवा, पृ. ३३७
१४. पूर्वोक्त, पप, पृ. १९
१५. तत्रैव. पृ. १३
१६. तत्रैव. पृ. २१
१७. पहा–लेले, वा. के. 'ललितलेखन व शैली' नागपूर, साहित्य प्रसार केन्द्र; प्रथमावृत्ती १९८४, पृ. १०३–५
१८. पूर्वोक्त, पप. पृ. २३
१९. पूर्वोक्त, आमवा, पृ. ३२९
२०. ठकार, निशिकांत 'मराठी कविता, स्वरूप आणि विवेचन', स्वाध्याय म. वि. पुणे प्रथम, नोव्हें. १९७७, पृ. २५१
२१. तत्रैव, (उद्धृत) पृ. २५०
२२. सरदेशमुख, त्र्यं. वि. 'अंधारयात्रा' मुंबई, मौज, १९६८, पृ. ५५–५६
२३. मनोहर माधव, 'अभिरुचि' वर्ष १३ वे, अंक पहिला, मुंबई जाने–फेब्रु. १९६९, पृ. २९
२४. पंडित, म. श्री. 'रसधारा' (प्रस्तावनेतून)

■

बनारस हिंदू विश्वविद्यालय,
वाराणसी

॥ संशोधन ॥

मराठी अभिलेखांतील सांकेतिक अंकलेखन आणि ज्ञानदेवांचा काळ

सु. बा. कुळकर्णी

ज्ञानदेवांचा कालखंड हे आजवर न उलगडलेले कोडे आहे. या कालखंडासंबंधी कितीतरी प्रश्न अनुत्तरित आहेत. या विषयाचे एक अभ्यासक डॉ. सु. बा. कुळकर्णी यांनी या कालखंडासंबंधाने विविध प्रकारे महत्त्वाचे अध्ययन चालविले असून त्यांचे या विषयावरील तीन लेख युगवाणीतून यापूर्वी प्रकाशित झाले आहेत. त्यावरील वाचकांच्या, अभ्यासकांच्या प्रतिक्रिया देखील युगवाणीतून व्यक्त झालेल्या असून त्यांच्या ऑगस्ट'९१ च्या अंकातील लेखावरील काही प्रतिक्रिया याच अंकात इतरत्र प्रकाशित केलेल्या आहेत.

या लेखावर देखील प्रतिक्रिया अपेक्षित असून निवडक प्रतिक्रिया युगवाणीतून प्रकाशित करण्यात येतील.

पुराभिलेखांतून कालनिर्वचनासाठी संख्यांचा वापर केलेला आढळून येतो. या संख्यांचे लेखन अक्षरी वा अंकी करण्याचा परिपाठ असे. शून्य ते नऊ अशा दहा अंकचिन्हांच्या समवायाने संख्या बनविल्या जात. कालनिर्वचनाप्रमाणे वस्तू, भू, नाणी इत्यादींच्या परिगणनेसाठी संख्यांचा वापर होई. भारतामध्ये ज्योतिष, गणित आणि अन्य अनेक विषयांवरील ग्रंथलेखन पद्यात करण्याची पद्धती होती. त्यात पाठांतरांची सोय अनुस्यूत असे. अशा ग्रंथांतून होणारी संख्यांची पुन:पुनरुक्ती शैलीदार लेखनास मारक ठरे. प्रत्येक मूल अंकासाठी व त्यापासून व्युत्पादिलेल्या संयुक्त संख्यांसाठी एकेकच शब्द असल्याने तो विशिष्ट वृत्तामध्ये चपखलपणे बसविण्यासाठीही बरीच ओढाताण करावी लागे. यातूनच अंकनिर्देशनाचे नवनवीन संकेत रूढ झाले. उदा. कर, नेत्र, जानू, पक्ष इ. शब्दांनी 'दोन' ही संख्या निर्देशिली जाऊ लागली. वेद, वर्ण, आश्रम इ. शब्दांनी 'चार' ही संख्या दर्शविली जाऊ लागली. 'अष्ट' वसू, 'दश' दिशा, 'पंधरा' तिथी; 'वीस' अंगुली, 'बत्तीस' दात हे अशांपैकीच काही संकेत होत. कालांतराने असे शेकडो संकेत प्रचारात आले.

प्रारंभी विशिष्ट शब्दाने एकच एक संख्या निर्देशिली जाई. परंतु पुढे ग्रंथकर्त्यांच्या लहरीनुसार वा प्रदेशभेदानुसार एकाच शब्दाने कधी-कधी दोन वा अधिक संख्यांचा निर्देश होऊ लागला. उदा. तपन या शब्दाने सूर्य या अर्थी 'बारा' व अग्नी या अर्थी 'तीन' ही संख्या निर्देशिली जाऊ लागली. युग हा मुळात 'चार' या अंकाचा निर्देशक; परंतु पुढे याने 'दोन' ही संख्याही निर्देशिली जाऊ लागली. यातूनच सागर म्हणजे 'चार' किंवा 'सात'; दिशा म्हणजे 'दहा' किंवा 'चार'; रत्ने 'पाच' किंवा 'नऊ' किंवा 'चौदा'; तत्त्वे 'पाच' किंवा 'पंचवीस'; गुण 'सहा' किंवा 'तीन' असे बहुविध संकेत रूढ झाले. रवि या शब्दाने 'बारा', तर चंद्र या शब्दाने 'एक' हा अंक

निर्देशिला जाई. परंतु, रविचंद्र यांच्या समाहाराने 'दोन' हा अंक दर्शविला जाऊ लागला.

शब्दसंकेत

मराठी अभिलेखांतील संख्या निर्देशन प्रायः संस्कृतच्याच धर्तीवर होत असल्याने या दोन्ही भाषांतील शब्दसंकेत सारखेच आहेत. किंबहुना, संस्कृत शब्दसंकेतांना अखिल भारतीय स्वरूप प्राप्त झालेले आढळून येते. असे बहुप्रचल शब्दसंकेत पुढीलप्रमाणे होत :–

० = पूर्ण, रंध्र, बिंदु, आकाश (ख, गगन' अंबर इ.)

१ = आदि, गो, ध्रुव, आत्मा, जगति, परब्रह्म, चंद्र (शशि, इंदु इ.), पृथ्वी (भू, धरा, वसुंधरा इ.)

२ = यम, युग, युग्म, पक्ष, अश्विनी, ओष्ठ, कर, कर्ण, जानु, रविचंद्रौ.

३ = राम, गुण, काळ, त्रिनेत्र, सहोदर; नाडी, वचन, जग (लोक, भुवन इ.); अग्नि (वह्नि, पावक, इ.)

४ = वेद, वर्ण, आश्रम, युग, बंधु, ब्रह्मास्य, व्यूह, गति, दिशा, सागर (अर्णव, अब्धि, सिंधु इ.)

५ = अर्थ, इंद्रिय, तत्त्व, पर्व, पांडव, भूत; पातक, विषय, इंद्रिय, रत्न, लवण, बाण (शर, सायक इ.)

६ = अंग, ऋतु, रस, काय, दर्शन, राग, रिपु, शास्त्र, मासार्ध, वेदांग.

७ = ऋषि, अत्रि, वार, स्वर, धातु, छंद, द्वीप, कलत्र, अश्व, लोक, स्वर, पुर, पर्वत (शैल, नग, अद्रि इ.)

८ = सिद्धि, अनुष्टुभ्, मंगल, मूर्ति, नग, वसु, गज (नाग, हस्तिन् इ.)

९ = अंक, नंद, द्वार, निधि, रंध्र, ग्रह, गो, भक्ति, पवन.

१० = दिशा, अंगुलि, पंक्ति; कर्म, अवतार रावणशिर.

११ = अक्षौहिणी, लाभ, ईश, शिव (रुद्र, हर, महादेव इ.)

१२ = मास; राशि; व्यय; जगति, सूर्य (रवि, अर्क, भानु इ.)

१३ = काम, मन्मथ, विश्वदेव, अघोष, अति-जगति.

१४ = इंद्र, मनु, विद्या, लोक, रत्न.

१५ = तिथि, दिन, घस्र, पक्ष.

१६ = शृंगार, कला, अष्टि, नृप, भूप.

१७ = अत्यष्टि.

१८ = धृति, प्रकृति.

१९ = अतिधृति.

२० = कृति, नख, अंगुलि, रावणभुज.

२१ = प्रकृति, स्वर्ग.

२२ = कृति, जाति, आकृति.

२३ = विकृति.

२४ = गायत्री, जिन, सिद्ध.

२५ = तत्त्व.

२६ = उत्कृति.

२७ = नक्षत्र, उडु, भ.

३२ = दंत, रद.

३३ = देव, अमर, सुर इ.

३४ = तान.

४० = नरक.

४८ = जगति.

४९ = वायु, तान.

६४ = कला.

१०० = धार्तराष्ट्र, अब्जदल, शक्रयज्ञ.

१००० = जान्हवीवक्त्र, शेषशीर्ष, रविबाण, अर्जुनकर.

वर्णसंकेत

शब्दसंकेतांप्रमाणे वर्णांनीही संख्यानिर्देश करण्याच्या पद्धती रूढ होत्या. अशा पद्धतींत आर्यभटीय, कटपयादी, नञादी व सिंहली या प्रमुख होत. सुप्रसिद्ध ज्योतिर्विद आर्यभट याने पाटलीपुत्र येथे इ. स. ४९९ च्या सुमारास प्रचारात आणलेली वर्णांनी संख्यानिर्देश करण्याची पद्धती 'आर्यभटीय' म्हणून ओळखली जाते. या पद्धतीत क ते म या पंचवीस व्यंजनांनी १ ते २५ या संख्या दर्शविल्या जात. य ते ह या उर्वरित व्यंजनांनी अनुक्रमे ३० ते १०० पर्यंतचे दशक–

अंक दर्शविले जात. इ, उ, ऋ, लृ, ए, ऐ, ओ, औ या स्वरांनी अनुक्रमे १० चा वर्ग, चतुर्घात, षष्ठघात ते षोडषघात या संख्या दर्शविल्या जात. या घातांकांनी व्यंजननिर्दिष्ट संख्येस गुणले म्हणजे अपेक्षित संख्या मिळे. उदा. ग = ३, गि =३००, गु = ३०००; य = ३०, यि = ३०००, यु = ३००००; रि = ४०००, गिरि (किंवा ग्रि) = ४३००. या आर्यभटीय पद्धतीचा वापर प्राधान्येकरून ज्योतिष व गणितविषयक ग्रंथांतून होई. कोरीव लेखांतील कालनिर्वचनासाठी तिचा वापर झालेला दिसून येत नाही. अशाच धर्तीची वर्णांक-संकेत पद्धती केरळात प्रचारात होती. ती 'नन्नादी' म्हणून ओळखली जाते. सिंहल द्वीपातही दुसरी एक पद्धती रूढ होती. नन्नादी व सिंहली वर्णांक पद्धतींचा वापर प्रामुख्याने पोथ्यांच्या पानावर अनुक्रमांक टाकण्यासाठी होई.

महाराष्ट्र व दक्षिण भारतात विशेष प्रचारात असलेली वर्णांक-संकेत पद्धती 'कटपयादी' ही होय. ही पद्धती अकराव्या शतकात दुसऱ्या आर्यभटाने प्रचारात आणली. कोरीव लेख व पोथ्यांमधील कालनिर्वचनासाठी तिचा वापर झालेला दिसतो. कटपयादी संकेत पद्धतीचे सूत्र पुढीलप्रमाणे आहे :-

नञावचश्च शून्यानि संख्या कटपयादयः।
मिश्रे तूपान्तहल्संख्या
न च चिन्त्यो हलः स्वरः॥

या पद्धतीत स्वर हे निरर्थक वा शून्यवाचक असतात. संयुक्त व्यंजनातील फक्त अंत्य व्यंजन अंकनिदर्शक असते. 'अंकानां वामतो गतिः' या सूत्रानुसार अंकक्रम घ्यावयाचा असतो.

या पद्धतीतील वर्णांचे अंकमूल्य अनुक्रमाने पुढे निर्देशिल्याप्रमाणे असते.

क ख ग घ ङ	१ २ ३ ४ ५
च छ ज झ ञ	६ ७ ८ ९ ०
ट ठ ड ढ ण	१ २ ३ ४ ५
त थ द ध न	६ ७ ८ ९ ०
प फ ब भ म	१ २ ३ ४ ५
य र ल व श	१ २ ३ ४ ५
ष स ह ळ	६ ७ ८ ९

या पद्धतीत ग = ३ आणि ज = ८; परंतु गज = ८३ (३८ नव्हे). शब्दान्ती अनुस्वार असल्यास त्या संख्येची पाचपट करतात. उदा. सरस्वतीं = ६४२७ × ५ = ३२१३५.

मराठीतील सांकेतिक अंकलेखन

मराठी कोरीव लेखांतून आणि पोथ्यांच्या समाप्तिलेखातून कालनिर्देशासाठी शब्दसंकेत आणि कटपयादी वर्णसंकेत या दोन्ही प्रकारच्या संकेतांचा वापर होई. शब्दांकनासाठी पारंपरिक संस्कृत पद्धतीचाच अवलंब केलेला असला तरी काही स्वजात संकेतही रूढ केलेले दिसून येतात. लेखनकालाप्रमाणेच ग्रंथसंख्याही सांकेतिक पद्धतीने सांगण्याची प्रथा होती.

सांकेतिक संख्यालेखनामध्ये 'अंकानां वामतो गतिः' हा जरी सामान्य नियम असला तरी संख्या अंकी लिहिण्याच्या सवयीमुळे 'सव्यतो गती'ची उदाहरणेही तुरळकपणे आढळून येतात. क्वचित, एकाच संख्येत अंक व शब्दांक, किंवा शब्दांक व वर्णांक अशी संमिश्र योजनाही आढळून येते.

मराठी अभिलेखांतील कालनिर्वचन सामान्यत: युधिष्ठिर शक (कलियुग), शालिवाहन शक व विक्रम संवत या तीन कालगणनांनुसार झालेले आढळते. मध्ययुगीन मराठी पत्रव्यवहार, फर्माने, खुर्दखते इत्यादींमध्ये शुहूर, फसली वा हिजरी कालगणनेचा वापर होई. ब्रिटिश रियासतीत प्राधान्येकरून इसवी सनाचा वापर होई. मराठी रियासतीत राजशकाचाही वापर होत असे.

सांकेतिक पद्धतीचे कालनिर्देशन मराठी पोथ्यांतून मोठ्या प्रमाणात होत असले तरी कोरीव लेखांतून मात्र ते क्वचितच होई. या संदर्भात शं. गो. तुळपुळे लिहितात,

"दक्षिण भारतांतील कालगणना बहुतेककरून बार्हस्पत्य पद्धतीची असते. मराठी लेखांतूनहि तीच; एक अपवाद सोडल्यास, सर्वत्र दिसते. तो अपवाद म्हणजे नागावच्या शिलालेखाचा. या लेखांत मात्र शकवर्षाबरोबर हिजरी वर्षाचाही उल्लेख आला आहे. तसेच, बहुतेक सर्व मराठी लेखांतून शकवर्ष आंकड्यांत सांगितले जात असतांना भोरसारख्या एखाद दुसऱ्या लेखांत मात्र

तें अक्षरी व अंकी अशा उभय पद्धतींनीं निर्देशिलेलें आढळते. शिलाहारांच्या काहीं लेखांतहि हीच पद्धती दिसून येते. उदा. आगाशी व चांजें हे लेख पहावे. शकवर्ष सांकेतिक पद्धतीने सांगयाची रीत मराठी लेखांतून अभावानेच दिसते. प्राचीन मराठी काव्यांतून दिसून येणाऱ्या सांकेतिक कालनिर्देशन पद्धतीचा संपर्क कोरीव लेखांस कसा लागला नाही. याचें आश्चर्य वाटतें."

(–प्राचीन मराठी कोरीव लेख, प्रस्ता. पृ. ७५)

प्राचीन मराठी साहित्यात आढळणाऱ्या अनेकविध सांकेतिक अंकलेखन पद्धतींचा प्रस्तुत अभ्यास प्राधान्येकरून महाराष्ट्र–सारस्वताच्या सहाव्या आवृत्तीत समाविष्ट झालेल्या अभिलेखांवर आधारलेला आहे. त्यात निर्देशिलेले पृष्ठांक या सहाव्या आवृत्तीचे (इ. स. १९८२) आहेत.

कोरीव लेखांतील कालनिर्देश

१. मराठी कोरीव लेखातील सांकेतिक पद्धतीचा कालनिर्देश कृष्णदेव यादवाच्या तासगाव ताम्रपटात आढळत असला तरी तो त्यातील संस्कृत पाठांतर्गत आहे हे ध्यानात घेतले पाहिजे. हा निर्देश पुढीलप्रमाणे आहे.

"शालवाहन शके नेत्राद्रिरुद्रोन्मिते तच्छाधारणवच्छरे सुविदिते माघे ✕ रारेत्तिथि।" (प्रा. म. को. ले. पृ. १३६)

यातील नेत्र = २, अद्रि = ७ आणि रुद्र = ११ या शब्दप्रतीकांमधून ११७२ हा शक प्राप्त होतो.

२. सुप्रसिद्ध मराठी कवी श्रीधर याच्या पंढरपूर येथील समाधीवरील लेखात शब्दसंकेताचा वापर केलेला आहे.

"भूप्राणांगमही मिते शुभ शके सौम्याब्द सौम्यायने। माघे मासि असिते द्विजे गुणतिथौ ब्राह्मे मूहूर्ते यमे ।। भीमातीरगते सुपंढरपूरे श्रीविठ्ठलाधिष्ठिते। श्रीमत् श्रीधर सद्गुरु: सुखघन: सच्चित् समाधौ स्थित: ।।

(म. सा. पृ. ९४५)

या लेखातील 'भूप्राणांगमही' या शब्दांमधून भू = १, प्राण = ५, अंग = ३ आणि मही = १ असे अंक प्राप्त होतात व श्रीधराचा १६५१ हा मृत्युशक विदित होतो.

ग्रंथसमाप्तीचे कालनिर्देश

३. शिशुपाळवधाच्या शेवटी भास्कराने शके ११९५ असा ग्रंथरचनाकाळ दिला आहे, असे वि. ल. भावे सांगतात. (म. सा. पृ. ७७). त्यांनी उद्धृत केलेली ओवी अशी आहे–

"हा शिशुपाळवधु : आइकतां तुटे भवबंधु : जीवा होए प्रबंधु : परमात्म्याचा ।। शरांक रुद्र रोकडे : श्रीमुख माधव चोखडें : श्रीकृष्णवर्णन तोकडें : वानिलें मियां ।। ऐसा नागार्जुनाचा दातारु : मियां वर्णिला श्रीचक्रधरु : तो जगा मंगळकरु : म्हणे भास्कर कवि ।।"

या ओवीतील 'शरांक रुद्र' या शब्दबंधात, शर = ५, अंक = ९ आणि रुद्र = ११ असे अंक प्राप्त होतात व शिशुपाळवधाच्या रचनेचा शके ११९५ हा काळ कळतो. कालनिर्देशाच्या संदर्भात 'रोकडें' वा 'निरुतें' ही विशेषणे वापरण्याची पद्धतीही दिसून येते.

वि. भि. कोलते यांना मात्र शिशुपाळवधाचा हा लेखनकाल मान्य नाही. भावे यांनी उल्लेखिलेली ओवी त्यांना शिशुपाळवधाच्या कोणत्याही उपलब्ध प्रतीत मिळाली नाही. त्यांच्या मते शिशुपाळवधाचे लेखन शके १२३४ मध्ये झाले.

४. शिशुपाळवधाप्रमाणेच रवळोवासाच्य[1] सह्याद्रि वर्णन या ग्रंथाची समाप्तिकालदर्शक ओवी वादग्रस्त ठरली आहे. वि. ल. भावे यांनी सारस्वताच्या पृ. १५९ च्या तळटीपेत पुढील ओवी दिली आहे.

"वेदबाणपक्षुचंद्रशका। अंगिरा माधवमासु निका। शुक्ल बाणेसि हिरांविका। पूर्ण केलें।।"

या ओवीतील 'वेदबाणपक्षुचंद्र' या शब्दबंधात वेद = ४, बाण = ५, पक्षु = २ आणि चंद्र = १ असे शब्दसकेत आले आहेत. त्यांतून शके १२५४ हा सह्याद्रि–वर्णनाचा काल प्राप्त होतो. य. खु. देशपांडे व ह. ना. नेने यांनीही हाच काल निर्देशिला आहे. परंतु कोलते यांना सह्याद्रि–वर्णनाच्या कोणत्याही पोथीत ही कालनिर्देशक

ओवी आढळली नाही. त्यांनी सह्याद्रि–वर्णनाचा लेखनकाल शके १२७५ असावा असे अनुमान केले आहे. [प्रस्ता. पृ. ८४].

५. ज. शा. देशपांडे व कृष्णदास महानुभाव यांनी प्राचीन मराठी कविता या ग्रंथमालेच्या ६ व्या खंडात जाल्हणशिष्य नृसिंह याचे रुक्मिणी स्वयंवर संपादित केले आहे. या काव्याच्या कांही हस्तलिखित प्रतींतून पुढील कालनिदर्शक ओवी आढळते.

"शरपक्ष रामचंद्र सुभानुनामा। शकारंभा मधु राकोत्तमा। तैं विवाह रुक्मिणीकृष्ण परब्रह्म। जाला श्रीदत्तवरदे।।" [प्रस्ता. पृ. २]. पांगारकर व भावे यांनीही ही ओवी उद्धृत केली आहे.

या ओवीत शर = ५, पक्ष = २, राम = ३ आणि चंद्र = १ असे सांकेतिक शब्दांक येतात. त्यांतून रुक्मिणीस्वयंवराचा शके १३२५ हा लेखनकाल विदित होतो, संवत्सरही बरोबर जुळते.

६. वऱ्हाडातील कळपूर येथील विठ्ठल नावाच्या कवीच्या रासक्रीडा प्रकरणाचा निर्देश भावे करतात [महा. सारस्वत, पृ. २४८]. या कवीने आपल्या काव्याचा लेखनकाल पुढीलप्रमाणे नोंदविला आहे.

"कुमारवक्त्राग्निशरेंदुयोगें। शकें गणावी विपरीत मार्गें।। आनंद संवत्सर माघमासीं। निशीशवारीं तिथि पौर्णिमेसी।।"

यात कुमारवक्त्र म्हणजे कार्तिकेयाची मुखे = ६, अग्नि = ३, शर = ५ आणि इंदु = १ असे शब्दसंकेत अभिप्रेत आहेत. त्यांची गणना शके १५३६ अशी येते. यावर्षी आनंद संवत्सर येते.

७. महाराष्ट्रकवि आणि काव्यसंग्रह या दोन्ही मासिकांतून मुद्रित झालेले 'द्रौपदीवस्त्रहरण' नावाचे काव्य आहे. हे विठ्ठल वा कचेश्वर यांनी लिहिले आहे असा समज होता. परंतु त्याचा कर्ता रामसुतात्मज नावाचा समकालीन कवी होय असे भावे यांनी दाखवून दिले आहे [महा. सारस्वत पृ. ४१२]. याने आपल्या काव्याचा रचनाकाल पुढीलप्रमाणे नोंदविला आहे.

"जें तो शक वेदफणींद्रतिथी ऋषि आत्मज तो परिधावि असे। वर्षा ऋतु श्रावण शुद्ध बिजं भृगुवार मघा उडु पूर्ण वसे।।"

भावे या शकाचे वाचन १५९४ परिधावी संवत्सर असे करतात. परंतु शब्दसंकेतांप्रमाणे ते १५८४ असे येते. जसे, वेद = ४; फणींद्र = ८ आणि तिथी = १५. शके १५९४ मध्ये परिधावी संवत्सर येते हे मात्र खरे आहे; परंतु 'फणींद्र'-मधून ९ हा अंक कसा मिळावा ?

८. जयरामस्वामी वडगावकर यांच्या निधन कालासंबंधीचा एक श्लोक भावे यांनी सारस्वतात उद्धृत केला आहे. [पृ. ३३८].

"शालीवाहनके विरिञ्चिमुखतो भक्तिप्रपञ्चाब्दके। तत्र श्रीपरिधाविवत्सरवरे दाक्षिण्यमार्गे रवौ। मासे प्रौष्ठपदे शिते हरिदिने जीवाह्वये वासरे। सोऽयं श्रीजयरामयोगितिलको ब्रह्मस्वरूपो बभौ।।"

या श्लोकातील शकाची गणना भावे यांनी १५९५ अशी केली आहे; परंतु ती १५९४ अशी असावयास पाहिजे. एक तर तो विठ्ठलबोवा नावाच्या कोणी स्वामींनी पाठ म्हणून दाखविला होता. या पाठांतरात 'अब्जके'चे 'अब्दके' झालेले दिसते. शिवाय परिधावी संवत्सर शके १५९४ मध्येच येते.

या श्लोकातील विरञ्चिमुखतो म्हणजे ब्रह्मदेवाच्या मुखातून उत्पन्न झालेले वेद = ४; भक्ति = ९, प्रपंच = ५ आणि अब्ज म्हणजे चंद्र = १ असे संकेत प्राप्त होतात. त्यांचे वाचन शके १५९४ असे होते.

९. रा. ग. हर्षे यांनी संपादित केलेल्या ज्ञानदेवीसाठी (अध्याय पहिला. १९४७) वापरलेल्या बरवा परंपरेतील वि– २ प्रतीचा (के. ना. विप्र यांची प्रत) लेखनकाल "रामभूरसभूमिते" असा सांगितलेला आहे. या शब्दबंधात राम = ३, भू = १, रस = ६ आणि भू = १ असे शब्दसंकेत आहेत. त्यांतून १६१३ हा शक प्राप्त होतो. [प्रस्ता. पृ. २६].

१०. हर्षे यांनी उपयोजिलेली आणखी एक ज्ञानेश्वरीची प्रत म्हणजे भारदे प्रत होय. या पोथीचा लेखनकाल "बाणशैलांगभूशके" असा सांगितलेला आहे [तत्रैव, प्रस्ता. पृ. ९४].

या शब्दबंधातून बाण = ५, शैल = ७, अंग = ६ आणि भू = १ असे शब्दसंकेत मिळतात. त्यांचे वाचन शके १६७५ असे होते.

११. श्री. ना. बनहट्टी यांनी ज्ञानदेवीची प्रतिशुद्ध संहिता (अध्याय १ आणि ७) तयार करताना वापरलेल्या शालिग्राम प्रतीचा लेखनकाल पुढीलप्रमाणे नोंदलेला आहे.

"शकें नेत्रमुनिबाणचंद्रेय विकृति तथावत्सरे उत्तरायणे ऋतौ वसंत वैशाखमासे च शुक्ले तिथौ सप्ततद्दिने शुभं रविवारे" [प्रस्ता. पृ. १९]

यातील नेत्र = २, मुनि = ७, बाण = ५ आणि चंद्र = १ या शब्दप्रतीकांनी पोथीचा शके १५७२ हा लेखनकाल समजून येतो.

१२. वा. अ. वांबर्डेकरांना कुडाळ प्रांताचे सरदेशमुख प्रभुदेसाई यांचे कागद तपासताना सापडलेल्या एका नोंदीत "शाके सूर्यदिवाकरे परमितं संवत्सरे धिकृते मासे भाद्रपदे तिथे वसुमते वारे च भूमोसुते" अल्लाउद्दिनाने रामदेवरावाचे राज्य घेतले असा मजकूर आढळला [भा. इ. सं. मं. त्रै. वर्ष ७, शके १८४९, पृ. ४७].

या कालनिर्देशातील 'सूर्यदिवाकरे' या शब्दबंधात सूर्य = १२ आणि दिवाकर = १२ असे शब्दसंकेत येतात व त्यातून शके १२१२ हा काळ ज्ञात होतो. याशिवाय 'वसुमते' या शब्दाने प्रतिपदा किंवा अष्टमी व 'भूमोसुते' या शब्दाने मंगळवार विदित होतो.

अंकाक्षर व शब्दांकयुक्त कालनिर्देश

कालवाचक संख्या पूर्णतः सांकेतिक शब्दांनी जशा व्यक्त होत तशाच त्या अंकाक्षर व सांकेतिक शब्दांच्या समाहारानेही व्यक्त होत.

१३. रामदेवराव यादवाचे राज्य केव्हा गेले यासंबंधीची आणखी एक नोंद भावे यांना एका पोथीवर लिहिलेली आढळली. ती त्यांनी सारस्वताच्या पृष्ठ ३५ वरील तळटीपेत उद्धृत केली आहे.

"शाके सप्तु शशि द्वि भू परिमिते संवछरे मन्मथे। मासे फाल्गुनके तिथौ प्रतिपदे शुक्ले च मंदे दिने ।। म्लेंच्छे शास्त अल्लावदीन रिपुणा भद्रो गृहीता तथा। श्रीमत् देवगिरौ स्थितस्य नृपते रामस्य राज्यं गतम् ।।"

या लेखातील 'सप्तु शशि द्वि भू' या शब्दबंधातील सप्तु = ७ व द्वि = २ हे अंक अक्षरीं लिहिलेले असून शशि = १ व भू = १ हे अंक सांकेतिक शब्दांनी व्यक्त केले आहेत. यातून प्राप्त झालेल्या ७१२१ या संख्येचे वामतो गतीने शके १२१७ असे वाचन करता येते.

१४. महानुभाव कवी ओंकार चोरमागे याच्या 'लक्ष्मणास्वयंवर' या काव्याचा रचनाकाल पुढीलप्रमाणे नोंदलेला आहे.

"शून्याग्नि संख्या रशभूशका हे।
मेषाग्निलग्नीं शुभरोग आहे।।
प्रसिद्ध संवत्सर सर्वधाटी।
संपूर्ण जन्माष्टमि बौधवारीं।।"

[—महा. सारस्वत, पृ. ३८५, तळटीप]

या नोंदीतील अशुद्धे लक्षात न घेता तिचे निरीक्षण केल्यास शून्य = ०, अग्नि = ३, रश = ६ आणि भू = १ अशी शब्दप्रतीके व अंक प्राप्त होतात. त्यांचे वाचन शके १६३० असे करता येते. या वर्षी 'सर्वधारी' संवत्सर येते.

१५. श्रीधराप्रमाणेच कृष्णदयार्णवाच्या समाधीवरही निधनलेख कोरलेला आहे. परंतु या लेखात केवळ शब्दप्रतीकांचा वापर न करता अंकशब्द व सांकेतिक शब्द या उभय प्रकारांचा संमिश्र वापर केलेला आढळतो.

"रौद्रीं द्विषट् षट् शशि शाक्यवर्षीं।
सत्पंचमी शुक्ल सुमार्गशीर्षीं।।
नैर्गुण्य श्रीकृष्ण दयार्णवासी।
तत्पादुका पूज्य सुखैकराशी।।"

या लेखातील द्वि = २, षट् = ६, षट् = ६ आणि शशी = १ या शब्दांमधून १६६२ हे शकवर्ष प्राप्त होते. [अपूर्ण]

[उर्वरित भाग पुढील अंकात]

स्मरण
— संतवाङ्मयोपासक ह. भ. प. पांगारकरांचे

डॉ. स. मो. अयाचित

स्वातंत्र्यपूर्वकाळात भारताच्या प्राचीन इतिहासाचा, संस्कृतीचा, साहित्याचा, आणि मुख्यत: संतसाहित्याचा सात्त्विक अभिमान बाळगून सत्यशोधनाच्या अभिनिवेशाने व राष्ट्र-कार्य म्हणून ज्यांनी आपले जीवन समाजप्रबोधन, साहित्य-संशोधन व संतांच्या विचारसरणीचे प्रवचन या विषयांना सर्वस्वी वाहिले होते अशा ह. भ. प. लक्ष्मण रामचंद्र पांगारकर यांच्या निधनाला पन्नास वर्षे झाली आहेत. या थोर साहित्यसेवकाचे संस्मरण विशेषत: आजच्या काळात पुन: आवश्यक झाले आहे असे वाटते. स्वातंत्र्यपूर्व काळात राजवाडे, खरे, पारसनीस, पोतदार अशी राष्ट्राभिनिवेशाने सतत संशोधना-साठी अविरत परिश्रम करणारी एक पिढी होऊन गेली. राष्ट्राचा इतिहास हाच भविष्यकालातील उन्नतीचा आधार असतो, आणि आपल्या राष्ट्राचा इतिहास अतिशय ऊर्जस्वल आहे या अभिमानाने त्यांचे जीवित उजळलेले होते. मधल्या काही काळाचा इतिहास अंधारात राहू नये यासाठी साधनांची जुळवाजुळव व संशोधन या एकाच ध्यासाने भारलेली अशी या पंडितांची व्यक्तिमत्त्वे होती. पांगारकर हे त्यातीलच एक तेजस्वी रत्न !

माझ्या बालपणी माझ्यावर पांगारकर वाङमयाचा जो संस्कार झाला तो सतत स्फुरण-दायी व वाढता प्रभाव निर्माण करणारा ठरला. पांगारकर हे माझे मातामहच असल्याने त्यांचे बहुतेक ग्रंथ आमच्या घरी होते. माझ्या शालेय जीवनात मी त्या ग्रंथांच्या वाचनात रंगून जात असे. स्वभावभेदामुळे मला त्यांची सर्वच मते आवडत नव्हती. तरी त्या पाठीमागची राष्ट्रीय प्रेरणा, संशोधनाची तळमळ, मोरोपंताच्या महाभारतादि ग्रंथातून व कागदपत्रातून त्यांनी निर्माण केलेले तत्कालीन सामाजिक स्थितीचे चित्रण यांची अमिट छाप अद्यापही माझ्या मनावर आहे. नागपूर विद्यापीठात हस्तलिखित विभागाचा प्रमुख म्हणून काम करण्याची मला संधी मिळाली हेही मी या सांस्कृतिक वारशाचा पुण्यप्रभावच समजतो. या निमित्ताने मला भारतात अनेक ठिकाणी हस्तलिखित संग्रह पाहण्याची संधी मिळाली. तथापि स्वतंत्र भारतात अनेक बाबतीत सामान्य सुबुद्ध जनतेची आकांक्षा वस्तुस्थितीत साकारण्याऐवजी दडपली गेली, त्यापैकीच ऐतिहासिक संशोधन हा एक भाग आहे. आजही त्याच मूलभूत प्रेरणेने संशोधनाकडे प्रयत्नशील असलेले अभ्यासू लोक आहेत, परंतु त्यांच्या मनात डोकावले तर त्यांची प्रगतीविषयी मोठ्या प्रमाणात निराशाच झालेली दिसून येईल. १९०४ च्या साहित्य संमेलनात मराठी हस्त-लिखितांच्या संग्रहासाठी, सूचीसाठी, संशोधना-साठी, प्रकाशनासाठी स्वतंत्र भवन असावे असा प्रस्ताव पांगारकरांनी मांडलेला होता. त्या संदर्भात पुढे प्रगती कशी झाली. याचा संबंधितांनी अवश्य विचार करावा. मराठी हस्तलिखितांची सूचीदेखील अपूर्ण राहिली. गेल्या काही वर्षात महाराष्ट्र शासनाने ग्रंथालय विभागासाठी हे काम नव्याने दिले त्याची प्रगति कशी होत आहे हेही कितीजणांना समजू शकत असेल याची शंकाच आहे. लालफीतशाहीच्या प्रभावाने आपल्या राष्ट्रीय जीवनाची सर्वच क्षेत्रे काळवंडून गेली आहेत, व स्वार्थी लोक त्या प्रभावाखाली आनंदात आपला स्वार्थ साधून घेत आहेत. राष्ट्रीय प्रेरणाच लुप्त झाल्यासारखे दिसत आहे, धनाची चिंता नाही, पण धन ज्यांच्याकडे सोपविले आहे त्यांना कार्याची चिंता नाही यामुळे काम बाजूस राहून तांत्रिक अहवाल मात्र वर्षानुवर्षे सादर होत राहतात. माटे, पोतदार अशा श्रेष्ठतर कार्यकर्त्यांची जी जवळून ओळख झाली असे मला त्यावेळी वाटले तसे उत्तरकालीन आयुष्यात

कधीही वाटू नये हाच या दोन पिढ्यांतील आंतरिक फरक असावा का? साहित्य संस्थांनी याविषयी गांभिर्याने विचार करावा एवढेच मला या ठिकाणी तीव्रतेने सुचवायचे आहे.

१९७२ मध्ये पांगारकर जन्मशताब्दि झाली त्यावेळी विदर्भ साहित्य संघात डॉ. वि. भि. कोलते यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या परिसंवादात पांगारकरांच्या वाङ्मयीन कल्पनांविषयी मी एक निबंध वाचला होता. प्रस्तुत लेखात तत्कालीन काही वादांविषयी थोडे निर्देशन करण्याचा विचार आहे. वाङ्मयीन वाद मधूनमधून उद्‌भवत असतात व त्यांची माहिती उत्तरकालीनांना असणे इष्ट व आवश्यकच असते. एवढ्याच सामान्य दृष्टिकोणातून या विषयाकडे सध्या पाहावे. हा लेख लिहिण्यात माझा न. र. फाटकांसारखे साक्षेपी लेखकही कित्येक वेळा कसे मत:पूत लिहीत जातात हे दाखविण्याचा उद्देश आहे. महाराष्ट्र साहित्य पत्रिकेच्या एप्रिल–जून १९७२ या अंकात पांगारकरांच्या परिचयपर एक लेख फाटकांच्या नावावर प्रसिद्ध झालेला आहे. अतिशय संक्षिप्त अशा या टीकालेखात त्यांनी पांगारकरांविषयी पुढीलप्रमाणे केलेले निर्देश त्यांच्याविषयी आदर वाढविण्यास कारणीभूत होतात की गैरसमज निर्माण करतात याचा वाङ्मयेतिहासाच्या अभ्यासकांनी अवश्य विचार करावा. पांगारकरांचा लेखनातील 'गाफिलपणा'; त्यांच्या 'व्यक्तिमत्त्वातील खाचखळगे', आत्मचरित्रात त्यांनी 'चढविलेले भडक रंग', एकातूनच अनेक ग्रंथ तयार करण्याचा त्यांचा 'ग्रंथवृद्धीचा प्रकार', 'कालाची गती उलटवू किंवा अडवू पाहणारी त्यांची विचारसरणी', 'इतरांहून आपण कोणी वेगळे आहो, असे वाटावयास लावणारी त्यांची वागणूक', 'पांगारकरांचे मागासणे', 'आपल्या पीछेहाटीचे कारण नव्या पिढीला नावे ठेवून स्पष्ट करणे', आत्मस्तुती इत्यादि दोष फाटकांनी उल्लेखिले आहेत. ते म्हणतात; "त्यांच्या मागून त्यांच्या सर्व कार्याचे स्मरणही लोकांमध्ये ऱ्हास पावले आहे." (पृ. ३५), (केळकर, खाडिलकर, पलुस्कर या) 'तिघांच्या कामगिरीसारखी उठावदार टिकाऊ कामगिरी पांगारकरांच्या हातून घडली नाही, हे उघड आहे' (पृ. ३५) 'साधारणपणे १९०० पासून पुढे चाळीस वर्षे व्याख्यान, प्रवचन, लेखन या तोंडी व कागदी साधनांद्वारे लोकांसमोर अखंड असलेली व्यक्ती मृत्युपूर्वीच एकदोन वर्षे लोकांच्या स्मरणातून का जावी याची विवंचना ('विवेचन') करून (पृ. ३६) पांगारकरांच्या पीछेहाटीचे कारण त्यांचा मागासलेपणाच होय असे निदानही त्यांनी केले आहे! 'पण त्यांनी मुळीच कामगिरी केली नाही, असा ग्रह कुणाचा असल्यास तो चुकीचा ठरेल' म्हणून नि:पक्षपातीपणाचा आव आणून पांगारकरांची कामगिरीही त्यांनी सांगितली आहे. फाटकांना उल्लेखार्ह वाटलेली अशी त्यांची कामगिरी कोणती असावी? रामदास, मोरोपंत व अहल्याबाई यांच्या सार्वजनिक पुण्यतिथीचा उपक्रम ही एक; 'केवळ परमार्थ विषयाला वाहिलेले नियतकालिक सतत पंचवीस वर्षे चालविणे' (की ज्यातील लेखक फाटकांच्या मते कसदार नाही) ही दुसरी; व 'त्या कामगिरीच्या पोटातून निघालेल्या लेखांना पुस्तकरूपात लोकांपुढे ठेवणे' ही तिसरी! फाटकांची पांगारकरांवरील ही समीक्षा अजब आहे हे मानलेच पाहिजे. त्यांच्या कार्याची 'विवंचना' करितानाच त्यांनी स्वत:ची व वाचकांचीही वंचनाच केली आहे. 'पांगारकरांचे नाव वाङ्मयाच्या क्षेत्रात त्यांनी लिहिलेल्या ग्रंथानिमित्त (एकवचन?) बहुतकाळ उच्चारले जाईल' (पृ. ३१) हे जर खरे; मोरोपंत चरित्र हा जर त्यांच्या 'टिकाऊ कीर्तीचा बुरूज' तर मग सबंध लेखातून त्यांचे व्यक्तिदोष आणि लेखनदोषच फक्त का उगाळण्यात आले? 'खासगी व सार्वजनिक व्यवहाराच्या अनुरोधाने पांगारकरांच्या व्यक्तिमत्त्वाचे बारीक परीक्षण करण्याची (जन्मशताब्दि) ही वेळ नसल्याने तो विषय सोडणे बरे' याची फाटकांना जाणीव आहे. तरीही त्यांची एखाद्याला निमित्त करून दूषण देत राहण्याची खोड याही ठिकाणी दिसून यावी हे चीड आणणारे वाटत नाही का? त्यांच्या या मूल्यमापनात आत्मविसंगती आहे हेही आश्चर्यच म्हणावे लागेल.

पांगारकरांच्या लेखनात दोष नाहीतच असे मुळीच म्हणता येणार नाही. कोणाही अभ्यासकास हे मान्य होण्यासारखे आहे. पांगारकरांप्रमाणे जुनी मते असलेल्यांनीही हे मान्य केलेले आहे. पांगारकरांनी स्वतःही हे प्रांजळपणे मान्य केले असते. परंतु फाटकांनी केलेले त्यांचे मूल्यमापन वाङमयेतिहासाच्या अभ्यासकांना मान्य आहे काय ? पांगारकरांची कामगिरी म्हणून फाटकांनी केलेले निर्देश टवाळखोरपणाचा नमुनाच नव्हे काय ? मराठीच्या सद्यःकालीन अभ्यासकांपैकी कोणीतरी याविषयी अधिकृतपणे लिहून पांगारकरांची वास्तविक कामगिरी पुनः एकदा सांगणे आवश्यक आहे असे वाटल्याखेरीज राहत नाही.

नव्या पिढीला दूषण देऊन आपल्या पिढीच्या विचारांचे गोडवे गाणे हा काही पांगारकरांचा वैशिष्टयपूर्ण दोष म्हणता येणार नाही. प्रत्येक पिढीला असेच वाटत आले आहे. रँगलर परांजपे विचारांनी ' सुधारक ' मतांचे असले तरी त्यांनाही त्यांच्या पुढच्या पिढीचे वर्तन आवडत नव्हते. नामदार श्रीनिवास शास्त्रींच्या आठवणीनुसार जवाहरलाल नेहरूंचे विद्यार्थ्यांना आंदोलनात्मक राजकीय चळवळीत ओढणे पसंत नव्हते. सुधारक आणि सनातनी, नवे आणि जुने या संज्ञा वापरून बोथट झालेल्या आहेत. त्यांचा सवंग वापर करता येणार नाही. संदर्भानुसारच मतांचे उल्लेख केले जाणे इष्ट आहे. डॉ. आंबेडकरांच्या प्रबुद्ध भारतातील पांगारकरांना दिलेले उत्तर मार्मिक व लक्षात ठेवण्यासारखे आहे. पांगारकरांची भाबडी मते व आंबेडकरांची सडेतोड विचारसरणी यातील भेद तीव्र आहे. पांगारकर काळाची गती अडवू पाहत होते हे सत्य आहेच. तसे प्रत्येक पिढीलाच थोड्याबहुत प्रमाणात वाटत असते. परंतु माणसाच्या मनोवृत्तीचा विचार करूनच या संबंधीच्या टीकेला वाव दिला पाहिजे. आजच्या वावदूक खऱ्या-खोटया अभ्यासकांनी ही उत्तरे-प्रत्युत्तरे वाचण्यासारखी आहेत. करमणुकीबरोबरच त्यातून डॉ. आंबेडकरांच्या मनाचा मोठेपणाही व्यक्त होतो. या पार्श्वभूमीवर तर फाटकांचा कोतेपणा व अप्रासंगिक फटकळपणा अरसिकपणाचाच ठरतो. पांगारकरांसारखीच विचारसरणी मालाकार भोपटकरांचीही होती. विचारसरणी कितीही महत्त्वाची असली तरी व्यक्तिमत्त्व व कार्य यांचे परीक्षण केवळ त्या आधारावरच करणे अनेक वेळा चुकीच्या निष्कर्षांना कारण होते. लोकहितवादींवरील विष्णुशास्त्री चिपळूणकरांची टीका या दृष्टीने विचारात घेण्यासारखी आहे, लोकहितवादींच्या संदर्भातही फाटकांनी गैरसमज निर्माण करणारे लिखाण पांगारकरांविषयी उल्लिखित टीकेत केलेले आहे.

हस्तलिखितांचे संशोधन हा तर पांगारकरांचा आवडीचा विषय, परंतु आवड आणि चिकित्सा यात भेद आहे. नवीन नवीन कागदपत्रे व हस्तलिखिते शोधून काढून त्या आधाराने काही नवीन फलित लोकांपुढे मांडणे हा जसा त्या कार्याचा एक महत्त्वाचा भाग, त्याचप्रमाणे त्या कागदपत्रांची तुलनात्मक पाहणी व तार्किक चिकित्सा करणे हाही संशोधनाचाच महत्त्वाचा भाग आहे. किंबहुना या चिकित्सेवरच फलितांचा निकष ठरत असतो. अशी साधार चिकित्सा मांडण्याकडे मात्र पांगारकरांचा तितकासा कल नव्हता मोरोपंताच्या एका हस्तलिखिताची अशी चिकित्सा कशी करता येईल याविषयी आपल्या प्रस्तावनेत पोतदारांनी जे निकष सांगितले आहेत त्यावरून अशा साधनांची परीक्षा किती बारकाईने करायला पाहिजे याचा वस्तुपाठच मिळतो. दासबोधाची संशोधित आवृत्ती तयार करताना पांगारकरांनी ग्वाल्हेरकडील एका मठातील पोथी व दुसरी दक्षिण महाराष्ट्रातील एक महत्त्वाची संहिता यातील तफावत तपशिलाने नजरेस आणून दिली आहे, व त्यावर आपले विचारही स्पष्टपणे सांगितले आहेत. परंतु ही चिकित्सा पोतदारांप्रमाणे महत्त्वाच्या मुद्यांपुरती राहिली आहे. एखाद्या आधुनिक ब्रिटिश पठडीतल्या अभ्यासकाप्रमाणे ही चिकित्सा नाही. किंबहुना पांगारकरांचे एकूणच लिखाण शास्त्रीय निबंधाच्या कसोटीला काटेकोर अशा स्वरूपाचे नाही. त्यात भाषेच्या लालित्याला व धावत्या विवेचनाला अधिक महत्त्व दिलेले आहे. या कसोटया अर्थात्

बाह्यतःच जास्त महत्त्वाच्या आहेत. तो एक लेखनाच्या आराखड्याचा भाग आहे. त्या कसोट्यांवर प्रत्यक्ष लेखन झाले तर अधिक चांगले किंवा शास्त्रीयतेला अधिक जवळचे एवढेच म्हणता येईल. विचारांच्या व तुलनेच्या अंतर्गत कसोट्या याच केव्हाही अधिक महत्त्वाच्या. या कसोट्यांवर मात्र चोखंदळपणे मनोमन चिकित्सा करून मगच पांगारकरांनी आपली मते यथेच्छ मांडली आहेत. त्यांनी स्वतःपुरती त्या त्या विषयाची खात्री करून घेतलेली असल्याने त्यांचे मन स्वच्छ व कोणत्याही शंकेला उत्तर देण्यास तत्पर होते. उत्तर देताना मात्र भाषेचा व अभिव्यक्तीचा थोडासा 'गाफिलपणा 'मधून मधून दिसतो. हा 'गाफिलपणा 'ही वरवरच आहे. आपल्या विचारांबाबतचा पक्केपणा त्याच्या आवरणाखाली आहेच. याच कारणाने बाह्यतः इतर चिकित्सा अभ्यासकांनी कशीही केली तरी निष्कर्ष पांगारकरांच्या लिखाणाच्या कलानेच यावयाचे असे अनुभवास येई. याला अपवाद फक्त नवी संशोधन-साधने प्रकाशात आली तरच. त्यामुळेच पांगारकरांनी दासबोधाच्या संहितेची बारीक चिकित्सा करूनही वरकरणी मात्र इकडे-तिकडे थोडे कानामात्रेचे फरक झाले तरी काही विघडत नाही. असे बेफिकीरपणे म्हटले आहे. कानामात्रेचे फरक आधुनिक संशोधन पद्धतीतच नव्हे तर सर्वत्र महत्त्वाचे आहेत यात शंका असू नये. या बाबतीत इतकेच म्हणता येईल की इतर काही पूर्वग्रहदूषित अभ्यासकां-प्रमाणे शास्त्रीयतेचा आव आणून मनःपूत, पक्षपाती, अगर भावनापूर्ण लिहिण्यापेक्षा मनमोकळेपणे विचार शास्त्रपूत म्हणजेच स्वतःच्या बुद्धीने निश्चित केल्यावर स्वभावधर्माप्रमाणे योग्य वाटेल तसे लिहिणे हे अधिक प्रशस्त. पांगारकरांनी आपल्या प्रतिस्पर्ध्याविषयी असा प्रांजळपणा दाखविलेला आहे. त्यांच्या प्रांजळपणामुळेच त्यांचे लेखन हृदयग्राही झालेले आहे. त्यात काव्यात्मता आहे, बौद्धिक पातळीची उंचीही आहे, आणि भावनेचा ओलावा व राष्ट्रप्रेम तुडुंब भरलेले आहे, ज्या भावनांच्या व विचारांच्या भरात त्यांनी लिहिले त्या भावना व ते विचार वाचका-पर्यंत व श्रोत्यांपर्यंत जाऊन पोचतात, इतकेच नव्हे तर हृदयाला भिडतात असाच तत्कालीन ज्येष्ठ-कनिष्ठ सर्व रसिकांचा निर्वाळा आहे. आपले मत आचार्य अत्र्यांच्या टवाळीचा विषय तर होणार नाही अशी चिंता पांगारकरांना आपल्या एका साहित्य संमेलनप्रसंगी अध्यक्षीय भाषणाच्या अनुरोधाने लागून राहिली होती. परंतु वेळ येताच त्यांनी 'संत साहित्य हेच खरे पुरोगामी साहित्य ' हा आपला अभिप्राय ठणका-वून सांगितलाच, अत्र्यांनीही त्याचा आशय मानला. असे होते त्यावेळचे साहित्यिकांचे मोठेपण.

■

..... युगवाणी प्रतिभेत भेद करणार नाही.
प्रतिभा जुनी-नवी अशी नसतेच.
अशा धारणांच्या लेखकांची युगवाणीस गरज आहे.

सामार पोच

कालपात्र / बाळकृष्ण बन्नोरे / संघमित्रा प्रकाशन, नागपूर / रु. ९/- [पृ. ५२]

पश्चिमेच्या वृक्षाला पूर्वेची ओढ / उषा गडकरी / श्रीविद्या प्रकाशन, पुणे / रु. ४०/- [पृ. १३१]

माणसं उद्योगातली / सुषमा देशपांडे / श्रीविद्या प्रकाशन, पुणे / रु. ६०/- [पृ. १३२]

महाराणी कुमारीदेवी / सदानंद महास्थविर / सद्धम्मादित्य प्रकाशन, केळझर / रु. १६/- [पृ. ८४]

कर्मयोगी गाडगेबाबा / मनोज तायडे / लोक वाङ्मयगृह, मुंबई / रु. १०/- [पृ. ५२]

अण्णाभाऊ साठे / बाबुराव गुरव / लोक वाङ्मयगृह, मुंबई / रु. ६०/- [पृ. २०१]

झाकली झोल / योगेन्द्र मेश्राम / पारमिता साहित्य चळवळ प्रकाशन, नागपूर / रु. ६०/- [पृ. २६२]

मऱ्हाटी स्त्री रचित रामकथा / संग्राहक-कै. ना. गो. नांदापूरकर / म. सा. परिषद, आंध्रप्रदेश / रु. १५०/- [पृ. ४००]

रुंद अरुंद / डॉ. जोगींदरकौर महाजन / प्रबोधन प्रकाशन, नागपूर / रु. २०/- [पृ. ८४]

लक्ष्मण स्वयंवर अर्थात विवेक विलास / संपादक-कै. रा. ब. माढेकर व द. पां. जोशी / म. सा. परिषद, आंध्रप्रदेश / रु. ७५/- [पृ. २५१]

शब्दसंगत / व्यंकटेश वळसंगकर / म. सा. परिषद, आंध्रप्रदेश / रु. ३५/- [पृ. १६०]

अखिल भारतीय दलित साहित्य सम्मेलन / अध्यक्षीय भाषणे / संपादक-वामन निंबाळकर / प्रबोधन प्रकाशन, नागपूर / रु. ७५/- [पृ. १९२]

ना. सी. फडके एक चिकित्सक अभ्यास / प्रल्हाद वडेर / राजहंस वितरण पणजी / रु. १५०/- [पृ. २५६]

बालकवींची औदुंबर कविता / संपादक-प्रा. एस्. एन. नाडकर्णी / राजहंस वितरण पणजी / रु. १००/- [पृ. २५८]

बालकवी समीक्षा / संपादक-प्रा. एस. एन. नाडकर्णी / राजहंस वितरण पणजी / रु. २००/-[पृ. ५६७]

भारतीय संविधान व डॉ. बाबासाहेब आंबेडकर / नरेंद्र चपळगावकर / श्रीविद्या प्रकाशन, पुणे / रु. ५० /- [पृ. १०३]

मनस्वी / वासंती अभ्यंकर / श्रीविद्या प्रकाशन, पुणे / रु. ४०/- [पृ. ८०]

फुटलेले बांध / भीमराव शिवराळे / श्रीविद्या प्रकाशन, पुणे / रु. ४० / [पृ. १३२]

जन्मझुला / यशवंत पुलारे / श्रीविद्या प्रकाशन, पुणे / रु. ३० /- [पृ. ६६]

निळ्या हिरव्या तळ्यात / तुकाराम खिल्लारे / जीवन प्रकाशन, सोनखेड / रु. ११ /- [पृ. २८]

वेलु / श्रीकृष्ण गवळी / मधुश्री प्रकाशन, पुणे / रु. १२/- [पृ. ६३]

रगमनाचे / गिरिवाल / कृ. व्यं. हवालदार / सरोज हवालदार, सागली / रु. ४० /- [पृ ६९]

फाटकं आयुष्य / उत्तम राठोड / अंकूर साहित्य संघ, मालेगाव / रु. २०/- [पृ. ३०]

पालखी / प्र. रा. देशपांडे / अंजली, अकोला / रु. २०/- [पृ. ५९]

रात्रीच्या कविता / साहेब खंदारे / प्रसाद प्रकाशन, परभणी / रु. ३०/- [पृ. ८०]

अनुक्रमणिका

['ललित' जाने. १९९१ मधील बळवंत कांबळे यांचा परिचय वाचून माझ्या अभ्यासविषयाशी संबद्ध असलेली ही व्यक्ती आहे असं लक्षात येताच त्यांच्याशी पत्रव्यवहार केला. त्यांनी लिहिलेल्या 'जोगती पोटचा' (श्री विद्या प्रकाशनातर्फे प्रकाशनाच्या मार्गावर) आणि 'गावभोग आणि मरणकळा' या दीर्घ काव्याचे (प्रचार प्रकाशन) हस्तलिखित वाचावे आणि विषयानुषंगानं माहिती मिळवावी म्हणून मी माझे मित्र ना. म. शिंदे यांच्या मदतीनं बी. डी. चाळीतील पत्ता शोधत तेथे पोचलो. त्यांची ही पुस्तकं वाचून काढली आणि मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयात त्यांची एक अनौपचारिक मुलाखत जून ९१ च्या शेवटच्या सप्ताहात घेतली. त्यावेळची ही काही प्रश्नोत्तरे :]

मदन कुळकर्णी : आपण 'सम्यक' हे नियतकालिक काढता, देवदासीविषयक विशेषांकही आपण काढला होता. स्वत: देवदासी मुक्ती संघटनाही तुम्ही चालवता, मग 'जोगती पोटचा' हे आत्मकथन लिहिण्यास एवढा विलंब कां लागला ?

कांबळे : मी हे सर्व करीत होतो ते माझी देवदासी–समाजाशी बांधिलकी आहे म्हणूनच ! माझी 'आयडेंटिटी' जाहीर करावी असं मला वाटत नव्हतं. दुसरं म्हणजे माझ्या आत्मकथनामुळे माझ्याशी संबंधित असलेली मंडळी दुखावली गेली असती, परंतु आता दुखावल्या जातील अशा प्रेमाच्या व्यक्ती निघून गेल्यामुळे माझ्याकडून हे लेखन झालं. शिवाय दलित लेखकांच्या प्रसिद्ध झालेल्या आत्मकथनांमुळे तथाकथित प्रतिष्ठेचं बंधन बाजूला सारून आपली जीवनकथा सांगण्याचा धीर आला. त्यातून 'जोगती पोटचा' साकारले.

मदन कुळकर्णी : आपण देवदासी जीवनावरील 'नापत' ही कादंबरी लिहिली आहे. साहित्य आणि देवदासी सारखा सामाजिक प्रश्न यांच्या अनुबंधाबाबत तुमचं काय मत आहे ?

कांबळे : देवदासी किंवा अशाच स्वरूपाच्या विविध प्रश्नांवर साहित्य लिहिलं गेलं पाहिजे. अशा साहित्यानं त्या सामाजिक प्रश्नाकडे पाहण्याची एक दृष्टी लाभते. पीडितांबद्दल सहानुभूती निर्माण होऊन वाचक परिवर्तनसन्मुख होऊ शकतो. त्याची मानसिकता बदलते. मात्र अशा साहित्याकडे केवळ अनोळखी आणि, दु:खमय जीवनाचं चित्रण म्हणून पाहिलं जाऊ नये. या साहित्याच्या वाचनानं वाचक मनातून हादरला पाहिजे. कार्यप्रवृत्त झाला तर उत्तमच !

कुळकर्णी : आपल्या 'नापत' कादंबरीवरील चित्रपटाचं काय झालं ?

कांबळे : कादंबरीवर चित्रपट घेतण्याचं पक्क झालं होतं, पण संबंधितांना चित्रपटकथेचा शेवट 'देववादी' हवा होता, आणि अशा बदलास माझा विरोध होता. त्यामुळं हे प्रकरण थांबलेलं आहे.

कुळकर्णी : आपण 'गावभोग आणि मरणकळा' हे चिंतनशील दीर्घकाव्य लिहिलं. त्यात तुमचे अनुभवच काव्यानुभूतीचं रूप घेऊन प्रकटलेले आहेत असं वाटतं. यावर आपली प्रतिक्रिया सांगू शकाल !

कांबळे : माझ्या या काव्यांतून या प्रथेवर, प्रथा जोपासणाऱ्या समाजावर मी कोरडे ओढले आहेत. काही चिंतनही मांडलेलं आहे. तसंच नव्या परिवर्तनशील स्त्रीचं चित्रणही केलं आहे.

'सोडल्या केसातल्या जटा
तोडली कवड्यांची माळ
फेकून दिलं 'दर्शन'
आली जाण स्त्रीत्वाची—'

या जाणिवेबरोबरच

'...ती बबकलीम
एका निळयाशोर आभाळाखाली
ती होते फुल्यांचा आसूड
पसरते चहुकडे
आंबेडकरी चवदार तळयाचं पाणी होऊन
तथागताच्या पिवळया प्रदेशाची
स्वीकारून निरव शांतता
ती दरवळते सगळीकडे
फुलांचं गंधलेणं होऊन !'...

ह्या ओळी वरील गोष्टीचा प्रत्यय देतील.

कुळकर्णी : यानंतर आपण काय लिहिणार आहात ?

कांबळे : देवदासीच्या प्रश्नावर एक नाटक लिहिणार आहे. त्यात या जीवनाचे तपशील मी रंगवीन.

कुळकर्णी : देवदासीवरील साहित्यात सौंदत्ती, मनोळी, कोट, जत या स्थळांचा उल्लेख येतो, या स्थळांचे महात्म्य काय आहे ?

कांबळे : सौंदत्ती हे कर्नाटकातील गाव. तिथं डोंगरावर यल्लमा देवी आहे. या यल्लमाशीच देवदासींचा विवाह होतो. त्याच्या अलिकडे जोगुळभावी (वावी) आहे. या वावीत पैसे देऊन स्नान करावं लागतं, तिथं स्वच्छतेचा विचार करायचा नसतो. जत या गावी यल्लमाच्या पादुका आहेत. कोट हे यल्लमाच्या बहिणीचं मायक्काचं (मायणी) स्थान आहे, म्हणून घरात यल्लमाचा देव्हारा आणायचा असला म्हणजे डोंगरास्नं (सौंदत्तीवरून) की कोटास्नं ? असा प्रश्न विचारला जातो, कारण 'कोट' जवळ आहे. जोगुळवावीत यल्लमा लपली आहे असं

बळवंत कांबळे

[मुलाखत]



'देवदासी : प्रत्यक्षातील आणि साहित्यातील' या डॉ. मदन कुळकर्णी यांच्या ग्रंथाच्या निमित्ताने देवदासी मुक्ती चळवळीतील कार्यकर्ता व लेखक श्री. बळवंत कृष्णाजी कांबळे यांची भेट झाली. त्यावेळी डॉ. मदन कुळकर्णी यांनी घेतलेली ही मुलाखत.

मानलं जातं, म्हणून 'गणका' या नावानं तिला संबोधलं जातं. 'मनोळी' ही सौंदत्तीच्या अलिकडे दोन मैलावर असलेली नदी असून यात्रेकरू प्रारंभी तिथं थांबतात.

कुळकर्णी : 'कुंड; दर्शन, रांडापुनव' या शब्दांमागे कोणत्या संकल्पना आहेत ?

कांबळे : ज्या गावात एखाद्याकडे देव्हारा घरात आणायचा असतो तेव्हा तो आणण्यापूर्वी किंवा देवदासीसह यात्रेला जाण्यापूर्वी "कूंड–पूजा' केली जाते. हे कुंड फक्त मातंग वस्तीत असते. यामागे कारण असं की परशुरामानं मातंगीचं शीर रेणुकेला लावलं. मातंगीच्या आत्मसमर्पणा-प्रित्यर्थ मांगाच्या कुंडाची पूजा केली जाते, यात त्या समाजालाही प्रतिष्ठा देण्याची कल्पना शक्य आहे.

'दर्शन' म्हणजे लाल पांढऱ्या मण्यांची माळ, पांढरे मणी हे निर्मळतेचं तर लाल मणी हे वासनेच्या उद्रेकाचं प्रतीक आहे. वाहिलेल्या मुलीचं यल्लमाशी लग्न झाल्यावर हे 'दर्शन' गुरव तिच्या गळयात बांधतो. शिवाय कवड्यांची माळही घातली जाते. कारण 'कवडी' हे आपल्याकडे स्त्री–योनीचं प्रतीक मानलं जातं. पर्यायानं इथं योनीपूजेचा संदर्भ असावा.

'रांडा पुनव' म्हणजे माघी पौर्णिमेला पेटलेल्या कुंडात 'जोगती' आपल्या बांगड्या टाकतात. दु:खानं आक्रोश करतात कारण या दिवशी परशुरामानं रेणुकेचा जमदग्नीच्या आज्ञेनं शिरच्छेद केला. त्याचं प्रतीक म्हणून देवीचा गुरव पुढे तीन दिवस स्वत:ला देवळात कोंडून घेतो. हे तीन दिवस सुतकाचे मानले जातात.

कुळकर्णी : देवदासींच्या अंगात येतं. त्या नृत्य करतात. गाणी म्हणतात. हे सर्व वास्तवात काय आहे ?

कांबळे : देवदासीच्या अंगात देवी येते हे खोटं आहे. परंतु त्या चौंडकाची लय आणि तालवाद्याचा ठेका यावर नृत्य करतात. अर्थात हे नृत्य म्हणजे केवळ अंग हलवणं असतं. त्यात शास्त्रीय असं काही नसतं. मात्र देवीची गाणी ही पारंपरिक असतात आणि ती त्या गात असतात. या गाण्यात रेणुका–जमदग्नी–परशुराम यांची कथाच त्या गात असतात.

कुळकर्णी : मेळयात देवदासी नाचतात हा काय प्रकार आहे ?

कांबळे : घरी शुभकार्य असलं म्हणजे गोंधळ, डहाका घातला जातो तसंच हे मेळा प्रकरण असतं. काही जोगती–जोगते मिळून 'फड' असतात. त्यात त्या देवदासी गातात. नाचतात.

कुळकर्णी : आपण हे जीवन जवळून पाहिलेलं आहे. या प्रथेच्या बळी प्रामुख्यानं कोणत्या जाती आहेत ?

कांबळे : प्रामुख्यानं महार, मांग, चांभार, ढोर या जातींमध्ये ही प्रथा जास्त आढळते. कारण अज्ञान, अंधश्रद्धा, आर्थिक दारिद्र्य शिवाय अन्य कौटुंबिक कारणंही असतात. सवर्णांमधील अन्य जातीही या देवदासीप्रथेच्या बळी असतात. पण त्यांचं प्रमाण कमी असतं. यात्रेत ६०% अस्पृश्य तर ४०% सवर्ण असं यात्रेकरूंच प्रमाण असतं.

कुळकर्णी : अस्पृश्य जातीतच हे प्रमाण जास्त कां असावं ?

कांबळे : कदाचित देवदासी म्हटल्यावर अस्पृश्यतेवर विजय मिळवल्याचं समाधान त्यांना मिळत असावं. शिवाय 'देवदासी' वाहिलेलं घर हे देवाचं घर समजलं जातं. त्यामुळे दलितत्व असूनही यात्रेच्या वेळी वगैरे त्यांना बरोबरीनं वागविलं जातं. पण परतल्यावर पुन्हा अस्पृश्य म्हणून दूर लोटलं जातं. कदाचित असंही असू शकेल की श्रमानं पैसा मिळविण्यापेक्षा सहज पैसा मिळवण्याकडे ओढा असल्यामुळे त्या देवदासी वेश्यांसारखं जीवन जगत असाव्यात. शिवाय प्रत्यक्ष विधीच्या वेळी गावसेवेचा कानमंत्र दिला जात असतो. सर्वच तशा वागत असल्यानं तशी मानसिकता घडत जाते हेही संभवनीय आहे.

कुळकर्णी : या देवदासींना विवाह करायला लावले तर ! ...

कांबळे : अहो, देवदासीशी कोण विवाह करणार ! तसे प्रयत्न आता केले जात आहेत. पण एकदा देवदासी म्हणून यल्लमाशी विवाह झाल्यावर दुसरा विवाह कसा करायचा ? असा प्रश्न असतो. हा त्यांच्या श्रद्धेचा (?) भाग असतो. शिवाय समाजाचा विरोध असतोच ! आता असा विवाह कोणी केलाच तर शासन त्यांना दहा हजार रुपये अनुदान देतं. पण मग दहा हजार मिळतात म्हणून खोट्या देवदासींचे खोटे विवाह होऊ लागले. कार्यकर्त्यांनी सूचना केल्यावर या पद्धतीत आता बदल केला जात आहे.

कुळकर्णी : 'झुलवा' लावल्यावर तो कां मोडला जातो ?

कांबळे : पूर्वी श्रीमंत, वागायतदार नव्यानं देवदासी झालेल्या सुंदर-बरी-दिसणाऱ्या देवदासीशी 'झुलवा' लावत. मग झुलवा लावणारा पुरुष तिला वेगळं घर करून देई. अर्थात यामुळे देवदासीला प्रत्यक्ष काही मिळण्यापेक्षा तिच्या आई-बापांना काही मिळे ! उदा. पैसा वगैरे. पण लेकावळा झाला की त्या माणसाची मती फिरे. मग तो त्या स्त्रीला मुलांसह हाकून लावी. अशी स्त्री या गोष्टीची गावाला सूचना म्हणून एक मिरवणूक काढी. म्हणजे आता ती मुक्त आहे असं गावानं समजावं.

अशाच स्त्रिया दारिद्र्यामुळे पुढं आपल्या मुलीला 'जोगती' तर मुलाला 'जोगता' करून आपल्या म्हातारपणीच्या उदरनिर्वाहाची काळजी वाहत. त्यामुळे ही देवदासी परंपरा सुरू राहते.

ही परंपरा सुरू राहण्याचं दुसरं कारण मजेशीर आहे. म्हणजे असं पाहा की, एकदा गळ्यांत हे 'दर्शन' बांधलं की, ते दुसऱ्या कोणाच्या तरी गळ्यांत तिनं मरणापूर्वी बांधलंच पाहिजे. नाहीतर स्वर्गप्राप्ती नाही.

कुळकर्णी : देवदासी प्रश्नावर काही मंडळींचं लक्ष केंद्रित झालेलं आहे. यासंबंधी काही माहिती सांगाल ?

कांबळे : होय ! १९७५ ला गडहिंग्लजला देवदासी परिषद झाली. त्यानंतर अनेक परिषदा झाल्यात. मी प्रा. विठ्ठल बन्ने यांच्याबरोबर कार्य करतो. पण या क्षेत्रात बाबा आढाव, सुनिती पुगलिया; सुभाष जोशी; डॉ. आनंद वास्कर-डॉ. उषा वास्कर हे दाम्पत्य, आदि मंडळी मोलाचं कार्य करीत आहेत. देवदासींसाठी पुनर्वसन केंद्रे, उद्योग केंद्रे, देवदासींच्या मुलींसाठी वसतिगृहे उघडली जात आहेत. पण कार्यकर्ते विभागलेले आहेत. त्यामुळे काही प्रश्नही निर्माण होत आहेत. राजकीय मंडळी स्वतःच्या सोयीनुसार ह्या चळवळींचा उपयोग करून घेत आहेत.

कुळकर्णी : कार्यकर्ता म्हणून आपण या प्रश्नावर कोणते उपाय सुचवू शकाल ?

कांबळे : एक म्हणजे या समाजाला आर्थिक स्थैर्य दिलं पाहिजे. त्यांच्या श्रद्धा पक्क्या आहेत. त्यांच्या श्रद्धांना तडा न लावता तर्कशुद्ध विचारानं त्यांना अनैतिक जीवनापासून दूर नेण्याचा प्रयत्न करता येईल. देवदासी कायद्यात सुयोग्य बदल करावे लागतील. कार्यकर्त्यांना एकजुटीनं कार्य करावं लागेल.

कुळकर्णी : या प्रश्नाकडे दलित चळवळीचं लक्ष गेलेलं नाही का ?

कांबळे : दलित चळवळीनं महाराष्ट्रात फार यश मिळवलं. पण मला हे मान्य केलं पाहिजे की दलितांपेक्षाही दलिद्र जीवन जगणाऱ्या देवदासी, जोगती-जोगतिणींकडे या चळवळीनं म्हणावं तेवढं लक्ष दिलं नाही. (परंतु चंद्रगुत्तीची नग्नपूजा बंद करण्यात दलित चळवळीनं हातभार लावला आहे-) प्रासंगिक प्रश्नावर त्यांनी लक्ष दिलं, नाही असं नाही. पण ते

तेवढ्यापुरतं. कदाचित देवदासीग्रस्त क्षेत्र तसं महाराष्ट्राच्या मध्यवर्ती धारेपासून काहीसं दूरच हेही कारण असावं. मी आशावादी आहे. दलित चळवळीचा मोहरा हळूहळू तिकडे वळेल असं मला वाटतं.


कुळकर्णी : कदाचित या प्रश्नात दलितांखेरीज अन्य जातीही असल्यानं हा प्रश्न चळवळीला तेवढासा आपला वाटत नसावा का ?

कांबळे : मला तसं वाटत नाही.

कांबळे : 'कुळकर्णी सर' तुम्ही खूप प्रश्न मला विचारले. आता मला तुम्हाला प्रश्न विचारायचा आहे तो असा की, तुम्ही या अभ्यासाकडे कसे वळलात ?

कुळकर्णी : मी या प्रश्नाकडे मुद्दाम वळलो नाही. 'मराठी प्रादेशिक कादंबरी'चा अभ्यास करताना या विषयावरच्या काही साहित्याचं वाचन मी केलं होतं. तेव्हाच ठरवलं होतं की या विषयाकडे केव्हा तरी वळायचं. त्याला आता ९ वर्षे झालीत, आता मात्र हा विषय हाती घेतला आहे. माझ्या ग्रंथाचा आधार सबळ असावा म्हणून मी आपल्यापर्यंत येऊन पोचलो. इतरांकडेही जाणार आहेच ! शिवाय सामान्यत: ज्या विषयांकडे वाचक दुर्लक्ष करतात त्या विषयांवर लक्ष केंद्रित करायचं मी ठरवलं आहे. म्हणून हा खटाटोप सुरू आहे.

कांबळे : आपल्या ग्रंथामुळे या प्रश्नाकडे व त्यावरील साहित्याकडे प्रगत महाराष्ट्राचं लक्ष अधिक वेधलं जाईल अशी अपेक्षा करतो. धन्यवाद ! ■



टिपण

मराठी पुस्तक परीक्षण : समीक्षा की परिचय ?

भास्कर गिरधारी

'मराठी पुस्तक परीक्षण' हा एक आज विचार करायला लावणारा विषय निश्चित झाला आहे. ग्रंथ परीक्षणं किंवा पुस्तक परीक्षणं अलीकडे वेगळे रूप धारण करू लागली आहेत असे दिसते. सध्या मराठीमध्ये पुस्तक परीक्षणाच्या नावाखाली ग्रंथवार्ता, ग्रंथपरिचय, पुस्तकांचे स्वागत-परिचय या शीर्षकाखाली संक्षिप्त मजकूर येऊ लागला आहे. त्याने ना वाचकाचे समाधान ना लेखकाचे समाधान ना प्रकाशकाला समाधान अशी सद्यःस्थिती झाली आहे. त्यामुळेच पुस्तक परीक्षणाचा विशेष गांभीर्याने विचार केला जाण्याची गरज आहे.

पुस्तक परीक्षणातील सजावटीत आणि मांडणीमध्ये मात्र लक्षणीय भर पडली आहे. पुस्तकाचे मुखपृष्ठ जसेच्या तसे, छपाईतील प्रगतीमुळे छापले जाते. लेखकाचे फोटो सोबत छापलेले असतात आणि आटोपशीर स्वरूपातच नेटकेपणाने, आकर्षक स्वरूपात परीक्षण छापलेले असते. फार तर अगदी ज्या मूळ दोन तीन रंगात पुस्तकाचे कव्हर असेल त्या रंगासहित ते आता लगेच छापण्याची सोयही झालेली आहे ही जमेची बाजू. मात्र खऱ्या रसिकाचं या केवळ मुद्रणातील आकर्षकतेने आणि सजावटमांडणीने समाधान होणार नाही. त्याला हवे आहे ते पुस्तकाचे सडेतोड निर्भीड परीक्षण. वाचकाला न उलगडणारा भाग उलगडून दाखविला जावा. चोखंदळ रसिकतेने कलात्मक आणि काव्यात्मक अर्थ उलगडून दाखवावा अशी अपेक्षा असते. वाङ्मयीन मूल्यमापनात पुस्तक आवडले असेल तर त्याची कारणमीमांसा असावी आणि आवडले नसेल तर का आवडले नाही याचा सकारण उलगडा केलेला असावा. पुस्तक परीक्षणांच्या संग्राह्यतेला वाङ्मयाभिरुची, वाङ्मयेतिहास आणि साहित्य समीक्षा यांच्या संदर्भात महत्त्व असते. पुस्तक निर्मिती, वाचकवर्ग आणि पुस्तकरुची यांच्या वाढीबरोबर आजची नियत-कालिकातील पुस्तक परीक्षणे हे आजच्या व्यापक वाङ्मयव्यवहाराचे लक्षणीय अंग झाले आहे. विविध स्तरातील संमिश्र वाचकवर्गाची गरज लक्षात घेता पुस्तक परीक्षण हे माध्यम अधिकच उपयुक्त ठरते. या माध्यमाचे डोळस भान ठेवून वृत्तपत्रातून, नियतकालिकातून आणि आकाश-वाणीवरून केलेली पुस्तक परीक्षणे संग्रहित केली पाहिजे. पुस्तकरूपात ती उपलब्ध झाली पाहिजेत.

पुस्तक परीक्षणात खास निवड करून आपल्या स्वतःच्या आवडीप्रमाणे पुस्तके शोधून मग त्यांचे परीक्षण केले जाते असे काही नाही. परीक्षणासाठी हाती येणाऱ्या पुस्तकांची गुणवत्ताही अनेकदा समान असत नाही. काही पुस्तके गाजलेली असतात, काही लोकप्रिय लेखकांची असतात, काही नवोदित लेखकांची असतात, तर काही पुस्तके समाजकारण, राजकारण, शिक्षण, कला, प्रकाशन अशा विविध क्षेत्रात वावरणाऱ्या लेखकांची असतात. काही पुस्तके वाङ्मयगुणांनी युक्त असतात तर काही अन्य कारणांसाठी महत्त्वाची असतात. पुस्तक परीक्षणांच्या या माध्यमांच्या द्वारे वाचकांशी जवळिक साधणे आपल्याला शक्य होते. आपल्या पुस्तकांच्या आस्वादप्रक्रियेत आपण इतरांनाही सामावून घेऊ शकतो. मराठीतील साहित्याचे क्षेत्र आज खूपच विस्तारले आहे.

त्याच्या कक्षा रुंदावल्या आहेत. विविध प्रकाशन संस्थांच्या वतीने प्रतिभहा प्रसिद्ध होणारी ललित आणि ललितेतर पुस्तके, अनेक पुस्तकांच्या सवलतीच्या योजना, बुक क्लब योजना, ग्रंथ प्रदर्शने; ग्रंथालयीन चळवळी, शासकीय अनुदानांमुळे नवोदित लेखकांना आपल्या पुस्तक प्रकाशनाची मिळणारी सुसंधी, विविध संस्थांतून हाती घेतले जाणारे वाचक चळवळीचे प्रयत्न, शिक्षणप्रसार त्यातून होणारी पुस्तक वाचकांची वाढ, त्यामुळे आता पूर्वीपेक्षा पुस्तकनिर्मितीचे स्वरूप खूपच व्यापक झाले आहे. समाजाच्या विविध स्तरातून हा नव आणि नवा वाचकवर्ग निर्माण झाला आहे. त्याचप्रमाणे शहरी आणि अतिग्रामीण भागातही नवा वाचकवर्ग निर्माण झाला आहे. अशा वाचकवर्गामध्ये सतत भर पडत जाऊन वाढ होताना दिसते आहे. जिल्हा व तालुका पातळीवरील छोटी छोटी साहित्यसंमेलने, वाङमयीन चळवळी, वाचकांचे भरविले जाणारे मेळावे, यांच्या आयोजनामुळे पुस्तकांच्या बद्दलचे सर्वसामान्यांचे प्रेम सतत वाढतच आहे. आज ही वाढलेली पुस्तकनिर्मिती आणि वाढता वाचकवर्ग यामुळे तर पुस्तक परीक्षणांची आवश्यकता अधिकच आहे. त्यासाठी मासिके, साप्ताहिके, दैनिके आणि अन्य नियतकालिके जास्तीत जास्त प्रयत्न करून पुस्तक परीक्षणे प्रसिद्ध करीत आहेत. परंतु ते कामही पुरेसे होत नाही. काही नियतकालिकांतून नुसती पुस्तकांची पोच, स्थूल पुस्तक परिचयच केवळ दिला जातो. तर काही नियतकालिके विस्तृत पुस्तक परिचय देण्याचा प्रयत्न करतात. अपवादात्मक परिस्थितीत पुस्तकाचे वाङमयीन मूल्यमापन केलेले आढळते. यावरून पुस्तक परीक्षणे वाचूनच मराठी वाचक पुस्तके वाचायला घेतात असे मानले तर ते साफ चुकीचे होईल. कारण निदान मराठीत तरी पुस्तकांच्या संख्येच्या प्रमाणात पुस्तक परीक्षणाचे प्रमाण अत्यल्प आढळते. त्यामुळे काही वेळा पुस्तक वाचले न जाता केवळ पुस्तक परीक्षण वाचूनच भागविले जाते तर काही वेळा नुसती पुस्तकेच वाचायला मिळतात पण त्यावर परीक्षणेच उपलब्ध होत नाहीत. (उदा : डॉ. रा. भा. पाटणकरांचे 'सौंदर्यमीमांसा' आणि सुधीर रसाळांचे 'मराठी कवितेतील प्रतिमा' या ग्रंथावर अद्याप परीक्षणे फारशी लिहिलेली आढळत नाहीत.) समजा आपण एखाद्या पुस्तकाचे परीक्षण वाचले तर प्रत्यक्षात ते पुस्तक वेळेवर आपल्या हाती वाचायला येईलच असे नाही. किंवा ते वाचूनही होईलच याची खात्री नाही. काहीवेळा पुस्तकच आधी वाचले जाते आणि परीक्षण मग वाचकांना पाहावयाला मिळते. पुस्तक परीक्षणाचा लाभ जसा वाचकांना होतो तसाच तो ग्रंथालयांच्या अधिकाऱ्यांनाही होत असतो. त्यामुळे ग्रंथाची निवड करणे त्यांना सुलभ होते. वाचकांना अधिकात अधिक प्रमाणात आवडलेल्या पुस्तकांचे परीक्षण 'ललित शिफारस'-मधून ललितचे संपादक देत असतात. नवीन प्रसिद्ध झालेल्या चांगल्या पुस्तकांची वाचकांना ओळख होणे आज वाढलेला वाङमयाचा पसारा लक्षात घेता महत्त्वाचे आहे.

पुस्तक प्रसिद्ध झाल्यानंतर नियतकालिकातून प्रसिद्ध करण्यासाठी पुस्तक परीक्षणांची आवश्यकता असते. पुष्कळदा ते 'मागणी तसा पुरवठा' या न्यायाने अत्यंत जुजबी स्वरूपात केले जाते. काही पुस्तकांच्या प्रस्तावना पुस्तक परीक्षणात्मकच असतात असे आढळते. त्यात पुस्तकाच्या लेखकाला उत्तेजन, शाबासकी देण्याची प्रवृत्ती दिसून येत असली तरी त्यात गुणगौरवाचाच भाग अधिक असतो. तथापि प्रा. वा. ल. कुळकर्णी, (डोह, जिप्सी) प्राचार्य नरहर कुरुंदकर; (महाभारत, सुडाचा प्रवास, श्रीमान योगी) प्रा. रमेश तेंडुलकर (चौकोनी आकाश) यांच्या प्रस्तावना म्हणजे उत्तम आस्वादक पुस्तक परीक्षणाची उदाहरणेच आहेत. अर्थात पुस्तक परीक्षण म्हणून त्या लिहिल्या नसल्या तरी त्यात लेखकाच्या वाङमयीन कार्याचे मोजमाप असते.

पुस्तकांचा परीक्षणवजा संक्षिप्त परिचय, दैनिकांच्या रविवार आवृत्तीतून करून दिला जातो. अनेकदा हा परिचय विस्तृत व सूक्ष्म अभ्यासाचा निदर्शकही असतो. पण सर्वसाधारणपणे त्याचे स्वरूप बहुतांशाने 'वर्तमान पत्री'यच असते असे आपल्याला म्हणता येईल.

सत्यकथा, युगवाणी, महाराष्ट्र साहित्य पत्रिका, आलोचना, ललित, अभिरुची, प्रतिष्ठान, अस्मितादर्श, पंचधारा, नवभारत या सारख्या वाङ्मयीन नियतकालिकातून मात्र अधिक अभ्यासपूर्ण, चोखंदळ रसिकाच्या दृष्टिकोणातून मार्मिक अशी पुस्तक परीक्षणे लिहिलेली आढळतात. ही परीक्षणे वाङ्मयाच्या अभ्यासकांना, लेखकांना, प्रकाशकांना आणि वाचकांना मार्गदर्शक ठरतात. निदान काही अंशी दिशा दाखवून देतात. प्रा. वा. ल. कुळकर्णी आणि डॉ. स. गं. मालशे यांनी वर्तमान पत्रातून अलिकडे प्रसिद्ध होणाऱ्या रविवार आवृत्तीतील पुस्तक परीक्षणांकडेही गांभीर्याने पाहिले पाहिजे असे मत मांडले त्याचे कारण त्यातही ज्ञानेश्वर नाडकर्णी, माधव मनोहर, शंकर सारडा वि. शं. चौघुले सारखे जाणकार, मर्मज्ञ, सराईत परीक्षक असतातच. जुन्या वाङ्मयीन नियतकालिकातील पुस्तक परीक्षणे तर नव्याने छापण्याची गरज वा. ल. कुलकर्णी यांनी प्रतिपादन केली आहे. एवढेच नव्हे तर प्रतिष्ठान सारख्या मासिकातून ती पुनर्मुद्रित करण्याचा यशस्वी प्रयोगही केला होता. त्याची उपयुक्तताही त्या निमित्ताने स्पष्ट झाली होती. विविधज्ञानविस्तार, करमणूकचा उदाहरणे म्हणून उल्लेख या संदर्भात करता येईल.


मराठी आणि इंग्रजी या सारख्या भाषा विषयाच्या प्राध्यापकांनीच प्रामुख्याने पुस्तकपरीक्षण क्षेत्रात आघाडी मिळविलेली दिसते. याचे कारण आपल्याकडील भाषा अभ्यासक्रमांतच मुळी 'समीक्षण', 'परीक्षण', 'मूल्यमापन' या बाबींना सर्जनशीलतेच्या चिंतनापेक्षा अधिक महत्त्व दिलेले आढळते. त्यातून प्राध्यापकांची विश्लेषक बुद्धी (Anyaletic Mind)च फक्त जागविली जात असल्याचे दिसून येते. अनेकदा अध्यापनातूनच पुस्तक परीक्षणे सिद्ध झालेली दिसतात. 'वा. ल.', 'व. दि.', 'गो. म.', 'द. भि.', 'व. दा.' इत्यादी कुळकर्णी प्राध्यापक मंडळींचे समीक्षालेखन आणि पुस्तक परीक्षण प्रामुख्याने अध्यापन आणि त्या निमित्ताने झालेले आहे. वाङ्मयीन नियतकालिकातून केलेल्या या पुस्तक परीक्षणांना स्थळातीळ मर्यादा पडते. फार तर दोन तीन पानांचेच पुस्तक परीक्षण अपेक्षित असते तेव्हा नाईलाजाने संक्षेपाने समीक्षण केले जाते आणि त्यातूनच समीक्षणापेक्षा परिचयाचेच स्वरूप या लेखनाला प्राप्त होते.

साधारणपणे या पुस्तक परीक्षणात वाङ्मयीन नियतकालिक आणि वृत्तपत्रांकडे अभिप्रायार्थ पाठविलेल्या पुस्तकांचाच समावेश होतो. फारतर शासनाची, अकादमीची, वाचक पारितोषिके प्राप्त झालेल्या ग्रंथांचा आवर्जून परामर्ष घेतला जातो. निव्वळ ग्रंथपरीक्षणाला वाहिलेले वाङ्मयीन नियतकालिक आपल्याकडे फार काळ तगत नाही. लेखकांनी प्रसिद्ध केलेले ग्रंथ परीक्षणार्थ मोफत वाटणे सुद्धा परवडणारे नसते तेव्हा जाणकार समीक्षकांनी हे ग्रंथ शोधून, मागवून घेऊन त्यावर लेखन केले पाहिजे आणि त्याचा लाभ सर्व अभ्यासकांना झाला पाहिजे. आज लोकप्रिय आणि मान्यवर सुप्रतिष्ठित लेखकांच्याच पुस्तकाचे परीक्षण विस्तृत केले जाते पण त्यात अनेक चांगल्या पुस्तकांकडे दुर्लक्ष होते किंवा त्याला परीक्षणकर्ता भेटत नाही अशी स्थिती आहे. उदा : तात्त्विक, चिंतनगर्भ व साहित्यशास्त्रीय ग्रंथांवर फारशी परीक्षणे आढळत नाहीत. वैचारिक, सर्वस्पर्शी लेखकांचा आणि परीक्षकांचाही अभाव आज जाणवत आहे. आंतर-ज्ञान-शाखांना गवसणी घालणाऱ्या पुस्तकांना कोणी परीक्षणार्थ हात घालीत नाहीत. नाट्यपरीक्षणाचा एक वेगळा गट आपल्याला दिसून येतो. पुस्तक-संहिता परीक्षण करणारा आणि प्रयोगाच्या सादरीकरणातून परीक्षण करणारा. त्यातही बोटावर मोजता येतील एवढीच मोजकी नावे आढळतात. माधव मनोहर, वा. य. गाडगीळ, प्र. न. परांजपे, वि. भा. देशपांडे, डॉ. दीपक घारे इ.

प्रसिद्ध व लोकमान्य लेखकांच्या पुस्तकांची परीक्षणे जशी येतात, तशीच अप्रसिद्ध व नवोदित परंतु कसदार लेखकांच्या नवजात पुस्तकांची देखील परीक्षणार्थ दखल घेतली पाहिजे. पुस्तक परीक्षण हा 'अहोरुपं-अहोध्वनी' प्रकार होता कामा नये. समीक्षकाला आव्हान देणारी

ग्रंथसंपदा निर्माण व्हायला हवी आणि समीक्षा मूल्यांबाबतही पुन्हा चिंतन करायला भाग पाडणारी ग्रंथनिर्मिती व्हायला हवी. उदा. डोह, सारे प्रवासी घडीचे, कोवळे दिवस, रूपक कथा-लेखन इ. ग्रंथनिर्मात्यांना मार्गदर्शक होईल अशी ग्रंथसमीक्षणे मन:पूर्वक आणि अभ्यासपूर्ण लिहिली गेली पाहिजेत. जाणकार समीक्षकांनी भले बुरे का होईना पण काही तरी आपल्या पुस्तकाबद्दल लिहावे अशी मान्यवर लेखकाचीही अपेक्षा असतेच आणि माझ्या दोन हातांनी मला जेवढे लिहिता आले तेवढेच मी लिहू शकलो, माझ्या एकट्याकडून केवढी अपेक्षा कराल अशी भूमिका समीक्षकांचीही असते. त्याला उदाहरणे देण्याची गरज नसते. चिपळूणकर, कालखंडातील काही लेखन वजा जाता पुस्तक परीक्षणावर डॉ. गं. ब. ग्रामोपाध्ये यांनी एका लेखातून विचार केला किंवा वि. शं. चौघुले यांच्या 'ग्रंथसंवाद' ग्रंथांत याची चर्चा आली आहे. यापेक्षा अधिक निर्णायक लेखन या विषयावर फारसे झालेले आढळत नाही.

ग्रंथपरीक्षणातही वाचक सापेक्षता आढळते. सामान्य वाचकांसाठी वृत्तपत्रीय लिखाण आणि जाणकारांसाठी निखळ वाङमयीन लिखाण होते. समीक्षकाला किंवा परीक्षणकर्त्याला स्वत:ची दृष्टी असावी लागते. मग तो आशयनिष्ठ किंवा शैलीनिष्ठ पद्धती परीक्षक अवलंबितो. तसेच समीक्षेच्या ऐतिहासिक, रूपवादी, आस्वादक, मानसशास्त्रीय, समाजशास्त्रीय अशा विविध भूमिकेतून तो कलाकृती उलगडवीत असतो. थोडक्यात कलाकृतींचे कलाकृतीपण शोधणे आणि कलाकृती म्हणून तिचा परीक्षणात विचार करणे अधिक महत्त्वाचे. ■



मराठी प्रबंध सूची प्रकल्प

विद्यापीठ स्तरावर मराठी संशोधनाचे अर्धशतक पूर्ण झाले. या निमित्ताने इ. स. १९३८-३९ ते १९८८–८९ या कालखंडातील भारतामधील एकूण ३७ विद्यापीठांमधील स्वीकृत मराठी विषयक प्रबंधांची मी संकलित केलेली "मराठी प्रबंध सूची" प्रकाशित झाली. मराठी संशोधनाची प्रक्रिया सातत्याने चालू असल्याने स्वीकृत प्रबंधांमध्ये नवीन भर पडत राहते. त्याशिवाय सध्या मराठीविषयक कोणत्या विषयांवर संशोधन चालू आहे. ही माहिती मिळणे अगत्याचे आहे. या दोनही प्रकारच्या संशोधनाची दखल घ्यावयाची यासाठी मराठी प्रबंध सूची प्रकल्प हाती घेतला आहे व त्यासाठी पीएच्. डी. साठी नोंदणी केलेल्यांचे व ज्यांचे प्रबंध १–१–१९९० पासून स्वीकृत झालेत किंवा होत आहेत त्या सर्व संशोधकांचे सहकार्य मिळावे यासाठी हे आवाहन करीत आहे.

१. ज्यांचे प्रबंध १ जानेवारी १९९० नंतर स्वीकृत झालेत किंवा यापुढे स्वीकृत होतील; त्यांनी प्रबंधावर नमूद केल्यानुसार पूर्ण नाव (व त्यात बदल असल्यास तेही नाव, त्यानंतर कंसात) विद्यापीठ प्रबंधाचा विषय, नोंदणी व स्वीकृती वर्ष, मार्गदर्शक, घरचा व कार्यालयाचा पत्ता (पिनकोडसह) कळवावे.

२ ज्यांनी पीएच्. डी. साठी नाव नोंदवले आहे, त्यांनी स्वतःचे पूर्ण नाव, घरचा पत्ता, कार्यालयाचा पत्ता, विद्यापीठ, नियोजित प्रबंधाचा विषय, मार्गदर्शक व नोंदणी वर्ष कळवावे.

३. ज्यांचा प्रबंध ग्रंथ–रूपाने प्रकाशित झाला आहे. त्यांनी ग्रंथाचे नाव, प्रबंध पूर्णतः प्रकाशित केला की अंशतः / सारांश रुपाने, प्रकाशक, प्रकाशन स्थळ व वर्ष, किंमत कळवावे.

४. ज्यांच्या प्रबंधाला (अप्रकाशित / प्रकाशित) पारितोषिक मिळाले आहे त्यांनी स्वतःचे पूर्ण नाव, पत्ता, प्रबंधाचे नाव व पारितोषिकाचा तपशील कळवावा.

५. ज्यांना मराठी विषयासाठी संशोधन मार्गदर्शक म्हणून मान्यता १ जानेवारी १९८५ नंतर मिळाली असेल त्यांनी स्वतःचे पूर्ण नाव, घरचा व कार्यालयीन पत्ता, विद्यापीठ व मान्यता वर्ष कळवावे

६. भाषाशास्त्र अथवा अन्य विषयातील ज्या मार्गदर्शकांच्या संशोधकांनी मराठीच्या अभ्यासाशी संबंधित विषय घेतला असेल, त्या मार्गदर्शकांनी व अभ्यासकांनी वरील क्रमांक २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे तपशील कळवावा.

वरील माहिती मराठी-विषयक प्रबंधां संबंधी हवी आहे. असा प्रबंध जरी तौलनिक साहित्याभ्यासावरील असेल (जसे हिन्दी–मराठी) किंवा मराठी–संबंधी असूनही जरी अन्य कोणत्या विद्यापीठ विभागातून व विद्या शाखेतून संशोधन चालू असेल किंवा स्वीकृत झाला असेल तरीही तपशील कळवावा ही विनंती.

पत्रव्यवहाराचा पत्ता– डॉ. वसंत वि. कुलकर्णी, "व्यासंग", ११ विद्याविहार,
राणा प्रताप नगर, नागपूर– ४४००२२.

|| संशोधन ||

विदर्भातील कृत्रिम व नैसर्गिक शैलाश्रय !

श्रीपाद केशव चितळे

वि. सा. संघाच्या "युगवाणी"च्या अंकात (एप्रिल- मे- जून- १९९०) प्रस्तुत लेखकाची विदर्भातील महत्त्वपूर्ण मूर्तींची सूची प्रसिद्ध झालेली आहे. ती सूची अभ्यासकांना उपयुक्त असून सामान्य वाचकांच्याही ज्ञानात भर घालेल. अशा विविध पुरावशेषांची सूची प्रसिद्ध करणे व युगवाणीसारख्या नियतकालिकांनी त्याकरता सहकार्य करणे आज अगदी अत्यावश्यक होऊन बसले आहे. दिवसेंदिवस प्रगतीच्या गोंडस व सोज्वळ नावाखाली जमिनीचे पट्टेच्या पट्टे उघडे-बोडके होत आहेत, त्यातून अनेक पुरावशेषदेखील बाहेर डोकावतात. त्यांना सूचीबद्ध करणे हे पुढील पिढीसाठी एक महत्त्वपूर्ण रचनात्मक कार्य होऊन बसले आहे. अगोदरच्या अंकातील विविध प्रतिमांच्या सूचीला धरून पुढील सूची अभ्यासकांसाठी देत आहोत.

विदर्भ हा पुरावशेषांनी अगदी खच्चून भरला आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात ब्रिटीश संशोधकांनी व काही भारतीय संशोधकांनी सुद्धा या क्षेत्रात बरीच मोलाची व महत्त्वपूर्ण कामगिरी करून ठेवली आहे. तसेच शासनाच्या (भारत व महाराष्ट्र शासन) पुरातत्त्व विभागाचीही समन्वेषण मोहीम सतत सुरू असतेच. मात्र शासकीय यंत्रणा या सर्व कामाकरिता तहत अपुरीच पडते. सर्व जबाबदारी शासनावर ढकलणे इष्ट नव्हे. पुरावशेषांच्या या सूचीत मी प्रतिमा, शैलाश्रय (कृत्रिम व नैसर्गिक) मंदिर (मध्ययुगीन, हेमाडपंथी, भोसले, गोंडकालीन) शिलालेखांची स्थाने, नाण्यांचा संचय स्मारके, प्राचीन वसाहती, शिल्प, राजवाडे, वास्तूविशेष असा सर्वसमावेशक अनुक्रम योजिला आहे. त्यापैकी प्रतिमांवरील सूची युगवाणीतूनच प्रसिद्ध झालेली आहे. शैलाश्रयांची सूची आता अभ्यासू या !


शैलाश्रय म्हणजे नेमके काय ? : शैलाश्रय याचा सरळ सोपा अर्थ शिलेचा आश्रय, प्रस्तरांचा आश्रय ! पण हे दोन प्रकारचे असतात. (१) पृथ्वीच्या जडणघडणीत लक्षावधी वर्षाआधी नैसर्गिकरित्या तयार झालेली गुहा गव्हरे व (२) मानवाच्या स्पर्शाने तयार झालेले शैलाश्रय. उभय प्रकार शैलाश्रय ह्या संज्ञेतच मोडतात. यापैकी पहिल्या प्रकारच्या शैलाश्रयांचा प्रचंड अभ्यास जगप्रसिद्ध पुरातत्वज्ञ, शैलविथीकांचे भीष्माचार्य व आंतरराष्ट्रीय ख्यातीप्राप्त चित्रकार कै. पद्मश्री डॉ. विष्णू श्रीधर उपाख्य हरिभाऊ वाकणकर यांनी केला होता व जागतिक नकाशात त्यांनी भारताला मानाचे स्थान मिळवून दिले आहे.

या शैलाश्रयांचा उपयोग अश्मयुगीन मानवाने निवासासाठी केला होता. रोजच्या व्यवहारासाठी शिकार, कंदमुळे, बारमाही वाहणाऱ्या पाण्याचे झरे व निवासासाठी अशा शैलाश्रयांचा तो उपयोग करी. विदर्भात अशी २०० च्या आसपास शैलाश्रये असावी असे डॉ. वाकणकर म्हणत. मी स्वतः अशी ४० ते ५० शैलाश्रये प्रत्यक्ष भेट देऊन अभ्यासिली आहेत. कृत्रिम शैलाश्रय मात्र ऐतिहासिक मानवाने, लोहयुगीन मानवाने लोह उपकरणांच्या सहाय्याने तयार केली, निवासायोग्य केली. विदर्भात अशा कृत्रिम शैलाश्रयांची

संख्या ७५ च्या आसपास असावी. [ह्यातील काहींबद्दलचा उल्लेख डॉ. मो. गं. दीक्षितांच्या "मध्य प्रदेश की पुरातत्वीय रूपरेखा" या ग्रंथात आला आहे.] हा एक मोठा प्रकल्प (Project) म्हणून हाती घेण्यासारखा आहे. शासनाने योजनापूर्वक विदर्भाच्या ह्या सर्व शैलाश्रय-प्रकारांवर शास्त्रशुद्ध प्रकाश टाकायला हवा. आवश्यक तेथे व्यापक उत्खनन करायला हवे. ही शैलाश्रये कोरण्याचा हेतू काय ? ह्यांचा काळ कोणता असावा हे कोरणारी मंडळी कोण ? ह्यांची काही स्थायी व्यवस्था होती काय ? ह्या शैलाश्रयांचा उपयोग कोण करीत ? या व अशा अनेक प्रश्नांची उत्तरे केवळ शासनाने अधिक उत्खनन कार्य केल्यानेच

अंदाज आहे. ही भारतातील एकूण शैलाश्रयांच्या तुलनेत तीन-चतुर्थांश (३/४) आहेत.

मौर्य, शुंग-सातवाहन, गुप्त, वाकाटक, चालूक्य राष्ट्रकुट, वर्धन, यादव इत्यादी कालखंडात मानवाने आपल्या निवासस्थानासाठी अशी शैलकूप प्रस्तरात पोखरली, पुढे ती कलास्पर्शाने सजविली. काहींमध्ये तो राहत असे, तर काहींचा उपयोग प्रार्थनास्थळ म्हणून होई. विदर्भात मात्र कठीण प्रस्तराच्या अनुपलब्धतेमुळे या कलेला अधिक वाव मिळाला नाही. परिणामतः केवळ २-२, ३-३ खोल्या वा कक्ष कोरणे, थोड्या जुजबी सोयी त्यात करून घेणे, (हवा, प्रकाश) पावसाचे पाणी आत येऊ नये म्हणून काही खाचा करणे, थंडी-



मिळणार आहेत. काही शैलाश्रय शुंग-सातवाहन स्तूपावशेषाजवळ आढळली आहेत. यावरून असे म्हणता येते, की ही बौद्ध भिक्षुंची वर्षावासासाठीची (पावसाळ्याचे ४ मास) असावीत, व त्यात राहून ते धर्मप्रसाराचे पवित्र कार्यही करीत असावेत. ही शैलाश्रय डोंगरात पोखरून काढलेली व कक्षवजा (Room type) पोकळ, निवासायोग्य तयार केलेली असतात. एकट्या महाराष्ट्रात अशी १२०० लेणी असावीत असा

पासून बचाव म्हणून द्वारावर चटया टाकणे (कारण त्याचे ओंडके उभय बाजूंना आढळतात) हिंस्त्र श्वापदापासून स्वसंरक्षण म्हणून रात्री सतत अग्निकुंड प्रज्वलित ठेवणे अशा त्या सोयी होत. या शैलाश्रयातील उपलब्ध पुराव्यांवरून येथे बौद्ध भिक्षुच रहात असावेत असा तर्क बांधता येतो. भंडारा जिल्ह्यातील पवनीच्या होनदानी बौद्ध केंद्राचा अभ्यास करता असे लक्षात येते की या केंद्राच्या नजीकच्या प्रदेशात सुद्धा बौद्ध भिक्षु रहात असावेत.


हे केंद्र अत्यंत विख्यात असे असून येथे शुंग-सातवाहन काळातील स्तूपावशेष आढळला आहे. पण असे म्हणावे तर विदर्भातील इतरत्रही (विषेशत: नदीच्या काठाकाठाने) ओढयांजवळ, विपुल जीवनसाहित्यांच्या स्रोतांजवळ (शिकार–कंदमुळे, मध) व संपूर्ण विदर्भभर अशी कूपे आढळतात. खेड्यातील मागसे अशा शैलकृत्यांना वाघाची दरी, कोपी, कुपी, भूताचे घर, सीतेचा महाल, गिरिजेचा महाल, किंवा पाताळमार्ग असे म्हणतात. प्रस्तुत सूचीत आपण ५ भागात शैलाश्रयांचा विचार करू. (१) शैलाश्रयांची संख्या व दगडाचा प्रकार (२) जिल्ह्याचे तालुक्याचे स्थानापासून अंदाजे अंतर (अंतर सापेक्ष आहे याची नोंद कृपया वाचकांनी घ्यावी– प्रत्यक्ष भेटीत मी निश्चित स्थान सांगू शकेन) (३) शिलालेख, मृदभांडी काही इतर अवशेष आहेत किंवा कसे ? (४) कालनिर्णय (अंदाजे) (५) उत्खननायोग्य आहे किंवा कसे ? व अभ्यासकाचा शेरा असा अनुक्रम मी योजिला आहे.

कृत्रिम शैलाश्रयामध्ये विविधता असल्यानेच त्यांचा अभ्यास रकान्यात दिला आहे. पण नैसर्गिक–अर्धनैसर्गिक शैलाश्रयामध्ये केवळ निवासायोग्य पोकळी एवढेच वैशिष्टय असल्याने त्यांची सूची रकान्यात न देता सरळ सरळ देऊन त्यांना जिल्हाश: विभाजित केले आहे. प्रागैतिहासिक काळात (Prehistorical period) मानवाने ह्यांचा उपयोग थंडी-ऊन व वारा ह्यापासून केवळ बचाव म्हणून उपयोग केला. अशी नैसर्गिक शैलाश्रये कशी ओळखायची ? त्याच्या कसोटया काय ? याचे शिक्षण मला जगप्रसिद्ध शैलगृहअन्वेषक पद्मश्री डॉ. वि. श्री. वाकणकर यांनी दिले. अशा गुंफामध्ये अनेक वेळा मानवी अश्मोपकरण (Tools) आढळतात. आता आपण अशा साईट्सचा (विदर्भातील) थोडक्यात आढावा घेऊ.

१. नागपूर जिल्हा– मनसर, नागार्जुन, डोंगरमोदा, गडपायली, आदासा, अंभोरे, तारणा मेटपांजरा– शिरजरबुवा.

२. चंद्रपूर जिल्हा– सात बहिणीचा डोंगर, रामदिघी, चिमूर, पिंपरडोल.

३. गडचिरोली जिल्हा– पळसगाव, कान्पा–टेन्पा, सिरोंचा, राजूरा.



४. भंडारा जिल्हा– आमगाव, बनीबाईचा डोंगर.

५. यवतमाळ जिल्हा– चिखली, परमडोह,

६. अमरावती– चिखलदरा, मेळघाट धारणी,

यापैकी– रामदिघीची दोन शैलाश्रये अतिभव्य असून अनुक्रमे ५० – ७५ माणसे सहज सामावतील इतक्या क्षमतेची आहेत. तर कान्पा–टेन्पा नजीक लालसर अँगेटची असंख्य क्षुद्रास्त्रे आढळली आहेत. पण अद्याप शैलचित्र मात्र कोठेही आढळले नाही. पण विदर्भाचा अधिक कसून व चमूने अभ्यास केला तर या "प्रागैतिहासिक विदर्भ क्षेत्रात खूप काही संशोधन कार्य होऊ शकते असे मला व्यक्तिश: वाटते.–

कृत्रिम शैलाश्रये

अनु.	शैलाश्रयांची संख्या व दगडाचा प्रकार	जिल्हास्थान किंवा तालुकास्थानापासून अंतर	पुरावशेषांचे सहअस्तित्व शिलालेख, मृदभांडे, हत्यारे इत्यादी	साधारण कालनिर्णय : अंदाजे (Approximately)	विशेष वैशिष्ट्यपूर्ण माहिती
	नागपूर जिल्हा				
१.	भुयारी-१ (लालसर रवाळ)	नागपूरपासून पश्चिमेस अमरावती रस्त्यावर व्याहाडपेठ पासून फाटा (शिरपूर) २४ कि. मी.	अत्यंत अस्पष्ट अक्षरे (ब्राम्ही लिपी) इ. स चे ४ थे शतकातील असावी. वाचन– व ञ्‌ बा हु मा तं ग	इ. स. चे ४ थे ५ वे शतक	मध्यभागी कक्षासन (शिलासन) आकारमान-लांबी × रुंदी × उंची १२ फूट × ७ फूट × ६ फूट, प्रवेश-द्वार स्पष्ट दिसते.
२.	पुल्लर १ विशीयट रेतीमिश्रित रवाळ	नागपूर जिल्हा – तालुका कुहीपासून १० कि. मी. चंडाळा जंगल	शैलाश्रय पूर्णपणे भग्न पण शिलाक्षरे इ. स. पूर्व २ रे शतक. वाचन– व (?) स वं द ल क पु त स अ प ल स म ती क मं ओ कि य. स. (पहा– वि. सं. मंडळ वार्षिक १९७१, पृष्ठ क्र. ११०, डॉ. शां. भा. देव)	. स. पूर्वी २ रे शतक. सर्वात प्रथम ज्ञात झालेले विदर्भातील पहिले शैलाश्रय शोधक-कै. शं. गो. चट्टे व श्री. भांडारकर व एक ग्रामस्थ.	पवनीच्या शुंग–सातवाहन कालातील स्तूपाच्या दर्शनार्थ येणारे हीनयानी बौद्ध भिक्षु येथे आश्रय घेत असावेत.
३.	जगनकोप १ लालसर–पापुद्र्याचा खडक	पूल्लरच्या पश्चिमेस २ कि. मी. (गायमुख–चांद सूरज टेकड्याजवळ)	तळात खूप मोठा शिलालेख असल्याचे स्थानिक सांगतात. (आज तळावर सिमेंट प्लॅस्टर आहे.	इ. स. पूर्व पहिले शतक, सातवाहन काळ.	पूर्णपणे चौकोनी पण भव्य १४ × १० × ७ घनफूट. आज हिंदू शिव पंचायतन दिसते. समोर अंगण कोरले आहे.
४.	भिवसेन समूह ४ शैलाश्रय सच्छिद्र रवाळ लाल प्रस्तर	कुहीपासून २२ कि. मी. छोट्यादेवळी जवळ हुडुपा–कटारा शैलाश्रय	एका शैलाश्रयांच्या माथ्यावर काही शिलाक्षरे–ब्राम्ही लिपी वाचन– वें व स त सु त स	इ. स. चे ४ थे ५ वे शतक वाकाटक कालीन ४ ही शैलाश्रये उत्तम. (प्रथम शोधक-समन्वेषक श्री. विलास कुळकर्णी)	साधारण आकारमान सारखे. क्षेत्रफळ १०० ते २०० फूट (वर्ग) सोपान मार्ग (जीना) (उत्खननायोग्य) सूर्यप्रकाश, हवा, पर्जन्य, संरक्षण सर्व सोयींनी युक्त

अनुक्रमणिका

अनु.	शैलाश्रयांची संख्या व दगडाचा प्रकार	जिल्हास्थान किंवा तालुकास्थानापासून अंतर	पुरावशेषांचे सहअस्तित्व, शिलालेख मृद्भांडे, हत्यारे इत्यादि	साधारण कालनिर्णय : अंदाजे (Approximately)	विशेष वैशिष्टयपूर्ण माहिती
५.	दक्षिण वैनगंगा १	उपरनिर्दिष्ट स्थळापासून पूर्वेस ४ कि. मी. शोधक–समन्वेषक – श्री. विलास कुळकर्णी	शिलालेख आहे. अत्यंत महत्वपूर्ण पुरावा. डॉ. मिराशींच्या सिद्धांतास उपोद्‌बलक. वाचन– ए त प व ते वे ना (१) ह्या पर्वतावर वेणा नदीकाठचा प्रदेश–वैनगंगा.	इ. स. चे दुसरे शतक असावे.	बेण्णाकट (वेणा नदीच्या काठावरील प्रदेश) तत्कालीन भौगोलिक संदर्भाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण पुरावा.
६.	पिंपरडोल शैलाश्रय ५–(१ अर्धनैसर्गिक व ४ पूर्णपणे कृत्रिम) टणक व मजबूत ग्रॅनाईट प्रस्तर.	उमरेड तालुक्यात; उमरेडपासून पश्चिमेस मकरधोकड्याजवळ १४ कि. मी.	शिलाक्षरे आहेत, पण जीर्ण व पुसट–वाचन ( ) वृ ह स्प ती य त सि. स का य.	अक्षरवाटिकेवरून इ. स. चे ४ थे शतक असावे.	आकारमान साधारण ६०० घन फूट. गजपृष्ठाकार छत, लोहयुगीन, आज दत्तप्रतिमा दिसते. उत्खननायोग्य साईट.
७.	गायडोंगरी, २ शैलाश्रय. मुरूमाड प्रस्तर, पण टणक.	भिवापूरपासून पाहमी–चिचाळा–जवळी रस्त्यावर ७ कि. मी. वासी–वनवासी खेड्याजवळ.	मृदभांडी आढळली. अभ्रक मिश्रित, काही दगडी चकत्या.	अंदाज करता येत नाही पण मृदभांडयांच्या उपलब्धतेवरून इ. स. च्या ५ व्या शतकातील असावी.	गजपृष्ठाकार छत. आकारमान ६५० घन फूट एकामध्ये शिलासन.
८.	सातभोकी शैलाश्रय ७ शैलाश्रय. प्रस्तर वालुकामिश्रित, करडा.	पुल्लरपासून दक्षिणेस चंडाळा जंगलात ११ कि. मी.	अतिशय लहानलहान कूप पण समोर अग्नीकुंडाचे अवशेष, हिंस्रश्वापदापासून संरक्षण.	साधारण कोरण्याच्या पद्धतीवरून पुल्लर – जगनकोप कालखंड इ. स. चे १ ले २ रे शतक.	एकूण ७ असल्या तरी २ जोड शैलाश्रय आहेत. पश्चिमाभिमुख, पण छत उडालेले.
९.	रामटेक १ सफेदी दिल्याने प्रस्तराचा प्रकार लक्षात येत नाही.	प्रत्यक्ष रामटेकला धूम्रेश्वर देवालयाच्या रस्त्यावर–आज शिवमंदिर आहे.	भिंतीच्या (दक्षिण) बाजूने ओटा कोरला आहे. हा रात्रीच्या निद्रेसाठी असावा. असे ओटे प. महाराष्ट्रातील लेण्यात आढळतात.	अंदाज करता येत नाही (पण आजपासून १२०० वर्षे पूर्वं असावे)	आज भव्य शैलाश्रयाचे अवशेष २० × १० × ७ घन फूट आकारमान ओटा–समोर भोसले कालीन सभामंडप. गाभारा–स्तंभ.

अनुक्रमणिका

	अमरावती जिल्हा				
१०.	झीरीची शैलाश्रये (२) दगड काळसर पण गारगोटीच्या धमन्या (dyke) सह.	वरुडपासून उत्तरेस बैतूल रस्त्यावर रवाळा नावाचे खेडे आहे तेथे धबधब्या-जवळ, १४ कि. मी.	शैलाश्रयात निजण्यासाठी दगडी ओटा कोरला आहे. प्राथमिक अवस्था (लेण्यांची) सफेदीमुळे चित्र स्पष्ट होत नाही.	सर्वोत्कृष्ट शैलाश्रय. अंदाज करता येत नाही.	एकामध्ये आज हनुमंत प्रतिमा आहे तर दुसऱ्यात शक्ती. चरबीचा दिवा ठेवण्यास कोनाडा. द्वारावर संरक्षक चटया, प्रकाश परावर्तन व पर्जन्यजल आत न येण्यासाठी खाचा.
	यवतमाळ जिल्हा				
११.	कवडसा–शिरपूर शै. (२)–दगड लाल पण पापुद्र्याचा व कच्चा	वणी तालुक्यात वणीपासून २१ कि. मी. शिरपूर गावाच्या पूर्वेस कवडसीच्या किर्र जंगलात ७ कि. मी. अंतरावर	शिलाक्षरे आहेत पण अतिशय अस्पष्ट. शैलाश्रयात कोनाडे आहेत व हे घरासारखे आतून जोडलेले आहे.	साधारण अक्षराच्या अस्पष्ट पुराव्यावरून इ. स. चे ९ वे १० शतक (राष्ट्रकुट–चालुक्य काल)	क्षेत्रफळ अनुक्रमे १३०० फूट व १०० वर्ग फूट, आतून द्वार गवाक्षाने जोडलेले प्रवेशद्वार चौकोनी भव्य–म्हरांडा सम शैलाश्रय.
	अकोला जिल्हा				
१२.	पातुरच्या लेण्या सर्वात भव्य शैलाश्रय	अकोला–वाशिम रस्त्यावर नानासाहेबाचे पातूर प्रसिद्ध. अकोल्यापासून दक्षिणेस २० मैल (संरक्षित स्मारक)	ह्यास लेणे म्हणावे लागेल. नाशिकच्या पांडव लेण्याशी साम्य, प्रचंड म्हरांडे, स्तंभ प्रदक्षिणापथ, गर्भगृह, महायानी, ब्राम्ही लिपीत छताजवळ एकावर–एक दोन लेख· वाचन–दुर्बोध	इ. स. चे दुसरे–तिसरे शतक, हे शैलाश्रय प. महाराष्ट्रातील नाशिक, पितळखोरे, कार्ले, भाजे बेडसे, कोंडाणा, महाड, पन्हाळे-काजी–कान्हेरी, महाड, तुळजालेणे; अजिंठे या संदर्भात एक महत्त्वपूर्ण दुवा ठरू शकते.	४० फूट × ४० फूट चे म्हरांडे, आत हॉलसारखे कक्ष, विहार–सातवाहन काळातील भांदकचे विजासन लेणे व हे लेणे ह्याचा तौलनिक अभ्यास व्हायला हवा.

अनु.	शैलाश्रयांची संख्या व दगडाचा प्रकार	जिल्हास्थान किंवा तालुका स्थानापासून अंतर	पुरावशेषांचे सहअस्तित्व शिलालेख मृद्भांडे, हत्यारे इत्यादी	साधारण कालनिर्णय : अंदाजे (Approximately)	विशेष वैशिष्ट्यपूर्ण माहिती
	भंडारा जिल्हा				
१३.	कोरंबी शैलाश्रय—३ (१ महादेव व २ गिरीजेचा महाल) जोडलेणे प्रस्तर सच्छिद्री (Porous) पण टणक धमनीयुक्त	पवनीच्या वायव्येस ६ कि. मी. एका पहाडावर अत्यंत सुंदर-सुबक व वास्तूशास्त्र दृष्ट्या उत्कृष्ट शैलाश्रय महादेव शं. छोटेसेच आहे, पण भग्न आहे. द्विकक्षात्मक असून समोर व्हरांडा व मागे निवारा—पुल्लर व्यतिरिक्त स्तूपाजवळील दुसरे शैलकूप.	मातीने खचाखच भरले असल्याने उत्खननास एक आशादायी साईट, मृद्भांडी, मणी, नाणी, काही इतर अवशेष मिळू शकतात. पण जोडशैलाश्रयातील एकाचा तळ मात्र दगडी आहे तेव्हा उत्खननास अयोग्य.	शृंग—सातवाहन काळातील असावे. एकाचा आकार चौकोनी तर दुसऱ्याचा इंग्रजी T या अक्षराप्रमाणे	आकारमान १७' × १० × ७ १६' × १० × ७ प्रकाशतूयं कोन, संरक्षक प्रवेशद्वार, छत तिरपे, शैलाश्रयास स्तंभानी आधार दिल्याचा भास, पर्जन्यजल ओसरणे, हवा व स्वच्छ प्रकाश पण शिलालेखीय पुरावा नाही. हिंस्र श्वापदांची खूप भीती आहे.
	गडचिरोली जिल्हा				
१४.	मोहाळी (मोकासा) पांडव गुंफा-शैलाश्रय ५ शैलाश्रय (उत्कृष्ट संच) प्रस्तर पिवळसर • पांढुरका पण ज्वालाग्रही खडक	नागभीडपासून मोहाडी २॥ कि. मी. अंतरावर आहे. स्थानिक मंडळी पांडव गुंफा म्हणतात, म्हणजे प्राचीन असा त्याचा अर्थ असतो.	५ गुंफा बहिर्वक्र मुखाच्या असून क्र. २ गुंफेत ब्राम्ही लिपीत लेख कोरला आहे. एकूण अक्षरे १३. इ. स. चे दुसरे शतक. लेखाची भाषा संस्कृत. वाचन-सिव स्वा मी स पु त्र स ग्रा मे प्र म ई (पुढे अस्पष्ट)	अक्षरवाटिकेवरून हा शैलाश्रय समूह (५) इ. स. च्या दुसऱ्या शतकातील म्हणजे सातवाहन काळातील असावा. उपयोग भिक्षुंच्या वर्षावासासाठी होत असावा.	याच शिलालेखयुक्त लेण्यापासून केवळ १३ कि. मी. वर देवटेक येथे पुण्यश्लोक सम्राट अशोकाच्या महामात्राचा शिलालेख आढळला आहे. "सिवस्वामीचा सुपुत्र प्रमई गावचा" असा शिलालेखाचा अर्थ होतो. पण विदर्भातील हे महत्त्वपूर्ण केंद्र असावे.

अनुक्रमणिका

चंद्रपूर जिल्हा

१५.	घुग्गुस शैलाश्रये ४- (२ बुजले आहेत) प्रस्तर रेतीमिश्रीत सच्छिद्र पण टणक	चंद्रपूरपासून पश्चिमेस घुग्गुस गावात ५ नं. फाटकाजवळ झोपडपट्टीत W. C. F. (Mine)	आज आतमध्ये गोंडकालीन अवशेष आहेत. सतीशिळा सुंदर व वैशिष्ट्यपूर्ण आहे.	शैलाश्रय समूहातील २ शैलाश्रय पूर्णपणे बुजले आहेत पण इतर २ मात्र प्राचीन असावेत–निश्चितपणे काळ सांगणे कठीण.	कोळशाच्या खाणीत ही शैलाश्रये सुरक्षित राहिली ह्याबद्दल आश्चर्यच वाटते. पण उत्खननायोग्य क्षेत्र.
१६.	माना शैलाश्रय ४ दगड काळपट ग्रॅनाईट	चंद्रपूरच्या पठाणपुरा गेटबाहेर W. C. F. परिसरात ४–५ कि. मी. अंतरावर आहे.	गोंड कालखंडात शैलाश्रयास पूर्ण स्पर्श झालेला दिसतो.	मुळात ही कृती इ. स. च्या १० व्या शतकातील असावी. पण इ. स. च्या १६ व्या १७ शतकात पूर्णस्पर्श झाला असावा.	चौथ्या शैलाश्रयात मेहरपीस्तंभ व प्रवेशद्वारावर कमलपुष्प दिसते. मात्र पहिल्या क्रमांकात दगडी पलंग कोरण्याचा प्रयत्न झालेला दिसतो.
१७.	भटाळा शैलकुप (वरोड्याजवळ) ४	वरोड्यापासून उत्तरेस १३ कि. मी. अंतरावर आहे.	प्रत्यक्ष प्रतिमा–केवलनृसिंह वेशीवर २–३ शैलकूप, मंदिराजवळ १ व तलावाजवळ २–३ पण मानवनिवासास अयोग्य.	यादव कालखंडातील इ. स. चे १३ वे १४ वे शतक केवळ देवप्रतिमाकोष्ठ असे यांचे स्वरूप आहे.	केवळ नृसिंहांच्या प्रतिमेचे पूजन यादवकालखंडात देखील सुरू होते. यांचा पुरावा. थेट वाकाटक काळापासून इ. स. ४ थे ते इ. स. १४ वे शतक.
१८.	देऊळवाडा-(६) गुंफा दगड-लालसर-रवाळ	भांदकपासून पश्चिमेस ११ कि. मी. गजपृष्ठाकार चक्राकार छत. एका वोगद्यासारखे अरुंद. शैलाश्रय कोरण्याचे प्रयोजन मात्र कळले नाही.	शंख लिपीतील शिलालेख आढळला (भांदक–हिरालाल सूची क्र. २१) श्री. कुळकर्णी वि. सं. मं. वार्षिक १९८९ वाचन काही अक्षरे : गो-द्र-हा-त.	इ. स. चे ७ वे ८ वे शतकातील असावे. (क्षुद्रास्त्रे आढळली आहेत.) त्यामुळे क्र. २ चे अतिप्राचीन असावे.	व्हरांडा, कक्ष, व पर्जन्यप्रक्षेपण सोय आहे. पण २ शैलाश्रये अर्धवट कोरली आहेत. A. S. R. IX 135 (म. प्र. पुरातत्व की रुपरेखा, पृष्ठ ९१) डॉ. मो. गं. दीक्षित

अनु.	शैलाश्रयांची संख्या व दगडाचा प्रकार	जिल्हास्थान किंवा तालुकास्थानापासून अंतर	पुरावशेषांचे सहअस्तित्व शिलालेख मृदभांडे, हत्यारे इत्यादी	साधारण कालनिर्णय : अंदाजे (Approximately)	विशेष वैशिष्ट्यपूर्ण माहिती
१९.	विजासन लेणी (खूप प्रसिद्ध आहे. त्यामुळे केवळ संदर्भासाठी घेतली आहे. भव्य तीन पुडाचे लेणे. प्रस्तर वालूकाश्म)	भांदकपासून दक्षिणेस ५ कि. मी. जगप्रसिद्ध लेणे ब्रिटीश काळात खूप संशोधन झाले आहे.	त्रुटीत शिलाक्षरे ब्राम्ही लिपीतील. कालखंड इ. स. च्या दुसऱ्या तिसऱ्या शतकातील. तथागताची भव्य प्रतिमा. कक्ष (निवास) पाण्याची टाकी (पोई) भव्य व वैशिष्ट्यपूर्ण खोल पॅसेज.	इ. स. चे दुसरे तिसरे शतक. जनरल कंनिगहॅम 2nd 3rd Century A. D. विजासन लेणी-विष्यासन नागार्जुनाची लेणी म्हणून प्रसिद्ध. विदर्भातील तत्कालीन व एकमेव ज्ञात स्थान, महायान पंथीयांचे प्राबल्य.	A. S. R. IX 121 – 131 PLXIV, XXI – XXIII संरक्षित स्मारक, पद्मासनातील भव्य बौद्ध प्रतिमा (प्रत्येक गर्भ-गृहात एक प्रतिमा अश्या तीन लेणे ह्या संज्ञेस उत्कृष्ट पात्र)
२०.	गवराळा (वरद-विनायक) १. शैलाश्रय- सीतेचे भूयार, प्रवाळयुक्त-रेती- वालूकाश्म	भांदकपासून २ कि. मी. दक्षिणेस (जौबनास गुंफा)	दशावतरातील काही प्रतिमा आहेत तर काही खाचा रिक्त ६ किचकशिल्प, शिलासन, ५ देवकोष्ठे.	कालनिर्णय इ. स. चे ११ वे १२ वे शतक (यादवपूर्वकाळ).	आकारमान १० × ५ × ७ घनफूट त्रिविक्रम, केवलनृसिंह, शिवलिंग, शयन प्रतिमा श्री विष्णू, भूवराह, व एक अस्पष्ट प्रतिमा. केवल-नृसिहाची पूजा, अर्चा, ११ व्या १२ व्या शतकापर्यंत सुरू होती असे दिसते.
२१.	प्रत्यक्ष गावांतील शैलाश्रय (पी. एच. सी. पब्लीक हेल्थ सेंटर-शैलाश्रय हे नांव मी दिलेले आहे) लालसर,	हे लेणे प्रत्यक्ष गावात असून पी. एच. सी. चे रुग्ण त्याचा शौचालय म्हणून उपयोग करतात. मी स्वतः नाक मुठीत धरून रांगत रांगत आतपर्यंत जाऊन आलो.	केवळ प्रवेश द्वार–अपुरे, आत तथागत भगवान बुद्धाचे मस्तक. ही प्रतिमा पूर्ण ६ फूट असावी. म्हणजेच शैलाश्रयाची उंची तळापासून किमान १० फुट असावी सुप्रसिद्ध पुरातत्वज्ञ डॉ. गो. बं.	महायानी पंथियाचे प्रार्थना स्थान असावे व्हरांड्याच्या आत प्रवेश-द्वार बुजले असल्याने मानवास प्रवेश अशक्यच, केवळ टॉर्च मारूनच पहावे लागते. इ. स. च्या ४ थ्या ५ व्या शतकातील असावे.	इतर तीन कक्षाची प्रवेशद्वारांची वरची टोके फक्त मुक्त आहेत. केवळ आत लेणे आहे ह्याचा तो पुरावा आहे. शासनाने त्वरित पावले उचलून उत्खनन करावे ही नम्र विनंती.

अनुक्रमणिका

धमनीयुक्त (dyke) रवाळ पण कठीण दगड, एकूण ५ गुंफा असाव्यात ३ बुजल्या आहेत. उत्खनन करण्यास विदर्भातील उत्कृष्ट शैलाश्रय.	(श्री. भाऊ भांदककर यांचे सहकार्याने) दक्षिणाभिमुख लेणे. एकच मोकळे, बाकी ३–४ मातीने पूर्ण बुजलेले	देगलूरकर पुणे यांचे मते उत्खननास योग्य (त्वरित) स्थान.

[टीप : अशी साधारण ५७ शैलाश्रये मी स्वत: माझ्या डोळ्यांनी प्रत्यक्ष जाऊन पाहिली आहेत. व व ज्यांचेबद्दल ऐकले आहे, वाचले आहे, अशीही काही स्थाने आहेत. ती अशी : अंबाई, निंबाई, चापेगडी, झाडापापडा, गडपायली, मारन, बिजली, कचरगड, गायमुख, (जिल्हा भंडारा) मंजिरा (अचलपूर) कळंब, निबदारव्हा (यवतमाळ) ढागा (वर्धा) आमनेर (नागपूर) – म. प्र. पुरातत्वकी रुपरेखा डॉ. दीक्षित व प्रत्यक्ष ऐकीव माहिती.]

संदर्भ सूची : १. म. प्र. की पुरातत्वीय : रुपरेखा डॉ. मो. ग. दीक्षित.
२. वि. सं. मंडळ वार्षिक १९८६, ८७; ८८, ८९; ९०.
3. Rock Shelter in Malva : Dr. Wakankar
४. मांढळचे लेखयुक्त प्राचीन लेणे : वि. सं. मं. ७१, डॉ. शा. भा. देव
5. Geology of Central India : Dr. Rao.
६. शैलाश्रयावरील माझी अनेक वर्तमानपत्रीय टिपणे.
७. सार्थवाह (ग्रंथ)
८. आर्य– श्री. वसंत पटवर्धन

ग्रां थि की

निंबाळकरांचे महायुद्ध : सम्यक् विद्रोह

प्रा. डॉ. आशा धावडे

बुद्धाने अष्टांगिक मार्ग समजावून सांगताना म्हटले की हा संसार एक तुरुंग आहे व माणूस एक कैदी आहे. पण या कैद्याची स्थिती निराशाजनक नाही. कारण माणसामध्ये एक शक्ती आहे. जिला इच्छाशक्ती म्हटली जाते. त्याला थोडासा जरी प्रकाश दिसला व तो त्या प्रकाशात दिशा शोधू शकला तर तो आपल्या इच्छाशक्तीला कार्यरत करू शकतो व बंधनमुक्त होऊ शकतो. प्रकाशात योग्य दिशा शोधणारी जी दृष्टी आहे ती सम्यक् दृष्टी आहे. ती मिथ्या-दृष्टीची विरोधिनी आहे. सम्यक् म्हणजे समग्र नव्हे. सम्यक् म्हणजे योग्य. सम्यक् मन स्वातंत्र्याचा पुरस्कार करते. सम्यक् मन समतेचा पुरस्कार करते. सम्यक् मनाला न्याय व नैतिकतेची आवश्यकता भासते. ज्या व्यवस्थेत स्वातंत्र्याचा व समतेचा अभाव आहे. ज्या व्यवस्थेत न्यायाची चाड नाही. शोषण हीच ज्या व्यवस्थेची नैतिकता आहे. त्या व्यवस्थेला नाकारून मूल्याधिष्ठित व्यवस्थेची निर्मिती करण्या-साठी संघर्ष करण्याची इच्छा ज्या मनात निर्माण होते, ते मन सम्यक् मन आहे. ते खरे विद्रोही मन आहे.

आपल्या देशात बुद्ध, फुले व आंबेडकर यांच्या रूपाने विद्रोही मन जन्माला आले. बुद्ध व फुले यांनी डॉ. आंबेडकरांना प्रेरणा दिली व डॉ. आंबेडकरांनी सर्जनक्षम प्रतिभावंतांना प्रेरणा दिली. या प्रतिभावंतांच्या मनाचा आविष्कार दलित साहित्याच्या रूपात साकार झाला. मराठी साहित्याला समृद्धीचा अर्थ कळला. अमानुषतेचे चित्रण करता करता मानुषता दर्शविण्याचे कार्य दलित साहित्याने केले. वर्गीय, वर्णीय व जातीय पातळीवर होणारी पिळवणूक ही मानवी जीवन दुःखी करते. हे सत्य आपल्या देशात बुद्ध, फुले या क्रांतिकारी मानवतावाद्यांना उमगले. हे सम्यक् सत्य दलित साहित्याने आविष्कृत केले. दलित साहित्य हे सम्यक् सत्य म्हणजेच सम्यक् ज्ञान प्रकाशित करणारे साहित्य आहे. नवबौद्धवादामुळे पुष्ट झालेले हे साहित्य १९६० पासून गतिशील झाले. या साहित्याला विकसित करणाऱ्या प्रतिभावंतांपैकी एक नाव वामन निंबाळकर यांचे आहे.

" महायुद्ध " या कवितासंग्रहाच्या निमित्ताने वामन निंबाळकरांच्या सम्यक् मनाचा परिचय होतो. सम्यक् मनाचा, म्हणजे विद्रोही मनाचा, वारसा त्यांना बुद्ध, फुले व आंबेडकर यांच्यापासून प्राप्त झाला आहे, हेही स्पष्ट होते. 'महायुद्ध' या कवितासंग्रहातील कविता आशयपूर्ण आहेत, असे म्हणणे अपूर्ण आहे कारण या कवितांच्या आशयात एक प्रगल्भता आहे. या प्रगल्भतेने एक उंची गाठली आहे. 'गावकुसाबाहेरील कविते'तील अनुभवी पण दुःखी निंबाळकरांनी जीवनभोग घेता घेता जीवनशोध घेतला. हा जीवनशोध या कवितेत व्यक्त झाला आहे. मानवी जीवनातील दुःखाचे आदिकारण पिळवणूक अर्थात शोषण हे आहे. हे शोषण कुरूप मनाने केले आहे. हे शोषण प्रच्छन्न वृत्तीने केले आहे. या प्रच्छन्नवृत्तीच्या विरोधात साकारलेले हे युद्ध आहे. शोषणविरहित समाजाच्या निर्मितीसाठी केलेले हे महायुद्ध आहे. 'महायुद्धा'तील कवितांमधून वैचारिक युद्ध

साकारले आहे. हे युद्ध सर्वच परिवर्तनवाद्यांनी सुरू केले आहे. वामन निंबाळकर एक परिवर्तनवादी कवी आहेत.

निंबाळकरांची वृत्ती चिकित्सक आहे. या चिकित्सकवृत्तीमुळे ते इथल्या बंदिस्त व्यवस्थेची चिकित्सा करतात. ही व्यवस्था नेमकी कशाच्या आधारावर उभी आहे ? कोणाच्या इच्छेनी ती मजबूत झाली आहे ? या प्रश्नांची ते तर्कशुद्ध उत्तरे देतात.

हे आधार अपौरुषेय आहेत असे भाकड विधान ते करू शकत नाहीत. असल्या भाकड विधानांनीच माणूस जळून गेला आहे, माणुसकी आटून गेली आहे. माणूसपण अंकुरित करण्यासाठी, माणूसपण फुलविण्यासाठी ही अवर्षणे ओलांडली पाहिजे ही रास्त निष्ठा त्यांनी व्यक्तविली आहे. तीव्र इच्छाशक्तीच्या बळावर व नैतिकतेच्या आधारावर माणूस जगाचा कायापालट घडवून आणू शकतो. जगाच्या पाठीवरील प्रत्येक व्यक्तीला न्याय्य हक्क प्राप्त करून देऊ शकतो. प्रत्येक व्यक्तीला समृद्धपणे जगण्याचा अधिकार आहे पण धूर्त व कावेबाज वृत्ती रुजविणारी व पोसणारी माणसे अगतिक माणसाची हाडे चघळतात, त्यांचे रक्त पितात, चिरगुट नसलेल्यांना नग्न करतात.

कवीला ही दृष्टी ही एका नैतिकतेमुळे प्राप्त झाली आहे. या नैतिकतेमुळे कवी म्हणतो,

विसाव्या शतकाच्या शेवटच्या टोकावर उभा राहून,
एका हातात सूर्य, दुसऱ्या हातात चंद्र घेऊन
मला माझ्या संकल्पाचे भान आहे
एकलव्याच्या तुटलेल्या बोटातील
रक्ताचे मोल आहे
तेच माझे इमान आहे
मी माझा शब्द गहाण टाकणार नाही
मोडेन पण कधी वाकणार नाही
हे क्षात्रतेज अविचल निष्ठेमुळे येऊ शकते.

क्षत्रिय बाणा कोणता ? हा प्रश्न बुद्धाच्याही जीवनात निर्माण झाला होता. सिद्धार्थ गौतम हा क्षत्रिय होता. धर्मशास्त्र विशद करते म्हणून आप्तेष्टांशी लढणे हा क्षत्रिय बाणा होता. सिद्धार्थ गौतमाने या अविवेकी क्षत्रिय बाण्याला नकार दिला होता. सिद्धार्थाच्या विवेकी, प्रगल्भ व संयमित मनातून हा नकार उद्भवला होता. या नकाराने मानवतेची हमी दिली होती. मानवता सुरक्षित केली होती. संघर्ष हा जगण्यासाठी केला पाहिजे, युद्ध हे मानवतेच्या प्रस्थापनेसाठी केले पाहिजे असा सृजनशील अर्थ सिद्धार्थ गौतमाने नकारातून स्पष्ट केला होता. सिद्धार्थाच्या लेखी मानवता विकसित करणे हा क्षत्रिय बाणा होता. हा बाणा सिद्ध करण्यासाठी राजवैभवाचा त्याग करणारा सिद्धार्थ महाक्षत्रिय होता. त्याने शब्दाचे इमान राखले होते, त्याने ईश्वर व कर्मकांड नाकारले. आत्मा व पुनर्जन्म नाकारले. हा समग्र नकार तो नैतिकतेच्या बळावर देऊ शकला हे त्याचे इमान होते. या इमानामुळेच तो तथागत झाला. वामन निंबाळकरांच्या नैतिकतेमुळे त्यांची नजर तथागताजवळ पोहचू शकली, तथागतानेच त्यांना ही शक्ती दिली, ही शक्ती अशी साकारली,

आभाळ डोळ्यात साठवून
मी नजर पुढे केली
तशीच ती थेट तथागताजवळ नेली
आता मी उभारीन क्षितिजावर
मानवतेची इंद्रधनुषी कमान
मला माझ्या संकल्पाचे आहे भान

संकल्पाचे भान ठेवणारा हा कवी तथागतासारखा माणूस, माणुसपण व माणुसकी जन्माला यावी यासाठी चालतो आहे. तथागताकडून प्रेरणा घेऊन प्रेमाच्या निर्मितीसाठी व बंधुता रुजविण्यासाठी आपली काव्यशक्ती वापरतो आहे. तो म्हणतो,

माझे शब्द तुफानात पेटलेल्या मशाली
त्यातच प्रकाशमान करीन
तुमच्या ख्याली-खुशाली
मी घराघरातून लावणार आहे दिवे
सर्वांना हाकारून करणार एकत्र
गळयात गळा घालणारी भेट घालीन
दिवस रात्र
अस्तंगत झालेल्या या सूर्याच्या किरणांची
माझ्या लेखणीत आहे साठवण
माणसाशी माणसासारखे वागावे
याचीच करून देणार पुन्हा एकदा आठवण

स्वातंत्र्य, समता, न्याय, बंधुता ही प्रकाशमूल्ये राष्ट्रीय एकात्मता सिद्ध करतात. ज्या राष्ट्रातील समाजव्यवस्था विषमता, पिळवणूक व दंभ यावर आधारित असेल ते राष्ट्र एकात्म पाहणे ही स्वप्नाळू आदर्श कल्पना ठरू शकते. तेव्हा ही प्रकाशमूल्ये प्रस्थापित करण्याचे, ती रुजविण्याचे काम तीव्र इच्छाशक्ती बाळगणाऱ्या माणसाचे आहे. गतिनिष्ठ प्रज्ञावंताचे आहे. हे उमजून कवी म्हणतो की,

हे रस्ते चालणारे नसतात
आपणास त्यावर चालावे लागेल

निर्जिव रस्ते चालू शकत नाही. ही वस्तुस्थिती प्रत्येक स्थितिशील मनाने नाकारली आहे व नाकारित आहे. ही स्थितिनिष्ठ भूमिका ज्या मनाने स्वीकारली आहे ते मन बदलविणे अशक्य नाही. गतिनिष्ठ मनासाठी हे आव्हान आहे. हे आव्हान गतिनिष्ठ मनाने स्वीकारले पाहिजे असे वामन निंबाळकर सांगतात. कारण त्यांना पूर्णपणे उमजले आहे की,

माणूस कधी चिखल असतो, दगड असतो
त्याला घडवावे लागेल
तेव्हाच तो स्वत्वाने जागेल
आणि माणुसकीने वागेल.

माणसाच्या मर्यादा या कवी मनाला जाणवल्या आहेत, या मर्यादांची बैठक या कवीने शोधली आहे. म्हणून हा कवी आक्रस्ताळेपणा करीत नाही. समंजस मनाने सांगतो की माणसाला घडवावे लागेल. त्याच्यावर संस्कार करावे लागतील. तेव्हाच तो स्वत्वाने जागेल. तेव्हाच तो माणुसकीने वागेल.

स्वत्व जागविण्यासाठी संघर्ष करावा लागेल. निर्मितीक्षम संघर्ष करणाऱ्याच्या खांद्यावर विजयाचे झेंडे असतात ही ग्वाही देताना निंबाळकर म्हणतात की,

चालताना जो वादळ झेलत चालतो
भूकंपाचे धक्के खातो
समुद्र लाटा ओलांडून जातो
त्याच्या अंगाखांद्यावर
विजयाचे झेंडे असतात.

इतका आत्मविश्वास या कवीमनाला आहे. हे मन हताश होत नाही. हताश होणारे मन कधीच उर्जस्वल नसते. निंबाळकरांचे उर्जस्वल मन आपल्या दोस्तांना मंत्र देतात. हा मंत्र समृद्ध जीवन जगण्याची अपेक्षाही व्यक्तविते.

हे माझ्या प्रकाशमान मित्रांनो !
या असे जवळ या
तुमच्या माझ्या प्रकाशाने
या अंधारकोठड्या उजळून टाकू
माणसांना माणूसकीच्या क्षितिजावर
नेणारे रथ हाकू

माणुसकीचे क्षितिज गाठल्याशिवाय मानवी जीवन समृद्ध होऊ शकत नाही. परिवर्तनाचा विचार करणाऱ्या मित्रांना, क्रांतीचा विचार करणाऱ्या दोस्तांना स्वतेजाने अंधार कोठड्या प्रकाशमय करण्याचे आवाहन हा तेजाळलेला कवी करतो. तेव्हा या कवीच्या मनाचा शोध घेणे अधिक सोपे होते. स्वतेजाची व स्वशक्तीची जाणीव होणे, ही विशिष्ट परिस्थितीत, विशिष्ट व्यवस्थेत क्रांतिकारी घटना ठरते. वर्णाधिष्ठित समाजव्यवस्थेत ही प्रलयंकारी अवस्था ठरते.

धर्माच्या आधाराने जातीयता व अस्पृश्यता पोसली गेली आहे. कर्मठवृत्तीने स्त्री-शूद्रातिशूद्रांना बंदिस्त केले आहे, शतकांपासून अंधारकोठडीत खितपत टाकले आहे. अशा या अंधारकोठड्या उजळून टाकू म्हणणारे हे कवीमन पराभूत इतिहास व बंद परंपरा नाकारते आहे. स्त्री-शूद्राति-शूद्रांना पांगळे करणारी संस्कृती नाकारते आहे. अधर्माला धर्म म्हणणारी मानसिकता नाकारते आहे. प्रकाशमूल्ये प्रस्थापित करण्यासाठी संघर्ष करते आहे. त्यामुळे या मनातून अशा ओळी जन्माला येतात,

कित्येक अंधाऱ्या कोठड्यांचे, तळघराचे
कुलपे, दरवाजे तोडून मी आलो आहे
त्या दैदिप्यमान सूर्याच्या किरणांची ऊंच
प्रकाशाची वस्त्रे मी घालणार आहे

शोषणाधिष्ठित व्यवस्थेत जीव असणारी माणसे मृतावस्थेत जगतात असा हा विरोधाभास शोषणाधिष्ठित व्यवस्थेतच असू शकतो, अशा व्यवस्थेतील ज्ञानाची व परंपरेची घृणा सुरूप मनाला आलीच पाहिजे. सुरूप मनाचे ते एक व्यवच्छेदक लक्षण आहे. अशी घृणा बुद्धाला आली म्हणून त्याला सम्यक् ज्ञानाची प्राप्ती झाली. इथे हे लक्षात घेतले पाहिजे की घृणा म्हणजे द्वेष नव्हे. त्यामुळेच निंबाळकरांच्या कवितेत द्वेषापोटी जन्माला येणारा तळतळाट नाही, सर्वनाश करणारा संताप नाही की शाप देणे नाही. आक्रोश नाही की तक्रार नाही. किंबहुना वांझोटा अनुनयही नाही.

निंबाळकरांच्या कवितेत विवेक आहे, विचार आहे, हा विवेक भरकटलेल्या, अगतिक झालेल्या व मतिशून्य माणसांना एकत्र आणणारा आहे. हा विचार समूहशक्ती विकसित करणारा आहे. हा विचार भरकटलेल्यांशी नाते तोडणारा नाही. उलट अज्ञानी माणसांशी नाते जोडणारा आहे. त्यांच्या मनात विश्वास निर्माण करणारा आहे. धर्मभोळ्या जीवांना धर्माचा अर्थ सांगणारा आहे. त्यांना मुक्त करणारा आहे. प्रकाशाची वस्त्रे घालणाऱ्या या कवीचे मन निश्चितच सुंदर आहे. म्हणूनच या मनात विद्रोह फुलला आहे, सुंदर मनातच विद्रोह फुलू शकतो. सुंदर मनात फुललेला विद्रोह सम्यक् विद्रोह असतो. ■

महायुद्ध : वामन निंबाळकर
प्रबोधन प्रकाशन, नागपूर
पृष्ठे १०४; मूल्य २५ रु.

ताडा : एक प्रांजळ आत्मनिवेदन

वसन्त वाहोकर

'लमाण' ही एक वऱ्हाडी, विदर्भातली, जमात. तिचे वास्तव्य ज्या खेडेवजा ठिकाणी असते त्याला 'तांडा' असे संबोधन आहे. इथे आर्थिकच नाहीतर वैचारिक, शैक्षणिक, सांस्कृतिक मागासपण अजूनही आहे. विसावे शतक संपेल. एकविसावे उजाडेल पण तांडा आहे तिथेच असेल. विज्ञानानं उपलब्ध होणाऱ्या सर्व सुखसुविधांना तांडा कदाचित अजूनही पुजाऱ्यांच्या आशीर्वादाची शक्ती किंवा पुढाऱ्यांच्या आश्वासनांची पूर्ती मानत असेल. खरं म्हणजे तांड्याला कुठलेही प्रश्न नव्हते. प्रश्न पडत नाहीत. किंवा प्रश्न समजत नाहीत. प्रश्न पडतात ते प्रस्तुत लेखकाला. 'तांडा' हाच ज्याचा जन्म आणि मरणाचा संबंध राहिला आहे. अशा शिक्षित सुजाण सवेदनाशील तरुणाला, आत्माराम कनीराम राठोड ह्या कविमनाच्या तरुणाला, चळवळीत कार्यकर्ता म्हणून जग पाहू जाणाऱ्या एका आदिवासी विचारप्रवण माणसाला. प्रश्नं अनेक आहेत, जसे प्रश्नांचेच एक अस्ताव्यस्त अरण्य दाटले आहे आणि त्या अरण्यात या युवकाची भटकंती ही एक दमछाक होत आहे.

'तांडा' काय नाही ? रीतिरिवाज, चालीरीती, समजूती, अंधश्रद्धा, शोषण, अज्ञान ह्या सगळ्यांचे एक महायुद्ध आहे. राजकीय, शासकीय, सामाजिक भ्रष्टाचार–शोषणाची धडधडीत नोंद आहे. कैफियत आहे. स्वतः लेखकाने स्वतःचाच व सोबत तांड्याचा शोध घेण्याचा एक धाडसी प्रयत्न आहे. अनेक दिग्गजांचे वस्त्रहरण करण्याचे एक योजनाबद्ध कृत्य आहे. आणि हे सगळे असेल नसेल पण 'तांडा' हे एका आदिवासी लमाण युवकाचे खूपसे प्रांजळ असे आत्मनिवेदन आहे.

लेखकाची कौटुंबिक पार्श्वभूमी ह्या लेखनाला लाभली आहे. तिथले दारिद्र्य, अज्ञान, अंधश्रद्धा अशी इतर परिमाणे ह्या पार्श्वभूमीला अधिक प्रभावी करण्यासाठी सहज उपलब्ध आहेत. दुर्दैवाचा कायम फेरा आहेच. अपसमजूती, गैरसमज, पायात खिळे मारल्यासारखेच आयुष्याची वाटचाल करत आहेत. मग ज्यावर आशा आकांक्षा केंद्रित व्हाव्या असे सांगण्यासारखे इतर काही आहे का ? माणुसकीचा ओलावा, धीराचे, सांत्वनाचे शब्द, पाठीवर फिरणारा एखादा समजूतदार हात ? अस्मिता फुलून बहरून यावी असे एखादे हिरवेसे बेट ? उगवत्या सूर्याचे कोवळे आश्वासन ?

इथे व्यक्ती आणि वल्लींची तशी बेसुमार गर्दी आहे. काही त्यांच्या सत्य नावारूपानं भेटतात, काही नावं रूपं बदलून. कोणत्याही रूपात त्या फार अपरिचित नाहीत. ज्या प्रांत–प्रदेशाशी संबंधित हे लेखन आहे तिथली माती, तिथली माणसं ह्या व्यक्तींना जवळून ओळखून आहेत. त्यामुळे थोडे कुतूहल, थोडी जिज्ञासा, थोडी अपेक्षापूर्ती असे मिश्र-संमिश्र भान जागत राहिले आहे. कथानकाच्या ओघात हे भान, ह्या व्यक्ती कधी चकवतात, कधी त्रस्त करतात, कधी माणुसकीचा गहिवर आणून देतात. पण नेमके एक निश्चित मात्र हातात काही लागत नाही. आपलीही अवस्था खूप सैरभैर भरकटल्या शीड भरलेल्या तारूसारखी दिशाहीन होते. काही उपाय सुचत नसल्यासारखी. हातातून सारी सूत्रं, नियंत्रणाच्या कळा हरवून बसल्यासारखी.

"नसतं नाकारलं त्यांनी माझं माणूसपण तर जीवनाची उमेद क्षय झालेल्याच्या छातीसारखी पोखरून गेली नसती. आणि जन्मापासून जपलेली स्वप्नं महारोग्याच्या बोटासारखी गळून पडली नसती डोळ्यातून...हातातून."

–असं एक सूत्र लेखनाला अभिप्रेत आहे. त्याभोवती कितीतरी पसारा आहे. रती आहे. तिचे नाटक–साहित्याशी नातं जुळवून फसवणूक करणारे, अव्हेरणारे प्राचार्य वडील आहेत. सानावतजी आहेत. भाईजी आहेत. ह्या सगळ्यांच्या सुरुवातीच्या सुखद अनुभूतीपुढे मात्र कटू आठवणी, म्हणून आयुष्याचे डाग होऊन राहतात.

तांड्यातील आठवणी आणि निवेदनातली लेखकाची चीड विचारात घ्यायला हवी. एखाद्या अत्यंत जिव्हाळ्याच्या व्यक्तीविषयीची सुद्धा पराकोटीची घृणा का निर्माण व्हावी ? प्राप्त परि-स्थितीचे आघात की एखाद्याचा अशा प्रकारचा अगदी वैयक्तिक पराभव ? घटनाक्रमात जे घडले ते स्वीकारण्याचे सुजाणपणच उरले नाही म्हणून की घडले ते तेवढ्याच पातळीच्याही खालचे घडले म्हणून ? निवेदनाचा उद्देश खरा की त्याची शैली–भाषा, तिचे असे स्वैर होणे खरे ? लेखकाचा अशा पद्धतीनं तोल जाणे खरे ? की वर्तमानाचे दाहकत्व खरे ? अथवा या प्रश्नव्यूहात सापडणेच खरे ?

येथे परिस्थितीतून सुचलेलं शहाणपण तत्त्वज्ञानाच्या रूपात संपूर्ण मजकूर व्यापून राहिले आहे. तसेच दाहक परिस्थितीची दाहकता तेवढ्याच जहालपणे व्यक्त होण्याची खुमखुमी देखील आहे.

तांड्यापासून सुरुवात झालेले हे लेखन केवळ त्या प्रांत, परिसरापर्यंतच थांबले नाही तर गल्ली ते दिल्ली म्हणजे नागपूर, मुंबई, शहादा, धुळे असे कुठे कुठे शोध घेत आयुष्याला साद घालते आहे, सेवादास चरित्र लेखन, पोथी, ओव्या, प्रवचनं, पत्रकारिता, नेतेशाही, बकाल-भंकपपणा, आजारपण, अवहेलना आणि कौटुंबिक पडझड अशा कितीतरी अंगांनी...कितीतरी दिशांनी एक प्रवास सुरू असतो. त्यात गद्य असते, तशी कविता असते, आणि पोवाडादेखील.

'तांडा' ही केवळ कादंबरी आहे असे म्हणणे हे जसे धाडस आहे तसेच ती 'कलाकृती' आहे हे म्हणणेही. (दुसरे धाडस)

जगतानाचे आयुष्य हे वेगळे असते आणि लिहितानाचे दुसरे ! माणूस आणि लेखक अशी 'सोईची' गल्लत मात्र होता उपयोगाची नाही. 'तांडा'मध्ये अशी गल्लत फार आहे. लेखक कुठेतरी कोपऱ्यात जणू अंग चोरून आणि माणूस त्याचेवर डोळे रोखून, काठी उगारून असा प्रकार. त्यामुळे स्वाभाविक ओबडधोबडपणा, भाषेकडे–शैलीकडे कानाडोळा, बरीचशी कृत्रिमता, व्यक्ति-चित्रणातली दुटप्पी नीती, अशा काही गोष्टी अगदी सरळसरळ जाणवतात. मात्र गुंगवून, खिळवून ठेवणारे जबरदस्त कथानक या बाबींकडे सहज काणाडोळा करायला लावू शकले असते पण तेही झालेले नाही. कथानकातली धरसोडही अशीच खिन्न करणारी आहे. आत्मनिवेदनाचे स्वरूप घेऊन एक लेखक म्हणून सर्जनशील अंत:करणाने एक कलाकृती घडवण्याच्या प्रेरणेने लेखकाला भारून जाता आले नाही. लेखक आणि माणूस या संबंधात लेखक पराभूत झाला आणि माणूस पुढे सरसावला आहे. तो वाचावासा वाटतो पण खिळवून ठेवत नाही. दुखवतो पण अस्वस्थ करून टाकत नाही. सगळे रोख भांडवल लाभूनही 'कलाकृती'ची होण्याची एक अस्सल शक्यता असणारी पातळी तो कां गाठू शकत नाही ? हे एक कोडेच आहे ? लेखकाने हे कोडे आपल्याला उमगावे याचा फार प्रयत्न केलेला दिसत नाही. एक प्रकारचा एकांगी, एकारलेपणा आणि स्ववर्तनाचे समर्थन करण्याची, स्वत:ला सहज सोडवून घेण्याची वृत्ती हे दोष 'तांडा' दूर सारू शकलेले नाही.

लेखकाचे पूर्वायुष्य हे दु:खाकष्टाचे आणि त्याची सुरुवातही तशी विपन्नावस्थेतली. त्याचे एकूण तपशील बारीकसारीक आठवणीसह आले आहेत. कामावरचे गडी शेजारी, तांड्यावर येणारे बाहेरचे, नाईक मंडळी, नेते, पोरींवर डोळा ठेवणारे, लुटणारे, फसवणारे, अज्ञानाचा फायदा उपटणारे सारे सारे या आत्मनिवेदनातून भेटतात.

मात्र एका विशिष्ट लमाण वंजारा जमातीबद्दल जाणून समजून घ्यावे असे यात खूप आहे. त्यांचे अज्ञान–रूढी परंपरेने येणारे भोळेपण आणि त्यातून होणारे त्यांचे आर्थिक. सामाजिक...

राजकीय शोषण, सुशिक्षितांपासून त्यांना लाभलेले तुटलेपण इत्यादि. ते आत्माराम कनीराम राठोड या लेखकाने त्याच्या समज आणि कुवतीनुसार आपणापर्यंत पोहचवण्याचा प्रयत्न केला आहे तो प्रयत्न समजून घेतला पाहिजे. ■

तांडा : आत्माराम कनीराम राठोड
अभिजीत प्रकाशन, नागपूर.
साठ रुपये

खडकातील निर्झर

सुनंदा देशपांडे

स्त्री जीवनावर प्रकाशझोत टाकणाऱ्या कथासंग्रहात भर टाकणारा आणखी एक कथासंग्रह. सौ. प्रतिभा कुळकर्णी या लेखिकेने लिहिलेल्या या कथांमध्ये स्त्रीवरील एकूणच जुलुमाचे प्रकर्षाने चित्रण केले आहे. एकशेएक पानांच्या या पुस्तकात एकूण सोळा कथा आहेत. खरे तर कथेसाठी निवडण्यात आलेले विषय चांगलेच. त्यामानाने या पुस्तकात नमूद केलेल्या कथा अधिक विस्ताराने व स्त्री स्वभावाचे सखोल व सूक्ष्म चित्रण करण्यास थिटया पडल्या आहेत.

या कथासंग्रहातील कथांचा विशेष हा की, यातील एकूणएक कथा स्त्रीच्या भावविश्वाशी निगडीत झाली आहे. स्त्रीच्या अनुभवविश्वापलीकडे डोकावून पहाण्यास लेखिका थिटी पडली असे वाटते. फक्त 'फ्लॅट सिस्टिम' ही कथा याला अपवाद आहे. 'सोन्याचं पान'च्या कथेतून प्रतीत होणारा स्त्रीविषयीचा नवा-जुना दृष्टिकोण 'बाई आणि नोकरी' या कथेपर्यंत अधिक बंडखोर बनताना दिसतो. आपल्या लेकाला मुलीच झाल्यात म्हणून त्याचे दुसरे लग्न लावण्याच्या तयारीत असलेली म्हातारी मात्र ज्याप्रमाणे एका बुरसटलेल्या मनाचे दर्शन घडवते तर दुसरीकडे नवरा-बायको नोकरीची असताना बाईप्रमाणेच पुरुषानेही घरातली जबाबदारी उचलावी असे म्हणणाऱ्या स्त्री चित्रणातून आधुनिक काळातील बंडखोर स्त्री मनाचे दर्शन आपल्याला घडते. आपल्या लाडक्या लेकाच्या मृत्यूने घायाळ झालेले मन सुनेचा स्वीकार जेव्हा लेक म्हणून करते तेव्हा स्त्री मनाचा आधुनिक काळात विस्तारलेला दृष्टिकोनच वाचकाच्या मनाला सुखावून जातो. नोकरीमुळे सुखाच्या संसारातही परपुरुषाकडे आकर्षित झालेल्या स्त्री मनाचे 'हिंदोळा' या कथेतील चित्रण आजच्या धीट स्त्री मनाचे वास्तव दर्शन घडवते.

'खडकातील निर्झर' हे शीर्षकच स्त्रीमनाचे पारदर्शित्व दर्शविते. स्वतःच्या बळावर संघर्ष करू बघणारी स्त्री खडकाप्रमाणे कठीण आणि कठोर वाटत असली तरी तिचे अंतर्मन मात्र निर्झरासारखे द्रवणारे असते. 'खडकातील निर्झर' या कथेतील नायिका नवऱ्याच्या उपेक्षेने पेटून उठते आणि स्वबळावर नावलौकीक मिळवते. अशा या खंबीर व्यक्तिमत्त्वाच्या अंतर्मनात मात्र पतीला एकदा तरी भेटण्याचा आक्रोश उच्छाद मांडत असतो. स्त्रीच्या खंबीर व्यक्तिमत्त्वाचे कवच गळून पडून त्यातील खळाळत्या निर्झराचे दर्शन आपसूकच वाचकांना घडते. 'वृंदावनातील तुळस' या कथेमध्ये पहिल्या, दुसऱ्या, तिसऱ्या पिढीचे चित्रण आले आहे. कथेच्या अती गतिशीलतेमुळे कथेची खोली हरवते. उथळ पाण्यासारखी कथा सारखी धावत राहते. कथा वाचून संपताच कथेचा परिणामही वाचकांच्या मनावरून पुसला जातो. संग्रहातील कोणतीही कथा वाचकांच्या मन... चिरकाल ठसा

उमटविणारी नसल्यामुळे कथासंग्रह संपल्यानंतरही लेखिकेच्या लेखणीची अनुभवसंपन्नता वाचकांना नजरेस पडत नाही. काहीवेळा तर या कथा केवळ वरवरच्या वाटतात. असे असले तरी स्त्री मनाची भावनिक आंदोलने तसेच एका स्त्री लेखिकेने स्त्री मनाचा वेध घेण्याचा केलेला प्रयत्न म्हणून या कथासंग्रहाकडे बघायला हवे.

रवीमुकुल, पुणे यांचे मुखपृष्ठ व 'खडकातील निर्झर' हे नाव स्त्री मनातील निर्झराच्या स्वरूपाचे यथायोग्य दर्शन घडवते. शीर्षकावर रेष न दिल्याने निर्झराची गतिमानता रेखाटण्यात मुखपृष्ठकाराला यश आलेले आहे. ■

खडकातील निर्झर : सौ. प्रतिभा कुळकर्णी
जानकी पब्लिकेशन्स, एस–१८, राणी लक्ष्मीनगर,
नागपूर ४४० ०२२
पृ. सं. १०१, मूल्य ३५/–

'युगवाणी' मिळत नाही ?

युगवाणीचा अंक पोस्टाने पाठविल्यानंतर तो मिळत नसल्याच्या अनेक तक्रारी येतात. तसेच अपुऱ्या पत्त्यामुळे / पत्ता बदलल्यामुळेही अंक परत येत असतात. परिणामी बराच डाकव्यय वाया जाऊन संस्थेला भुर्दंड सोसावा लागतो. सर्व सभासदांना / वर्गणीदारांना युगवाणीचा अंक नियमित पाठविला जात आहे, याची विशेष काळजी आम्ही आमच्याकडून घेत आहोच. आपणाकडून कृपया पुढील सहकार्य मिळावे.

- ज्या महिन्याचा अंक असतो त्याच्या पुढील महिन्याच्या पंधरा तारखेपर्यंत तो आपल्याला मिळावा ही अपेक्षा असते. तरीही अनेकदा पोस्टाच्या दिरंगाईमुळे तो आपल्यापर्यंत पोहोचण्यास बराच वेळ लागतो. तेव्हा त्या महिन्याच्या पंधरा तारखेपर्यंत थांबूनही आपल्याला अंक न मिळाल्यास, प्रथम आपल्या गावच्या / विभागाच्या पोस्टात चौकशी करा—लेखी तक्रार द्या व तिची एक प्रत पुढील कार्यवाहीसाठी आम्हाला पाठवा.
- अंक शिल्लक असल्यास आपल्याला तो आवर्जून पाठविण्यात येईल.
- आपण आपला पत्ता पूर्ण व अचूक नोंदला आहे काय ? पत्त्यात झालेला बदल, कार्यालयाला त्वरित कळविण्याची आपण कृपया काळजी घ्यावी, शक्यतोवर घरचाच पत्ता द्यावा, संस्थेचा / कार्यालयाचा देऊ नये.
- आपली वर्गणी संपलेली नाही ना ? आपले नाव नियमित सभासदांच्या / वर्गणीदारांच्या यादीत आहे याची खात्री करून घ्यावी.
- पत्ता बदलल्यामुळे परत आलेला व पुढील अंक सभासद / वर्गणीदारांकडून कार्यालयाला नवीन पत्त्यांची रीतसर सूचना मिळेपर्यंत पुन्हा पाठविले जात नाहीत.

मनोहर म्हैसाळकर
सरचिटणीस
विदर्भ साहित्य संघ

॥ प्रतिक्रिया ॥

ज्ञानेश्वरीतील श्रृंगारविश्व

: १ :

संपादक, युगवाणी / स. न. वि. वि.

जुलै ९१ च्या 'युगवाणी'मधला 'ज्ञानेश्वरीतील श्रृंगारविश्व' हा डॉ. सु. बा. कुळकर्णी यांचा लेख अतिशय अभ्यासपूर्ण व विचारगर्भ वाटला. ज्ञानेश्वरांच्या साहित्यातून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा व चरित्राचा शोध घेण्यात डॉक्टरसाहेब यशस्वी झाले आहेत. इतक्या प्रचंड कालावधीनंतर का होईना, पण ज्ञानेश्वरांचे खरे व्यक्तिमत्त्व व चरित्र कसे असावे हे बिनतोडपणे, निर्भीडपणे व परंपरागत चाकोरीबद्ध साहित्य कल्पनांच्या बाहेर निघून सांगण्याचे धारिष्टच दाखविल्याबद्दल त्यांचे हार्दिक अभिनंदन.

ज्ञानेश्वरांच्या कालनिश्चितीबाबत एका पक्षाने असे म्हटले आहे की, ज्ञानेश्वर हे ज्ञानेश्वरी लिहितेवेळी सत्तरीच्या आसपास होते. अशा लेखकांचे चाकोरीबाह्य लेखन ज्ञानेश्वरांचे उपासक म्हणवून घेणाऱ्यांना रुचले नाही. त्यांनी या लेखकांविरुद्ध आघाडी उघडली. त्यामुळे घाबरून जाऊन या लेखकांपैकी काहींनी नंतर आपली भूमिका बदलली, काहींनी त्यावर लिहिणे बंद केले, तर काहींनी डॉ. साहेबांच्या मतानुसार 'मधाळ' लेखणी वापरली. परिणामी ज्ञानेश्वरांचे खरे व्यक्तिमत्त्व समजून घेण्यासाठी त्यावेळी अनायसे चालून आलेली संधी मराठी वाचकांना गमवावी लागली. ती आता कुळकर्णीसाहेबांच्या लेखाच्या निमित्ताने पुन्हा मिळाली आहे. या लेखातील बिनतोड युक्तिवाद निश्चितच मराठी वाचकांना त्यांच्या मनातील आजपर्यंतच्या ज्ञानेश्वरांबाबतच्या कल्पनाविश्वाला छेद द्यायला भाग पाडेल. सत्य वगळून ज्ञानेश्वरांचे चरित्र वर्तवीत गेल्याने मराठीतील हा जनहितकर्ता 'वंडवाला' कवी सर्वसामान्य लोकांपासून दुरावल्या गेला. त्यामुळे ज्ञानेश्वरांची प्रतिमा उंचावण्याऐवजी ती धूसर किंवा अंधूक होऊन सर्वसामान्य माणसांची व ज्ञानेशांची फारकत झाली. त्यांच्यामध्ये मोठी दरी निर्माण झाली. मीही स्वतः ज्ञानेश्वरभक्त आहे. मला तर ज्ञानेश्वरांविषयी वाटणारी श्रद्धा हा लेख वाचून तसूभरही कमी झाली नाही. ज्ञानेश्वरांच्या साहित्यातून व्यक्त होणारे त्यांचे व्यक्तिमत्त्व बहुआयामी वाटते. कारण प्रत्येक गोष्टीतील बारकावे, जगातील प्रत्येक शास्त्राची माहिती, जीवनाचे बारीक निरीक्षण ह्या सर्व गोष्टी ज्ञानेश्वर गृहस्थ जीवनापासून अलिप्त असलेले अपोगंड ब्रह्मचारी होते; हे मान्य करण्याच्या आड येतात. असे असतानाही '१६ वर्षाच्या अपोगंड ब्रह्मचाऱ्याने ज्ञानेश्वरी लिहिली.' असे म्हणणे म्हणजे 'दगडी देवाने नैवेद्याची चव सांगण्याइतपत' अडाणीपणाचे ठरेल. तूर्त मी इतकेच म्हणेन की ज्ञानेश्वर हे सर्वांगीण जीवनाचा रसिकतेने अनुभव घेणारे बहुआयामी व्यक्तिमत्त्व होते; कारण त्यांच्या साहित्यातून विशेषतः ज्ञानेश्वरीतील जीवनविषयक तत्त्वज्ञानातून व श्रृंगारिक वर्णनातून त्यांची हीच छबी डोळ्यांसमोर निर्माण होते.

ज्ञानेश्वरांच्या ज्ञानेश्वरीतूनच नव्हे तर अमृतानुभव, चांगदेव पासष्टी व इतर अभंगरचना यांमधूनही त्यांच्या बहुविध व्यतिमत्त्वाच्या विविध पैलूंवर प्रकाश पडतो. जरी त्यांनी स्वत.च्या चरित्राविषयी कोठेही उल्लेख केलेले नसले, किंवा त्यांच्या कोणत्याही समकालीन लेखकाने फारसा त्यांच्या चरित्रावर प्रकाश टाकला नसला, तरीही त्यांच्या अक्षर वाङ्मयरचनेमधील शब्दाशब्दातून ज्ञानेश्वरांचे व्यक्तित्व कसे होते हे आपणास नेणीवेच्या पातळीवरून कळल्याशिवाय राहत नाही. कुठलाही वक्ता किंवा लेखक जे बोलतो किंवा लिहितो ते ह्या जगातील त्याच्या अनुभवाला आलेले

संचित असते. संसारातील चित्रित केलेल्या घटनांचा तो साक्षीदार असतो. त्याने स्वत: वर्णन केलेल्या घटनांशी, भावनांशी वा विचारांशी त्याचा स्व–पर–तटस्थ यापैकी कुठलातरी संबंध असतो. म्हणजेच त्याच्या स्वत:विषयीची माहिती अनपेक्षितपणे त्याच्या भाषणातून वा लेखणीतून उतरणार हे निर्विवाद ! अर्थात ज्ञानेश्वरही याला अपवाद असू शकत नाहीत. त्यांनी स्व–पर-तटस्थ यापैकी कुठल्यातरी एका भावनेने स्वत:च्या साहित्यातून मांडलेला अनुभव घेतलेला असणारच ! आता एक प्रश्न असा उद्भवतो की, त्यांच्या साहित्यातील विशेषत: ज्ञानेश्वरीतील 'शृंगारिक अनुभव' हे वरीलपैकी कोणत्या भावनेने घेतले असणार ? आता ते अनुभव इतक्या बारकाईने, तपशीलवार व स्त्री–पुरुषांच्या खाजगीतील आहेत, की त्यांचा अनुभव पर वा तटस्थपणे घेता येणे शक्य नाही. इतके ते वैयक्तिक, खाजगी, गुप्त, उत्कट आणि तपशीलवार आलेले आहेत. थोडावेळ आपण हे अनुभव ज्ञानेश्वरांनी 'पर' वा 'तटस्थ'पणे घेतले आहेत, असे जरी गृहीत धरले, तरी त्यांचे विवेचन इतक्या बारकाव्यांनिशी, तपशीलवार व उत्कटपणे झाले आहे. की ते अपौगंड ब्रह्मचाऱ्याला करणे शक्य नाही.

उदा. 'आंधळे हारिरू मातले । का डोंगरी जैसे पेटले ।
तैसे विषयी सुटले । चित्त जयाचे ॥' (१३–९८ साखरे महा. प्रत.)

किंवा– 'चोरियेचे धन आले । तरी कोणाशी विष जाले ।
वालभे परद्वार केले । कोढी कोणी होय ॥' (१६–४ साखरे महा. प्रत.)

या उदाहरणातील उत्कटता, जाज्वल्य रसिकता व बारकावे अगदी स्वत: कवींनी अनुभवल्यागत वर्णिली आहेत. ह्याशिवाय शृंगाराचे अनेक प्रकार, सुंदर स्त्रियांच्या नामावली व वर्णने, कामशास्त्रातील माहिती, स्त्री–पुरुष रतिक्रीडेची बारीकसारिक वर्णने व भोगलोलुप माणसालाही माहिती नसतील इतकी स्त्रियांची व वेश्यांची नावे, ही ज्ञानेश्वरांच्या लेखणीतून लीलया बाहेर पडलेली दिसतात. सुरताचे वर्णन करताना तर ज्ञानेश्वरांची रसिकता कळसच गाठते.

उदा. 'तिये आलिंगन मेळी । होय आपेआप कवळी ।
तेथ जळ जैसे जळी । वेगळे न दिसे ॥' (५–१३३ साखरे महा. प्रत.)

किंवा– 'खरी टेको नेदी उडे । लातोनि फोडी नाकाडे ।
तऱ्ही जेवी न काढे । माघौता खरू ॥' (१३–७०५ साखरे महा. प्रत.)

अशीच उत्कट, बारकाव्यांनी युक्त सुरताची वर्णने ज्ञानेश्वरीत इतरत्रही आली आहेत. रतिक्रीडेच्या अशा वर्णनांतील बारकाव्यांवरून, उत्कटतेवरून व तपशीलवार निवेदनावरून, हे लेखन एखाद्या १६ वर्षाच्या अपौगंड ब्रह्मचाऱ्याने लिहिले असावे; हे खरे वाटत नाही.

बरे थोडावेळ आपण असे गृहीत धरू की, ही वर्णने कुमार ज्ञानेश्वरांनी पर–तटस्थ या भावनेने लिहिलीत. मग येथे हेही विचारात घ्यावे लागेल की, अशी वर्णने लिहिणारा कवी हा शारीरिक व मानसिक विकास झालेलाच असावा लागतो. कारण तसा तो नसेल तर त्याला कामक्रीडेच्या बाबतीत ज्ञान कसे असणार ? येथे ज्ञानेश्वरीकर्त्याचे वय तर चौदा ते सोळा असे कल्पिले आहे. ते या लिखाणाशी विसंगत वाटते. शिवाय आज मानसशास्त्राचा व शरीरशास्त्राचा विचार केल्यास १६ वर्षाच्या आत शक्यतोवर पुरुष अथवा स्त्री शारीरिक व मानसिक दृष्टीने 'मॅच्युअर' होऊ शकत नाही. या दृष्टीनेही ज्ञानेश्वरांचे कुमारवय त्यांनी लिहिलेल्या प्रौढ लेखनाशी विसंगत आहे. शिवाय ज्ञानेश्वरांचा काळ हा आजच्यासारखा तारुण्यसुलभ भावनांना आव्हानात्मक नव्हता. त्यामुळे 'मॅच्युरिटी'ची मर्यादा त्या काळात सोळा वर्षाच्याही वर असणार ! तात्पर्य, ज्ञानेश्वर जर अपौगंड ब्रह्मचारी होते तर मग लैंगिक ज्ञानाविषयी आणि ते सुद्धा अधिकार वाणीने ते कसे बोलू शकतील ?

अनुक्रमणिका

एकंदरीत ज्ञानेश्वरांच्या साहित्यातून त्यांच्या चरित्रासंबंधी जी वरीलप्रमाणे अप्रत्यक्ष माहिती डोळ्यांपुढे येते, त्यातून 'ज्ञानेश्वर हे पूर्वायुष्यात जीवनाकडे रसिकतेने पाहणारे सर्वानुभावी अभ्यासक असावेत व उत्तर आयुष्यात पांडित्य प्राप्त करून व अनुभवाच्या जोरावर सन्यस्थवृत्तीने जगता जगता ज्ञानेश्वरी व इतर ग्रंथ त्यांनी लिहिले असावेत.' हा ज्ञानेश्वरांच्या चरित्राबाबत तर्क लावता येतो.

प्रा. रवीन्द्र ठाकरे
नेहरू वार्ड, हिंगणघाट

: २ :

श्री. संपादक युगवाणी / स. न. वि. वि.

जुलै १९९१ युगवाणीतील डॉ. सु. बा. कुलकर्णी यांचा "ज्ञानेश्वरीतील श्रृंगारविश्व" हा लेख वाचला. मी काही ज्ञानेश्वरीचा अभ्यासक नाही. पण सद्भावाने व श्रद्धेने ज्ञानेश्वरी वाचतो व श्रवण करतो. लेख वाचल्यावर मनात जे काही विचाराचे तरंग उठले ते मी यथामती शब्दांकित करीत आहे.

डॉ. कुलकर्णी हे ज्ञानदेवांच्या शब्दकळेमुळे दिङ्मूढ होतात व त्यांच्यापुढे मानही तुकावतात. एवढेच नव्हे तर त्यांच्या शब्दबद्धतेविषयी अतर्क्य म्हणून बौद्धिक माघारही घेतात. ज्ञानदेवाची आयुर्मर्यादा निश्चित करण्याकरिता प्रचलित पुरावे विसंगत, निराधार व अनैतिहासिक आहेत, वैज्ञानिक दृष्टिकोनाचा संपूर्ण अभाव आहे, आणि अंधश्रद्धेचा वृथा अनुनय आहे, असे ते म्हणतात. मग ज्ञानदेवाची आयुर्मर्यादा ऐंशी वर्षाची होती, व वयाची सत्तरी ओलांडल्यावर ज्ञानेश्वरीची निर्मिती झाली हे त्यांचे तर्कट कोणत्या आधारावर आहे ?

लेखक म्हणतात, "ज्ञानदेवामधील कवी त्यांच्या तत्त्वज्ञानावर मात करताना दिसतो व ज्ञानदेव स्वाभाविकपणे प्रियकर-प्रेयसीमधील प्रेम, विरहवेदना, मधुतृप्ती शब्दबद्ध करतात. कामिनी, कुलवधू, प्रतिव्रता, धांगडी, स्वैरिणी, पण्यांगना यांचा उल्लेख करतात. व आपण वाहावत गेलो याची जाणीव झाल्यावर ईश्वरनिष्ठांच्या मांदियाळीची क्षमा मागतात." व पुढील ओवीचा संदर्भ देतात. " म्हणोनि असोतु इथे वायाणी । कायशी मूर्खाची बोलणी । वाया वाढविता वाणी । शिजेल हन ॥ ९.१८६ ॥ " पण हा संदर्भच चुकीचा आहे. याचा वरील स्त्रियांशी संबंध नसून जे राक्षसी व आसुरी संपत्तीचे लोक आहेत अशा मूर्खांची बोलणी नकोत असे ज्ञानदेव म्हणतात. घरी मात्या-पित्याशी धड न बोलणारा व जगाशी आदराने वागणारा, विवेकाची भाषा अवगत नसणारा, वैराग्याची शीव न पाहणारा, यांना ज्ञानदेवांनी मूर्ख म्हटले आहे. "तरी घरी माता पितरा । धड बोली नाही संसारा । येर विश्व भरी आदरा । मूर्खु जैसा ॥ १८.५९५ ॥ तैसे वैराग्याची शीव न देखती । जे विवेकाची भाष नेणती । ते मूर्ख केवी पावती । मज ईश्वराते ॥४.२५ ॥ जया ऐहिक धड नाही । तयांचे परम पुससी काई । म्हणोनि सांग का वाई । पंडुकुमरा ॥ ४.१५५ ॥ " अशा मूर्खांची बोलणी कशाला ? हे ते वरील ओवीत सांगतात. ज्ञानदेवांनी स्त्रियांना मूर्ख म्हटलेले नाही. येथे श्री. कुलकर्णी यांनी उगीचच वडाची साल पिंपळाला लावली.

स्त्री-पुरुषाच्या आलिंगनमेळी स्त्री स्वतः होऊन कवळा मारते हे वास्तव स्वानुभवाशिवाय अशक्य वाटते असे डॉ. म्हणतात. आणि त्यांत अप्रत्यक्षपणे ज्ञानदेवाला गोवतात. सर्वच बाबतीत स्वतः अनुभव घ्यावा लागतो असे थोडेच आहे ? पुष्कळ गोष्टी अनुभवावाचूनही कळतात. विष सेवन केल्याने मृत्यू येतो याचा कोणी अनुभव घेतला ? अग्नीप्रवेशाने काय होते याची अनुभूती कोणाला झाली ? सापाबरोबर खेळल्याने आणि व्याघ्रसंसर्गाने काय होते याचा अनुभव कोणी घेतला ?

" शिरच्छेदे काय होये । का आगी रिघता कैसे आहे ।। १७.१६० ।। हां गा सर्पेशी खेळो येईल । की व्याघ्रसंसर्ग सिद्धी जाईल । सांगे हळाहळ जिरेल । सेविलिया काई ।। ४.२०३ ।। " मग हे पण ज्ञानदेवाचे स्वानुभव वास्तवच का ? हे तर अनुभवावाचून आपल्या सारख्या सामान्यालाही सांगता येते. मग ज्ञानदेवासारख्या योग्यास काय अशक्य आहे ? योगाच्या वळावर काय करता येते याचे एक उदाहरण देतो.

आदि शंकराचार्य आणि मंडनमिश्र शास्त्रार्थ करीत असताना मंडनमिश्र पराभूत झाले. आपल्या पतीचा पराभव झाला म्हणून अर्धांगिनी या नात्याने – मंडनमिश्राची पत्नी भारतीने शंकराचार्यांपुढे कामशास्त्रावर चर्चा करण्याचा प्रस्ताव मांडला. आता शंकराचार्य पडले बाल ब्रह्मचारी ! कामशास्त्राची त्यांना काय माहिती ? त्यांनी भारतीकडून सहा महिन्याचा कालावधी मागून घेतला आणि आपल्या एका शिष्याबरोबर ते गुहेत गेले. त्यास सर्व वृत्तांत सांगितला. समाधी लावून आचार्यांनी सूक्ष्म-शरीराच्या सहाय्याने मृत झालेल्या अमरूक राजाच्या शरीरात प्रवेश केला. राजा उठल्यावर सर्व राण्यांना, प्रजेला आनंद झाला. आणि सहा महिने पूर्ण होण्यापूर्वीच शंकराचार्याने राजाच्या देहात कामशास्त्राचे अध्ययन केले. ते आपल्या सूक्ष्म शरीराने पुन: गुहेतील स्थूल शरीरांत प्रविष्ट झाले. नंतर भारतीबरोबर त्यांनी कामशास्त्रावर वाद केला आणि तिलाही पराभूत केले. ज्ञानदेव तर सिद्ध योगी ! करील तो काय नोहे महाराज । त्यांनी आपल्या सर्वांचे अनुभव ग्रथित केले म्हणूनच ते " लोकोत्तर प्रौढ " झाले.

दुसरे असे की, भोगांत बुडालेल्याची विवेकबुद्धी नष्ट होते. हा गीतेचा सिद्धांत आहे. भोगैश्वर्य प्रसक्तानां तयाऽपहृत चे तसाम् ।। १२.४४ ।। गीता हा ज्ञानदेवाचा आत्मा ! तिची आज्ञा शिरसावंद्य मानणारे ते होत. श्रृति स्मृती माया । वैसणे घापे ।। १६.४५९ ।। नाही श्रुतिपरौती । माऊली जगा ।। १६.४६२ ।। या शास्त्रमातेचं उल्लंघन करून ज्ञानदेव भोगात रत होणे केवळ असंभवनीय ! श्री. कुलकर्णी म्हणतात, " ज्ञानदेवांनी स्वानुभव वास्तव व्यक्त केलं. सत्तरी ओलांडल्यावर ज्ञानेश्वरीची निर्मिती केली. " त्यांचं हे म्हणणंही खोटंच ! सत्तर वर्षापर्यंत भोग भोगून गात्रे गलित झाली आहेत, बुद्धी विस्मृतीत बुडाली आहे. अशांकडून नवरसाने ओथंबलेला, शृंगाराच्याही माथ्यावर पाय ठेवणारा, अमृतही फिके वाटायला लावणारा, खेचराच्या मनाला सात्विकाचा पान्हा आणणारा, निचाडाच्या ठायी चाड निर्माण करणारा, जियं चातुर्य शहाणे झाले, समाधानास स्वस्थता आली, वयेला पाझर फुटला, क्षमेत सहनशीलता आली, शांतीला जीवन मिळालं, दैव भाग्यास चढले, उत्साहास उत्तेजन मिळाले, किती लिहावं या अलौकिक ज्ञानेश्वरी ग्रंथासंबंधी ? असा ग्रंथ सत्तरी. नंतर निर्माण होईल ? या काव्यरावाविषयी न पवता जयाते । कारवे सूनि बुद्धीते । बोलणे मागौते । ओसरले ।। १८.४१९ ।। अशी लेखकाची अवस्था झाली असतानाही ज्ञानदेवाचे वय ऐंशी वर्षे निश्चित करण्याचा तर्कदुष्टपणा श्री. कुलकर्णी का करतात हे समजत नाही.

शेवटी वाचक हा आपल्या स्वभावाप्रमाणे अर्थ ग्रहण करीत असतो. ज्ञानेश्वरीचे वैशिष्टच असं की, जो ज्या दृष्टिकोनाकडून तिच्याकडे पाहील त्याला ती आपलीच वाटते. ज्ञानीयाला ज्ञानामुळे, कर्मे करणाराला कर्मामुळे, भक्ताला भक्तीमुळे ती आपलीच वाटते. एवढेच काय संसार करणारालाही ती आपलीच वाटते. याच्याही पुढं जाऊन बोलायचं म्हणजे वरचे सर्व पूर्वग्रह बाजूला करून ज्ञानेश्वरी वाचली तरी तिच्या वाक्चातुर्याने वाचक सुखी होतो. पण विकृत मात्र कुणीही होत नाही. येथे शृंगार आहे पण काम नाही. ■

भा. ग. गर्जे
मु. पो. ता. अकोले, जि. अहमदनगर ४२२६०१

वा | च | की | य

प्रिय श्रीपाद जोशी / स. न. वि. वि.

'जुलै'चा युगवाणी महत्त्वपूर्ण आहे. त्या अंकातील डॉ. भा. व्यं. गिरधारी / शंकर सारडा / डॉ. पद्माकर दादेगावकर / डॉ. वि. स. जोग / श्रीपाद भालचंद्र जोशी यांचे वाङ्मयीन नियतकालिकांच्या संदर्भात उपयुक्त चर्चा करणारे लेख संदर्भासाठी महत्त्वाचे आहेत. या जिव्हाळ्याच्या विषयावर सर्वंकष चर्चा झाली पाहिजे. ही चर्चा घडवून आणण्यात आपल्या संपादकीय दृष्टीचे मोठे योगदान आहे. एम. फिलच्या अभ्यासातही जास्तीत जास्त वाङ्मयीन मासिकांचा सविस्तर अभ्यास झाला तरच या वाङ्मयीन नियतकालिकांच्या योग्य दिशेच्या संदर्भात विवेचन करता येईल. युगवाणीचा अंक महत्त्वपूर्ण आहे. 'ग्रंथिकी'त नवनवीन पुस्तकांची ओळख देत जावी.

—प्रशांत वि. गौतम
'संहिता', त्रिमूर्तीनगर, परभणी

८-८-९१

संपादक 'युगवाणी' / स. न. वि. वि.

'युगवाणी' आता नियमित प्रकाशित होणार हे ऐकून खूप बरे वाटले. आपल्या कुशल संपादनामुळे 'युगवाणी'ची आशयसमृद्धी उत्तरोत्तर वाढेल अशी खात्री आहेच. शुभेच्छा. कळावे.

मृणाल चिचाळकर
नागपूर

२८-८-९१

संपादक 'युगवाणी' / स. न. वि. वि.

मी आपल्या संस्थेचा आजीव सभासद आहे. आपला जुलै ९१ चा युगवाणीचा अंक मिळाला. मराठी भाषा, नियतकालिके, साहित्यसंस्थांची मुखपत्रे व त्यांच्या अडचणी, उपाययोजना आदि विषयांवरील लेख खरोखर महत्त्वाचे आहेत.

—अशोक महादेवराव मांजरखेडे
विश्वकर्मानगर, नागपूर

२-९-९१

संपादक 'युगवाणी' / स. न. वि. वि.

'युगवाणी' जुलै ९१ अंकातील 'मेंदी : एक विचार' हा लेख खूप आवडला. कळावे

—शंकर रामाणी
३०७, रॉय रोड, टिळकवाडी,
बेळगाव

८-९-९१

संपादक 'युगवाणी' / स. न. वि. वि.

'युगवाणी'चा नूतन अंक मिळाला. (जुलै १९९१) आपण स्नेहपूर्वक मजकडे युगवाणी पाठविला याबद्दल त्रिवार धन्यवाद. 'युगवाणी'चा प्रत्येक अंक वैशिष्ट्यपूर्ण, सखोल विवेचनयुक्त लेख इ. साहित्याने नटलेला व लक्षणीय असतो.

वंदनीय डॉ. वि. भि. कोलते यांचा म. म. दत्तो वामन यांचेविषयीचा लेख विशेष वाटला.

–वि. म. कुळकर्णी

११–९–९१ 'कमळवेल' ६१/४८ एरंडवणे पुणे ४

संपादक 'युगवाणी' / स. न. वि. वि.

'युगवाणी'चा जुलै ९१ चा अंक परवाच मिळाला. तब्बल एका वर्षानंतर अंक वाचायला मिळाला. अंक हाती पडताच संपूर्ण वाचून झाल्यावरच सोडला. अंकाचे स्वरूप वाचक, अभ्यासक यांना आवडेल असेच आहे. कारण दर्जेदार वाङमयीन नियतकालिके काढायची म्हणजे ती तारेवरची कसरत ठरते, तरीपण नव्या उमेदीने 'युगवाणी' उभी राहिली म्हणून आपले आभार ! आवरण पृष्ठ, रेखाटने आणि एकूणच निर्मिती सुंदर आहे. पहिल्या वाङ्मयीन नियतकालिक विकास परिषदेचा वृत्तांतही अतिशय सूचक आहे. "तीन पसायदान : मर्ढेकर / तुकाराम / ज्ञानेश्वर" हे डॉ. द. भि. कुळकर्णी यांचे टिपण आवडले. इंदिरा संतांच्या 'मेंदी' या काव्यसंग्रहाचा घेतलेला वेधही वाचला. एकूणच अंक सुंदर आणि वाचनीय असाच आहे. 'युगवाणी'च्या पुढील प्रवासास शुभेच्छा !

शकुंतला अंभोरे

१४–९–९१ काकू निवास, वसमत जि. परभणी

संपादक 'युगवाणी' / स. न. वि. वि.

एक वर्षाच्या दीर्घ कालावधीनंतर 'युगवाणी'चा जुलै ९१ चा अंक मिळाला. 'युगवाणी'च्या परंपरेला साजेल असाच अंक सुंदर निघाला आहे. आपल्या कुशल संपादनाची ही किमया आहे. अभ्यासकांना आवडेल असाच आपला अंक आहे. प्रत्येक अंकाची आतुरतेने वाट पाहाते. यापुढे अंक वेळेवर निघेल अशी अपेक्षा आहे. असो.

–अरुणा चौधरी

२५–९–९१ 'अक्षय', धर्माबाद, नांदेड ४३१८०९

मा. संपादक 'युगवाणी' / स. न. वि. वि.

युगवाणी जुलै ९१, पृष्ठ १२८ वर मी, युगवाणीचे संपादक श्रीपाद भालचंद्र जोशी यांना लिहिलेले पत्र त्यांनी जसेच्या तसे छापल्यामुळे विदर्भात चांगलीच खळबळ माजली आहे. माझ्याविषयी अकारण चर्चेला ऊत आला आहे. माझा निषेध करणारी साठ सत्तर पत्रे नाराजीसह अनेकांनी मला पाठविलेली आहेत. वैयक्तिक चर्चेतही लोक माझ्याशी सरळ सरळ या पत्राविषयी विचारणा करतात. वि. सा. संघाशी माझे भांडण सांसदीय पद्धतीचे होते. लोकशाही मार्गाने होते. माझ्यामते वि. सा. संघाशी गेल्या दहा वर्षात असे कुणीच लढले नाही. मी माझ्या परीने युद्ध खेळलो, एक धुंदी होती, एक असंमजसपणा होता. वि. सा. संघाच्या दुरून दिसणाऱ्या कार्याविषयी,

अंतर्गत सुरू असलेल्या गोष्टींविषयी थोडाफार संघर्ष मी केला, जाहीरपणे केला. तोंड लपून, गुळमुळीतपणे मी काही त्यांच्याशी लढा दिलेला नव्हता.

युगवाणीच्या अंकातील माझं पत्र संपादकाने छापलं त्याविषयी "त्यांनी फार मोठा कावेबाजपणा केला" किंवा 'माझी खोड जिरविली' असं काही मला वाटलं नाही...उलटपक्षी चागलंच वाटलं बरं झालं लढाई संपली. बरं मी. वि. सा. संघाशी भांडत होतो...कुणासाठी भांडत होतो ? हा माझ्यापुढे कायम प्रश्न आहे. खुल्या दिलाने मी माझी मते मांडत होतो. श्री. राम शेवाळकरांच्या विरुद्ध मी उभा राहिलो तरीही त्यांनी कटुता माझ्याविषयी बाळगली नाही. माझं वेळोवेळी अभिनंदनच केले. मात्र ग्रामीण, दलित, इतर बहुजन समाजातील लेखकांनी माझी तोंडावर 'वारे शेरऽ' अशी शाबासकी द्यावी आणि माझी पाठ वळताच 'भगवान ठग मॅड झाला, काही अक्कल नाही लेकाला...शेवाळकरांसारख्यांशी लढतो', अशा शब्दात नाचक्की करायच्या पलीकडे काही केले नाही.

महाराष्ट्रातल्या चारशे-पाचशे नियतकालिकात माझ्या अडीच तीन हजार कविता छापून आल्यात हे सर्वांना ठाऊक आहे. परंतु युगवाणीत एकही कविता आजवर छापल्या गेली नाही. मी माझ्या पत्रात म्हटलचं आहे, माझ्या पाच-सहा कविता युगवाणीत छापाल काय ? यात काय चुकलं ? मी कवी आहो. कविता छापून आणणे माझे कर्तव्य आहे, जन्मसिद्ध अधिकार आहे, असं म्हणण्यात कोणता लाळघोटेपणा आहे ? कवी संपादकाशी लाळघोटेपणा करणार नाहीत तर कुणाशी करतील ? युगवाणीने माझ्या ४--५ कविता छापण्याने असा कोणता माझ्या काव्याच्या इस्टेटीवर फरक पडणार आहे...

विदर्भातील शेकडो लेखक कवी (फक्त ब्राह्मण वगळून) मला ठाऊक आहेत जे वैयक्तिक चर्चेत वि. सा. संघाला शिव्या देतात, संपादकाविषयी गैर बोलतात, या लेखकांमध्ये नवीन लेखकच नाहीत तर मोठे मोठे (?) लेखक-कवी सुद्धा आहेत जे एकीकडे माझं समर्थन करतात, माझ्या सोबत बोलू लागतात. शिव्याशाप देऊ लागतात...आणि युगवाणीचा नवीन अंक निघाला की त्यांचे लेख / कविता पान भरू भरू युगवाणीत दिसतात. या कृतीला काय संज्ञा द्यावी आणि माझं पत्र छापून आल्याबरोबर मला 'वचकणे' देणे सुरू करतात.

माणसानं युद्ध करावं तर समोरासमोर, असं 'बोलायचं एक' आणि पाठ वळल्यावर बोलायचं दुसरंच, याला काही अर्थ नसतो. वि. सा. संघाविषयी माझ्या मनात काही नाही. त्यांचे चांगले उपक्रम सुरू झाले आहेत. नव्या दमाच्या लेखकांविषयी वि. सा. संघाने आशा निर्माण केली आहे. ज्या × × फौजेसाठी मी लढत होतो. त्या लढाईमुळे माझे नुकसानच झाले आहे. युगवाणीने माझी १० वर्षात कविता छापली नाही....अठरा पुस्तके निघूनही त्याची साभारपोच दिली नाही. समीक्षा तर दूरच. आणि या तथाकथित लेखकांचं साधंसुधं लिखाण युगवाणीत प्रसिद्ध झालं याचं काहीच वैषम्य मला वाटणार नाही काय ?

मी. वि. सा. संघासाठी डोकेदुखी होतो. ती आता नाही हे त्यांनी समजावे. माझ्या पत्रात 'त. भा. तून' असा उल्लेख आहे. तो म्हणजे तरुण-भारत. त्यांनी सुद्धा माझ्या पुस्तकांची कधी दखल घेतली नाही. याचा अर्थ हा देखील नाही की युगवाणी किंवा त. भा. ने माझी कविता, किंवा पुस्तकाची समीक्षा द्यावी. त्यांना वाटलं तर त्यांनी जरूर द्यावी किंवा न द्यावी त्यांच्याविषयी माझा काही राग लोभ नाही.

श्रीपाद जोशी यांना मी जे वैयक्तिक कार्ड पाठविले ते फार विचार करूनच पाठविलेले आहे. त्यांनी ते प्रसिद्ध केले हे देखील फार चांगले झाले आहे. खाजगी पत्राचा हा दुरुपयोग नसून उत्कृष्ट उपयोग आहे. पाच कविता छापण्यासाठी मी जी विनंती त्यांना केली, तो माझा कवीसुलभ

(स्त्रीसुलभ सारखा) प्रकार आहे. माझी सर्व जळमटे दूर झाली आहेत. पत्र पाठवून "आता आपण शह द्यायला पाहिजे." अशी चिथावणी देणारी पत्रे मला येत आहेत. जे असे पत्रातून पाडण्यासाठी लिहितात त्या कवींच्या / लेखकांच्या अनेक कविता / लेख, युगवाणीतून प्रसिद्ध झालेले आहेत. नुकतीच विदर्भात एका संस्थेची स्थापना झाली. त्यादिवशी झालेल्या सभेत विदर्भातील दिग्गज मंडळी जमली होती. वि. सा. संघाला विरोध या भावनेतून जमा झालेले ते लेखक तिथे उपस्थित होते. मी देखील होतो. वि. सा. संघाविषयी द्वेष, मत्सर, युगवाणीविषयी खुळचट, खवचट बोलणे तिथे झाले. या मंडळींमध्ये वि. सा संघाचे विरुद्ध बोलायची जणू काही स्पर्धाच सुरू होती. निव्वळ शब्दांची वाफ म्हणावे तर त्यातील काही मंडळी युगवाणीच्या संपादक मंडळात आहेत हा प्रश्न जेव्हा मला पडला, तेव्हा मी म्हटलं इथे उपस्थित सर्व लेखक / कवींच्या कविता, अन्य साहित्य युगवाणीतून येत असते, तिथूनच ते मोठे झालेले आहेत. याच सभेत वि. सा. संघाविषयी ते इतकी जहरी भाषा कशी काय वापरतात म्हणूनच त्याच दिवशी माझा विरोध मावळला की " साहित्यिक ढोंगी " असतात आपणच अडाणी आहोत. स्वतःचे नुकसान करून घेत आहोत. आणि याच भावनेतून मी माझं पत्र लिहिलं आहे.

मी आता मवाळच काय ? पूर्ण वि. सा. संघाविषयी आपुलकी बाळगणारा एक शिपाई आहो. एवढी ग्वाही देऊन माझा पत्रप्रपंच संपवतो. क. लो. अ.

भगवान ठग

२७-९-९१ टिळक चौक / वाशीम / जि. अकोला

श्री. भगवान ठग यांनी हे मनोगत प्रकाशित करावेच असा आग्रह स्वतंत्र पत्र लिहून केलेला आहे. त्यांच्या अपेक्षेनुसार त्यांचे हे पत्ररूपी संपूर्ण मनोगत प्रकाशित करीत आहोत. –संपादक

प्रिय श्रीपाद जोशी / स. न. बि. वि.

जुलै ९१ चा 'युगवाणी' अंक वाचला. गेल्या मे ९० पासून 'युगवाणी' बंद असल्यामुळे जरा रुखरुखल्यासारखे वाटत होते. परंतु आता नियमित सुरू राहणार यात आनंद आहे. जुलै ९१ च्या अंकातील 'धनसत्ता, राजसत्ता आणि वाङमयकला व्यवहार' हा प्रसन्नकुमार भावे यांचा लेख, 'मराठी वाङमयीन नियतकालिकांच्या समस्या : आजच्या आणि कालच्या' हा डॉ. वसंत कुलकर्णी यांचा लेख तद्वतच आपण लिहिलेला विदर्भातील थोर चित्रकार भाऊ समर्थ यांचेवरील लेख म्हणजे भाऊंच्या जीवनातील एकेक पैलू शब्दरूपाने शब्दबद्ध करून आपण एक बोलका चित्ररूपी आलेखच जणू उभा केल्याचा भास झाला.

एकंदरीत अंक दर्जेदार व नावीन्यपूर्ण बनलेला आहे यात शंका नाही. युगवाणीचे स्वरूप, दर्जा, स्वतंत्र व निर्भीड विचारांची बांधिलकी ज्या वऱ्हाडी मातीशी आहे, तिने साहित्यिकांना घडविले, वाढविले, जोपासले त्यांच्या कला-गुणांची कदर केली त्या मातीशी युगवाणीचीही बांधिलकी आहे, आणि राहील हे निश्चित. कळावे.

–प्रा. डॉ. विजय हुंबरे
नवरगाव

३-१०-९१

संपादक 'युगवाणी' / स. न. वि. वि.

आपल्या 'युगवाणी'चे अंक सुरेख निघतात, अभिनंदन ! या क्षणी छापण्यालायक लिहिलेले हाताशी काही नाही ! क्षमा असावी, नवीन काही लिहिले तर पाठवीनच. निमंत्रणाबद्दल ऋणी आहे. लोभ असाच रहावा.

वसंत सावंत
सावंतवाडी

४–१०–९१

प्रिय श्रीपादजी / स. न. वि. वि.

'युगवाणी' ऑगस्ट ९१ चा अंक भेटीसाठी आला. युगवाणीचा आपला स्वतंत्र ठसा आहे. स्वत:चा चेहरामोहरा आहे. याची जाणीव आपल्या 'विशेष' मधून पुन:प्रत्ययास आली. आपल्या स्वअर्जित चोखंदळपणाच्या पाऊलखुणा एकूणच साहित्यनिवडीत उलगडत जाताना दिसतात. धन्यवाद.

–प्रा. डॉ. विश्वास पाटील
३४ ब 'कृष्णांबरी' सरस्वती कॉलनी, शहादा

२७–१०–९१

श्रीपाद भालचंद्र जोशी / स. न. वि. वि.

'युगवाणी'चा ऑगस्ट ९१ चा अंक मी वाचला. युगवाणी अंक मी आज प्रथमच वाचला आणि त्याविषयी आकर्षण निर्माण झाले. आपल्या विदर्भभूमीमध्येसुद्धा कोवळ्या रोपांचे संगोपन करणारी वनदेवता आहे याची जाणीव झाली. रानावनात भरकटलेल्या एखाद्या पिलास आपली आई दिसली तर त्याला ज्या प्रकारचा आनंद होतो तशाच प्रकारचा अत्यानंद मला 'युगवाणी' वाचून झाला.

'युगवाणी'मधील सर्व लेख सुंदर तर आहेतच पण त्यातल्या त्यात 'मराठी वाङमयेतिहास : स्वरूप आणि अपेक्षा'–डॉ. सुशीला पाटील आणि 'ग्रेसच्या कवितेतील दुर्बोधता'–सौ. मृदुला करंदीकर यांचे लेख आवडले. डॉ. सुशीला पाटील यांनी वाङमयेतिहासाबद्दल ज्या अपेक्षा दर्शविल्या त्या आजच्या साहित्याचा अभ्यास करणाऱ्यांसाठी अत्यावश्यक आहेत. अशाच प्रकारची आपणाकडून साहित्यनिर्मितीची सेवा घडत राहो व युगवाणी विदर्भाचीच नाही तर संपूर्ण महाराष्ट्राची युगवाणी ठरो अशी सरस्वतीचरणी इच्छा प्रकट करतो.

के. व्ही. बराटे
अमरावती

२८–११–९१

लेखकांना विनंती

साहित्य पाठविताना त्यावर संपूर्ण नाव व संपूर्ण पत्ता लिहिणे आवश्यक आहे. नाव व पत्ता लिहिलेले आणि पुरेसे पोस्टेज लावलेले पाकीट लेखनासोबत असेल तरच साहित्य परत पाठविणे शक्य होईल.

अनुक्रमणिका

विशेष कार्यवृत्त

नागपूर

वैदर्भीय लेखिका संमेलन – १९९१

विदर्भ साहित्य संघाने यंदा प्रथमच नागपूरला एक वैदर्भीय लेखिका संमेलन दिनांक ६ ऑक्टोबर ९१ रोजी धनवटे रंगमंदिरात प्रसिद्ध कथाकार सौ. आशा बगे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित केले होते. कथाशताब्दीवर्षात एक प्रसिद्ध कथालेखिका अध्यक्ष असा हा योग होता. शिवाय उद्घाटकही कथालेखिका, समीक्षक अशा मुंबईच्या विजयाबाई राजाध्यक्ष होत्या. संमेलनाच्या आमंत्रक होत्या कवयित्री सौ. सुलभा हेर्लेकर !

सकाळी ९ वाजता कार्यक्रमाला सुरुवात झाली ती एका भावपूर्ण गीताने ! सुलभा हेर्लेकरांचे गीत येथील एल. ए. डी. कॉलेजच्या विद्यार्थिनींनी गायिले होते. संगीत प्रा. नंदा देशपांडे यांचे तर संयोजन प्रा. सुनंदा देशपांडे यांचे ! विजयाबाईंनी दीप प्रज्वलित केला. संमेलनाच्या आवश्यकतेविषयी व भूमिकेविषयी आमंत्रक या नात्याने सुलभा हेर्लेकरांचे व वि. सा. संघाचे अध्यक्ष या नात्याने प्रा. सुरेश द्वादशीवारांचे प्रास्ताविक झाले. उद्घाटक विजया राजाध्यक्ष यांनी "लेखिकांनी, लेखनाच्या कक्षा रुंदावतील असे नवनवीन जीवनानुभव घेऊन साहित्यनिर्मिती करावी. लेखनाला समाजशास्त्रीय रूप, बैठक आणि अधिष्ठान प्राप्त करून द्यायला हवे. आज एकांगीपणाने होणाऱ्या सदोष साहित्यसमीक्षेसंबंधी परखड विचार मांडून समीक्षण पद्धतीचा योग्य समन्वय साधला गेला पाहिजे" असे आवाहन केले व या संमेलनातून स्त्रीसंवाद घडून यावा अशी अपेक्षा व्यक्त केली. संमेलनाध्यक्षा आशा बगे यांनी कथेचा १०० वर्षांचा धावता आढावा घेतला. कथावाङ्मयातील स्थित्यंतराचा सूक्ष्म रीतीने परिचय करून दिला. 'बदलत्या कथारूपाला काळाची अशुभ सावली बाधली' असे सांगताना भारत सासणे या प्रसिद्ध कथाकाराच्या सामर्थ्याचे समर्थपण विशद केले. 'कथेला आता नांदायला घरच उरले नाही' अशी खंतही व्यक्त केली. या उद्घाटन कार्यक्रमाला प्रा. राम शेवाळकर, प्रा. तारा सावंगीकर, डॉ. वि. भि. कोलते, डॉ. मदन कुळकर्णी, प्रा. रविंद्र शोभणे, कार्याध्यक्ष वामन तेलंग, श्रीपाद भालचंद्र जोशी इ. मान्यवर हजर होते.


दुपारचा परिसंवादाला सुरुवात झाली १२॥ वाजता ! विषय होता 'वैदर्भीय लेखिकांचे साहित्य व सामाजिक भान ! 'सर्वच' वक्त्यांनी अभ्यासपूर्ण असे विचार मांडले. काव्यावर विजयिनी जोशी, कथेवर शामला मुजुमदार, कादंबरीवर भारती कुळकर्णी, चरित्र आत्मचरित्रावर विमल भालेराव, संध्या अमृते यांनी समीक्षेवर ज्योती लांजेवार यांनी विवेचन केले. नाटकावर विजया डबीरांनी अध्यक्ष या नात्यानी समारोप केला. समीक्षा स्त्रीवादी नसावी हा विचार त्यांनी मांडला.

दुपारच्या जेवणानंर कार्यक्रम रंगला तो वाचकांचा भेटीला लेखिका ! विदर्भातील नामांकित लेखिका व प्रश्न विचारणारे वृद्धांपासून तर कॉलेज तरुणतरुणींपर्यंत ! सर्वांनीच उत्स्फूर्तपणे प्रश्न विचारले. लेखिकांनीही तेवढ्याच धीटपणे व समर्पक उत्तरे दिली. यात सहभागी लेखिका होत्या आशा बगे, शुभांगी भडभडे, सुलभा हेर्लेकर, ज्योती लांजेवार, मृणाल चिचाळकर, मालती निमखेडकर, प्रतिमा इंगोले, वर्षा रेगे, सुप्रिया अय्यर व जयश्री रूईकर. कथा, कादंबरी, कविता या विषयावर पुनः एकदा मंथन झाले. लेखिकांना आत्मपरीक्षण करण्यास प्रवृत्त करणारे प्रश्न विचारून, वाचक श्रोत्यांनाही संमेलनात सहभागी करून क्रियाशील ठेवता येते हे या नवीन कार्यक्रमामुळे सिद्ध झाले. विमल गाडेकर, शशी भगत, निवेदिता कर्पे, मृणालिनी

नानिवडेकर, रमा लांबट; रविंद्र शोभणे, दीपक रंगारी, प्रकाश एदलाबादार इ. नी अभ्यासपूर्ण प्रश्न विचारले.

यानंतरच्या सत्रात प्रसिद्ध सामाजिक कार्यकर्त्या रूपा कुळकर्णी व प्रा. सीमा साखरे यांचा सत्कार सरदार माणकसिंह यांच्या हस्ते करण्यात आला. सायंकाळ झाली होती. शेवटचा कार्यक्रम होता कवीसंमेलन. या संमेलनात नव्या जुन्या ६०–६५ कवयित्रींचा सहभाग होता. अध्यक्ष होत्या मृणाल चिंचाळकर, संचालनही त्यांनीच केले होते. तीन पिढींचा सहभाग असलेले हे संमेलन ३ तास चालले. वसुधा घुरडे, प्रतिभा भागवत, जोगिंदर कौर महाजन, कल्पना व्यवहारे, श्रद्धा पराते, ज्योती लांजेवार, संध्या भराडे, मृणाल चिंचाळकर, सुलभा हेर्लेकर, चित्रा रविकिरण, उर्मिला निनावे, विमल गाडेकर, अनिता गहलोद, मृणालिनी केळकर, सुचित्रा कातरकर यांच्या कवितांना विशेष दाद मिळाली. नवोदितांमधे राधा इखनकर, अनघा काळे, शुभांगी मिश्रीकोटकर, अनुपमा टिपणीस, निवेदिका कर्पे, अनुराधा वऱ्हाडे, लीना आगाशे, मेघना वाहोकार, अपर्णा लांजेवार यांच्या कविता उल्लेखनीय होत्या. संमेलनानिमित्य ग्रंथप्रदर्शनाने तर विशेष शोभा आणली. कुंदा केळापुरे व चंद्रकांत कुळकर्णी यांनी हे प्रदर्शन साकारायला कष्ट घेतले.

या संमेलनाने काय मिळाले वगैरे प्रश्नकर्त्यांना उत्तरे देण्याच्या भानगडीत न पडले तरीही चिंतनशील व वैचारिक अधिष्ठान, आत्मशोध आणि आत्मपरीक्षणाची जाणीव, आत्मसन्मान, स्त्री शक्तीच्या सामर्थ्याचा प्रत्यय, नवी जीवन अनुभवांना सामोरे जाण्याची क्षमता, प्रेरणा, नवोदितांचा शोध–बोध वगैरे. एकूण संमेलन रंगले, गाजले. संमेलनाच्या यशासाठी प्रा. सुरेश द्वादशीवार, कार्याध्यक्ष वामन तेलंग, चंद्रकांत कुळकर्णी, श्रीपाद भालचंद्र जोशी, मनोहर म्हैसाळकर, प्रकाश एदलावादकर व आमंत्रक सुलभा हेर्लेकर यांनी विशेष परिश्रम घेतले. ■



विदर्भ साहित्य संघ नागपूर

केंद्रीय कार्यवृत्त दि. १ सप्टें, ९१ ते ३० नोव्हेंबर १९९१

श्रद्धांजली : विदर्भ साहित्य संघाचे विश्वस्त श्री. वामन शिवदास बारलिंगे यांचे ३० ऑक्टोबर रोजी व वि. सा. संघाचे आजीव सदस्य, प्रसिद्ध कादंबरीकार, पत्रकार व लेखक श्री. प्रभाकर सिरास यांचे ३१ ऑक्टोबर ९१ रोजी दुःखद निधन झाले. वि. सा. संघाचे अध्यक्ष प्रा. सुरेश द्वादशीवार यांच्या अध्यक्षतेखाली शोकसभा घेण्यात येऊन त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

स्मृतीदिन : वि. स. खांडेकर, डॉ. राधाकृष्णन, मामा वरेरकर, कविवर्य अण्णाजी बोबडे, महात्मा गांधी, दुर्गाप्रसाद तिवारी, शरदचंद्र मुक्तिबोध, केशवसुत, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, वि. रा. हंवर्डे, ग. त्र्यं. माडखोलकर, महात्मा फुले यांच्या छायाचित्रास त्यांच्या स्मृतिदिनी पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहण्यात आली.

विदर्भ साहित्य संघाचा नवीन प्रकल्प : नाट्य शोध संस्थान

वैदर्भीय नाट्यकलावंतांना वाव मिळावा व त्यांच्या कलागुणांचे चीज व्हावे या गोष्टींचा विचार करून विदर्भ साहित्य संघाने "नाट्य शोध संस्थान" या नावाचा नवीन प्रकल्प सुरू केला आहे. या प्रकल्पामुळे नाट्य कलेशी संबंधित सर्व स्तरातील आणि घटकातील तंत्रज्ञ व कलावंतांसाठी एक 'मंच' उपलब्ध करून दिल्या जाणार आहे. या प्रकल्पांतर्गत ज्या विविध योजना राबविल्या जाणार आहेत. त्या अशा-

१. नाट्य पदविका अभ्यासक्रम – या योजनेअंतर्गत दहावी उत्तीर्ण झाल्यावर तीन वर्षांचा नाट्य पदविका अभ्यासक्रम जुलै ९२ मध्ये सुरू करण्याचा मानस आहे. या अभ्यासक्रमात प्रात्यक्षिकांवर भर दिला जाणार असून नाट्य अभिनय व नाट्यतंत्र यांचा त्यात समावेश असेल. एका परिपूर्ण व प्रगल्भ अशा या अभ्यासक्रमामुळे जगातील विविध 'थिएटर्सचा' व अभिनय संकल्पनांचा अभ्यास व त्याचबरोबर जगप्रसिद्ध व काही मराठी प्रातिनिधिक नाटकांचा त्यात समावेश केला गेला आहे.

२. नाट्य प्रशिक्षण शिबीर – वर्षातून, किमान एकदा नाट्य प्रशिक्षण शिबीराचे आयोजन केल्या जाईल. यात मास्कमेकींग, कॉस्च्युम डिझाईनिंग, कॅरेक्टर व स्टायलाईड मेकअप, प्रकाश योजना, सेट डिझाईन व सेट मॉडेल, अभिनय कला, नाट्यनिर्मितीचे शास्त्र, दिग्दर्शन कला, नाट्य समीक्षा, नाट्य लेखन, आवाज शास्त्र इ. नाट्याशी संबंधित विषय, जाणकार मंडळीकडून शिकविण्यात येतील.

३. वरआंगण – या योजनेअंतर्गत महिन्यातून किमान एकदा विदर्भातील कोणत्याही संस्थेस कोणत्याही भाषेतून एकांकिका सादर करू देण्याची संधी मिळेल. अगदी जुजबी साहित्य वापरून प्रायोगिक स्वरुपाच्या आणि नवीन नाट्य आशय असणाऱ्या एकांकिकेस प्राधान्य दिले जाईल. एकांकिकेचे सादरीकरण टिळक सभागृहात करावे लागेल. एकांकिका संपल्यावर चर्चा होईल. या योजनेत एकपात्री प्रयोग, स्वागत, नाट्यवाचन इ. चा समावेश केला गेला आहे.

४. नाट्यविषयक व्याख्याने – सुप्रसिद्ध विद्वानांचे नाट्यकलेशी संबंधित विविध विषयांवरील व्याख्यानांचे आयोजन केल्या जाईल. नामवंत दिवंगत नाटककार, दिग्दर्शक व कलावंत यांच्या स्मरणार्थ त्यांच्या कार्याची माहिती देणाऱ्या व्याख्यानांचे आयोजन तसेच निबंध वाचन, नाट्य विषयक सिद्धांत, विविध नाटककार, नाटके या विषयीची माहिती असणाऱ्या व्याख्यानांचे आयोजन या योजनेअंतर्गत केल्या जाईल.

५. व्हिडीओ शो – जगप्रसिद्ध क्लासिक नाटकांचे 'व्हिडीओ शो' व जाणकार व्यक्तींचे त्यावरील भाष्य व क्रिटीकल अॅप्रिशिएशन असे या योजनेचे स्वरूप राहील. या योजनेमुळे नाट्य-कलावंतांना उच्च दर्जाच्या नाट्यकृती बघावयास मिळतील व जागतिक दर्जाच्या पुढे आपण कुठे आहोत याचे सतत भान राहील.

६. नाट्यवाचनालय – रंगभूमीवरील पुस्तके, मासिके, साप्ताहिके, त्रैमासिके इ. नी युक्त असे सुसज्ज व समृद्ध नाट्यवाचनालय उभे करणे हे 'नाट्यशोध संस्थान'चे एक महत्त्वाचे ध्येय असून त्यामुळे रंगभूमी विषयाचे सखोल ज्ञान असणारा असा एक "अॅकेडेमीशिअन्स"चा मोठाच वर्ग विदर्भात तयार होईल. ज्यांचा फायदा येणाऱ्या पिढीस होईल.

७. डाक्यूमेंटेशन – आजपर्यंत विदर्भात अनेक नाट्यसंस्था, दिग्दर्शक, कलावंत व तंत्रज्ञ होऊन गेलेत आणि नवीन मंडळी पुढे येत येत आहे, त्यांच्या विषयीची सम्पूर्ण माहिती गोळा करण्याचा प्रयत्न या योजनेअंतर्गत होईल.

विदर्भातील सर्व नाट्यप्रेमींनी या प्रकल्पाला उत्स्फूर्तपणे मदत करावी अशी अपेक्षा आहे.

दिनांक ६ सप्टेंबर ९१

विदर्भ साहित्य संघ, बसोली ग्रुप आणि स्वप्नपूर्ती कला केंद्र या संस्थांतर्फे आयोजित मोवाड-वरील रंगचित्रांच्या प्रदर्शनाचे उद्घाटन नागपूरचे पोलीस आयुक्त श्री. सुरेंद्र मोहन पठानिया यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी वि. सा. संघाचे अध्यक्ष प्रा. सुरेश द्वादशीवार होते.

बसोली ग्रुपच्या ६ ते १४ वर्ष वयोगटातील बाल चित्रकारांनी काढलेली सुमारे १०० रंगचित्रे या प्रदर्शनात आहेत. शिवाय नागपूरच्या नामवंत वृत्तपत्र छायाचित्रकारांनी काढलेली ५० छाया-चित्रे आणि मोवाड परिसरातील विध्वंस शब्दबद्ध करणारी जवळजवळ सर्वच वृत्तपत्रातील कात्रणे या प्रदर्शनात होती. प्रदर्शनात जमा झालेला रु. ५००१/-चा निधी मोवाड पूरग्रस्तांसाठी देण्यात आला.

दिनांक २८ सप्टेंबर ९१

मॅजेस्टीक प्रकाशन मुंबई आणि विदर्भ साहित्य संघ यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. रवींद्र शोभणे यांच्या "वर्तमान" या कथासंग्रहाचे डॉ. भा. ल. भोळे यांच्या हस्ते प्रकाशन झाले. याप्रसंगी डॉ. वि. स. जोग आणि श्री. प्रभाकर पावडे यांनी आपले विचार व्यक्त केले.

दिनांक ३ नोव्हेंबर ९१

विदर्भ साहित्य संघ आणि अंधश्रद्धा निर्मूलन समिती यांच्या संयुक्त विद्यमाने अंधश्रद्धा चळवळीचे एक अध्वर्यु श्री. श्याम मानव यांच्या चार पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले.

दिनांक ६ ऑक्टोबर ९१

विदर्भ साहित्य संघातर्फे लेखिकांचे एक दिवसाचे लेखिका संमेलन घेण्यात आले. या संमेलनाच्या अध्यक्ष प्रख्यात कथाकार श्रीमती आशा बगे या होत्या. प्रसिद्ध समीक्षक विजया राजाध्यक्ष यांनी संमेलनाचे उद्घाटन केले. या संमेलनात परिसंवाद, कवितंमेलन, 'वाचकांच्या भेटीला लेखिका' असे विविध कार्यक्रम सादर करण्यात आले. समारोपाच्या कार्यक्रमात नागपूरातील प्रसिद्ध समाजसेविका डॉ. सौ. सीमा साखरे व डॉ रूपा कुळकर्णी यांचा सत्कार करण्यात आला. संपूर्ण कार्यक्रमाला रसिकांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला. या संमेलनाचे संयोजन श्रीमती सुलभा हेर्लेकर यांनी केले होते.

दिनांक २५ ऑक्टोबर ९१

विदर्भ साहित्य संघाच्या लाखनी येथे होणाऱ्या ४३ व्या विदर्भ साहित्य संमेलनाचे अध्यक्ष प्रा. डॉ. भाऊ मांडवकर यांचा विदर्भ साहित्य संघातर्फे प्रा. राम शेवाळकर यांचे हस्ते सत्कार करण्यात आला. याप्रसंगी वि. सा. संघाचे अध्यक्ष प्रा. सुरेश द्वादशीवार, डॉ. वि. वा. प्रभुदेसाई, प्राचार्य राम शेवाळकर प्रभृतींची भाषणे झाली. डॉ. भाऊ मांडवकर यांनी सत्कारास समयोचित उत्तर दिले.

दिनांक ६ नोव्हेंबर ९१

दरवर्षी दिनांक ५ नोव्हेंबर हा दिवस मराठी रंगभूमी दिन म्हणून साजरा करण्यात येतो. यावर्षी त्या दिवशी लक्ष्मीपूजन असल्यामुळे रंगभूमी दिनाचा समारंभ दिनांक ६ नोव्हेंबर रोजी धनवटे रंग मंदिरात घेण्यात आला. तत्पूर्वी दिनांक ५ नोव्हेंबरला सकाळी ९-०० वाजता धनवटे रंग मंदिराच्या परिसरात असलेल्या नटराजाच्या मूर्तीचे श्री. जयंत पाचपोर यांच्या हस्ते पूजन करण्यात आले. याप्रसंगी वि. सा. संघाचे कार्याध्यक्ष श्री. वामन तेलंग, चिटणीस श्री. प्रकाश एदलाबादकर नाट्य समितीचे आमंत्रक श्री. मुकुल खोत उपस्थित होते.

दिनांक ६ नोव्हेंबर वि. सा. संघाच्या 'नाट्य शोध संस्थान'च्या वतीने रोजी सादर झालेल्या कार्यक्रमात "न्यू हँगमन", "भासचक्र", "डिस्कोहॉस्पीटल" ह्या एकांकिका तसेच "महाराणी अवंतिका" हे स्वगत इत्यादी कार्यक्रम स्थानिक कलावंतांनी सादर केले. या संपूर्ण कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. व. कृ. वऱ्हाडपांडे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला डॉ. वऱ्हाडपांडे यांच्या हस्ते नटराजाच्या मूर्तीस आणि कै. नाना जोग यांच्या पुतळ्यास हार अर्पण करण्यात आला. रंगमंचाचे पूजन वि. सा. संघाचे अध्यक्ष प्रा. सुरेश द्वादशीवार यांचे हस्ते झाले. कार्यक्रम सुविहितपणे पार पडण्यासाठी प्रा. विनोद इंदुरकर, श्री. प्रकाश एदलाबादकर, श्री. मुकुल खोत यांनी बरेच परिश्रम घेतले.

दिनांक २४ नोव्हेंबर ते २७ नोव्हेंबर ९१

विदर्भ साहित्य संघातर्फे आंतरशालेय स्पर्धा सप्ताहाचे कै. नलिनी जतकर चित्रकला स्पर्धा, कै. इंदिरा खरे वक्तृत्व स्पर्धा व कै. सत्यभामाबाई सगदेव कथाकथन स्पर्धा घेण्यात आल्या. या या स्पर्धेपैकी कै. नलिनी जतकर चित्रकला स्पर्धेत भारतीय विद्याभवन या शाळेचा मनीष झवर ह्याने प्रथम क्रमांक तर हडस हायस्कूलच्या ईश्वरी ढवळेने द्वितीय क्रमांक मिळविला. "ब" गटात सुशीलकुमार मिसाळ (नवयुग विद्यालय) व शुभलक्ष्मी शाहू ह्यांनी प्रथम व द्वितीय क्रमांक मिळविला.

यंदा फिरती ढाल भारतीय विद्याभवन व सरस्वती विद्यालय, शंकरनगर, या शाळांना संयुक्तरीत्या देण्यात आली. या स्पर्धेचे परीक्षक सौ. शिखा लोणकर, कु. मोहिनी जोशी व सौ. अंजली सुभेदार या होत्या.

कै. इंदिरा खरे वक्तृत्व स्पर्धेत कु. हेमांगी रिंगे, हडस हायस्कूल, राघव ढोले, सी. पी अँड. बेरार, रविनगर, कु. अश्विनी खरे, हडस हायस्कूल ह्यांनी पारितोषिके प्राप्त केलीत. डॉ. सौ. पुंडलीक व सौ. चिटगोपकर यांनी परीक्षक म्हणून काम केले.

कै. सत्यभामाबाई सगदेव कथाकथन स्पर्धेत सागर गरुड, हडस हायस्कूल, मंजिरी पुरोहित, भिडे गर्ल्स हायस्कूल, ऋत्ता गोखले, सोमलवार हायस्कूल, रामदासपेठ तसेच "ब" गटात रोहिणी देशपांडे, हडस हायस्कूल, राघव ढोले सी. पी. अँड. बेरार, रविनगर, ललिता दाणी, भारत महिला विद्यालय, यांनी क्रमांक पटकाविला. या स्पर्धेचे परीक्षक सौ मनाली दाणी व सौ. रेखा खरावे या होत्या. स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ सौ. सुहास मुंडले यांच्या हस्ते झाला. अध्यक्षस्थानी विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष प्रा. सुरेश द्वादशीवार होते. स्पर्धेचे संचालन सौ. कुंदा केळापुरे यांनी केले.

दलित साहित्य संमेलन

वि सा. संघाच्या विद्यमान कार्यकारिणीच्या कार्यकालात डॉ. बाबासाहेब आंबेडकर व महात्मा फुले यांच्या वेगवेगळ्या शताब्दी पर्वानिमित्त एका दलित साहित्य संमेलनाचे तसेच एका जन साहित्य संमेलनाचे आयोजन करण्याचा निर्णय घेतला गेला होता. त्यानुसार विदर्भ साहित्य संघातर्फे प्रथमच आयोजित होत असलेल्या दलित साहित्य संमेलनाच्या आयोजनाकरता. वि. सा. संघाचे अध्यक्ष प्रा. सुरेश द्वादशीवार तसेच कार्याध्यक्ष श्री. वामन तेलंग यांच्या अध्यक्षतेखाली कार्यकर्त्यांच्या बैठका होऊन त्यात संमेलनातील विविध कार्यक्रमांची आखणी करण्यात आली. प्रसिद्ध विचारवंत डॉ. भाऊ लोखंडे यांची २९ डिसेंबर रोजी होणाऱ्या या संमेलनाचे अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली.

संमेलनाचे संयोजन डॉ. ज्योती लांजेवार करीत असून अन्य भाषा साहित्य विभागाचे आमंत्रक व युगवाणीचे संपादक श्रीपाद भालचंद्र जोशी हे संमेलनाचे आमंत्रक आहेत. संमेलनाचे उद्घाटन केंद्रीय राज्यअर्थमंत्री व वि. सा. संघाचे माजी चिटणीस ना. शांतारामजी पोटदुखे हे करणार असून महाराष्ट्र राज्याचे समाज कल्याण, राज्यमंत्री, ना. श्री. रामदास आठवले हे प्रमुख अतिथी असतील.

जनसाहित्य संमेलन

विदर्भ साहित्य संघातर्फे प्रथमच स्वतंत्रपणे आयोजित करण्यात येत असलेल्या जनसाहित्य संमेलनाची तयारी सुरू करण्यात आली असून वि. सा. संघाचे अध्यक्ष प्रा. सुरेश द्वादशीवार यांच्या अनुमतीने डॉ. रविंद्र शोभणे यांनी या संमेलनाचे संयोजन करण्याची जबाबदारी स्वीकारली आहे.

युगवाणीचे संपादक व अन्य भाषा साहित्य विभागाचे आमंत्रक श्री. श्रीपाद भालचंद्र जोशी या संमेलनाचे आमंत्रक असून या संमेलनातील कार्यक्रम, अध्यक्ष व इतर आयोजनविषयक बाबी

संबंधाने निर्णय घेण्याकरता लवकरच कार्यकर्त्यांची बैठक होत आहे. फेब्रुवारी ९२ दरम्यान हे संमेलन आयोजित केले जाईल.

विदर्भ सहित्य संघ : परीक्षा समिती

दिनांक १५ जुलै ते ५ डिसेंबर १९९१ मध्ये भाषा-परिचय वर्ग आयोजित करण्यात आला. दिनांक ५ डिसेंबर रोजी श्री. किरण देशपांडे यांच्या हस्ते प्रमाणपत्र वितरणाचा कार्यक्रम होऊन भाषा परिचय वर्गाचा समारोप झाला.

सप्टेंबर सत्रातील परीक्षा दिनांक १२ व १३ ऑक्टोबर रोजी संपन्न झाल्यात. एकूण सात केंद्रावर परीक्षा घेण्यात आल्यात. परीक्षार्थी संख्या ७०० होती. दिनांक ३०-११-९१ रोजी निकाल घोषित करण्यात आला.

शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांकरिता हस्तलिखित स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे.

श्रीशिवाजी संदर्भ ग्रंथालय

सप्टेंबर १९९१ ते ३० नोव्हेंबर १९९१ कालावधीत श्रीशिवाजी संदर्भ ग्रंथालयाने ग्रंथसहवास उपक्रमाचे खालीलप्रमाणे कार्यक्रम केले.

दि. १-९-९१	श्री. साकुळकर यांचे घर, रघुजीनगर, नागपूर
दि. ५-९-९१	संत जोसेफ विद्यालय, जयताळा, नागपूर १६
दि. १३-९-९१	ॲड. श्रीकांत बडगे यांचे निवासस्थान
दि. २-१०-९१	श्री. व सौ. मढीकर यांचे निवासस्थान, व्यंकटेशनगर, नागपूर
दि. २०-१०-९१	प्रशांतनगर, नागपूर
दि. २२-१०-९१	गृहिणी समाज, रामदास पेठ, नागपूर
दि. १७-११-९१	सौ. सुहासिनी वैद्य यांचे घर ७३, शंकरनगर, नागपूर

एप्रिल १९९० ते डिसेंबर १९९१ पर्यंतचे आजीव सभासद

नागपूर-प्रदीप शरद्चंद्र मुक्तिबोध, पुरुषोत्तम यशवंतराव जोशी, मिलींद दिनकर ठोकरू, सुधीर पंढरपूरकर, सौ. वीणा सुरेश देशपांडे, सौ. मृणालिनी केळकर, सौ. पद्मिनी भांडारकर, प्रभाकर शंकर मराठे, प्रदिप दत्तोबाजी मोहिते, रमेश नारायणराव शेटे, मुकुंद शेषराव पाचखेडे, देवराव यादवराव फुलझेले, डॉ. रवि बळीरामजी चरडे, प्रमिला मदन भागवत, प्रा. कृष्णा वसंतराव साकुळकर, दीपक बी. देहाडराय, सुरेश शांताराम दांडेकर, शशिकांत गंगाधरराव साठे, शामल बी. हजारे, अनंती बी. हजारे, घनश्याम दाढे, चंद्रकांत लक्ष्मण चन्ने, सौ. तारा धरमचंद चोपडे, प्रभाकर पांडुरंगपंत अंजनकर, धनंजय वर्मा, शिशिरकुमार मुखर्जी, श्रीधर गजानन देसाई, अनिरुद्ध

नारायणराव आचार्य, पंजाबराव देशमुख, माधव गोविंद हस्तक, सुरेश पंढरीनाथ नेहेते, डॉ. प्रकाश ओंकार खरात, अजय प्रतापराव वडकस, मुकुल बऱ्हाणपुरे, रेखा दिपक चोंडेकर, दिपक प्रभाकर चोंडेकर, बाबा मोहड, कु. रागिणी म्हैसाळकर, कु. मंजिरी म्हैसाळकर, डॉ. रोहित देव, प्रवीण रत्नाकर लाखे, सुनिलकुमार दांडेकर, विनायकराव गजरलवार, रेविदास दुस्सावार, दिनेश रामकृष्ण निनावे, अशोक तुंबडे, पराग कमलाकर दिवसे, राजेश गोपाळ चिटणीस, शाम वासुदेव धर्माधिकारी, सुहृद गणपतराव बोकारे, आशिश धर्माधिकारी, विवेक शांताराम दुसाने, धनंजय वसंतराव लिंबेकर, सौ. श्रद्धा मधुकर पराते, भूषण मधुसूदन बनहट्टी, मंदार मधुसूदन बनहट्टी, काननवाला अरोरा, त्रिलोक अरोरा, निलाक्षी परांजपे, सौ. रत्नप्रभा बऱ्हाणपुरे, अनिल देशमुख, ए. जी. बेंदरे, पालवे नंदकिशोर विश्वनाथ, सौ. वसुधा राजुरकर, (साकोली)-प्रा. भागवत शिवराम भोयर, राम दशरथ महाजन, मोरस्कर दिवाकर काशीराम, सुरेश कापगते, ब्रिजीलाल पाटील, जयंत कटकवार; विनोद देवपुजारी, प्रा. शंकर आ. बागडे, प्रा. ए. आर. केवट, प्रा. रत्नाकर तिडके, प्रा. एम. ए. घोत्रे, श्री. अरुण क्षीरसागर, भीमराव सीताराम विठ्ठले, क्रिष्णकुमार उजवणे, जगदीश लोहिया, वासुदेवराव बावनकुळे, कु. शालिनी भोयर, नरेंद्र दामोधर उमाळे, एस. एस. माखाडे, मार्तंड गायधने, प्रा. उत्तमराव गायधने, बाबा मोहड. (अकोला)-सौ. अर्चना जी. पाटील. (अमरावती)-वासुदेव बळवंत खापर्डे (पुसद)-प्रा. गुल्हाने दिनकर माधव, गुलाबराव नाईक, सौ. सुलभा नाईक, प्रा. शंकर गणपत चव्हाण. (लाखनी)-दिनेश केदारनाथ गुप्ता, रामचंद्र गोविंद आर्वीकर, सूर्यनारायण सुब्रम्हणीयन भारद्वाज, कु. मिरा राजाराम मोहतुरे, डॉ. नूरचंद रामचंद्र पाखमोडे, दौलत श्रीरामजी लांजेवार, महेश रुपचंदजी रोकडे, सुरेन्द्र उदेभान मेश्राम, राम केशव हुकरे, रमेश आनंद खंडीकर, डॉ. सुधीर रणदिवे, युनुस अब्दुल सत्तार आकबानी, मधुकर डोमाजी गायधनी, विनोद गोविंद ठेंगडी, दिनेश श्रीपत सहस्त्रबुद्धे, उमराव मोतीराम बावनकुळे. सौ. इंदिराबाई दौलत बोरकर, गुलाब कवडोजी गिऱ्हेपुंजे, रामभाऊ शिवाजी डेकाटे. सजय गोविंदराव पोहरकर, सोनीराम विस्तारी हलमारे, भगवान महादेव मते, एकनाथ सदाशिव दोनाडकर, केवलराम तुलाराम सावरकर, मारुती मगरुजी खराबे, गोविंदराव शिवाजी निवेकर, विजय मनिरामजी कठाणे, दुलिचंद कोंडूजी लाळे, प्रा. केशव गणपत पाखमोडे, नारद कवडूजी गिऱ्हेपुंजे, केशव मोडकुजी भुरे, गुलाब शामराव खडसे, भैय्या विस्तारी बावनकुळे, डॉ. विकास शंकर गभने, दशरथ मो. महाजन, दुलिचंद नारायण बोरकर, सौ. उमादेवी राम हुकरे, सौ. सिंधुताई युवराज हटवार. (नाशिक)-राम विनायकराव पाठक, सौ. चित्रा रविकिरण म्हाळस. (आरमोरी)-नारायण बापुजी वटी, सौ. विशाखा पु. वंजारी, विजयकुमार नामदेव ठवरे, प्रा. पी. एच. बाळवुद्धे, प्रा. सुरेश खोंड, दिगंबर रामजी झंझाड, महादेव आत्माराम दहिकार, प्रा. गंगाधर जुआरे, विजय मारोतराव सोरते, सौ. माया गणेशराव हेमके, हैदर हुसेनभाई पंजवानी, डॉ. महेश कोपुलवार, डॉ. गुणानंद पिसे, गणपती वडपल्लीवार, मुरधीकर इरमलवार. (दर्यापूर)-प्रा. रामदास मुगुटराव देवके, (नागभीड)-तुळशीराम नारायण बोरकुटे, रविंद्र मोतीराम समर्थ, मिलींद दिनकर ठोकरु, मोतीराम समर्थ, प्रा. हरिदास फटींग; विजय तुळशीराम ठाकरे, प्रा. अमीर अकबर हुसेन धमानी, न. त. येसनुसरे, सौ. कांताबाई चितावार, नामदेव मेश्राम, प्रा. विनायक मारोती खरात; मधुकर बाबुराव

झाडे, वासु शिवाजी लामसोंगें, रमेश सदाशिव काळे, अशोक सालोडकर, आश्विन वारलूजी कोरे, वसंतराव पांडूरंगजी ढोरे, प्रा. विनायक सोनटक्के, प्रा. उमार्जी आनंदराव हिरे, प्रा. मोहन आनंदराव जगनाडे, पद्माकर केशवराव गजपूरे, राजेन्द्र विठ्ठलराव आमले, अतूल लहानुजी वऱ्हाडे, डॉ. व्ही. डी. पाथोडे, प्रा. रमेश विठोबाजी जिभकाटे, वामन विठोबाजी मायनकर, प्रा. जयंत बी. लांजेवार, सौ. रश्मी राजेश वंड, प्रा. सुभाष एच. जाधव, राकेश सत्यनारायण गुप्ता, रविंद्र वसंतराव चिल्लुरे, सौ. छाया जगनाडे, सौ. शोभा चिल्लुरे, सौ. लता शेवाळकर. (चंद्रपूर)–सुधीर सीताराम चंद्रात्रे, सौ. जयश्री जगन्नाथ सराफ, श्री. जगन्नाथ केशव सराफ, सौ. साने, राजेंद्र यशवंत साने. सौ. सविता भास्कर भट, सौ. जया सुरेश द्वादशीवार, विजय गजानन दत्तात्रेय, विनोद बाळकृष्ण दुर्गपुरोहित, उदय गजानन कुमडेकर, मोहन व्यंकटेश दड्डीकर, किशोर धरणीधर गुर्जर, सौ. विद्या किशोर गुर्जर, सौ. इंद्रायणी पु. धनकर, सौ. कल्याणी ए. सराफ, डॉ. विजय हरिभाऊ धनकर, एकनाथ वासुदेव सराफ, श्रीपाद महादेवराव बडवे, सौ. अरुण बी. कुल्लुरवार, दीपक मोरेश्वर चाडावार, सौ. सरिता जांभुळे, मोहम्मद जिलानी, प्रा. योगेश गिरीजाशंकर दीक्षित, सुभाष शामराव पोटदुखे, विनोदकुमार नकनवार, संजय मधुकर भागवत, अजय मुरलीधर स्वामी, विजय विठ्ठल मार्कंडेवार, डॉ. सौ. प्रणोती मार्कंडे, डॉ. प्रफुल्ल भास्करवार, सौ. मधूलता अजय स्वामी. (तुमसर)–प्रा. अशोक काळे, प्रा. सुलोचना महादुले, प्रा. कुमारी वीणा कुंभारे, प्रा. सुनिल गचके, प्रा. तानाजीराव खळतकर, प्रा. तुलसीदास कोचे, संजय दत्तात्रय दलाल, प्रा. गोपाल लक्ष्मण भोयर, प्रा. सुनिल कोन्होलकर, प्रा. सुभाष पडोळे, ललितकुमार थानथराटे, सौ. सुरुचि साखरवाडे, प्रकाश दत्तात्रय पात्रीकर, प्रा. विलास राणे, बळवीर रतिराम तुरकर. (रामटेक)–बळवंत नथ्थूजी येरपुडे, रामकृष्ण नथ्थूजी झंझाड, डॉ. कमलाकर मिरगुजी लेंडे, विवेक चिंतामणराव गोखले, गणपतराव मुकुंदराव चाफले, हरिभाऊ गोविंदराव चाफेकर, हरिभाऊ गोविंदराव तारसटवार, श्रीधव शंकरराव घुळे, शशिकांत लक्ष्मण कावलकर, केशव गोपाळराव चित्रिव, अशोक बाबूलाल हांडे शांताराम रामाजी उईके, सुरेश बालाजी भगत, प्रकाश जनार्दन कस्तुरे, अरविंद गोविंदराव तोतडे, सुरेश नत्थूजी मालपे, विश्वेश्वर शंकरराव टाकळे, आनंदराव देशमुख, नामदेवराव दौलतराव कडूकर, (भंडारा)–वामन गंगाधर तुरीले, रामाजी सखाराम गायधने, कु. माधुरी सुतोने, सौ. कल्पना पनके, सौ. वासंती पांढरीपांडे, नि. तु. रणदिवे, सौ. विशाखा गुप्ते, प्रदीप गादेवार, सौ. सुधा द. कापरे, संजय सुधाकर हांडे, श्रीकांत मधुसूदन गोडबोले, प्रा. सुमंत हनुमंतराव देशपांडे सौ. मालिनी तेजपाल रडके, सौ. शुभदा आगलावे, कु. चंद्रप्रभा डी. रामटेके, सौ. मधुश्री प्रमोद पाठक, गिरीश किंजवडेकर. (कारंजा लाड)- सौ. चंद्राताई अग्रवाल. (काटोल)–प्रा. कृष्णकांत बिडकर, (पुणे)–डॉ. गंगाधर नारायण जोगळेकर. (हिंगोली)–प्रा. द. ना. मातेकर. (औरंगाबाद)–सौ. लक्ष्मी विकास भावढाणकर. (जवाहरनगर)–डॉ. चंद्रमोहन गुप्ता, श्री. वसंत चन्ने, तीर्थराज राजाराम कापगते, रुपरेश उरकुडाजी रोटके, घनश्याम डोंगरे. (कामठी)–सौ. कुंती अंबिकाप्रसाद पांडे, (मूल)–श्री. आपटे. (यवतमाळ)–शुभदा दि. मुंजे, सुधाकर बुलबुले. (नांदेड)–शोभना संजय भागवत. (वाराणसी) –डॉ. सुरेश पुरुषोत्तम भृगुवार. (कन्हान)–वसंत रामचंद्र साळवणकर. (दिल्ली)–ज. श. वाटाणे, मधुकर बुलबुले. (सावनेर)–प्रा. भास्कर नंदनवार.

डिसेंबर ९१ पर्यंत नूतनीकरण झालेल्या शाखा

१. काटोल, २. कन्हान, ३. मौदा, ४. आकोट, ५. वाशीम, ६. कारंजा लाड ७. उमरखेड, ८. पुसद, ९. पांढरकवडा, १०. वणी, ११. ब्रम्हपूरी, १२, नागभीड, १३. आरमोरी, १४. देऊळगावराजा, १५. खामगाव, १६. पातुर्डा, १७. भंडारा, १८. गोंदिया, १९. जवाहरनगर, २०. तिरोडा, २१. लाखनी, २२. साकोली, २३. पालांदूर

नवीन शाखा

१. कारंजा घाडगे, २. गोरेगाव.

विदर्भ साहित्य संघाच्या सर्व सभासदांना नव वर्षाच्या शुभेच्छा.

सरचिटणीस

विदर्भ साहित्य संघ, नागपूर

सर्व सभासदांसाठी निवडणूक-विषयक अधिसूचना

(घटना कलम १२ (अ) नुसार)

विदर्भ साहित्य संघाच्या सर्व सभासदांना सूचित करण्यात येत आहे की दिनांक १-४-१९९२ ते ३१-३-१९९५ ह्या तीन वर्षाकरिता विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष व कार्यकारी मंडळाचे २० (वीस), सभासद यांच्या निवडणुकीचा कार्यक्रम खालीलप्रमाणे राहील.

१. वरील पदाकरिता पाठवावयाच्या नामनिर्देशनपत्रिका निर्वाचनाधिकाऱ्यांच्या नावे केंद्रीय कार्यालयात सोमवार दिनांक १३-१-१९९२ सायंकाळी ८ वाजेपर्यंत [illegible] मतदारांच्या सूचीतील कोणत्याही व्यक्तीस सभासदांच्या सूचीतील (कुठल्याही) कोणत्याही व्यक्तीचे नाव तिच्या लेखी अनुमतीसह सुचविता येईल. नामनिर्देशनपत्र जर पोस्टाने पोचते करणे असेल तर ते "रजि. पोष्ट अॅकनॉलेजमेंट ड्यू" पद्धतीने पोचते केले पाहिजे. अशा तऱ्हेने पोचते झालेले नामनिर्देशनपत्र जर नेमलेल्या अंतिम तारीख व वेळेपर्यंत निर्वाचनाधिकाऱ्यास मिळाले असेल तरच ते छाननीत घेतले जाईल.

२. मंगळवार, दिनांक १४-१-१९९२ सायंकाळी ७ वाजतापासून केंद्रीय कार्यालयात उमेदवारांच्या नामनिर्देशन पत्रिकांची छाननी करण्यात येईल. ह्यावेळी उमेदवारांना स्वतः किंवा त्यांनी लेखी नेमलेल्या प्रतिनिधींना उपस्थित राहता येईल.

३. छाननीअंती स्वीकृत झालेल्या उमेदवारांची यादी केंद्रीय कार्यालयाच्या सूचना फलकावर मंगळवार दिनांक १४-१-१९९२ ला लावण्यात येईल.

४. नामनिर्देशन-पत्रिकांच्या स्वीकृती किंवा अस्वीकृतीबाबत लवादाकडे तक्रारअर्ज करण्याची अंतिम तारीख शनिवार दिनांक १८-१-१९९२ सायं. ७ वाजेपर्यंत ही राहील.

५. लवादासमोरील पहिल्या सुनावणीकरिता गुरुवार दिनांक २३-१-१९९२ सायं. ७ ही तारीख व वेळ निश्चित करण्यात आली आहे.

६. तक्रारीच्या अंतिम निकालाची तारीख गुरुवार दिनांक ३०-१-१९९२ सायंकाळी ७ वाजता राहील.

७. नामनिर्देशन-पत्रिका परत घेण्याची अंतिम तारीख बुधवार दिनांक ५-२-१९९२ सायंकाळी ७.३० वाजेपर्यंत राहील.

(पुढील पानावर)

(मागील पानावरून)

८. उमेदवारी परत घेतल्या न गेलेल्या व ज्यांची उमेदवारी वैध आहे अशा उमेदवारांची यादी बुधवार दिनांक ५-२-१९९२ ला रात्री ९ वाजताचे सुमारास केंद्रीय कार्यालयाच्या सूचना फलकावर लावण्यात येईल.

९. मतदारांना केंद्रीय कार्यालयातून सोमवार दिनांक १७-२-१९९२ रोजी मतपत्रिका पाठविण्यात येतील.

१०. सभासदांकडून मतपत्रिका केंद्रीय कार्यालयाकडे शनिवार दिनांक ७-३-१९९२ ला सायंकाळी ८ वाजेपर्यंत पोचणे आवश्यक आहे.

११. मतपत्रिका-मोजणी रविवार दिनांक ८-३-१९९२ ला सकाळी ९ वाजेपासून केंद्रीय कार्यालयात सुरू होईल.

१२. निवडणुकीचा निकाल रविवार दिनांक ८-३-१९९२ ला विदर्भ साहित्य संघ, केंद्रीय कार्यालयात मतमोजणी संपल्यावर लगेचच घोषित करण्यात येईल.

१३. १३ (अ) घटना कलम १२ ड प्रमाणे एकूण निवडणूक प्रक्रियेविषयी तक्रार नोंदविण्याची अंतिम तारीख व वेळ सोमवार दिनांक १६-३-१९९२ सायंकाळी ७ वाजेपर्यंत ही राहील.

(ब) लवादाकडून तत्संबंधी निकाल देण्याची अंतिम तारीख गुरुवार दिनांक २६-३-१९९२ सायंकाळी ७ वाजता ही राहील.

टीप :-

१. नामनिर्देशनपत्र विदर्भ साहित्य संघाच्या केंद्रीय कार्यालयात रोख रु. ५/- (रुपये पाच फक्त) भरून दिनांक ३-१-१९९२ पासून सायंकाळी ६-३० ते ८-३० या कार्यालयीन वेळात प्राप्त होतील. नामनिर्देशनपत्रिकेच्या शेवटी टीपेतील सूचना बंधनकारक राहतील.

२. घटना कलम १२ (अ) प्रमाणे अध्यक्षपदासाठी रु. ५००/- (रुपये पाचशे फक्त) व कार्यकारिणी सदस्यपदासाठी रु. ३००/- (रुपये तीनशे फक्त) प्रत्येक उमेदवारास रोख स्वरूपात किंवा बँक ड्राफ्टच्या स्वरूपात अनामत रक्कम म्हणून कार्यालयात जमा करावी लागेल. बँक ड्राफ्ट विदर्भ साहित्य संघाच्या नावे काढलेला असावा.

३. निवडणुकीसंबंधीचा सर्व पत्रव्यवहार निर्वाचनाधिकारी, विदर्भ साहित्य संघ, झाशी राणी चौक, सीताबर्डी, नागपूर-४४० ०१२ ह्या पत्त्यावर करावा. अन्य पत्त्यावर केलेल्या पत्रव्यवहाराची जबाबदारी स्वीकारण्यात येणार नाही.

नागपूर :
दिनांक : ३१ डिसेंबर १९९१


(रामकुमार श्रीवास्तव)
निर्वाचन अधिकारी,
विदर्भ साहित्य संघ, नागपूर



विदर्भ साहित्य संघाच्या पहिल्याच दलित साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. भाऊ लोखंडे यांचे मानचिन्ह व शाल, श्रीफळ देऊन स्वागत करतांना वि. सा. संघाचे अध्यक्ष प्रा. सुरेश द्वादशीवार

PRINTED MATTER PERIODICAL

युगवाणी
सप्टेंबर-नोव्हेंबर '९१
मूल्य दहा रुपये




●●

"गद्यरुपात (मूळ व भाषांतरित) पाली व संस्कृतात बौद्धसाहित्य प्रचंड प्रमाणात उपलब्ध आहे. दलित साहित्यिकांनी बौद्ध साहित्याचे अवगाहन केल्यास त्यांना मार्क्सवादाकडे दीक्षा व प्रेरणेसाठी जावे लागणार नाही. बौद्धजातक कथा साहित्याने केवळ हितोपदेश व पंचतंत्रावर नव्हे तर इसापनीती व अरेबियन नाईटस् सारख्या वैश्विक कथासाहित्यावर आपला प्रभाव पाडला आहे. आपण त्याचा पाथेय म्हणून उपयोग केला पाहिजे."

●●

विदर्भ साहित्य संघाच्या प्रथमच आयोजित
दलित साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. भाऊ लोखंडे
(सविस्तर वृत्तांत पुढील अंकात)



विदर्भ साहित्य संघाच्या मूल येथे १०, ११, १२ जानेवारी १९९२ रोजी आयोजित
विदर्भ साहित्य संमेलनाचे अध्यक्ष श्री. उद्धव शेळके यांची निवड झाली.
त्यांचे हार्दिक अभिनंदन!

प्रकाशक : मनोहर म्हैसाळकर, सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ, नागपूर-१२
मुद्रक : मधुसूदन पांडुरंग ब्रनहट्टी, नारायण मुद्रणालय, धनतोली, नागपूर-१२
मुखपृष्ठ मुद्रण : मधुकर वैद्य, मधुकर आर्टस, धनतोली, नागपूर-१२